**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**अर्धा-तास चर्चा**

**पृ. शी.** : रोजगार हमी योजनेच्या मजुरीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : रोजगार हमी योजनेच्या मजुरीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता यासंबंधी श्री. भास्कर जाधव, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणा-या मजुरांना देण्यात येणा-या दैनिक मजुरीमध्ये सन 2004मध्ये कपात करणे, हे सुधारित दर सन 2001च्या दराच्या तुलनेत 3 ते 37 टक्के कमी होणे, पर्यायाने पूर्वीच्या दराने मजुरी मिळण्यासाठी मजुरांना 35 ते 59 टक्के अधिक वेळ काम करावे लागणे, यामुळे रोजगार हमी योजनेतील मजुरांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय मी या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेअंतर्गत जी काही कामे सुरु आहेत मग ती रस्त्याची असतील, जलसंवर्धनाची असतील फळलागवडीची असतील या कामाच्या संदर्भातील ज्या काही त्रुटी आहेत त्याकडे तसेच या रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या मजुरांना मिळणाऱ्या मजुरीच्या बाबतीत योग्य निर्णय घेणे अपेक्षित असल्याने त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. ही रोजगार हमी योजना महाराष्ट्र राज्यामध्ये रिकाम्या हाताला काम आणि उपाशी पोटाला भाकर मिळावी या उद्देशाने 1978मध्ये या राज्यात अस्त्वित आली. आता या रोजगार हमी योजनेचे स्वरुप केवळ राज्यापुरते मर्यादित राहिलेले नाही तर या योजनेला राष्ट्रीय स्वरुप प्राप्त झालेले आहे. एप्रिल 2008 पासून ही योजना संपूर्ण देशामध्ये लागू

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...)

करण्याचा निर्णय केन्द्र शासनाने घेतलेला आहे. या रोजगार हमी योजनेवर काम करणारी माणसे ही दुष्काळी भागातील, अर्वषणप्रवण क्षेत्रातील, ज्या ठिकाणी पाऊस पडत नाही, शेती भिजवता येत नाही अशा भागातील असतात. अशा या माणसाच्या हाताला काम मिळाले पाहिजे, त्याच्या पोटाची खळगी भरण्यासाठी त्याला दिवसातून तीन वेळा नाही तरी किमान एक वेळा तरी पोटभर जेवता आले पाहिजे या उद्देशाने ही योजना अस्तित्वात आली. ही योजना अस्तित्वात आली त्यावेळचा महागाई निर्देशांक आणि आताचा महागाई निर्देशांक यामध्ये खूप फरक पडलेला आहे. आज कालचाच महागाई निर्देशांक 7.41 इतका वाढलेला आहे. म्हणून त्यावेळच्या मजुरीचा दर आणि काम व आता देण्यात येणा-या मजुरीचा दर आणि काम, तसेच स्त्री मजुराने केलेले काम आणि पुरुष मजुराने केलेले काम याचे मोजमाप करुन मजुराला किती मजुरी देणे आवश्यक आहे हे निश्चित केले पाहिजे. हे सांगण्याचे कारण असे की, आता मजुराला जी मजुरी देण्यात येते ती फार अल्प आहे. सद्य:परिस्थितीमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुराला 68 रुपये मजुरी दिली जाते. ही मजुरी आजची महागाई लक्षात घेता परवडत नाही. खोदाईचे काम, कुशल-अकुशल काम यानुषंगाने प्रचलित मजुरीचे दर ठरविले जातात. म्हणून 68 रुपयामध्ये काम करणारा माणूस शोधून देखील सापडणार नाही. हे खरे आहे की, ग्रामीण भागातील माणसाच्या हाताला काम आणि पोटभर अन्न मिळावे ही या योजनेची संकल्पना असली तरी या योजनेच्या माध्यमातून फार मोठी राज्याच्या विकासाची कामे होत असतात. रस्त्यांची, जलसंधारणाची, फळलागवडीची कामे या योजनेतून होत असतात. आता फळलागवडीमुळे मोठया प्रमाणावर फलधारणा होत असल्यामुळे परकीय चलन देखील मोठया प्रमाणावर मिळू लागले आहे. या पार्श्वभूमीवर या मजुराच्या पोटाला एकवेळचे अन्न द्यावयाचे म्हटले तरी त्याला 68 रुपया ऐवजी किमान 100 रुपये मजुरी मिळणे अत्यंत गरजेचे आहे अशी माझी पाहिली मागणी आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजूर हे उन्हातान्हात काम करीत असतात त्यामुळे कामाच्या ठिकाणी त्यांच्या विश्रांतीसाठी निवारा शेड बांधण्यात येते. परंतु आमच्या कोकणामध्ये एकाही रोजगार हमी योजनेच्या कामावर ही निवारा शेड बांधलेली दिसत नाही, मात्र

..3..

(श्री. भास्कर जाधव...)

कामाच्या एस्टिमेटमध्ये शेडचा खर्च अंतर्भूत असतो. या संदर्भात विचारणा केली असता असे सांगण्यात येते की, कोकणामध्ये झाडी जास्त असल्यामुळे निवारा शेडची आवश्यकता नाही. माझे म्हणणे असे आहे की, निवारा शेडचा खर्च कामाच्या एस्टिमेटमध्ये दाखविलेला असेल आणि नैसर्गिक निवारा शेड उपलब्ध असेल तर अशा ठिकाणी काम करणा-या मजुरांना निवारा भत्ता देणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 11:05

श्री. भास्कर जाधव...

आज कोकणात पाहिले तर रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मोठया प्रमाणात फळझाड लागवड केली जात आहे. 100 टक्के अनुदानातून फळझाड लागवडीचा कार्यक्रम राबविण्यात येतो आहे, त्या कार्यक्रमाचा रिझल्ट अतिशय चांगला मिळाला आहे. कोकणामध्ये या कार्यक्रमांतर्गत फळझाड लागवड केल्यानंतर लाभार्थ्यांना हप्त्या हप्त्याने पैसे दिले जातात. परंतु ही फळझाडे वाढविण्यासाठी कोकणात मात्र पाण्याची मोठी टंचाई आहे. फळझाडांची लागवड करण्यारे लाभार्थी फळझाडे जगावित म्हणून दोन-दोन, तीन-तीन मैलावरुन डोक्यावर भांडी घेऊन पाणी आणतात आणि ते पाणी फळझाडांवर शिंपडतात. कोकणात फळझाडांची लागवडीचा कार्यक्रम चांगल्या प्रकारे राबविता जातो आहे, परंतु ही फळझाडे जगविण्यासाठी लाभार्थ्यांना पाण्याची उपलब्धता रोजगार हमी योजनेतून करुन देण्याच्या देखील गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये उनाड गुरांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे. कोकणात गुरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नाही. उनाड गुरांना चरण्यासाठी स्वतंत्र असे क्षेत्र नसल्यामुळे ती उनाड गुरु कोणाच्याही शेतात जाऊन फळझाडांचे नुकसान करतात. पर्यायाने फळझाड लागवड करण्या-या लाभार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. उनाड गुरांपासून संरक्षण मिळावे म्हणून फळझाड लागवडीच्या क्षेत्राच्या बाहेरच्या बाजूस गडगा घालण्याची आवश्यकता आहे. सदर गडगा घालण्याच्या कामाचा समावेश रोजगार हमी योजनेत केला तर रोजगार हमी योजनेच्या मुजुरीचे दर वाढतील याही गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी सूचना आहे. कुशल आणि अकुशल अशा प्रकारची कामे कोकणात रोहयोच्या माध्यमातून केली गेली तर रोजगार निर्मिती मोठया प्रमाणात होऊ शकेल, स्थानिक मजुरांना रोजगार मिळू शकेल म्हणून याही गोष्टीचा शासनाने विचार करणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजनेच्या बाबतीत शासनाने 60X40 रेश्यो तयार केला आहे त्याबाबतीत दुमत असण्याचे कारण नाही. परंतु आता शासनाने 51X49 असा रेश्यो नव्याने तयार केला आहे. यात 51 टक्के कामे अकुशल आणि 49 टक्के कामे कुशल असावीत अशा प्रकारचा हा रेश्यो आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कुशल आणि अकुशल कामे व्हावीत मोठया प्रमाणात व्हावीत या हेतूने रेश्यामध्ये शासनाने बदल केला त्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. शासनाने रोजगार हमी योजने बरोबरच संपूर्ण महाराष्ट्र ग्रामीण

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

रोजगार हमी योजनेची संकल्पना आणली आहे. परंतु या योजनेचे पूर्णपणे नियोजन आणि अधिकार ग्रामपंचायतीला आणि ग्रामसभेला देण्याचे ठरविले आहे. कदाचित आपल्याला दोन, चार दिवसापूर्वीच्या वृत्तपत्रात एक वृत्त वाचनात आले असावे. संपूर्ण कोकणातील ग्रामसेवकांनी या योजनेची अंमलबजावणी करण्यास बहिष्कार घालण्याचे ठरविले आहे. कोकणात रोजगार हमी योजनेची कामे करण्यासाठी स्थानिक मजूर उपलब्ध होत नाहीत. कोकणात रोहयोची कामे करण्यासाठी बाहेरुन मजूर आणावे लागतात. रोजगार हमी योजनेवरील मजुरांची मजुरी पोस्टाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. त्या मजुरांना पोस्टात खाते उघडावे लागणार असून त्या मजुरांच्या मजुरीचे पैसे पोस्टाच्या खात्यात परस्पर जमा होतात. मजुरांना मजुरी देताना ग्रामसेवक आणि सरपंच हे फक्त सहयांचे मालक राहणार आहेत. या योजनेत काही कमी जास्त झाले तर सरपंच आणि ग्रामसेवक यांना जबाबदार धरले जाणार आहे. या लोकांना जबाबदार धरुन चालणार नाही. कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा विचारन न करता, भौगोलिक रचनेचा विचार न करता शासनाने संपूर्ण महाराष्ट्रासाठी या योजनेच्या संदर्भात एकच निर्णय आणि एकच कायदा केला आहे. या कायद्याच्या कचाटयात सापडू नये, या कायद्याला तोंड द्यावे लागू नये, नोकरीवर गदा येऊ नये अशा भीतीने ग्रामसेवक ही योजना राबविण्यावर बहिष्कार घालण्याच्या प्रयत्नात आहेत. तसेच या योजनेची अंमलबजावणी करताना 55 टक्के कामे जलसंधारणाची झाली पाहिजेत, 20 टक्के कामे सामाजिक वनीकरणाची झाली पाहिजेत आणि 10 टक्के कामे वनीकरणाची झाली पाहिजेत अशा प्रकारचे बंधन घालून देण्यात आले आहे. महाराष्ट्रात रोजगार हमी योजना 1978 ते आज तागायत प्रभावीपणे राबविली जात आहे. या योजनेवर हजारो कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. रोजगार हमी योजना महाराष्ट्रात सुरु झाल्यापासून आज तागायत संपूर्ण महाराष्ट्रात एकूण किती रुपये खर्च झाला यासंबंधीचा आढावा माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. या सभागृहात नुकतेच सांगण्यात आले आहे की, रोजगार हमी योजनेसाठी 2 हजार कोटी रुपये शिल्लक ठेऊन या योजनेचा शिल्लक असलेल्या निधीचे समायोजन राज्य शासनाच्या तिजोरीमध्ये करण्यात आले आहे. या योजनेसाठी 2 हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला असताना त्या निधीतून 55 टक्के निधी जलसंधारणाच्या कामांवर खर्च झाला पाहिजे, 20 टक्के निधी सामाजिक वनीकरणाच्या कामावर खर्च झाला पाहिजे

3...



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 11:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

आणि 10 टक्के निधी वनीकरणाच्या कामावर झाला पाहिजे असे बंधन घालून देण्यात आले आहे. या राज्यात रोजगार हमी योजना अस्तित्वात आल्यापासून कोकणात रस्त्यांच्या कामावरच मोठया प्रमाणात खर्च केला गेला आहे. कोकणात रोजगार हमी योजनेतून रस्त्यांच्या कामांची मोठया प्रमाणात मागणी केली जाते, रोजगार हमी योजनेची दुसरी कोणतीही कामे करण्यास कोकणात अजिबात स्कोप नाही.

यानंतर श्री. कानडे...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) C-1

SSK/ KGS/ MMP/ 11:10

श्री. भास्कर जाधव ....

शासनाने अशा प्रकारची अट टाकली,किंवा अशा पध्दतीने रेश्यो आणि निकष ठरविले तर कोकणामध्ये रोजगार हमी योजनेतून कामेच होणार नाहीत. कारण कोकणची भौगोलिक रचना, तेथील लोकांची कामाची मागणी आणि गरजा विचारात घेता हे निकष शासन बदलणार आहे काय याबाबत मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये खुलासा करण्याची आवश्यकता आहे. या योजनेची प्रभावीपणे आणि यशस्वीपणे अंमलबजावणी होण्याकरिता ग्रामपंचायतीच्या सदस्यांपासून, सरपंचांपासून सर्वांना ट्रेनिंग देण्याची आवश्यकता आहे. यापूर्वी मी सदनामध्ये याबाबत उल्लेख केला होता. मंत्रीमहोदयांनी त्यावेळी सांगितले होते की 1978 सालापासून ही योजना सुरु झालेली आहे. सन्माननीय सदस्यांना ही योजना माहीत नाही काय ? परंतु सभापती महोदय, आम्ही लोकप्रतिनिधी 15/20 वषे काम करीत असल्यामुळे आम्हांला ही योजना माहीत नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही. परंतु संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना राबविण्याकरिता ट्रेनिंग देण्याची आवश्यकता आहे. कारण कोकणातील सर्व ग्रामसेवकांनी एकमुखी ठरविले आहे की या योजनेची जबाबदारी आमच्यावर नको. म्हणून ही योजना प्रभावीपणे आणि समर्थपणे अंमलात आणावी असे वाटत असेल तर ही योजना समजावून सांगणे आवश्यक आहे. यामध्ये तांत्रिक अडचणी काय आहेत आणि प्रॅक्टीकल अडचणी काय आहेत याची माहिती होणे आवश्यक आहे. यासंदर्भात कार्यशाळेचे आयोजन अधिवेशन संपण्यापूर्वी घेणार आहोत असे मंत्रीमहोदयांनी सांगितले होते. आता अधिवेशनाचा कालावधी वाढलेला असल्यामुळे यासंदर्भात एक कार्यशाळा आयोजित करावी अशी माझी मागणी आहे. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला याची गरज आहे. आमच्या मनातील शंका दूर झाल्या पाहिजेत. ही योजना अधिक कार्यक्षम कशी होईल याबाबत विचार करणे आवश्यक आहे. अकुशल लोकांना रोजगार मिळण्यासाठी किमान 100 रुपये मजुरीचा दर वाढविला पाहिजे.त्याचप्रमाणे निवारा शेड एस्टीमेटमध्ये दाखविल्या जातात परंतु प्रत्यक्षात बांधल्या जात नाहीत त्याला मंजुरी देणार काय ? स्थानिक पातळीवर मजूर मिळत नाहीत म्हणून याच राज्यातील मजूर विशेष बाब म्हणून कोकणामध्ये काम करण्यासाठी परवानगी देणार काय ? फळबागांसाठी गडगे बांधण्यासाठी मंजुरी देणार काय ? या प्रश्नांना मंत्रीमहोदयांनी सकारात्मक उत्तर द्यावे याचकरिता मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. मला बराच वेळ बोलण्याची संधी दिल्याबद्दल सभापती महोदय मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

15-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) C-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी अर्धा-तास चर्चेच्य माध्यमातून रोजगार हमी योजनेच्या बाबतीत काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत आणि या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने काही सूचना केलेल्या आहेत.

सर्वात महत्वाची बाब म्हणजे रोजगार हमी योजनेच्या बाबतीत मजुरांना रोजगार उपलब्ध करुन द्यावा, शेतीसाठी पर्याय म्हणून ही योजना नाही. जेव्हा अवर्षणाचा काळा असतो आणि शेतीमध्ये कामे नसेतील अशा वेळी लोकांना काम उपलब्ध व्हावे हा योजनेचा मूळ गाभा आहे. रोजगार हमी योजनेवरील मजुरीचे दर मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे ठरविण्याचे काम शास्त्रोक्त पध्दतीने केले जाते. कामगार विभागाकडून दर 2 ते 5 वर्षांच्या कालावधीत मजुरीचे दर ठरविले जातात आणि त्यानुसार अधिसूचना काढली जाते.मजुरीच्या बाबतीत शेवटची अधिसूचना आहे ती 14.3.2007 रोजी काढण्यात आली होती. परिमंडल 1,2,3 आणि 4 प्रमाणे परिमंडल एकसाठी 72 रुपये, परिमंडल दोन साठभ 70 रुपये, परिमंडल 3 साठी 68 रुपये आणि परिमंडल 4 साठी 66 रुपये असे मजुरीच्या दराचे वर्गीकरण केलेले आहे. हे दर ठरवीत असताना टाईम ॲन्ड मोशन स्टडीच्या बाबतीत जी काही काम करण्याची क्षमता असेल आणि महिलांच्या बाबतीत त्यांच्याकडून जे काम होऊ शकते त्याचा अंदाज घेऊन रोजचे मजुरीचे दर मिळू शकतील. यासाठी अभ्यास सुरु करण्याचे ठरविलेले आहे. अभ्यास झाल्यानंतर मजुरीच्या दराच्या बाबतीत निश्चित फरक पडेल असा अंदाज आहे. शेडच्या बाबतीत माननीय सदस्यांनी उल्लेख केला. निवारा म्हणजे शेड बांधण्याची एस्टीमेटमध्ये तरतूद असली तरी प्रत्यक्षात निवारा किंवा शेड बांधण्यासाठी एकूण कामाच्या खर्चाच्या 2.75 टक्के इतका खर्च करण्याची मर्यादा आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.कानडे 11:15

श्री.राणा जगजितसिंह पाटील.........

जर शेड बांधली तरच त्याचा खर्च एस्टीमेटमध्ये अंतर्भूत केला जातो. अन्यथा ज्याठिकाणी झाडे आहेत, सावली आहे तेथे शेडची तरतूद केली जात नाही आणि एस्टीमेटमध्ये तो खर्च धरला जात नाही. फलोत्पादनाच्या माध्यमातून फलोत्पादन योजना रोहयो अंतर्गत राबविली जाते. राष्ट्रीय फलोत्पादन योजनेच्या माध्यमातून शेततळी किंवा तत्सम योजना राबविण्याचा निश्चितपणे प्रयत्न करता येईल. त्यासाठी वेगवेगळया योजना आहेत. फळझाडांसाठी पाण्याची उपलब्धता करता येणे शक्य आहे. सन्माननीय सदस्यांनी गडगा किंवा दगडी बांधासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. डोंगर उताऱ्यावर दगडी बांध बांधण्यासाठी 16 जुलै, 2007 रोजी मंजुरी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांना जे अभिप्रेत आहे ते त्यामध्ये अंतर्भूत आहे अशी मला शक्यता वाटते. त्यात जर काही बदल अपेक्षित असतील तर निश्चितपणे त्याबाबत विचार केला जाईल. खास करुन कोकणाची भौगोलिक परिस्थिती, तेथे असलेली मजुरांची उपस्थिती यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडले आहेत. त्याबाबत ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांचा अभ्यास करुन योग्य तो निर्णय घेता येईल. 100 रुपये मजुरी देण्याबाबत मागणी केली आहे. परंतु ऑफ हॅण्ड ही मागणी मान्य करणे शक्य होणार नाही. मजुरीच्या दरामध्ये गेल्याच वर्षी बदल केला आहे. टास्क रेटसंबंधी टाईम अँड मोशन विचारात घेऊन बदल करण्याचा प्रयत्न करु. कोकणामध्ये जास्तीत जास्त रोहयोची कामे व्हावी अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. त्याबाबत निश्चितपणे शासन प्रयत्नशील राहील. रस्त्यांच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. जास्तीत जास्त मागणी ही रस्त्यांची असते. परंतु रस्त्यांची कामे करीत असताना जलसंधारण आणि मृदसंधारणाची कामे घेणे अपेक्षित आहे. एमआरईजीएसमध्ये ग्रामपंचायतींना 50 टक्के कामे ठरविता येऊ शकतात हा महत्वाचा भाग आहे. 50 टक्क्यापेक्षा जास्त कामे देखील ठरविता येऊ शकतात. कोणते काम प्राधान्याने करावयाचे आहे याचा प्रत्येक ग्रामपंचायतीने निर्णय घेणे अपेक्षित आहे. जलसंधारणाच्या कामांना अधिक प्राधान्य द्यायचे आहे. परंतु जलसंधारण आणि मृदसंधारणाची कामे होऊ शकत नसतील तर रस्त्यांची कामे घ्यायला कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. ग्रामसेवक रोहयोची कामे करणार नाहीत असा उल्लेख करण्यात आला. त्यांनी असे करणे योग्य नाही. त्यांच्या मदतीसाठी 12,000 ग्रामरोजगार सेवक नियुक्त करण्याचा निर्णय झालेला आहे. 1200 लोकांचे तांत्रिक पॅनेल नेमले जाणार आहे. अशा प्रकारचा प्रयत्न एमआरईजीएसच्या माध्यमातून राज्यात

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.कानडे 11:15

श्री.राणा जगजितसिंह पाटील.........

सुरु आहे. त्यातील पॉझिटिव्ह पॉईंट कन्सीडर करुन जास्तीत जास्त कामे करुन घेणे गरजेचे आहे. या योजनेची माहिती घेण्यासाठी लोकप्रतिनिधींसाठी कार्यशाळा निश्चितपणे आयोजित करु. परंतु फॉर्म नं.4 हा मजुरांची नोंदणी करण्याची प्रक्रिया वेगळी आहे. त्यापुढील सर्वात महत्वाचा भाग म्हणजे कामाची मागणी करणे हा आहे. मजूर म्हणून नोंदणी करणे ही प्रक्रिया वेगळी आहे. जॉब कार्ड मिळणे हा भाग वेगळा आहे. फॉर्म नं.4 भरुन देऊन कामाची मागणी करणे, कामाची मागणी केल्यानंतर ठराविक दिवसात काम दिले नाही तर त्यांना भत्ता दिला जातो. महाराष्ट्रात अशी एकही केस नाही, ज्या प्रकरणी भत्ता दिला गेला. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर दबाव आणायचा असेल तर फॉर्म नं.4 मोठया प्रमाणात भरुन देणे गरजेचे आहे. मी हे मान्य करतो की, एमआरईजीएसच्या बाबतीत ज्या प्रमाणात प्रतिसाद मिळायला हवा त्या प्रमाणात तो मिळत नाही. याबाबत सर्वात मोठी जबाबदारी लोकप्रतिनिधींची राहणार आहे. एकदा फॉर्म नं.4 भरुन दिल्यानंतर निश्चितपणे अधिकारीवर्ग कामाला लागतील. काम मिळवून देण्याची सर्वांची सामायिक जबाबदारी राहणार आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि सूचना मी कव्हर केलेल्या आहेत. या व्यतिरिक्त काही सूचना असतील, स्पेसिफिक सूचना असतील तर त्या लेखी स्वरुपात दिल्या तर चांगले होईल. धन्यवाद.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सन्माननीय सदस्यांच्या आणखी सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात द्याव्यात, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु रोजगार हमी योजना सुरु झाल्यापासून राज्यात जसे महसुली विभाग आहेत त्या विभागवाईज या योजनेवर किती खर्च झाला यासंबंधीची मी मागणी केली होती, ती माहिती माननीय मंत्री महोदय पटलावर ठेवणार काय ? त्याचप्रमाणे दुसरी गोष्ट अशी आहे की, एमआरईजीएस योजना प्रभावीपणे राबविली जात नाही, याचे कारण अधिकारी हेच आहे. कारण या कामांच्या बाबतीत नेहमी लोकप्रतिनिधीच यात पुढाकार घेतात. म्हणून क्र.4 चा जो फॉर्म असतो त्यासंदर्भात लोकप्रतिनिधींना माहिती देण्यात येणार काय ?

श्री. राणा जगजीतसिंह पाटील : महोदय, विभागवार कामाचा आढावा घेऊन ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल आणि एमआरईजीएसच्या बाबतीत तालुका व जिल्हा स्तरावर संबंधित अधिकारी तसेच पदाधिकाऱ्यांच्या देखील अनेक कार्यशाळा घेतलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे सर्व सन्माननीय सदस्यांची कार्यशाळा देखील येत्या 15 दिवसात घेण्यासंबंधीची तारीख निश्चित करण्यात येईल. अधिवेशन संपण्यापूर्वी सन्माननीय सदस्यांची इच्छा असल्यास येत्या शनिवार व रविवारला सुध्दा ही कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित रहावे, अशी माझी त्यांना व सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

-------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकणातील बदलते हवामान व अनुषंगिक
कारणांमुळे मत्स्योत्पादनात झालेली घट

**मु. शी.** : कोकणातील बदलते हवामान व अनुषंगिक
कारणांमुळे मत्स्योत्पादनात झालेली घट यासंबंधी सन्माननीय
सदस्य श्री.संजय केळकर वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास
चर्चा.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"कोकणातील बदलत असलेले हवामान, कारखान्याचे प्रदुषित पाणी गॅट करारामुळे मोठ्या व बाहेरील मच्छिमारांचे कोकण किना-यावर आक्रमण होत असणे, त्याचा परिणाम तेथील स्थानिक गरीब व असहाय्य मच्छिमारांवर होणे, आधीच प्रदूषण व लहरी निसर्गामुळे मच्छीचे प्रमाण कमी कमी होत जावून मच्छीव्यवसायाला आलेली मंदी, मोठे व पर्सियन नेट धारक मच्छिमार यांत्रिक बोटी व इतर सुसज्ज साधनसामुग्रीने मत्स्यव्यवसाय करीत असून गरीब मच्छीमारांना त्याचा फटका बसत असणे, सन १९८७ साली शासनाने गियरनेटद्वारे मच्छिमारीवर आणलेली बंदी, त्यावेळी पर्सियन नेटधारकानी न्यायालयातून शासनाच्या निर्णयाला मिळविलेली स्थगिती याबाबत मच्छिमार सल्लागर समितीने शासनाला सादर केलेल्या ठरावावर चर्चा होऊन पर्सियन नेट धारकांवर कायमची बंदी घालणारा कायदा करणेबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. "

श्री. संजय केळकर : महोदय, मच्छिमारीच्या संदर्भात गेल्या महिनाभरात अनेक घटना घडलेल्या आहेत, सागरी मोर्चे निघालेले आहेत, निरनिराळ्या ठिकाणी आंदोलने झाली आहेत. या सभागृहात सुध्दा नियम 93 अन्वये सूचना व अन्य विषयांच्या अनुषंगाने चर्चा झालेल्या आहेत. परंतु मच्छिमाराला कुठल्याही प्रकारचे ठोस आश्वासन शासनाकडून मिळालेले दिसत नाही. संपूर्ण राज्यात जवळपास 7 ते 8 लाख मच्छिमार आहेत त्यातील सर्वात जास्त मच्छिमार कोंकण किनारपट्टीत आहेत. 720 किलोमीटरच्या समुद्र किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात मच्छिमारीचा धंदा हे मच्छिमार करीत आहेत.

........3

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय केळकर .............

परंतु आज या मच्छिमारांची परिस्थिती मात्र "ना घर का ना घाट का" अशी झालेली आहे. ज्याप्रमाणे राज्यात निरनिराळे घोटाळे होतात आणि आपण म्हणतो कोणताही मोठा मासा त्यात सापडत नाही त्याप्रमाणे या मच्छिमारांच्या जाळ्यात मासे सापडत नाहीत, अशी त्यांची स्थिती आहे. त्यामुळे या मच्छिमारांची कुटुंबे उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. निरनिराळ्या मार्गांनी त्यांनी आपल्या मागण्या केंद्र व राज्य शासनाकडे केल्या आहेत परंतु त्यादृष्टीने अद्याप कुठलीच ठोस पावले उचलली गेली नसल्यामुळे मच्छिमार आज हवालदिल झालेला आहे. या सभागृहात यासंदर्भात चर्चा झाली होती त्यावेळी राज्यात मत्स्य दुष्काळ जाहीर करण्याच्या बाबतीत बैठक घेण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले होते पण तशी बैठक अद्यापही झाली नाही, असे मला वाटते. मत्स्य दुष्काळ जाहीर करावा अशी कोकणातील सर्व सन्माननीय सदस्यांची मागणी होती परंतु माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आकडेवारीवरुन मत्स्य दुष्काळ जाहीर करावा, अशी परिस्थिती दिसत नाही. या ठिकाणी मंत्री महोदयांनी सन 2005-06 व 2006-07 चे जे दोन वर्षांचे स्टेटमेंट दिले आहे त्यानुसार आजच्या स्थितीत मत्स्योत्पादन कमी झालेले आहे. म्हणून राज्यात मत्स्य दुष्काळ जाहीर झाला पाहिजे या मागणीबरोबरच हवामानातील बदलाप्रमाणे मत्स्योत्पादन सुध्दा कमी झालेले आहे अशा सर्व बाबींचा विचार करता सन 1982 चा जो यासंबंधीचा कायदा आहे त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली तर लहान मच्छिमारांना दिलासा मिळू शकतो. तसेच अवैध मासेमारीवर नियंत्रण येऊ शकते, शास्त्रोक्त पध्दतीने माशांचे जतन करता येईल, समुद्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यात व समुद्रावरील घुसखोरी रोखण्याच्या संदर्भात देखील या कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली तर आपण यशस्वी होऊ शकतो. परंतु आजची स्थिती अशी आहे की, मोठे ट्रॉलर्स समुद्रात येऊन पडलेले असतात.....

यानंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

पर्शियन नेट धारकांवर बंदी आणली गेली पाहिजे. जोपर्यंत आपण पर्शियन नेट धारकांवर बंदी आणत नाही तोपर्यंत छोटया मच्छिमारांना मासे मिळणार नाही त्यामुळे पर्शियन नेट धारकांवर बंदी आणण्याची नितांत आवश्यकता निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, नागपूर येथे मत्स्य आणि कृषी विद्यापीठ आहे. कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठाचे उपकेंद्र आहे. त्यामुळे कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठाची स्थापना झाली तर त्याचा फायदा कोकणातील मत्स्य उद्योगासाठी चांगल्या प्रकारे होऊ शकेल. कोकणातील मासळी ही भारतातच नव्हे तर जगात पाठवली जात असते असते त्यामुळे कोकणात मत्स्य विद्यापीठाची स्थापना झाली तर त्याचा चांगला उपयोग मच्छिमारांना होऊ शकेल. मासळीचे उत्पादन कमी होण्याची अनेक कारणे आहेत त्यामध्ये हवामानाचा बदल, पाण्याच्या तपमानात होणारे बदल यामुळे मासळीचे उत्पादन कमी होते परंतु सर्वात महत्वाचे कारण म्हणजे कोकणपट्टीत ऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याचे शासनाचे धोरण आहे तसेच कोकणामध्ये रासायनिक प्रकल्प मोठया प्रमाणात निर्माण होत आहेत. दाभोळ खाडीत लोटे परशुराम खाडीत प्रकल्प झाल्यामुळे त्या ठिकाणची मासळी मोठया प्रमाणात मरण पावली होती. या ठिकाणच्या प्रकल्पामुळे मासळीचे नुकसान झाल्यामुळे शासनाला मच्छिमारांना नुकसानभरपाई द्यावी लागली होती. अशा अनेक कारणामुळे मासळीचे उत्पादन आज कमी होत आहे. त्यामुळे यासंदर्भात माझी मागणी आहे की, यासंदर्भात आपण जर एखादा अभ्यासगट नेमला तर त्यावर काय काय उपाययोजना करता येईल याचा अभ्यास करता येईल व या अभ्यासगटाच्या माध्यमातून मच्छिमारांसाठी चांगला निर्णय होऊ शकेल.

सभापती महोदय, शासनाने अबकारी करात डिझेलसाठी 1.5 रुपयांची सवलत दिलेली आहे. परंतु वाढती महागाई लक्षात घेऊन 1.5 रुपयांऐवजी 5 रुपये सवलत अबकारी करात द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, केंद्रशासनाने देशातील शेतक-यांना कर्जमुक्त केलेले आहे. मच्छिमार लोक सुध्दा कर्जात बुडालेले आहेत परंतु असे असतांनाही मच्छिमारांनी आत्महत्या केलेल्या नाहीत त्यामुळे शासनाने मच्छिमारांनाही कर्जमुक्त करावे अशी मच्छिमारांच्या संघटनेने मागणी केलेली आहे. त्यामुळे मच्छिमारांच्या धंद्यात वाढ व्हावी यासाठी शासनाने मच्छिमारांना कर्ज मुक्त करावे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

अशी विनंती आहे. मच्छिमारांचे कर्ज माफ केले तर मच्छीमार स्वत:च्या पायावर उभे राहू शकतील. मच्छिमारांची आर्थिक स्थितीत वाढावी यासाठी शासनाने मच्छिमारांना 2 ते 4 टक्के या दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. ठाणे जिल्हयातील वसई आणि पालघर यांच्यामध्ये अनेक वेळा संघर्ष होत असतो यासाठी शासनाने कायमस्वरुपी तोडगा काढण्याची नितांत आवश्यकता आहे. यासंदर्भात जोपर्यंत कायमस्वरुपी तोडगा निघत नाही, कायमस्वरुपी उपाययोजना केली जात नाही तोपर्यंत वसई आणि पालघर या ठिकाणच्या मच्छिमारांचा संघर्ष कमी होणार नाही. या ठिकाणचा संघर्ष कायमस्वरुपी निकालात निघावा यासाठी राज्य शासनाने केंद्रशासनास बरोबर घेऊन कायमस्वरुपी तोडगा काढण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच जिल्हा स्थरावर ज्या समित्या असतात त्यामध्ये जिल्हाधिकारी आणि अन्य लोक असतात त्यामुळे या जिल्हा समित्यांवर मच्छिमारांच्या संघटनेच्या प्रतिनिधींना घेतले तर त्यांचा चांगला फायदा होऊ शकेल. अवैध मच्छिमाराला आळा बसावा यासाठी 1982 चा कायदा आहे परंतु या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे तसेच पर्शियन नेट धारकांवर बंदी आणण्यासाठी कायदा करण्याची गरज आहे. केंद्रशासनाने देशातील शेतक-यांना कर्ज मुक्त करण्यासाठी 60 हजार कोटी रुपयांची तरतूद केली तशाच प्रकारचा प्रयत्न कोकणातील मच्छिमारांना कर्ज मुक्त करण्यासाठी करण्याची आवश्यकता आहे. कारण मच्छिमार करणारा हा सुध्दा शेतकरीच आहे त्यामुळे शासनाने मच्छिमारांना कर्ज मुक्त करण्यासाठी लक्ष देण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक )सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आपण मला वेळ दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. या संदर्भात बोलत असतांना मी व्दिरुक्ती करणार नाही. शेतक-यांना कर्ज माफी करण्याचा निर्णय केन्द्र सरकारने घेतला असून त्याप्रमाणे मच्छिमारांना देखील कर्जमाफी देण्यात येणार असल्याचे सुतोवाच केन्द्रीय नेत्यांनी केलेले आहे परंतु त्या बाबतीत केन्द्र सरकारच्या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आली नाही त्याचप्रमाणे राज्याच्या अर्थसंकल्पात देखील कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. सागरामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुबियांना जी 50 हजार रुपयांची नुकसान भरपाई दिली जाते त्या ऐवजी या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये एक लाख रुपयापर्यंत नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याचा उल्लेख केला आहे. परंतु परंपरागत मच्छिमारीचा धंदा जगण्यासाठी जे काही करणे आवश्यक होते ते करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रयत्न करण्यात आलेला नाही तेव्हा या बाबीकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मच्छिमारांना कर्ज माफी करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने तातडीने प्रयत्न करावेत त्याचबरोबर मच्छिमारांना दोन टक्के व्याज दराने कर्जपुरावठा करण्यात आला तरच हा मच्छिमाराचा धंदा पुढच्या काळात जगू शकेल. दुसरी गोष्ट अशी की पर्सियन नेटधारकाच्या मच्छिमार यांत्रिक बोटीमुळे त्याचप्रमाणे मोठया ट्रॉलर्समुळे परंपरागत पध्दतीने मच्छिमार करणा-यां गरीब मच्छिमारांपुढे मत्स्य दुष्काळा सारख्या अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत . मोठया यांत्रिकी बोटीचे अतिक्रमण सागरामध्ये वाढलेले असून त्यासंबधीचा उल्लेख आताच सन्माननीय सदस्यांनी येथे केलेला आहे. या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने माझी शासनाकडे अशी मागणी आहे की, सपूर्ण सागराचे रक्षण करण्यासाठी तसेच मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी स्वायत्त कोस्टल कौन्सिल स्थापन करण्यात यावेत. इशान्येकडील राज्यांनी अशा प्रकारचे स्वायत्त कोस्टल कौन्सिल स्थापन केलेले आहे त्याच धर्तीवर आपल्या राज्यामध्ये देखील स्वायत्त कोस्टल कौन्सिल स्थापन करावे त्यामुळे मच्छिमारांना सागरवर मालकी प्रस्थापित करता येईल. मच्छिमार सागरी क्षेत्रात मच्छिमारी करतात परंतु त्यांची येथे मालकी नाही तेव्हा ती मालकी प्रस्थापित करणे आवश्यक आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

सभापती महोदय, नागपूरला मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्यात आलेले आहे तेव्हा नागपूर ऐवजी रत्नागिरीला मत्य विद्यापीठ स्थापन करण्यात यावे आणि उप केन्द्र ठाण्याला सुरु करण्यात यावे. संपूर्ण सागरी किनारा रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयास लागून आहे त्यामुळे नागपूरला मत्स्य विद्यापीठ सुरु करणे् योग्य होणार नाही म्हणून माझी अशी मागणी आहे की मत्स्य विद्यापीठ रत्नागिरी येथे आणि उप केन्द्र ठाणे येथे सुरु करावे. त्याचबरोबर एन.सी.डी.सी. कडे जे प्रस्ताव पाठविण्यात येतात त्यांना सहा महिन्यात मंजुरी देण्यात यावी अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल पुन्हा एकदा आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ 11:35

श्री. अनिस अहमद : (मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापति महोदय, आधे घंटे की चर्चा के माध्यम से माननीय सदस्य श्री. केळकर जी मछली पकड़ने वालों की समस्याओं के बारे में बहुत सारे मुद्दे यहां पर उपस्थित किए हैं.

सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. कपिल पाटील ने सब से बड़ा मुद्दा उठाया कि मत्स्य विद्यापीठ नागपुर में है. मैं यह खुलासा करना जरुरी समझता हूँ कि पूरे महाराष्ट्र में कहीं पर भी मत्स्य विद्यापीठ नहीं है. नागपुर के अन्दर महाराष्ट्र एनीमल एंड फिशरीज साइंस यूनिवर्सिटी है, वह खास तौर से एनीमल हस्बेंडरी और वेटनरी के बारे में है और वहां पर एल.डी.ओ. तैयार होते हैं. इस विद्यापीठ में फिशरीज साइंस का 30-32 बच्चों का एक क्लास चल रहा है. सब से बड़ा सवाल यह है कि महाराष्ट्र में 720 किलोमीटर लम्बा सागरी किनारा है और इसके लिए सन् 1981 से रत्नागिरी में लड़कों के लिए फिशरीज साइंस का सिर्फ एक कॉलेज चल रहा है. इसलिए महाराष्ट्र के अन्दर, कोंकण के अन्दर मत्स्यव्यवसाय विद्यापीठ बनाने का सरकार ने तय किया है. उसके लिए महाराष्ट्र सरकार ने प्लानिंग कमीशन के चेयरमेन और मुंबई यूनिवर्सिटी के भूतपूर्व वाइस चांसलर भालचंद्र मुणगेकर की कमेटी बनाई है. यह कमेटी सरकार को बताएगी कि कोंकण के अन्दर किस तरह से मत्स्यव्यवसाय विद्यापीठ बना सकते हैं. वे 2-3 महीने के अन्दर अपनी रिपोर्ट सरकार को देंगे और सरकार कोंकण इलाके के अन्दर नई फिशरीज यूनिवर्सिटी बनाने का काम करेगी. रत्नागगिरी में 1981 से जो कॉलेज चल रहा है वह कृषि विद्यापीठ से जुड़ा हुआ है. इसको कृषि विद्यापीठ से अलग करके नई मत्स्यव्यवसाय विद्यापीठ से जोड़ने का काम हमारी सरकार करेगी.

सभापति महोदय, हम लोग डीजल पर 100 प्रतिशत सब्सिडी देने का काम कर रहे हैं. पिछले साल जब गॅट का नया कानून आया था, तब महाराष्ट्र सरकार ने डीजल पर सब्सिडी देना बंद कर दिया था. लेकिन बाद में जब इन लोगों ने डीजल पर सब्सिडी देने की मांग को लेकर मोर्चा निकाला था तो मैं भी उस मोर्चे में गया था. उसके बाद हमने डीजल पर सब्सिडी दी है. मैं आपको बताना चाहता हूँ कि सरकार ने वर्ष 2005-06 में 42 करोड़ रुपए से ज्यादा की सब्सिडी दी है, वर्ष 2006-07 में 80 करोड़ रुपए की सब्सिडी दी है और 2007-08 में 72 करोड़ रुपए से ज्यादा की सब्सिडी मछली पकड़ने वालों को दी है. गुजरात, केरल, तमिलनाडु या कर्नाटक में कहीं पर भी डीजल पर 100 प्रतिशत सब्सिडी नहीं मिल रही है, जबकि महाराष्ट्र

. . . H 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. अनिस अहमद

सरकार डीजल पर 100 प्रतिशत सब्सिडी दे रही है. मैं यह बात सभागृह को स्पष्ट कर देना चाहता हूॅं कि केन्द्रीय सरकार की सेन्ट्रल एक्साइज पर अलग से सहूलियत मिलती है. महाराष्ट्र में राज्य सरकार भी डीजल पर 100 प्रतिशत सब्सिडी दे रही है, जबकि गुजरात में यह 80 प्रतिशत है और अन्य राज्यों में 50 प्रतिशत है. हमारी महाराष्ट्र सरकार मछली पकड़ने वालों को 100 प्रतिशत पैसा रिफन्ड करती है और उनको पैसा मिलने में 2-3 महीने इसलिए लग जाते हैं, क्योंकि उनकी फाइल कमिश्नर के पास जाती है, उनकी फाइल मंत्रालय में आती है. उनको यह पैसा 15 दिन के अन्दर मिलना चाहिए, इसलिए सरकार ने निर्णय लिया है उनकी फाइल कमिश्नर के पास या मंत्रालय में नहीं जाएगी. यह यह जिला स्तर पर डि-सेन्ट्रलाइज किया है और उसको जिला स्तर पर ही पैसा मिलेगा.

सभापति महोदय, जहां तक पर्सियन नेट के इस्तेमाल का सवाल है तो जो लोग इसका इस्तेमाल करते हैं, वे लोग हाईकोर्ट से स्टे लेकर आए हैं. इस बात को 2-3 साल हो गए हैं. इसके खिलाफ सरकार सुप्रिम कोर्ट में गई है और केस नं. 10316 दाखिल किया है. इसके लिए विशेष वकील नियुक्त किया है. यह मॅटर सब-ज्युडिश है, लेकिन अभी तक लिस्ट पर नहीं आया है. माननीय सदस्यों ने मांग की है कि इस बारे में राज्य सरकार को एक नया कानून बनाना चाहिए. इस बारे में जरुर विचार किया जाएगा.

सभापति महोदय, यह बात सच है कि पहले एक जमाने में जितनी मछली पकड़ में आती थी, उतनी मछली पकड़ में नहीं आ रही है, लेकिन दुष्काल जाहिर करने के बारे में सरकार ने जो नियम बनाए हैं, उसके अनुसार जब 50 प्रतिशत से कम मछली पकड़ में आती है, तब दुष्काल जाहिर किया जाता है. कमिश्नर ऑफिस के पास जो रिकार्ड हैं, उसके अनुसार वर्ष 2004-05 में 4 लाख 17 हजार 854 मैट्रिक टन मछली पकड़ी गई है, वर्ष 2005-06 में 4 लाख 45 हजार 343 मैट्रिक टन मछली पकड़ी गई है, वर्ष 2006-07 में 4 लाख 64 हजार 90 मैट्रिक टन मछली पकड़ी गई है और वर्ष 2007-08 में दिसम्बर माह तक 3 लाख 25 हजार मैट्रिक टन मछली पकड़ी गई है. इससे ऐसा नहीं लगता है कि मछली के उत्पादन में कमी आई है. लेकिन यह बात जरुर है कि मछली पकड़ने वालों की तादाद 3 गुना बढ़ गई है. कोंकण की जनसंख्या

. . . H 3

. . . . श्री. अनिस अहमद

बढ़ गई है. जो मछली आस-पास में ही पकड़ में आती थी, उसके लिए अब गहरे समुद्र के अन्दर जाना पड़ता है, उनको वापस आने में 8-10 दिन लग जाते है और इस वजह से डीजल भी काफी ज्यादा खर्च होता है

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार मछली पकड़ने वालों की हर संभव सहायता कर रही है और इसके लिए हम केन्द्रीय सरकार से भी मदद मांग रहे हैं. कल नागपुर में बाबासाहेब अंबेडकर एअरपोर्ट का उद्‌घाटन किया गया. वहां पर केन्द्रीय कृषि मंत्री शरद पवार आए थे, वहां पर हमारे मुख्य मंत्री भी उपस्थित थे. हमने उनके पास निवेदन दिया है कि हम 1 हजार करोड़ रुपए एक्सपोर्ट से आपको कमाकर देते हैं और मछली पकड़ने वालों का इसमें सब से ज्यादा योगदान है. हर साल लाखों मैट्रिक टन मछली का एक्सपोर्ट होता है. करोड़ों रुपए महाराष्ट्र के मछली पकड़ने वाले लोगों की वजह से केन्द्रीय सरकार को मिलते हैं. केन्द्रीय सरकार ने जिस तरह से किसानो की मदद की है, उनका कर्जा माफ किया है, उसी तरीके से केन्द्रीय सरकार को मछली पकड़ने वाले लोगों का लोन माफ करने के बारे में विचार करना चाहिए. माननीय केन्द्रीय कृषि मंत्री शरद पवार जी ने विश्वास दिलाया है कि वे इस पर जरुर विचार करेंगे. हमें बहुत जल्दी इस बारे में मालूम हो जाएगा. केन्द्रीय सरकार इस बारे में जरुर विचार कर रही है.

सभापति महोदय, सरकार ने 1981 के मरीन फिशरीज एक्ट में अमेंडमेंट लाने का काम किया है. इस अमेंडमेंट के द्वारा मुझे विश्वास है कि जो गैर कानूनी फिशिंग होती है, राज्य के बाहर से गलत तरीके से जो बड़े बड़े ट्रॉलर आते थे और मछली पकड़कर ले जाते थे और इस वजह से हमारे मछली पकड़ने वाले लोगों का बहुत बड़ा नुकसान होता था, उसके ऊपर रोक लगेगी. इस अमेंडमेंट के द्वारा 5 हजार रुपए का जुर्माना 10 गुना बढ़ाकर 50 हजार रुपए किया गया है और जो लोग बार बार पकड़े जाएंगे, उन लोगों के तीसरी बार पकड़े जाने पर जेल भेजने का अमेंडमेंट किया गया है.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री अनिस अहमद ....

अब उनको छोड़ा नहीं जाएगा, उनको जेल भेजा जाएगा. हर साल 10 जून से 15 अगस्त तक समुद्र में मछली पकड़ने पर बॅन लगाया जाता है. यह बॅन इसलिए लगाया जाता है ताकि अच्छे प्रकार का सीड मिल सके, बड़ी बड़ी मछलियाँ मिल सके. दूसरी बात यह है कि, सरकार की यह कोशिश है कि कोंकण के इन इलाकों में प्रदूषण कम किया जाए. इसके अलावा सरकार की यह भी कोशिश है कि कोंकण के इन इलाकों में जो समस्याएं हैं उनको हल किया जाए. जो लोग अवैध रुप से मछली पकड़ते है, उनके खिलाफ कार्रवाई की जाती है. वर्ष 2007 में अवैध रुप से मछली पकड़ने वाले 8205 लोगों के खिलाफ कार्रवाई की गई है और उनसे लगभग 50 लाख रुपये दंड वसूल किया गया है. वर्ष 2008 में अवैध रुप से मछली पकड़ने वाले 480 लोगों के खिलाफ कार्रवाई की गई है और उनसे लाखों रुपये दंड वसूल किया गया है. मछली पकड़ते समय दुर्घटना (एक्सीडेंट) हो जाने पर अफेक्टेड व्यक्ति के परिवार को 50 हजार रुपये मदद दी जाती थी. अब यह मदद बढ़ाकर एक लाख रुपये कर दी गई है. सम्माननीय सदस्य श्री केळकर जी ने बताया कि मुझे बैठक में बुलाया नहीं गया. मैं उन्हें बताना चाहता हूं कि बैठक बुलाई है, शायद उनको बैठक संबंधी पत्र मिला नहीं होगा. फिर भी मैं उनसे कहना चाहता हूं कि आपके जो भी मुद्दे हैं, वे आप हमें दें. सरकार उन मुद्दों पर विचार करेगी. मैं अंत में इतना ही कहना चाहूंगा कि यह अधिवेशन समाप्त होने से पहले नया पॅकेज बनाकर मछली पकड़ने वालों की मदद करने के लिए सरकार कोशिश कर रही है. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

......

यानंतर कु. धनश्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ SBT प्रथम श्रीमती रणदिवे.. 11:45

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मत्स्य विद्यापीठाची जी काही चूक झालेली आहे ती युती शासनाच्या काळात झालेली आहे. हे मला कबूल आहे. त्या वेळी मत्स्य व पशुसंवर्धन विभाग नागपूर येथे जोडला गेला होता त्यामुळे मत्स्य हा शब्द राहून गेला होता. या संदर्भात आतापर्यंत विधानसभेमध्ये बरीच चर्चा झालेली आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी सांगितले होते की, यासंदर्भात कॅबिनेटमध्ये चर्चा केली जाणार आहे तसेच मत्स्य विद्यापीठ कोकणात स्थापन करण्याचा विचार देखील केला जाणार आहे. याबाबत आता मुणगेकर यांचा रिपोर्ट देखील दोन महिन्यात येणार आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या संदर्भात कॅबिनेटमध्ये चर्चा झालेली आहे काय व नागपूर विद्यापीठाला जोडलेला विभाग काढण्याचा निर्णय झालेला आहे काय ?

श्री. अनिस अहमद : अभी सिर्फ कमेटी बनी है. कमेटी अपना काम करेगी. जितने भी फिशरीज कॉलेज है, चाहे वह उदगीर का कॉलेज हो, रत्नागिरी का कॉलेज हो, इन कॉलेजों में कहीं 35 विद्यार्थी, कहीं 50 विद्यार्थी पढ़ रहे हैं. जितने भी फिशरीज कॉलेज है वे सब फिशरीज युनिवर्सिटी के अन्तर्गत आ जाएंगे. नागपुर के मत्स्य विद्यापीठ के बारे में कहा जा रहा है, मैं यह बताना चाहता हूं कि इस संबंध में युती शासन काल में 4 सितम्बर, 1998 को आदेश जारी हुआ था. लेकिन मैं यह बताना चाहता हूं कि वहां फिशरीज की कोई युनिवर्सिटी नहीं है.

**उपसभापती** : अर्धा तास चर्चेच्यावेळी सर्वच सन्माननीय सदस्य बोलण्याची विनंती करतात. माननीय मंत्री महोदयांनी एकदा उत्तर दिल्यानंतर " There will be no question " यामुळे सर्वच चर्चा अर्धवट राहतात.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. शेतकऱ्यांना शासनाने कर्जमुक्ती दिलेली आहे. त्यामुळे मच्छिमारांना मदत देण्याकरिता केंद्र सरकारकडे मदतीकरिता डोळे लावून बसण्याची काय गरज आहे ? महाराष्ट्र शासन या संदर्भात काय कार्यवाही करणार आहे ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, जैसा मैंने बताया है कि महाराष्ट्र सरकार मछली मारने वालों की मदद कर रही है. पूरे देश में केवल महाराष्ट्र सरकार ही मछली पकड़ने वालों को डीजल के लिए करोड़ों रुपये की सब्सिडी दे रही है. गोवा, कर्नाटक इत्यादि किसी भी राज्यों में डीजल के लिए सब्सिडी नहीं दी जा रही है. लेकिन महाराष्ट्र सरकार 100 प्रतिशत डीजल के

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



DVG/ KGS/ MMP/ 11:45

श्री अनिस अहमद...

लिए सब्सिडी दे रही है. इसके अलावा मछली पकड़ने वालों को मदद करने की दृष्टि से सम्माननीय मुख्यमंत्री एवम् वित्त मंत्री से चर्चा कर रहे हैं. टेक्नीकल कारण से हम मत्स्य दुष्काल घोषित नहीं कर सके है. महाराष्ट्र से हजारों टन मछली का निर्यात हो रहा है. पहले की तुलना में अब तीन गुना मछली पकड़ने वालों की संख्या हो गई है. केन्द्रीय सरकार से भी हम मदद मांग रहे हैं. लेकिन मैं इतना ही कहना चाहता हूं कि राज्य सरकार की तरफ से जरुर पॅकेज देंगे.

.....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

**पृ.शी.**: मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतीमधील भाडेकरुंना संक्रमण शिबिरात घरे न मिळणे

मु.शी : मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतीमधील भाडेकरुंना संक्रमण शिबिरात घरे न मिळणे यासंबंधी श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----------------

**अर्धातास चर्चा क्रमांक 4 व 6 बाबत.**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली आज सभागृहात उपस्थित राहू शकणार नाहीत असे त्यांनी माझ्या दालनात सांगितले होते. त्यामुळे त्यानी दिलेल्या अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहेत.

-------------

**पृ.शी.**: सुशिक्षीत बेरोजगारांना आर्थिक सहाय्य न मिळणे

**मु.शी.**: सुशिक्षीत बेरोजगारांना आर्थिक सहाय्य न मिळणे या संबंधी प्रा. शरद पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

---------------

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी पुढील अर्धा तास चर्चेस सुरुवात करावी.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्रातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी एम.बी.बी.एस.ची जादा फी आकारणे

मु.शी : महाराष्ट्रातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी एम.बी.बी.एस.ची जादा फी आकारणे या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35630 ला दिनांक 29 नोव्हेंबर 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी एम.बी.बी.एस.ची जादा फी आकारणे या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35630 ला दिनांक 29 नोव्हेंबर 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, खाजगी वैद्यकीय महाविद्यालये व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये ही राज्यातील वैद्यकीय शिक्षणाचा भार उचलत आहेत. खाजगी वैद्यकीय महाविद्यालये व अभिमत विद्यापीठांची संख्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपेक्षा वाढत जाणार आहे असे एकंदर चित्र सध्या दिसत आहे.

यानंतर श्री. बरवड..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, राज्यात खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एम.बी.बी.एस. हा अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची जी संख्या आहे ती देखील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येपेक्षा वाढत जाणार आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. हजारो रुपये नव्हे तर लाखो रुपये फी घेऊन अशा प्रकारे वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिकवले जाते. या सर्वांना एम.सी.आय. चे सर्टिफिकेशन असते. एम.सी.आय.च्या नार्म्सप्रमाणे ही दोन्ही कॉलेजेस चालत असतात. पी.एम.पै. फाऊंडेशन आणि इस्लामिक अकॅडमी यांच्या याचिकेच्या अनुषंगाने सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला होता त्यातून दोन समित्या निर्माण झाल्या. शिक्षण शुल्क समिती आणि प्रवेश नियंत्रण समिती अशा दोन समित्या निर्माण झाल्या. शिक्षण शुल्क समिती निवृत्त न्यायमूर्ती जहागीरदार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. शासनातर्फे शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव तसेच डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन त्या समितीमध्ये आहेत. त्यामध्ये असे ठरले होते की, सन 2004 पासून या खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या शिक्षण संस्थांनी आपल्या जमा-खर्चाचा ताळेबंद सादर करावा. त्यानंतर त्या शिक्षणाची फी किती असेल, फी ची रचना कशी असेल याबाबतचा जो निवाडा त्यांच्याकडे असेल किंवा त्यांनी निर्धारित केलेले जे शुल्क असेल ते भरण्यास विद्यार्थी बांधील असतील. या चार वर्षाच्या फी च्या संदर्भात दृष्टीक्षेप टाकला तर असे दिसून येईल की, फी मध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. माझ्याकडे जी आकडेवारी उपलब्ध आहे ती मी देऊ इच्छितो. त्यावरुन माननीय मंत्रिमहोदयांना कल्पना येईल. सोमय्या महाविद्यालयामध्ये 2003-04 मध्ये 1 लाख 1 हजार रुपये फी होती. 2005-06 मध्ये फी 2 लाख 17 हजार रुपये झाली. 2006-07 मध्ये फी 3 लाख 46 हजार झाली. 2007-08 मध्ये फी 2 लाख 72 हजार 101 रुपये झाली. तेरणा मेडिकल कॉलेजमध्ये 2003-04 मध्ये 61 हजार 700 रुपये फी होती. 2005-06 मध्ये फी 2 लाख 37 हजार रुपये झाली. 2006-07 मध्ये फी कमी होऊन 1 लाख 77 हजार रुपये झाली. या वर्षी 1 लाख 90 हजार रुपये फी झाली. एनडीएनव्हीपी कॉलेजमध्ये 2003 मध्ये 61 हजार रुपये फी होती. 2005 मध्ये फी 2 लाख 60 हजार रुपये झाली. 2006 मध्ये फी थोडी कमी होऊन 1 लाख 80 हजार रुपये झाली. 2007 मध्ये थोडी वाढ

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

होऊन 1 लाख 94 हजार रुपये फी झाली. सर्वात जास्त फी कोठे वाढली असेल तर ती एन.के.पी.साळवे कॉलेज, नागपूर येथे वाढली. त्यांनी फी चा उच्चांक गाठलेला आहे. त्या महाविद्यालयामध्ये 2003-04 मध्ये 1 लाख 47 हजार रुपये फी होती. 2005-06 मध्ये ती वाढून 1 लाख 92 हजार रुपये फी झाली. 2006-07 मध्ये 4 लाख 41 हजार रुपये तसेच 2007-08 मध्ये 4 लाख 74 हजार रुपये फी झाली.

सभापती महोदय, दरवर्षी एवढी फी भरुन आईवडील मुलांना डॉक्टर करत असतील तर त्यांची मुले उद्या डॉक्टर झाल्यानंतर सामाजिक बांधिलकीची कोणती जाणीव ठेवणार ? यामध्ये राज्य शासनाचा कोणताही कंट्रोल नाही, ही गोष्ट खरी असली तरी राज्य शासनाने नाममात्र शुल्कामध्ये दिलेल्या अनुदानावर, सुरुवातीला 1 कोटी रुपये किंवा 60 लाख रुपये अनुदान देतो त्यावर ही महाविद्यालये उभी आहेत. ही सर्व महाविद्यालये सत्ताधारी पक्षाच्या लोकांची आहेत, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. आपल्याच चालणाऱ्या कॉलेजेसमध्ये आपणच त्यांच्यासाठी जे केलेले आहे ते आपल्या समोर आहे. तरी देखील सामान्य विद्यार्थी, मध्यमवर्गीय विद्यार्थी या कॉलेजेसमध्ये प्रवेश घेऊ शकत नाहीत. शेजारच्या राज्यात बघावे. गुजरातमध्ये, कर्नाटकमध्ये, केरळमध्ये, आंध्र प्रदेशमध्ये किती फी आहे ते पहावे. त्या ठिकाणी 1 लाख 30 हजार ते अडीच लाख रुपयांच्या आसपास फी आहे. आपल्याच राज्यामध्ये एवढी फी का ? सभापती महोदय, जो रिपोर्ट सादर केला जातो त्यासंदर्भात मी एन.के.पी. साळवे महाविद्यालयाचे उदाहरण देतो. त्या रिपोर्टमध्ये काय काय काय समाविष्ट केले जाते ? त्याचे चार्टर्ड अकाऊंटंट फार निष्णात असतात. त्यांनी अनेक गोष्टी यामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. ते राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांना देखील माहीत आहे आणि तरी देखील त्याच्याकडे कानाडोळा करतात. हा जो खर्च आहे तो अनावश्यक आहे हे शिक्षण शुल्क समितीला कळत नाही काय ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ श्री.बरवडनंतर 11:55

डॉ.दीपक सावंत....

उदाहरणादाखल मी सांगू इच्छितो की, जाहिरातीवरील 7 लाख रुपये, तसेच 2 कोटी 8 लाख रुपये व्याजाची रक्कम दाखविली आहे. पेट्रोल व डिझेलचा 20 लाख रुपये खर्च दाखविला आहे. वैद्यकीय महाविद्यालयांनी अनेक कारणांसाठी कर्जे घेतलेली आहेत. ती त्यांच्या अनेक शिक्षण संस्थांसाठी घेतली आहेत. ते कर्ज देखील वैद्यकीय महाविद्यालयांच्या डोक्यावर दाखवितात. अशाप्रकारे त्यांनी 5-5 कोटींची कर्जे घेऊन त्याची मूळ रक्कम आणि व्याज वैद्यकीय महाविद्यालयांच्या डोक्यावर दाखविलेले आहे. त्यामुळेच शिक्षण शुल्क समितीने त्यांची फी वाढवून दिली आहे. या शिक्षण शुल्क समितीला काय झाले आहे ते मला समजत नाही. विद्यार्थ्यांना वर्षाला 2.50 लाख, 4.74 लाख इतकी फी भरावी लागत असेल तर तो विद्यार्थी कोठून फी आणणार ? या वैद्यकीय महाविद्यालयांचा प्रिंटिंग, स्टेशनरी, कर्मचा-यांचे पगार, कॉंटिन्जन्सी फंड, डिप्रिसिएशन, हॉस्पिटल डेफिसिट या सर्व बाबींवरील खर्च एक कोटीच्या घरामध्ये जातो. खाजगी वैद्यकीय महाविद्यायाच्या हॉस्पिटलमध्ये कधीही 100 टक्के ऑक्युपन्सी नसते तरीही 100 टक्के ऑक्युपन्सी आहे असे दाखवून प्रत्येक रुग्णामागे जेवढा खर्च येतो तेवढा दाखविला जातो. हा खर्च 75 टक्क्यांपर्यंत वाढविलेला आहे, म्हणजे 3 कोटी 16 लाख 24 हजार 614 रुपये इतका खर्च या एन.के.पी.साळवे वैद्यकीय महाविद्यालयाने दाखविला आहे. शिक्षण शुल्क समितीने हा खर्च कमी केला आहे हे खरे आहे. समितीने केवळ 2 लाख 89 लाख रुपयांनी खर्च कमी केला आहे. म्हणजे काही तरी करावयास पाहिजे म्हणून तो कमी केला आहे. सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय संवेदनशील आहेत. त्यांनी कालच राज्यासाठी एक मोठी गोष्ट केली आहे. केंद्रीय मंत्री श्री.ऑस्कर फर्नांडीस यांच्याकडून इएसआयएस हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय महाविद्यालय निर्माण करण्याचे वदवून घेतले आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. परंतु या प्रश्नाकडे आपण पाहणार की नाही ? आपण आपल्या भागामध्ये अतिशय चांगले काम करीत आहात, पण तेच काम करीत असताना महाराष्ट्रातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांकडे का कानाडोळा करता ? ही बाब आपल्या परव्हयूमध्ये नाही. आपण ते करु शकता. परंतु ते करण्याची आपली इच्छा नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सर्वच प्रोफेसर्सना पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. पण सर्वच प्रोफेसर्सना त्याचा लाभ मिळत नाही. ज्यावेळी एमसीआयचे इन्सपेक्शन असते त्यावेळी कोणत्या तरी प्रोफेसर्सना धरुन आणले जाते. प्रोफेसर्सना वर्षाला 2 लाख रुपये दिले जातात, कागदोपत्री मात्र दरमहा 1 लाख रुपये दिल्याचे दाखवितात. सभापती महोदय, कोणत्याही खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये 100 टक्के इन्फ्रास्ट्रक्चर नाही. एमसीआयचे लोक इन्फ्रास्ट्रक्चर तपासणीसाठी जातात, त्यांना कसे मॅनेज केले जाते, किती पैसे दिले जातात आणि त्यानंतर कशी मान्यता मिळविली जाते हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. ते मंत्रिमहोदयांना सुध्दा माहिती आहे. ते मी वेगळे सांगण्याची गरज नाही. शासनाच्यावतीने दिल्लीला प्रतिनिधी जातात त्यांना याची काहीच माहिती नसते. शासनाला खरोखरच या फीवर नियंत्रण आणावयाचे असेल तर शासनाने या विभागासाठी डॉक्टर असलेल्या व्यक्तीला सचिवपदी नेमावे. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये काय चालते त्याची जाणीव असेल. शासनाने शिक्षण शुल्क समितीकडे बोट दाखवू नये. शासनाला जे काय जमेल ते सांगावे. या समितीमध्ये राज्य शासनाच्या एका प्रतिनिधीचा समावेश करावा. प्रतिनिधी म्हणजे विभागाचे सचिव नाही. त्या समितीमध्ये राज्यमंत्री वा कॅबिनेट मंत्री या दोघांपैकी एकाने असणे आवश्यक आहे. तसेच त्या वैद्यकीय महाविद्यालयातील एक विद्यार्थी व एक पालक यांचा देखील समितीत समावेश करावा. या सर्व उपाययोजना करुन या फी वाढीला आळा घालता येईल. याबाबत सर्वंकष चर्चा करुन फीला आळा घालावा. लाख-लाख रुपये फी भरुन विद्यार्थी शिक्षण घेत असतील तर या विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव असेल का ? तारांकित प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले होते की, "बाहेरच्या राज्यामध्ये किती फी आकारली जाते त्याचा आढावा घेण्यात येईल." त्या आढाव्यानुसार राज्यात काय करता येईल तेही उत्तरातून सांगावे. निदान पुढील वर्षापासून तरी पालकांना आपल्या पाल्यांना वैद्यकीय महाविद्यालयात पाठविणे सुसहय होईल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

------

नंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मेडिकल कॉलेजेसमधील फीच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे 2003मध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये शिक्षण शुल्क समिती नेमण्यात आली. त्यानंतर आजपर्यन्त शिक्षण शुल्क समितीपुढे जाऊन प्रत्येक संस्था ही एमबीबीएस तसेच पोस्ट-ग्रज्युएशनच्या संदर्भात आपापली फी ठरवून घेत असते. फीचे निकष शिक्षण शुल्क समितीनेच ठरविलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या मेडिकोच्या 5-6 वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वर्षी फीमध्ये वाढ होत राहाते. जेव्हा शिक्षण शुल्क समिती नेमण्यात आली होती त्यावेळी ॲडमिशनच्या वेळेला जी फी निश्चित केली जाईल तिच फी कोर्स पूर्ण होईपर्यन्त कायम राहावी अशी भूमिका होती. परंतु आता चलनवाढीचा दर 7 टक्के झालेला आहे, डेप्रिशिएनचा फॉर्म्युला ठरलेला आहे, हॉस्पिटल एक्सपेन्सेस अंतर्भूत केलेले आहेत. त्यामुळे ही फी वाढ होत आहे. ही फी वाढ केवळ महाराष्ट्रातच झालेली आहे असे नाही तर आपल्या शेजारच्या कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात या राज्यांमध्ये, जेथे मेडिकल कॉलेजस मोठया प्रमाणावर आहेत, ही फी वाढ झालेली आहे. केवळ महाराष्ट्र राज्यामध्येच ही फी जास्त आहे आणि इतर राज्यांमध्ये ती कमी आहे अशी वस्तुस्थिती नाही. कर्नाटक राज्यामध्ये एमबीबीएस कोर्ससाठी अव्हरेज फी 2,97,500 रु. आहे. बीडीएसची फी 2,37,000 रु. आहे. आंध्रप्रदेशमध्ये 2,11,000 रु. आणि गुजरातमध्ये 2,50,000रु. इतकी ॲव्हरेज फी आहे. महाराष्ट्र राज्यातील ॲव्हरेज फी 2,42,000 रु. इतकी आहे. के.जे.सोमय्या मेडिकल कॉलेजची फी 3,72,000 रु. आणि एन.के.पी.साळवे मेडिकल कॉलेजची फी 4,74,548 रु. इतकी आहे. इतर राज्यातील ॲव्हरेज फी आणि आपल्या राज्यातील ॲव्हरेज फी पाहिली तर अन्य राज्यामध्ये ही ॲव्हरेज फी जास्त आहे. गुजरात राज्यामध्ये आपल्यापेक्षा जास्त फी आहे. 500 बेडस्चे हॉस्पिटल मेण्टेन करणे, मेडिकल कॉलेजला द्याव्या लागणा-या फॅसिलिटी या गोष्टी देखील ही फी ठरवत असताना विचारात घेतल्या जातात आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे स्वत: डॉक्टर असल्यामुळे त्यांना त्याची पूर्ण कल्पना आहे. दुसरे असे की,प्रायव्हेट मेडिकल कॉलेजेस मधील एस.सी.एस.टी. विद्यार्थ्यांची शंभर टक्के फी आणि ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांची 50 टक्के फी भरण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

(श्री. सुरेश शेट्टी....)

घेतलेला आहे. खाजगी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एस.सी.,एस.टी. आणि ओ.बी.सी. विद्यार्थ्यांची संख्या खूप मोठी आहे. या सर्वांची फी राज्य शासन भरते. जनरल कॅटेगरीतील विद्यार्थ्यांसाठी ही मेडिकल अभ्यासक्रमाची फी जास्त आहे. या फीच्यासंदर्भात सन 2005मध्ये पी.अे. इनामदार विरुध्द महाराष्ट्र राज्य या केसमध्ये सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिलेला आहे की," In the said case the Court has urged that in the absence of Central Legislation the State should enact suitable laws with regard to fees and the State should enact its own laws." यासंदर्भातील बिल लोकसभेमध्ये येणार असल्याचे सांगण्यात येत होते. परंतु अद्यापपर्यन्त ते बिल आलेले नाही. अन्य कोणत्याही राज्यामध्ये या संदर्भात कायदा तयार करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासनाने मात्र याबाबतीत कायदा करण्याच्या अनुषंगाने एक पाऊल उचललेले असून आमचा ड्राफ्ट रिपोर्ट तयार आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या माध्यमातून, A Bill to provide regulation for admission and fees in private professional educational institutions and matters connected therewith and incidental thereto.यासंबंधीचे विधेयक तयार आहे. सदर विधेयकाचा मसुदा मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर नेण्यात आला होता. परंतु त्या विधेयकाचा मसुदा काही त्रुटीची पूर्ततेसाठी परत पाठविला आहे. सदरहू परिपूर्ण विधेयक पुन्हा मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी ठेवले जाणार आहे. Where admissions and fee structures of all private institutions can be regulated by the State to prevent profiteering and ensure that admissions are based on merit and transparency and students are not exploited. सदर विधेयकाचा मसुदा पुन्हा मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी ठेवला जाईल. सदरहू विधेयकाच्या मसुद्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर सदर विधयक दोन्ही सभागृहाच्या मान्यतेसाठी मांडले जाईल व त्या विधेयकास दोन्ही सभागृहांची मंजुरी घेण्यात येईल. सदर विधेयकामुळे या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे संरक्षण मिळेल अशी ग्वाही मी सन्माननीय सदस्यांना देऊ इच्छितो. सदर विधेयक ॲडॉप्ट केल्यानंतर यासंबंधीचे सर्व प्रश्न मिटतील ही देखील बाब मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

डॉ. दीपक सावंत : शिक्षण शुल्क समितीवर पालक प्रतिनिधी असावेत यासंबंधीची मी मागणी केली आहे, त्या मागणीच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी काहीही खुलासा केला नाही. शिक्षण शुल्क समितीवर पालक प्रतिनिधींचा समोवश करण्यात येईल काय? याबाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

श्री. सुरेश शेट्टी : शिक्षण शुल्क समितीच्या चेअरमनपदी डॉ. पी.एस.पाटणकर यांची नियुक्ती केली आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे विद्यमान प्रधान सचिव हे या समितीचे सदस्य सचिव आहेत. त्याचप्रमाणे डॉ. स्नेहलता देशमुख आणि डॉ.शेट्टी यांची नियुक्ती माननीय राज्यपाल यांनी नियुक्ती केलेली आहे. हे दोन्ही सदस्य वैद्यकीय क्षेत्रातील आहेत. त्याचप्रमाणे या समितीवर एका सी.ए.ची देखील नियुक्ती केली आहे. या समितीवर पालक प्रतिनिधींची नियुक्ती करावयाची झ ााली तर त्यासाठी शासनाला सुप्रीम कोर्टात जावे लागेल.

----------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अर्धा तास क्रमांक 8 पुढे ढकलण्यासंबंधी

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अर्धा तास चर्चेची सूचना दिली आहे. या अर्धा तास चर्चेच्या सूचनेबाबत सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी सदर अर्धा तास चर्चेची सूचना दोन दिवस पुढे ढकलावी अशा प्रकारची विनंती लेखी पत्राव्दारे माझ्याकडे केली आहे. त्यामुळे सदरहू अर्धा तास चर्चेची सूचना दोन दिवसानंतर चर्चेला घेण्यात येईल.

--------------

3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वेतनेतर अनुदान रोखून ठेवल्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन

**मु.शी.**: वेतनेतर अनुदान रोखून ठेवल्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 38068 ला दिनांक 12 मार्च, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

--------------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 12:05

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्यातील एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रम घेणा-या संस्थांना अनुदान देण्याबाबत

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्यातील एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रम घेणा-या संस्थांना अनुदान देण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 39551 ला दिनांक 14 मार्च,2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

-------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांची अर्धा-तास चर्चेची सूचना घेण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, अर्धा-तास चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : सभागृहात मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.10 ते 12.25 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----------

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** : सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे औषधांची परराज्यातून करण्यात आलेली खरेदी.

**मु. शी.** : सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे औषधांची परराज्यातून करण्यात आलेली खरेदी या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35626 ला दिनांक 29 नोव्हेंबर 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, 'सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे औषधांची परराज्यातून करण्यात आलेली खरेदी' या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35626 ला दिनांक 29 नोव्हेंबर 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे औषधांची परराज्यातून करण्यात आलेली खरेदी या विषयावर तारांकित प्रश्न क्रमांक 35626 दिनांक 29 नोव्हेंबर 2007 रोजी विचारण्यात आला होता. परंतु त्याच्यावर कोणतीही चर्चा झाली नव्हती. त्यामुळे अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून या महत्वाच्या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. राज्याचे औषध खरेदीबाबतचे जे धोरण आहे त्याबाबतीत राज्याची औषध खरेदी ही डब्ल्यूएचओ, जीएमपीच्या माध्यमातून तसेच केंद्र शासनाच्या माध्यमातून होते. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून त्यांच्या प्रोजेक्टसाठी औषधांची खरेदी होते. त्याचप्रमाणे नॅशनल रुरल हेल्थ मिशनच्या माध्यमातून त्यांच्या प्रोजेक्टसाठी औषध खरेदी होते, केंद्र सरकारकडून परचेस प्रेफरन्स पॉलिसीप्रमाणे जी खरेदी होते त्यामध्ये 102 औषधांचा प्राथम्यक्रम आहे. ही औषध खरेदी सेक्टर फार्मा एंटरप्राईज यांच्यामार्फत होते. या औषध खरेदी व्यतिरिक्त इतर औषधांची खरेदी, इन्स्ट्रमेंटची खरेदी राज्याच्या खरेदी धोरणानुसार होते. राज्य शासन जी औषध खरेदी करते त्यामध्ये औषधे,उपकरणे,किटकनाशके इ. गोष्टी असतात. दुर्देवाने आपण परिस्थिती पाहिली तर लेंटीन आयोगाचे नियम आणि निकष धाब्यावर बसवून राज्य शासन औषधांची खरेदी करीत आहे. तसेच परराज्यातून म्हणजे कर्नाटक, हिमाचल प्रदेश येथून औषध

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरेदी केली जाते. राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य खात्याने तर याबाबतीत उच्चांक गाठला आहे. दिनांक 30 ऑगस्ट 2007 रोजी खरेदीचे धोरण जाहीर केले. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "First preference will be given to undertakings whose rates are lowest out of Government of Maharashtra Undertakings such as Haffkine Bio-pharma and sister concerns and Central Public Sector Undertakings and subsidiaries of Government of India such as Hindustan Latex, whose rates are lowest will be given first preference." अशा प्रकारे सरकारच्या धोरणामध्ये उल्लेख केलेला आहे. कर्नाटक राज्याला बऱ्याच मोठया प्रमाणावर औषधांची ऑर्डर दिली जाते. हिंदुस्थान लॅटेक्सच्या बाबतीत विधानसभेत चर्चा झाली होती. काही काळाकरिता ही कंपनी ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यात आली होती. यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती आणि चौकशी सुरु होती त्या काळात त्यांनी जो अपहार केला होता त्यामुळे कंपनीला ब्लॅक लिस्टेड केले होते. औषध खरेदीसाठी डब्ल्यूएचओ जीएमपी यांच्याकडून प्रमाणपत्र घ्यावे लागते. औषध कंपन्या परराज्यात जात आहेत याचेकारण परराज्ये डब्ल्यूएचओ जीएमपी नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करीत नाहीत. बिहार, उत्तरप्रदेश आणि कर्नाटक राज्यातील औषध कंपन्या जुजबी इन्फ्रास्ट्रक्चर दाखवितात. आपल्या राज्यातील फार्मास्युटिकल कंपन्यांना सगळया नोंदी दाखवाव्या लागतात त्यामुळे कंपन्या हैराण होतात. हाच मुद्दा मागील हिवाळी अधिवेशनात मी वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्या निदर्शनास आणला होता.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:15

डॉ.दीपक सावंत.....

डब्ल्यूएचओ जीएमपी स्वागतार्ह आहे. परंतु यामुळे भ्रष्टाचार वाढणार आहे. महाराष्ट्रातील अनेक कंपन्या बॉर्डर क्रॉस करुन गुजराथमध्ये, मध्यप्रदेशमध्ये, आंध्रप्रदेशमध्ये जातील आणि तसेच होत आहे. शासन एकीकडे म्हणते की, हाफकीन बायोफार्माकडून औषधे घ्यायची. परंतु नेमकी काय परिस्थिती आहे? हाफकीन बायोफार्मा कंपनीचे पूर्णत: खच्चीकरण चालू आहे. आज हाफकीन संस्थेला शासनाकडून 50 कोटी रुपयांची आवश्यकता असताना फक्त 2 कोटी रुपये देण्यात आले. हाफकीनची बरीचशी प्रॉडक्ट्स बंद आहेत. तेथे पुरेसे इन्फ्रास्ट्रक्चर नाही. एका ठिकाणी हाफकीन संस्थेकडून औषधे घ्या असे म्हणता आणि दुसरीकडे त्या संस्थेला पुरेसे सहाय्य दिले जात नाही. म्हणजे आपोआप हाफकीन संस्था बंद पडणार आणि शासनाला परराज्यातून औषध खरेदी करण्यास मोकळिक मिळणार आहे. हा एक प्रकारचा ड्रामा आहे. आज राज्यात हाफकीन वगळता शासनाच्या अखत्यारित दुसरी कोणती कंपनी आहे? महाराष्ट्रातील शासनाच्या अंगिकृत उपक्रमापैकी औषधे बनविणारी हाफकीन ही एकच संस्था आहे. लेंटिन आयोगाने आपल्या शिफारशीमध्ये काय सांगितले होते? लोन लायसेन्सीवरुन काम करतात त्यांच्याकडून औषधे खरेदी करावयाची नाहीत. राज्य शासन आणि केंद्र शासन पुरस्कृत उपक्रम स्वत: निर्मिती करीत असलेली औषधे आणि इतर औषधांबाबत लेंटिन आयोगाने नेमून दिलेल्या शिफारशीनुसार डीएमईआरतर्फे खुल्या निविदा मागवून औषध निर्मिती संस्था अटी पूर्ण करीत असेल त्यांच्याकडूनच खरेदी करावी. अशा कंपनीने मागील तीन वर्षापासून औषध निर्मिती करणे आवश्यक आहे. ड्रग लायसन्स डब्ल्यूएचओ जीएमपीच्या नॉर्मप्रमाणे असावे, अन्न व औषध प्रशासनाचे परफॉर्मन्स सर्टिफिकेट असावे, मागील तीन वर्षात त्यांचे ड्रग लायसन्स सस्पेंशन झालेले नसावे. याठिकाणी मी कर्नाटक अँटिबायोटिक्स व हिंदुस्थान लॅटेक्स कंपनीचे उदाहरण दिले. या कंपनीचे डिस्ट्रीब्युटर्स असतात, त्यांच्याकडून ऑर्डर्सचा पुरवठा केला जातो. हे पुरवठादार दुसऱ्याकडून उधार उसनवारीवर लायसन्स घेऊन औषधे बनवितात. मंत्रीमहोदयांनी स्वत: जाऊन पाहणी करावी. लेंटिन आयोगाने शासनाच्या अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्याची शिफारस केली होती. किती अधिकारी तपासणी करुन आले? राजस्थानमध्ये किती अधिकारी तपासणी करण्यासाठी गेले होते? कर्नाटकमध्ये किती अधिकारी तपासणी करुन आले? माझ्या माहितीप्रमाणे एकही अधिकारी तपासणी करण्यासाठी गेला नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, रेट कॉन्ट्रॅक्ट हा प्रकार भयानक आहे. आर.सी.वर कोणत्या कंपन्या असाव्यात याबाबत अतिशय परिणामकारकरित्या मॅनेज केले जाते. हा मी जाणीवपूर्वक आरोप करीत आहे. एखाद्या औषधामध्ये 5 मिलिग्रॅम घटक असेल आणि दुसऱ्या औषधामध्ये 10 मिलिग्रॅम घटक असेल तर 5 मिलीग्रॅमची आवश्यकता असेल त्याला 10 मिलीग्रॅम दिले जाते. एखाद्या यंत्राचे स्पेसिफिकेशन असेल त्याप्रमाणे ॲड करुन ऑर्डर दिली जाते. हे कोणासाठी केले जाते? रुग्णांसाठी औषधे घेतली जातात, रुग्णांसाठी इक्वीपमेंट घेतली जातात की त्या कंपन्यांना फेव्हर करण्यासाठी ही खरेदी केली जाते? मालाफाईड इन्टेन्शनने सर्व अधिकारी काम करतात. शासनाच्या आर.सी.सेलबाबत मी सांगू शकतो की, कफ सिरप, टॉनिक यामध्ये प्रोटीन्स, कॅल्शियम किती असावे याबाबत पूर्णत: जगलरी सुरु आहे. यामधून कोणाला पुढे आणावे, कोणाला आऊट करावे हे व्यवस्थितपणे मॅनेज केले जाते. काही दिवसापूर्वी मी सभागृहात अँटी रेबिजचा विषय उपस्थित केला होता. चीनमधील त्या कंपनीकडे तीन वर्षाचे परफॉर्मन्स सर्टिफिकेट होते का? त्या कंपनीकडे मागणी नोंदवावी असे शासनाला का वाटले? यामध्ये लवचिकता आणली जाते आणि शासन त्या कंपन्यांना कॉन्ट्रॅक्ट देते. करोडो रुपयांची औषध खरेदी केली जाते. त्या औषधांमध्ये पॅरासिटेमॉल 500 एम.जी.मध्ये ॲसिटो ॲमिनोफेम आहे का? याची अन्न व औषध प्रशासनकडून तपासणी करुन घेतली जाते का? टेट्रासायक्लीनची क्वांटिटी योग्य आहे का? टॉनिकची 100 एम.एल.ची बॉटल आहे. तेवढे टॉनिक त्या बॉटलमध्ये आहे का? डोळयाने 100 एम.एल.असल्याचे दिसते, परंतु आतमध्ये फक्त 90 एम.एल.असते हे मी जाणीवपूर्वक सांगू इच्छितो.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

माननीय मंत्री महोदया याबाबतीत फार सेन्सेटीव्ह आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आज आपल्या औषधांची परिस्थिती काय आहे हे त्यांनी जाऊन पहावे. या औषधांच्या नावाखाली आयुर्वेदिक औषधे मोठ्या प्रमाणात भरली जातात, पण कोणालाही दिली जात नाही. लिव्होव्हीनसारखी औषधे भरण्यात येतात पण किती लोक दारु पितात, वास्तविक हे भूक वाढविण्यासाठी असलेले औषध आहे परंतु लिव्होव्हीनऐवजी लिव्होफरसारखे टॉनिक सर्रास देण्यात येते. दुसरीकडे मात्र राज्यात एकमेव औषध खरेदी करणाऱ्या हाफकिन संस्थेचे जाणुनबुजून खच्चीकरण करण्यात येत आहे. परराज्यातील कंपन्यांमार्फत ही खरेदी करण्यात येते अशाच प्रकारे एक औषध खरेदी करणारी हिंदुस्थान लॅटेक्स ही कंपनी काय बनविते अशा सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी उत्तरात द्यावीत, जेणेकरुन सभागृहाला सुध्दा ते समजेल. तसेच लेंटिन आयोगाने केलेल्या शिफारशींचे काटेकोरपणे पालन करणार काय ? कारण बाहेरच्या राज्यात डब्ल्यूएचओजीएमपी हे प्रमाणपत्र सहजरित्या मिळते, आपल्या राज्यात मात्र त्या प्रमाणपत्रासाठी अनेक अडचणी येतात. त्यांच्या नॉर्म्सचे पालन करु नका असे आम्ही म्हणणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आपले अधिकारी इतर राज्यांमध्ये पाठवून या कंपन्यांसंबंधीची माहिती करुन घ्या. तसेच लोन लायसेन्समधील ज्या कंपन्या असतील त्या सर्व बंद करुन टाका, उगाचच पैसे देऊन राज्याचे करोडो रुपये वाया न घालविता चार गरिबांना औषधे द्या व त्यांना बरे करा, एवढेच या निमित्ताने मी सांगतो. व माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून तसेच आरोग्य संचालनालयाच्या माध्यमातून परराज्यातून आपल्या राज्यातील रुग्णालयांसाठी औषध खरेदी होत असल्याचे सांगितले. अशा खरेदीवर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे अशीही त्यांनी सूचना केली. मी सभागृहाला प्रथत सांगू इच्छितो की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये अथवा उपकेंद्रे यांच्यासाठी जी औषधांची खरेदी करण्यात येते ती रेट कॉन्ट्रॅक्टनुसारच केली जाते. तसेच लेंटिन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत त्या पध्दतीनेच ही औषधांची खरेदी राज्यात केली जाते. या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण विभागाकडून आर.सी. काढण्यात येतात त्यानुसार त्यांची जी रुग्णालये आहेत त्यांच्यासाठी औषध खरेदी केली जाते. हाफकिन इन्स्टिटयुट, जी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारित येते त्यासंदर्भात देखील सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुद्दा उपस्थित केला. मला या अनुषंगाने असे सांगावयाचे आहे की, म्युनिसिपल कार्पोरेशनची रुग्णालये असतील, ईएसआयएसची रुग्णालये असतील अशा सर्व ठिकाणी विविध साधनसामुग्री तसेच औषधांची जी खरेदी केली जाते ती ठरवून दिलेल्या निकषांप्रमाणे आणि दरकराराप्रमाणेच केली जाते. आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 1 एप्रिल ते 27 सप्टेंबर, 2008 या कालावधीत कर्नाटक ॲंटी बायोटिक, राजस्थान ड्रग्ज, हिंदुस्थान ॲंटी बायोटिक अशा ज्या पाच कंपन्या आहेत त्या कंपन्यांमध्ये सुध्दा दरकरारानुसारच औषधांची खरेदी करण्यात आली आहे. यासंदर्भात शासनाने वेळोवेळी जे शासन निर्णय घेतले त्याप्रमाणेच ही खरेदी झाली आहे. सन्माननीय सदस्यांनी डब्ल्यूएचओजीएमपी बाबतचा मुद्दा उपस्थित केला. मी यासंदर्भात त्यांना सांगू इच्छिते की, उपरोक्त प्रमाणपत्र पाहूनच आपण ही खरेदी केली आहे. तसेच 30 ऑगस्ट, 2007 ला शासनाने स्थगिती दिली होती त्या लोन लायसेन्स परमिटेड कंपन्यांना परवानगी द्यावयाची त्या कंपन्यांची तपासणी संबंधित कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांवर आपण ठेवणार आहोत. कारण शेवटी ज्या कंपन्या आहेत, त्यात राजस्थान ड्रग्ज, कर्नाटक ॲंटी बायोटेक लि. या ज्या पाच कंपन्या आहेत त्या वास्तविक केंद्रशासनाच्या अखत्यारित असलेल्या संस्था आहेत व या कंपन्यांवर जागतिक आरोग्य संघटनेच्या जीएमपीच्या नॉर्म्स प्रमाणेच परवानगी घेणे बंधन घालण्यात आलेले आहे आणि ती जबाबदारी त्या

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा ......

त्या कंपन्यांचीच असते. हाफकिन इन्स्टिटयुट चांगल्या व कार्यक्षम पध्दतीने चालावी यासाठी राज्यशासनाचा विशेष करुन वैद्यकीय शिक्षण विभागाचा प्रयत्न आहे व त्यानुसार वैद्यकीय शिक्षण विभागाची रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालये यांच्यासाठी औषधे खरेदी करण्याचे अधिकार आपण हाफकिन इन्स्टिटयुटलाच दिलेले आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा ....

पुढील काळात हापकिन इंस्टिटट्यूट सक्षम बनावी यासाठी शासन निश्तिपणे प्रयत्नशील राहील. हाफकिन इंस्टिटट्यूटने तयार केलेल्या औषधांमध्ये अॅन्टी बायोटीक, क्रोसीन तसेच इतर काही औषधे असतील ती हापकिन इंस्टिटट्यूट कडूनच घेतली जातात. आतापर्यंत आमच्या विभागामार्फत हापकिन इंस्टिटट्युटकडून 26.26 कोटी रुपयांची औषधे घेतलेली आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यानीं काही लोन लायसन्सवर किंवा एआरव्हीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबद्दलचा तारांकित प्रश्न या अगोदर दोनदा चर्चेला आला होता व या प्रश्नाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. चायनीज कंपनीने तीन वर्षाची अट पूर्ण केली आहे की, नाही असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केलेला आहे. परंतु याबद्दलचे सर्टीफिकेट आणि ॲपिलेट ॲथोरिटी ही अप्पर मुख्य सचिव,सार्वजनिक विभागाच्या होत्या त्यांनी ते विभागून दिलेले आहे. यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाकडून निर्णय घेण्यात आला होता तो चुकीचा होता हे निदर्शनास आल्यानंतर ती चूक दुरुस्त करण्यात आलेली आहे. कफ सिरप, लिव्हर टॉनीक ही औषधे इशेन्सीअल असल्यामुळे ही औषधे प्राथमिक आरोग्य केंद्राला आवश्यक असतात. आयएफए हे अँटी ॲनामिया प्रोग्राममध्ये किंवा अँटीबायोटीक असेल या सर्व औषधांची जी काही खरेदी झालेली आहे ती पूर्णपणे तपासून फूड अँड ड्रग डिपार्टमेंट, मेडिकल एज्युकेशन या विभागाकडून रिझर्व्हेशन असल्या प्रमाणे खरेदी केली गेली आहे. खरेदी करण्यामध्ये कोणताही गैरप्रकार निदर्शनास आलेला नाही हे मी या निमित्ताने सांगू इच्छिते. लॅटींन आयोगाचे व्हायोलेशन झाले आहे अशी बाब उपस्थित केली जाते परंतु मी आपल्याला सांगू इच्छिते की, एआरएचएमचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. परंतु केंद्रशासनाने सांगितल्या प्रमाणे सीएसपीओ किंवा सीपीएसयु जे ड्रग मॅन्यूफॅक्चरर आहेत त्यांना लोनलायसेन्स परमिटेड करण्याच्या संदर्भात सूचना आहेत. त्यामुळे ज्या कंपन्या केंद्रशासन पुरस्कृत आहेत त्यामध्ये हिंदुस्तांन अँटीबायोटीक असेल बेंगॉल, राजस्थान, आयडीपीएल किंवा कर्नाटक असेल या केंद्रशासन पुरस्कृत कंपन्याना आपण टाळू शकत नाही. योग्य त्या प्रमाणातच आपण त्यांच्याकडून औषधे घेत असतो व या पुढील काळात सुध्दा योग्य त्या प्रमाणात या कंपन्याकडून औषधांची खरेदी करण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, हाफकिन इंस्टिट्यूटला 26.26 कोटी रुपयांची ऑर्डीर दिलेली आहे परंतु हाफकिन इंस्टिटयूटचे प्रॉडक्शन बंद आहे, या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चरच नाही त्यामुळे आपण हाफकिन बायोफार्मा इंस्टिट्यूटला कशी काय ऑर्डर दिलेली आहे? तसेच दुसरा मुद्दा असा आहे की, लँटीन आयोगानुसार लोन लायसन्सवर एखादी कंपनी काम करीत असेल तर यासंदर्भातील आपण एखादा नियम वाचून दाखववावा की, राज्य शासन किंवा केंद्र पुरस्कृत कंपन्याना ते अलाऊड आहे म्हणून. कनार्टक अँटी बायोटीक , राजस्थान अँटी बायोटीक किंवा अजून कोणती कंपनी असेल जी कंपनी परराज्यातून सप्लाय करते? महाराष्ट्राच्या हापकिन इंस्टिट्युटकडे यातील किती ऑर्डर्स जातात? महाराष्ट्रातील ज्या कंपन्यांमध्ये औषघे निर्माण केली जातात त्यांना बाहेरची राज्ये किती औषधांची ऑर्डर्स देतात याची आपल्याकडे माहिती आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य वारंवार कर्नाटक अँटी बायोटीक फार्मास्यूटीकलचा उल्लेख करीत आहेत. अर्धा तास चर्चा ही चार-पाच कंपनीच्या संदर्भातील आहे. कनार्टका अँटीबायोटीक, हिंदूस्तान अँटीबायोटीक, राजस्थान ड्रग्स, बेंगाल केमिकल्स ॲड इंडियन ड्रग फार्मास्येटीकल यासंदर्भात्तीलच आहे. मागच्यावर्षी सर्वात जास्त ऑर्डर्स कर्नाटक अँटीबायोटीक्सला देण्यात आली होती. या कंपनीकडून कोणती औषधे घेण्यात आली होती यासंदर्भातील माहिती सुध्दा माझ्याकडे आहे. या कंपनीकडून बेसीकली झींक कॅप्सूल, फल्यूबॅक ऑईनमेंट ही औषधे होती. या कंपन्या केंद्रशासन पुरस्कृत असून पब्लीक लिमिटेड कंपन्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, या कंपन्यांचे लायसन्स लोनवर आहे. परंतु यासंदर्भातील माहिती पुन्हा तपासून घेण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : लेन्टीन आयोगाच्या शिफारशी वाचून पाहत नाही काय ?..

श्री.मधुकर चव्हाण : या सदर्भात लेन्टीन आयोगाने शिफारशी केलेल्या आहेत तेव्हा आपण काय तपासून पाहणार आहात ? शासनाला या शिफारशी माहीत नाही काय ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर त्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.अरविंद सावंत :सभापती महोदय, गेल्या आठवडयात किंवा पंधरवाडयात तसेच आरोग्य खात्याच्या चर्चे पासून किती तरी वेळा सन्माननीय सदस्यांनी हा विषय मांडला होता.कर्नाटक ॲन्टी बायोटीक्स कंपनी लोन लायसन्सवर चालते काय याची माहिती माननीय मंत्री महोदयांना ज्या अधिकाऱ्यांनी गेल्या पंधरवाडयात दिली नाही त्या अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? हा विषय काही पहिल्यांदाच उपस्थित करण्यात आलेला नाही.यापूर्वी दोन वेळा हा विषय मांडण्यात आला असून आता तिस-या वेळी पुन्हा मांडला आहे.तरी सुध्दा माननीय मंत्री महोदयांकडून माहिती मिळत नाही. ही गोष्ट बरोबर नाही. हाफकिन बायो फार्माला मारण्याचा हा प्रयत्न आहे.

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य लोन लायसन्सचा उल्लेख करीत आहे. तेव्हा त्या बाबतीत केन्द्र सरकारने परवानगी दिली आहे.

डॉ.दीपक सावंत : आपण मला नियम दाखवा. आपण जर नियम दाखवला तर माझे काहीही म्हणणे नाही. मघाशी मी महाराष्ट्र शासनाच्या पुस्तकातील नियम वाचून दाखवला होता त्याप्रमाणें तुम्ही मला हा नियम वाचून दाखववावा

श्री.रणजित कांबळे : आपण ज्या पुस्तकातील नियम वाचून दाखवत आहात त्याबाबतीत मी आपल्याला सागू इच्छितो की तो खरेदीसंबंधीचा प्रस्ताव होता. अजून तो लागू झाला नाही. त्या संदर्भात प्रपोजल होते.

डॉ.दीपक सावंत : माझ्याकडे त्या डॉक्युमेन्टची कॉपी आहे

श्री.रणजित कांबळे : परंतु ते अंडर कन्सीडरेशन आहे. सभापती महोदय, जी गोष्ट कन्सीडरेशनमध्ये आहे, ज्या गोष्टीची अजून अंमलबजावणी झालेली नाही, जी बाब लागू झालेली नाही त्यासंबंधी माननीय सदस्य वाचून दाखवत आहे. मी अगोदरच सांगितले की, आपल्या राज्यामधील ज्या इन्स्टिटयूशन्स आहे त्यांच्या मार्फत खरेदी करण्यासाठी आमची प्रायॉरिटी आहे उदाहरणार्थ हाफकिन बायो फार्मा या इन्स्टिटयूशनमधून प्राधान्याने औषध खरेदी केली जाते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे...

त्यांच्या नंतर डी.एम.ई.आर. च्या रेट कॉन्ट्रॅक्टप्रमाणे खरेदी केली जाते . त्यांच्याकडे जर औषधे वेळेवर उपलब्ध होत नसतील तर इ.एस.आय.एस. किंवा बी.एम.सी.च्या रेंट कॉन्ट्रॅक्टप्रमाणे औषधाची खरेदी केली जाते. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, केन्द्र सरकारने त्यासाठी परवानगी दिलेली आहे. परंतु आज माझ्याकडे ती माहिती नाही. सन्माननीय सदस्यांना पाहिजे असेल तर ती माहिती मी पटलावर ठेवतो.

श्री.अरविंद सावंत :( बसून ) ही बाब सिरिअस आहे.

श्री.रणजित काबळे :मला देखील हे माहीत आहे की ही बाब सिरिअस आहे. दोन औषधांची खरेदी त्यांच्याकडून करण्यात आलेली आहे. बाकीची 70 टक्के खरेदी हाफकिन च्या माध्यमातून होत असते.

डॉ.दीपक सावंत : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की सन्माननीय सदस्य कर्नाटक अॅन्टी बायोटीक्सचा उल्लेख वारंवार करीत आहेत. मी त्यांना बसूनच असे विचारले होते की, सगळयात जास्त ऑर्डर कोणाला दिली तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी कबूल केले की,कर्नाटक अॅन्टीबायोटीक्सला ऑर्डर दिली होती. आता मात्र माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, त्यांच्याकडून फक्त दोनच औषधांची खरेदी केली आहे.मग सगळयात जास्त ऑर्डर त्यांना दिली असेल तर करोडो रुपयांचे फक्त झिंक खरेदी करण्यात आले होते काय ? केवळ दोन आयटेमसाठी .करोडो रुपयांची खरेदी करण्यात आली होती काय

श्री.रणजित कांबळे :सन्माननीय सदस्य माझ्या उत्तरातून चुकीचा अर्थ काढत आहेत.मी असे सागितले की, पाच कंपन्यांच्या माध्यमातून आपण औषधांची खरेदी करीत असतो त्यापैकी सर्वात जास्त मागच्या वर्षी म्हणजे सप्टेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत ऑर्डर दिली........

डॉ.दीपक सावंत : किती कोटी रुपयांची ऑर्डर दिली ?

श्री.रणजित कांबळे :आठ कोटी रुपयांची.

**उपसभापती** : बाकीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी.

श्री.रणजित कांबळे : ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





VTG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 12.45

**उपसभापती** : अर्धा तास चर्चा संपलेली आहे. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होऊन नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.48 ते 1.15 वाजेपर्यंन्त स्थगित झाली)

----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 12:50

( स्थगितीनंतर ..... )

**<u>सभापतीस्थानी - माननीय सभापती</u>**

**<u>नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत ....</u>**

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आज नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्री.मधुकर सरपोतदार, डॉ. दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत आणि डॉ.नीलम गोऱ्हे यांनी प्रस्ताव दिला आहे. आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून त्या ऐवजी नियम 289 खालील आपला प्रस्ताव मी का स्वीकारावा याबाबत सन्माननीय सदस्य काही सांगू इच्छित असतील तर मी त्यांना त्यासाठी 2 मिनिटे बोलण्याची परवानगी देत आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आज राज्यामध्ये वैद्यकीय शिक्षणाच्या संदर्भात अतिशय हलाखीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. कारण सर्व वैद्यकीय शिक्षण मग त्यात रूग्णालयीन व्यवस्था असोत, त्यात ग्रामीण आरोग्य केंद्रे असोत वा ग्रामीण रूग्णालये असू द्यात, या सर्वांमध्ये डॉक्टर्स लागतात. परंतु आज वैद्यकीय शिक्षण क्षेत्रामध्ये जी अवस्था निर्माण झाली आहे त्यामुळे अनेक पोस्ट ग्रॅज्युएटस् वैद्यकीय डिग्ऱ्या रद्द होऊ लागल्या आहेत. दोन दिवसापूर्वीच एमसीआयने या संदर्भात आपला निर्णय जाहीर केला की, महाराष्ट्रातील एमडी आणि एमएस या पदव्युत्तर डिग्री असो वा डिप्लोमा असो, त्यांच्या 242 जागा अचानकपणे रद्द करण्यात आल्या. त्यामुळे आता आपल्या राज्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतून पदव्युत्तर डॉक्टर्स तयार होणारच नाहीत. याचा अत्यंत प्रतिकूल असा परिणाम खाली आरोग्य व्यवस्थेवर होणार आहे. सभापती महोदय, या जागा का रद्द झाल्या याची कारणमिमांसा पाहिली तर 3-4 दिवसांपूर्वी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरूवातीलाच, तिसऱ्या-चौथ्या दिवशी मी या सभागृहाला सूचित केले होते की, एमसीआयने एक पत्र दिलेले आहे की, 31 मार्च पर्यंत आपण आपल्या डिग्ऱ्या अधिकृत करण्यासाठी अर्ज केला आणि तो अर्ज पास झाला तर तुमच्या डिग्ऱ्या पुढील वर्षासाठी अधिकृत करून मिळतील. परंतु आपल्या आरोग्य संचालकांनी, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या तसेच आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांनी किंवा मंत्र्यांनी देखील त्या संदर्भात कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे आज एमसीआयने आपला त्यासंबंधातील निर्णय जाहीर केला आणि त्यामुळे जे 1200 पदव्युत्तर डॉक्टर्स आपल्याकडे होत होते त्या ऐवजी आता आपल्याकडे केवळ 441 जागा राहिल्या आहेत. 2001 पासून 2007 पर्यंत जवळपास 1200-1300 जागांना आपण मुकलो आहोत. त्या

..... टी 2 ..

डॉ. दीपक सावंत .....

जागा रद्द झाल्या तर आपणास पुन्हा मिळू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. एक तर आपल्याकडे वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी प्राध्यापक वर्ग मिळत नाहीत. दुसरीकडे आपल्याकडील रूग्णांवर योग्य उपचार करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. मात्र खाजगी वैद्यकीय कॉलेजांना मात्र एमसीआय कशी माय मान्यता देते हा प्रश्न आहे. या संदर्भात महाराष्ट्राचे शिष्टमंडळ त्यांना भेटायला गेले असता त्यांनी सांगितले की, आपल्याला परराज्यामध्ये प्रवेश मिळत असेल तर तेथे तुम्ही जा. राज्यामध्ये येऊ नका. आपल्या वैद्यकीय शिक्षण संचालकांनी सांगितले की, आम्ही या बाबतीत आमचे काम केलेले आहे. 62 लाख रूपये आम्ही यासाठी भरले आहेत. पण एमसीआयला करोडो रूपये आम्ही देणार नाही. म्हणजे एमसीआय ही या मान्यतेसाठी करोडो रूपये घेते ही वस्तुस्थिती आहे, ती मला येथे नमूद केली पाहिजे. परंतु राज्य सरकार म्हणून आपल्या सरकारची या बाबत काही जबाबदारी आहे की नाही ? या सभागृहामध्ये सदस्यांनी जबाबदारीने सांगितल्यानंतर तरी याची दखल शासनाने घेतली पाहिजे. म्हणून माझी विनंती आहे की, या नव्याने निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आपण येथे तातडीने चर्चा करणे आणि यातून मार्ग काढण्याची नितांत आवश्यकता आहे त्यासाठी आजचा प्रश्नोत्तराचा तास देखील आपण स्थगित करावा आणि ही चर्चा घडवून आणावी यासाठी आम्ही नियम 289 खाली प्रस्ताव दिलेला आहे तो आपण स्वीकृत करावा. आम्ही या संदर्भात वारंवार विषय येथे उपस्थित करूनही शासना कडून कधीच उत्तर मिळत नाही अशी आमची तक्रार आहे. तेव्हा निदान या प्रस्तावाच्या माध्यमातून चर्चा झाल्यास यावर शासनाकडून उत्तर मिळेल, यावर सांगोपांग चर्चा होईल. त्यातून राज्य सरकारच्या या बाबत काय अडचणी आहेत हेही समजू शकेल तसेच एमसीआय आपल्याला न देता खाजगी महाविद्यालयांना का मान्यता देते हेही समजू शकेल, त्यात आपण कोठे कमी पडतो आहोत हेही लक्षात येईल. जी मुले आज वैद्यकीय शिक्षण घेत आहेत ती बाहेरच्या राज्यात जाऊन प्रॅक्टिस करू शकतात काय ? ते केवळ महाराष्ट्रातच प्रॅक्टिस करू शकतात. सभापती महोदय, यामुळे प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून आपण या प्रस्तावावरील चर्चेस परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो.

यानंतर सौ.रणदिवे........ यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 13:20

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्या संदर्भात मला माझे म्हणणे मांडावयाचे आहे. सध्या राज्यामध्ये अतिशय गंभीर वातावरण निर्माण झालेले आहे. यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे या राज्यातील एम.डी., एम.एस.च्या जागांची संख्या 1900 वरुन 411 पर्यंत कमी झालेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी शासनाला सदनामध्ये सातत्याने अवगत केले आहे की,शासकीय महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारचा अभ्यासक्रम राबविला जात आहे की, ज्याला मान्यता मिळालेली नाही. मी हे खाजगी महाविद्यालयांच्या बाबतीत सांगत नाही. या अभ्यासक्रमाला मान्यता न मिळण्याचे कारण म्हणजे आपण एम.सी.आय.च्या अटी पूर्ण करु शकत नाही. अशा वेळी जर महाराष्ट्र शासन अभ्यासक्रमाला मान्यता देण्याच्या संदर्भातील अटी पूर्ण करणार नसेल तर त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी डावलली जाणार आहे आणि या गोष्टीला महाराष्ट्र शासन कारणीभूत असेल. म्हणून सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी 289 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याबाबतीत अतिशय गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. नाहीतर या शिक्षणापासून महाराष्ट्रातील आमचे भूमीपुत्र, आमचे विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या धोरणामुळे वंचित होणार आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भातील चर्चेला मंजूरी देण्यात यावी अशी मी विनंती करतो.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, याठिकाणी दोन्ही सन्माननीय सदस्यांनी एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण नेहमीप्रमाणे प्रश्नोत्तराच्या तास सुरु करावा. तसेच हे अधिवेशन जवळपास 25 तारखेपर्यंत होणार आहे. त्यामुळे पुढच्या आठवडयामध्ये या विषयाच्या संदर्भात अडीच तासाची चर्चा किंवा दुसऱ्या पध्दतीने चर्चा घ्यावयाची असल्यास ती घेण्यात यावी. आता प्रश्नात्तराचा तास स्थगित करुन याबाबत चर्चा करणे योग्य वाटत नाही. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भात नंतर वेगळी चर्चा घेण्यात यावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आज एम.डी.,एम.एस. आणि डिप्लोमा या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याच्या संदर्भातील पहिला राऊंड संपत आहे आणि दुसरा राऊंड चार दिवसांनी सुरु होणार आहे. या चार दिवसामध्ये जर अभ्यासक्रमाला मान्यता दिली नाही तर हे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार आहेत. अशा परिस्थितीत हे विद्यार्थी .......

. . . .यु-2

डॉ.दीपक सावंत . . . .

प्रॅक्टीस करण्यासाठी महाराष्ट्राच्या बाहेर जाऊ शकणार नाहीत, फॉरेनला जाऊ शकणार नाहीत. अशा परिस्थितीत हे विद्यार्थी महाराष्ट्रातच घुटमळत रहाणार आहेत. त्यामुळे याबाबतीत इमर्जन्सी निर्माण झालेली असल्याने सदरहू विषयाच्या संदर्भातील चर्चा कधी घेण्यात येणार आहे ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आम्ही उद्या देखील या विषयाच्या संदर्भात चर्चा घेण्यास तयार आहोत. वाटल्यास, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची परवानगी असेल तर उद्या सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेऊन, त्यावेळी या विषयाच्या संदर्भातील चर्चा घेता येईल.

**सभापती** : याठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. या अनुषंगाने तांत्रिक उत्तर न देता, आता आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करु या आणि सन्माननीय पाटबंधारे मंत्री श्री.अजित पवार साहेबांनी सूचित केल्याप्रमाणे आणि आपण मागणी केल्याप्रमाणे सभागृहाची विशेष बैठक उद्या सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत घेण्यात येईल. त्यावेळी या विषयाच्या संदर्भात चर्चा घेऊ आणि त्यामध्ये दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य भाग घेतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, यापूर्वी सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी नियम 289 अन्वये कोकणातील आंब्याच्या पिकाला बुरशी येऊन जे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झालेले आहे, त्याबाबत शासनाकडून नुकसान भरपाई मिळण्याच्या संदर्भात चर्चा घेण्यात यावी असा प्रस्ताव मांडला होता. अशा प्रकारची नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. शासनाने यासंदर्भात कार्यवाही करावी यासाठी सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. यासंदर्भात मार्ग काढण्यात यावा. तसेच या विषयाच्या संदर्भात दुसऱ्या कोणत्याही मार्गाने चर्चा उपस्थित करता येईल. याबाबतीत शक्य असेल तर नियम 101 अन्वये चर्चा घेऊ असे आदेश दिले होते. परंतु आठ दिवस झाले तरी याबाबतीत काहीही कारवाई झालेली नाही.

**सभापती** : मी या विषयाच्या संदर्भात चर्चा घेण्याचे कबूल केले होते. त्याप्रमाणे या आठवडयामध्ये ही चर्चा घेण्यात येईल. आता आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करु.

-----

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

ता.प्र.क्र.41765

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य अनुपस्थित असले तरी आपल्या अनुमतीने मला या प्रश्नाच्या उत्तरामध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. याठिकाणी उत्तरामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, "उर्वरित 11 शाळा एप्रिलच्या पहिल्या आठवडयात सुरु करण्याचे नियोजित आहे." याऐवजी "उर्वरित 11 शाळा दि. 5 एप्रिल 2008 पासून सुरु करण्यात आल्या आहेत." असे वाचावे.

-----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 13:25

**असंघटित कामगारांना किमान वेतन व अन्य सुविधा देण्याबाबत**

**(२) * ४१५४७ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने असंघटित कामगारांसाठी अनेक कायदे करून औरंगाबाद परिसरातील बजाज, गरवारे, व्हिडियोकॉन या कारखान्यामध्ये त्यांची अंमलबजावणी न करता कामगाराची कंत्राटी कामगार म्हणून नेमणूक करून वेतन देण्यांत येत आहे हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर असंघटित कामगारांना किमान वेतन व अन्य सुविधा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक** : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय. चौकशी केली आहे. चौकशी केली असता कामगार उप आयुक्त, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखालील अंमलबजावणी यंत्रणेने माहे जानेवारी २००७ ते फेब्रुवारी २००८ या कालावधीत किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत २१९ कामगारांना १६,३८,२५७/- रुपयांचा आर्थिक लाभ मिळवून दिला. तसेच १३ दोषी मालकांविरुध्द न्यायालयात खटले दाखल केले असता ७ खटले निकाली निघाले असून रु. ५,७००/- दंड ठोठावण्यात आलेला आहे. उर्वरित खटले प्रलंबित आहेत. त्याचप्रमाणे माहे फेब्रुवारी, २००८ अखेर १०५३ कंत्राटदारांना अनुज्ञाप्ती देण्यात आली असून, कंत्राटी कामगारांची संख्या ६५०८७ एवढी असल्याचे आढळून आले. कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अंतर्गत एकूण २४६ निरिक्षण / भेटी देण्यात आल्या असून, ४६ दोषी मालकांविरुध्द न्यायालयात खटले दाखल केले असून ते न्यायप्रविष्ठ आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या ठिकाणी मी 3 कारखान्यांच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. बजाज, गरवारे व व्हीडीओकॉन हे तीनही कारखाने मोठे कारखाने आहेत. या कारखान्यांव्यतिरिक्त इतरही काही छोटे कारखाने आहेत त्यामध्ये देखील अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे कामगार उपायुक्त कार्यालय, औरंगाबाद येथील सर्व कारखान्यांमध्ये निरीक्षण, भेटी देणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, बजाज, गरवारे, व्हीडीओकॉन या कारखान्याची जी काही प्रक्रिया आहे, ती नियमाला धरुन आहे. त्या परिसरामध्ये अन्य 3 कारखान्याचे मालक असे आहेत की, त्यांनी कामगार खात्याच्या, कंत्राटी कामगारांच्या नियमांचा भंग केलेला आहे. अशा दोषी लोकांवर खटले दाखल केलेले आहेत. त्यापैकी 7 खटले निकाली निघालेले आहेत. एकूण 1053 कंत्राटी कामगारांना लायसन्स देण्यात आलेले असून कंत्राटी कामगारांची संख्या 65087 एवढी आहे...

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41547..

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये किमान वेतन कायदा लागू होऊन किती दिवस झालेले आहेत ?

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय,एकूण 43 दोषी मालकांविरुद्ध न्यायालयमध्ये खटले दाखल करण्यात आलेले आहेत. निरीक्षकांकडून वारंवार निरीक्षण केले जाते. जे जे घटक नियमांचे भंग करतात त्यांच्या विरुद्ध कारवाई शासनाकडून केली जाते.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, किमान वेतन कायदा लागू होऊन बरीच वर्षे होऊन गेलेली आहेत. तरी देखील अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये आहे, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. औरंगाबाद, संभाजी नगर या जिल्हयामध्ये मोठे कारखाने आहेत. या कारखान्यांमध्ये कामगार तात्पुरत्या स्वरुपात नोकरीवर आहेत. त्यांना देखील किमान वेतन दिले जात नाही. ही शोकांतिका आहे. किमान वेतन मिळाले पाहिजे. त्या किमान वेतनापेक्षा जास्त कितीही वेतन दिले तरी चालेल. परंतु किमान ठरविलेले वेतन तरी कामगारांना मिळाले पाहिजे. जे दोषी असतील त्यांच्यावर खटले दाखल केले जात आहेत. ही कोणती काम करण्याची पद्धत आहे ? हे मला तरी काही समजत नाही. अशी प्रकरणे निदर्शनास आली की, केस दाखल करावयाची. त्यानंतर ही केस न्यायालयामध्ये वर्षानुवर्षे चालत राहते. माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी ज्या क्षणी होत नाही, कायद्याची इज्जत राखली जात नाही, किंवा कायदयाचे पालन केले जात नाही त्याबाबत ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे. तसेच जे मालक कायद्याचे पालन करीत नाही अशा मालकांना, त्यांच्या कारखान्यातील कामगारांना कायम वेतन श्रेणीमध्ये घेण्याची सक्ती राज्य शासन करणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी विचारलेल्या प्रश्नाचा रोख अतिशय योग्य आहे. काही कंपन्यांचे मालक हे कायम स्वरुपी कामगार घेताना एम्प्लॉयमेंट प्रमोशनल प्रोग्राम अंतर्गत शिकाऊ कामगारांना 6-6 महिन्यांच्या कालावधी करीता कामावर घेतात.

यानंतर श्री. बरवड..

अधिकृत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41547 ....... गणेश नाईक .....

किंवा कॅज्युअल लेबर किंवा कंत्राटी कामगार म्हणून वापरले जाते. काही कंपन्यांमध्ये परमनंट कामगारांचा पगार 25 हजार रुपये असतो म्हणून त्या ठिकाणी या घटकांना 5 हजार रुपये वेतनावर वर्षानुवर्षे वापरले जाते. मी सदनाला सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी कायमस्वरुपी काम आहे अशा ठिकाणी कॅज्युअल लेबर किंवा कंत्राटी कामगार वापरत असतील तर त्यांचे रुपांतर परमनंट कामगार म्हणून होण्याच्या अनुषंगाने जी कार्यवाही करण्याची गरज असेल ती निश्चितपणे शासन करील. भविष्य काळामध्ये जे मालकांचे घटक किमान वेतनश्रेणी देणार नाहीत त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करुन त्यांना अटक करण्याच्या दृष्टीने सुध्दा कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, सब से बड़ा प्रश्न तो यह है कि महाराष्ट्र के अन्दर असंगठित मजदूरों के लिए अलग से कोई एक्ट नहीं है. माननीय सदस्य श्री. काले के प्रश्न के जबाब में माननीय मंत्री महोदय ने बताया है कि 1053 कॉन्ट्रॅक्टर रजिस्टर्ड हैं और उनके अन्तर्गत 65 हजार कामगार हैं. मेरा पहला प्रश्न यह है कि क्या इन कामगारों को मिनिमम वेज लागू किया है ? बजाज, गरवारे और वीडियोकोन इन कंपनियों में कॉन्ट्रॅक्ट लेबर परमानेंट रुप से काम कर रहे हैं तो सरकार इनके खिलाफ क्या कदम उठा रही है ? इंजीनियरिंग उद्योग में मिनिमम वेज को लागू करने में क्या समस्या है ? इन लोगों को ई.एस.आई.एस. की सुविधा देने के बारे में सरकार की क्या योजना है ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मघाशी मी उत्तरात सांगितले की, ज्या ठिकाणी कायमस्वरुपी कामगारांची गरज असेल त्या ठिकाणी कॅज्युअल लेबर किंवा कंत्राटी कामगारांची नेमणूक करणे कायद्याने बंद करण्याची प्रक्रिया शासन निश्चितपणे करील. ज्या घटकांनी आपल्या आस्थापनेमध्ये कंत्राटी कामगार ठेवले असतील आणि किमान वेतनश्रेणी देत नसतील त्यांना फौजदारी खटल्याच्या अनुषंगाने सामोरे जाण्याची प्रक्रिया करण्याचे निश्चितपणे शासनाच्या मनात आहे. औरंगाबादमधील व्हिडियोकॉन, गरवारे, बजाज या तीनही कारखन्यांनी अशा प्रकारे वेतन कमी दिले अशा प्रकारची माहिती आमच्याकडे नाही. परंतु भविष्य काळामध्ये ज्या ठिकाणी कायम स्वरुपी, कंटीन्यू प्रोसेसमध्ये कंपनीचे उत्पादन निघते त्या ठिकाणी कॅज्युअल लेबर किंवा कंत्राटी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41547 ....... गणेश नाईक .....

कामगार वापरावयाचे असतील किंवा त्यांना ठेवावयाचे असेल तर परमनंट कामगारांप्रमाणे वेतन देण्याची सक्ती केली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सार्वजनिक उपक्रम समितीच्या भेटीच्या निमित्ताने औरंगाबाद येथील काही कारखान्यांना आम्ही भेटी दिलेल्या होत्या. बजाज कारखान्यामध्ये आम्हाला असे सांगण्यात आले की, "All are on daily wages, but they are permanent" म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या कारखान्यांमध्ये एकूण किती कामगार आहेत आणि त्यातील परमनंट कामगार किती व डेलीवेजेसवर किती कामगार आहेत ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, अशा स्वरुपाची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल. मी सदनाला सांगू इच्छितो की, या ठिकाणी खरोखरच कॅज्युअल लेबरचा, कंत्राटी कामगारांचा अशा प्रकारे छळ चाललेला आहे या आपल्या भूमिकेशी मी व्यक्तिश: सहमत आहे. आपल्याला परमनंट केली जाईल म्हणून ते कामगार मरमर काम करतात. एक वर्ष, पाच वर्षे, दहा वर्षे एवढेच नव्हे तर सेवानिवृत्त होईपर्यंत ते कॅज्युअल कामगार म्हणून राहतात. अशा प्रकारे नफा वाढविणारे जे उद्योजक असतील त्यांच्यामध्ये माणुसकीचा लवलेश निर्माण करण्यासाठी शासन जरुर कायदा करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी तीनच कंपन्यांचा उल्लेख केलेला आहे. या राज्यामध्ये अनेक ठिकाणी एमआयडीसीमध्ये कंपन्या अशा प्रकारे असंघटित कामगारांचा वापर करतात आणि त्यांना किमान वेतनही मिळत नाही. यासंबंधीची माहिती शासन घेणार आहे काय ? राज्यामध्ये या तीन कंपन्यांसारख्या अनेक कंपन्या आहेत. मी खामगावचे उदाहरण देईन. त्या ठिकाणी एमआयडीसीमध्ये वर्धन सिन्टेक्स तसेच हिंदुस्थान लिव्हर या कंपन्यांमध्ये असंघटित कामगार वापरतात. किमान वेतनापेक्षा कमी वेतन देऊन त्यांचा वापर केला जातो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41547.... श्री.पांडुरंग फुंडकर....

अशा अनेक ठिकाणी ज्या कंपन्या काम करीत आहेत त्यांची माहिती शासनातर्फे घेतली जाईल काय ?

श्री.गणेश नाईक : औरंगाबाद येथील 3 कंपन्यांमधील डेलि व्हेजेस आणि परमनंट कामगारांची माहिती पटलावर ठेवण्यात येईल असे यापूर्वीच मी सांगितले आहे. काही आस्थापनामध्ये परमनंट कामगार काम करीत असताना जर आजारी पडला तर त्याच्या जागेवर तात्पुरत्या स्वरुपामध्ये कंत्राट पध्दतीतील किंवा कॅज्युअल लेबर रिप्लेस करण्याची तरतूद आहे. जे कामगार परमनंट म्हणून सातत्याने वर्षानुवर्षे काम करीत असतील अशा घटकांची माहिती मिळवून त्यांना परमंनट स्वरुपाचा दर्जा देऊन त्यांना बेसिक डेली अलाऊंसेस देण्यासंबंधी शासन सूचना देईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

## जळगाव जिल्ह्यात सुरु असलेला बनावट दारु बनविण्याचा कारखाना

**(३) * ४०९१७ श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात अनेक दिवसापासून बनावट दारु बनविण्याचा कारखाना सुरु असलेचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अधिक तपास करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक** : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणात तपास करण्यात आला असून एकूण ६ आरोपींना अटक करून त्यांचेविरूध्द मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे सुधारीत कलम ६५, ख,ग,घ,ड,च, ८३ व १०८ अन्वये गुन्हा क्र. २४/२००८ असा दिनांक ३०.१.२००८ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकूण रू. ३,१७,७४६/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, बनावट दारु तयार करण्याच्या प्रकरणात अधिक तपास करण्यात आला आहे, संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे, 6 आरोपींना अटक करण्यात आली आहे अशी लेखी उत्तरे दिलेली आहेत. या प्रकरणातील किती आरोपी फरार आहेत ? तपासात काय निष्पन्न झाले आहे ? ज्या ठिकाणाहून मुद्देमाल पकडण्यात आला आहे त्यांच्याविरुध्द शासनाने कारवाई केली आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, या गुन्हयामध्ये 6 लोकांना अटक केलेली आहे, एक आरोपी फरार आहे. श्री.दिपक चव्हाण नावाच्या आरोपीच्या घरी खात्याचे कर्मचारी गेले होते, परंतु तो सापडला नाही. त्याचा शोध घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. या प्रकरणात सुमोचा वापर केल्याचे आढळले असून ती गाडीही ताब्यात घेण्यात आली आहे. या गुन्हयात केलेल्या तपासाच्या अनुषंगाने पुढील कारवाई सुरु आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सदर कारखान्याच्या मालकाचे नाव काय आणि जळगाव जिल्हयातील कोणत्या शहरामध्ये हा कारखाना आहे ?

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ता.प्र.क्र.40917.....

श्री.गणेश नाईक : त्या ठिकाणी परप्रांतातून रसायने आणली जातात. त्यांच्याकडून खबरदारी म्हणून वेगवेगळया जागांचा वापर करण्यात येत असल्याचे आढळले आहे. तेथे सापडलेल्या रसायनाची किंमती 2.50 लाख रुपये आहे. श्री.दीपक चव्हाण या कारखान्याचा मुख्य सूत्रधार आहे अशी माहिती मिळाली आहे, त्याला पकडल्यानंतर अधिक माहिती उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल.

------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

## राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना जास्त उंचीवरील पाणी उचलण्यास द्यावयाचे खास अनुदान

**(४) * ३८२२० श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुधाकर गणगणे , श्री. शरद रणपिसे , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ज्या नगरपालिका व महानगरपालिका नळपाणी पुरवठा योजनेचे स्त्रोत २० कि.मी. पेक्षा जास्त किंवा ५० मीटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी उचलावे लागते त्यांना खास अनुदान देण्याच्या विषयाचा शासन निर्णय निर्गमित करण्याच्या कार्यवाहीचे सुरु असलेले काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) आणि (२) होय, राज्यातील महानगरपालिकांच्या (जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) मधील समाविष्ट महानगरपालिका वगळून) पाणीपुरवठा योजनांना दूरवरच्या उद्‌भवापर्यंतच्या कामासाठी विशेष अनुदान मंजूर करण्याचा निर्णय दिनांक १२ ऑक्टोबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

नगरपालिकांना दूरवरच्या उद्‌भवापर्यंतच्या कामासाठी १००% शासकीय अनुदान देण्याचा निर्णय यापूर्वीच दिनांक १५.९.१९९४ च्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, दिनांक 12.10.2007 रोजीच्या शासन निर्णयाचे स्वरुप काय आहे ? या शासन निर्णयाचा फायदा किती नगरपालिकांना व महानगरपालिकांना होणार आहे ? त्यानुसार आतापर्यंत किती महापालिकांना विशेष अनुदान मंजूर करुन वितरित केले आहे याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या जी.आर.चे स्वरुप असे आहे की, ज्या योजना महानगरपालिकांमध्ये आहेत त्या ऑग्मेंट करण्याचा नवीन प्रस्ताव आहे. त्याच्या अगोदर त्या महानगरपालिकांनी वॉटर ऑडिट केले पाहिजे, एनर्जी ऑडिट केले पाहिजे. ते रेक्टीफिकेशन केल्यानंतर अन्‌काऊंटेड वॉटर लॉस 15 टक्क्यांच्या आत आणला पाहिजे. त्यानंतर त्या महानगरपालिकेमध्ये या योजनेची गरज आहे किंवा नाही हे तपासून नवीन योजनेला अनुदान द्यावयाचे किंवा नाही हे शासन ठरविणार आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38220... (श्री. रणजित कांबळे...)

याबाबतीत शासन कोणतीही ग्रॅण्ट किंवा गॅरण्टी देणार नाही. ज्या नगरपालिकांची लोकसंख्या 7 लाखा पेक्षा जास्त आहे अशा महानगरपालिकांना 20 कि.मी.पर्यन्त पुढे शंभर टक्के अनुदान मिळेल. परंतु हे अनुदान एकूण योजनेच्या 50 टक्क्यापेक्षा जास्त असणार नाही. ज्या महानगरपालिकांची लोकसंख्या 3 ते 7 लाखापर्यन्त आहे अशा महानगरपालिकांना 60 टक्क्यापेक्षा जास्त अनुदान मिळणार नाही. आतापर्यन्त कोणत्याही महानगरपालिकेने या योजनेसाठी मागणी केलेली नाही.

श्री. सुरेशदादा देशमुख : राज्यातील किती नगरपालिकांचे प्रस्ताव राज्य शासनाने केन्द्र शासनाकडे पाठविलेले आहेत ? किती नगरपालिकांच्या प्रस्तावाना केन्द्राकडून मान्यता मिळालेली आहे ?

श्री. रणजित कांबळे : या योजनेंतर्गत केन्द्राकडे प्रस्ताव पाठविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. राज्य शासन पैसे देणार आहे. आतापर्यन्त या योजनेमध्ये कोणत्याही महानगरपालिकेने अर्ज केलेला नाही.

श्री. सुरेशदादा देशमुख : राज्याने मंजूर केलेले परंतु केन्द्राकडून मंजुरी न मिळालेले असे किती नगरपालिकांचे प्रस्ताव आहेत ? त्या प्रस्तावांना केव्हा मंजुरी मिळेल?

श्री. अजित पवार : महानगरपालिकांसाठी जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून केन्द्राकडून पैसे आणले जातात. या योजनेमध्ये बृहन्मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर आणि नांदेड या महानरपालिका येतात. बाकीच्या महानगरपालिकांसाठी माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितलेली स्कीम आम्ही लागू केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख यांनी यूआयडीएसएसएमटी या योजनेच्या अनुषंगाने प्रश्न विचारलेला आहे. नगरपालिकांमध्ये लोकसंख्या वाढत असल्यामुळे त्यांना स्वत:च्या फंडातून पिण्याच्या पाण्याच्या योजना करता येत नाहीत. त्याबाबतीत 80 टक्के केन्द्र आणि 10 टक्के राज्य शासन आणि 10 टक्के नगरपालिका अशा स्वरुपाची स्कीम केन्द्राने दिलेली आहे. 80 टक्के रक्कम केन्द्र शासनाकडून येत असल्यामुळे अन्य नगरपालिकांनी योजना दिलेल्या आहेत. काही नगरपालिकांनी अंडरग्राऊंड ड्रेनेज स्कीम दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा देशमुख यांनी परभणीच्या संदर्भात विचारणा केलेली आहे असे मला वाटते. मी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अजित पवार....) (ता.प्र.क्र. 38220...

परभणीला जाऊन आलो आहे. तेथे मी या प्रश्नाच्या बाबतीत मिटींग देखील घेतलेली आहे. स्मॉल ॲण्ड मिडियम टाऊनमध्ये जी जिल्ह्याची ठिकाणी आहेत त्यांना यूआयडीएसएसएमटीमध्ये बसवावे म्हणून 12 ऑक्टोबर 2007मध्ये जी.आर. काढलेला आहे. या योजनेचा जास्तीत जास्त फायदा त्या शहरांना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत 60 टक्के किंवा 50 टक्के एवढेच अनुदान मिळते. बाकीचे 20 कि.मी.पर्यन्तचे पैसे नगरपालिकांना भरावे लागतात. त्याबाबतीत बीड. लातूर, बारामती, सांगली, अलिबाग या नगरपालिकांचे प्रस्ताव केन्द्राकडे पाठविलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी यासंबंधी अर्धा-तास चर्चा देखील उपस्थित केली होती. अन्य नगरपालिकांचे प्रस्ताव केन्द्राकडे पाठविण्याचे काम सुरु आहे. आम्ही केन्द्र सरकारकडून जास्तीत जास्त निधी राज्यासाठी आणलेला आहे. यंदाच्या केन्द्र सरकरच्या बजेटमधून माननीय मुख्यमंत्र्यांच्या मदतीने केन्द्रीय मंत्री श्री. जयपाल रेड्डी यांच्याशी चर्चा करुन या योजनेंतर्गत केन्द्राचा निधी या शहरांना कसा इदेता येईल यादृष्टीने पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग काम करीत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38220...

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने कहा है कि जे.एन.एन.यू.आर.एम. के अन्तर्गत 4-5 बड़ी महानगरपालिकाओं के पाणी पुरवठा के लिए फंड आ रहा है. शासन के 12 अक्टूबर 2007 के निर्णय का लाभ किसी नगरपालिका या किसी नगर परिषद को नहीं मिल रहा है. विशेष रुप से रामटेक नगर परिषद के लिए मैं पिछले एक साल से प्रयास कर रहा हूँ. मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहूँगा कि वे इसके लिए क्या रास्ता निकालेंगे, क्योंकि रामटेक नगर परिषद को न तो जे.एन.एन.यू.आर.एम. का लाभ मिल रहा है और न ही महाराष्ट्र शासन के 12 अक्टूबर 2007 के निर्णय का लाभ मिल रहा है ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी उत्तराच्या सुरुवातीलाच सांगितले की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियान हे बृहन्मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे आणि नांदेड या जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे. नांदेड जिल्हयात गुरु-ता-गद्दी या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून 820 कोटी रुपये वेगवेगळया कामांसाठी मिळालेले आहेत. तो निधी कोणकोणत्या कामांवर खर्च करावयाचा यासंबंधी स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे. यु.आय.डी.सी.स्कीम आहे. सगळया राज्यातील नगरपालिका, नगरपरिषदांना 80x10x10 स्कीममध्ये बसणार नाहीत. या स्कीमच्या अनुषंगाने जेवढा निधी प्राप्त होतो, त्या निधीत जास्तीत जास्त गावे बसविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. मी मघाशी चार,पाच शहरांचा उल्लेख केला, त्या शहरामध्ये ही स्कीम बसली आहे. सन्माननीय सदस्यांनी रामटेक नगरपरिषदेचा देखील या योजनेत समावेश करावा अशा प्रकारची मागणी केली आहे. यासंदर्भात मी नम्रपणे सांगू इच्छितो की, यासंबंधी दिनांक 12 ऑक्टोबर, 2007 रोजी शासनाने जी.आर.काढलेला आहे. त्याचप्रमाणे पूर्वी दिनांक 15 सप्टेंबर, 1994 मध्ये देखील यासंबंधीचा जी.आर.काढलेला आहे. या दोन्ही जी.आर.मध्ये रामटेक शहराचा समावेश कसा करता येईल ती बाब तपासून पाहिली जाईल. परंतु या योजनेचा लाभ घेत असताना शहराने स्व:ता लोकवर्गणी देणे, त्यासाठी लागणा-या कर्जाचा हिस्सा उचलणे अशा प्रकारची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेने घेतली पाहिजे. ती जबाबदारी कोणत्याही शहराला टाळता येणार नाही. तशा प्रकारची जबाबदारी रामटेक नगरपरिषद घेणार असेल तर त्या ठिकाणी सदर योजनेचा लाभ देण्यासंबंधी अग्रक्रमाने विचार करण्यात येईल.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 13:45

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक- 41183</u>**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3.....

**बीड जिल्हा हा टेक्सटाईल्स झोन म्हणून विकसीत करण्याची मागणी**

**(६) * ३९१०८ श्रीमती उषाताई दराडे** : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा हा टेक्सटाईल्स झोन म्हणून विकसीत करावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर, श्री.सतिश चतुर्वेदी यांच्याकरिता** : (१) असे निवेदन या विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, उत्तरात शासनाने असे म्हटले आहे की, " असे निवेदन या विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही". मी अतिशय गांभीर्यपूर्वक सांगू इच्छिते की, बीड जिल्हा हा टेक्सटाईल झोन म्हणून विकसीत करवा या विषयासंबंधी संबंधित विभागास पत्र दिलेले आहे. बीड जिल्हयातील जमीन कापूस उत्पादनासाठी अतिशय चांगली आहे. बीड जिल्हयातील जमिनीमध्ये नत्र, स्फुरद, पालाश आणि गंधक हे द्रवपदार्थ आहेत. त्यामुळे कापूस पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. बीड जिल्हयात ८० टक्के बी.टी.कापसाचा पेरा होतो. महाराष्ट्रात कापूस पिकविणारा दोन नंबरचा बीड जिल्हा आहे. बीड जिल्हयात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात असल्यामुळे बीड जिल्हा टेक्सटाईल्स झोन म्हणून जाहीर करण्यात येईल काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, टेक्सटाईल पॉलिसी केंद्रीय उद्योग विभागाकडून ठरविली जाते. सन्माननीय सदस्यांनी तशी मागणी केली तर उद्योग विभागाकडून शिफारशीसह प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल.

--------------

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक इ ४१५०२</u>**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

----------------

५....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**सीना नदीला कॅनॉलचा दर्जा मिळण्याबाबत**

**(८) * ४०८२४ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीना नदीला कॅनॉलचा दर्जा मिळावा अशी मागणी मोहोळ, सोलापूर या तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास, सीना नदीला कॅनॉलचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**डॉ.सुनील देशमुख,श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे.

(२) उजनी प्रकल्पस्थळी उपलब्ध असलेल्या सर्व पाण्याचे नियोजन पूर्ण झालेले असल्याने सिना नदीला कालव्याचा दर्जा देता येणार नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रणजितसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, सोलापूर जिल्हयातील माढा, मोहोळ, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर या चार तालुक्यातील ५० हजार हेक्टर क्षेत्र सीना नदीच्या पाण्यामुळे ओलिताखाली येत आहे. साडेसात टी.एम.सी.पाणी सीना नदीत सोडले जाते. सोलापूर जिल्हयातील चार तालुक्यांसाठी सीना नदीत पाणी सोडण्यात येते. सदर नदीत वर्षातून किती वेळा पाणी सोडले जाते ? या नदीत कायम स्वरुपी पाणी सोडण्यासंदर्भात शासन काही विचार करील काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40824.....

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, शिरापूर-कोल्हापूर बंधाऱ्याच्या खालील भागात सीना नदीमध्ये पाणी सोडण्याची उजनी प्रकल्पामध्ये तरतूद नाही. तरीही काही क्षेत्र अजून सिंचनाखाली यायचे असल्यामुळे नदीला पाणी सोडतो आहोंत. पण त्या नदीला जर कालव्याचा दर्जा दिला तर त्याचे मॉनिटरींग होऊ शकत नाही आणि नदीतील पाणी म्हटले तर त्याचा अपव्यय होऊ शकतो म्हणून सन्माननीय सदस्यांना हे कळविण्यात आले आहे की नदीला कालव्याचा दर्जा देणे शक्य होणार नाही. जेव्हा सिंचन क्षेत्र निर्माण होईल तेव्हा पाणी पण शिल्लक राहणार नाही त्यामुळे नदीला कॅनॉलचा दर्जा देऊ शकत नाही असे सविस्तर कळविण्यात आलेले आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, ज्या भागातून सीना नदी जाते तो बहुतांशी दुष्काळी भाग येत असल्यामुळे राज्यात इतर ठिकाणी असा कालव्याचा दर्जा दुसऱ्या कोणत्या नदीला दिला आहे काय ? तसा दिला असेल तर खास बाब म्हणून या नदीला कालव्याचा दर्जा देता येईल काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, अशा प्रकारे राज्यातील कुठल्याही नदीला कॅनॉलचा दर्जा देण्यात आलेला नाही. उजनी धरण ज्यावेळी झाले त्यावेळी उजनी धरणामध्ये जास्तीत जास्त सोलापूर जिल्हयातील बहुतेक तालुक्यांना पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले. परंतु अजूनही उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट या भागात पाणी जात नसल्यामुळे काही अडचणी येतात. तेथे कॅनॉल, पोटचाऱ्या, चाऱ्या राहिलेल्या आहेत. काही ठिकाणी आष्टी उपसा सिंचन योजना, एकरुप उपसा सिंचन योजना, बार्शी उपसा सिंचन योजना, सांगोला उपसा सिंचन योजना, दहिगाव,शिरापूर योजना इ. योजनांना सध्या पाणी अडवण्याच्या कामांना प्राधान्य दिले असल्यामुळे दुसऱ्या टप्प्यामध्ये उपसा सिंचन योजनांच्या कामांना प्राधान्य देणार आहोत. सुरुवातीला राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे नेहमी सीना नदीला कॅनॉलचा दर्जा देण्याकरिता सोलापूर जिल्हयातील किंवा महाराष्ट्राच्या इतर जिल्हयातील सन्माननीय सदस्य मागणी करतात. खरे पाहता हे आठमाही धरण आहे. आठमाही धरण असताना देखील त्या भागातील लोकांना उन्हाळयामध्ये पाणी मिळावे म्हणून खरीपामध्ये पाणी देत नाही. रब्बीमध्ये पाणी देतो आणि उन्हाळयामध्ये पाणी देण्यासाठी त्या भागातील सगळया लोकप्रतिनिधींना एकत्र बसवून साधारणपणे धरण किती टक्के भरले आहे ते पाहून पाण्याचे नियोजन केले जाते. हे नियोजन केले जात असताना भीमा-सीना

.....2

ता.प्र.क्र. 40824 पुढे सुरु...

जोड कालवा ज्याचा माढा आणि मोहोळ या दोन तालुक्यांना खूप फायदा होतो आणि उस्मानाबाद जिल्हयातील परांडा तालुक्याला फायदा होतो त्यामध्ये सव्वातीन टीएमसी पाणी नदीमध्ये सोडत असतो. त्याही भागामध्ये त्याप्रमाणात ऊस लागलेला आहे तो या पाण्यावरच लागलेला आहे. वास्तविक हे आठमाही धरण आहे. सोलापूर जिल्हयातील ऊसाची शेती या धरणावरच अवलंबून असल्यामुळे त्याच्यातून शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळत असल्यामुळे लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन याचे नियोजन करतो. हे पाण्याचे नियोजन करीत असताना शेतकऱ्यांची अशी अपेक्षा आहे की कायमचे पाणी द्या. उजनी धरण बांधण्याच्या वेळी निर्णय घेण्यात आला त्यानुसार एकूण 79.28 टीएमसी पाण्याचे नियोजन केलेले आहे.त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचे,औद्योगिक वापराचे आणि सिंचनाकरिता नियोजन आहे. पुढील कामे झालेली नसल्यामुळे आपल्याकडे जे पाणी शिल्लक राहते ते पाणी आपण सव्वातीन टीएमसीपेक्षा कधी कधी जास्त सोडतो. नदीच्या दोन्ही तिरावरील शेतकरी याचा फायदा घेतात. या नदीला कॅनॉलचा दर्जा द्यावा अशी मागणी केली जात आहे. त्या भागामध्ये जो डावा आणि उजवा कालवा आहे त्यामध्ये कुठेही लिफ्ट इरिगेशन योजना करावी लागत नाही. भुईपाटाने पाणी जाते. येथ `मात्र नदीचे पाणी दोन्ही तिरावर उपसा सिंचन योजनेमार्फत दिले जाते त्याप्रमाणे सांगली आणि कोल्हापूर जिल्हयामध्यचे उचलतात तसे उचलावे लागते. खर्च तसा जास्तीचा आहे. त्यामुळे उजनी धरण करीत असताना जे नियोजन केलेले आहे त्याच्याबाहेर शासनाला जाता येणार नाही. जे पाणी दिलेले आहे ते काढून घेता येणार नाही आणि निधीच्या उपलब्धतेनुसार जे पाणी देता येत नाही तोपर्यंत आहे ते पाणी जास्तीत जास्त प्रमाणात देण्याचे जे काम आज चालू आहे ते पुढेही चालू ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40824...........

श्री.रणजितसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, कृष्णा भीमा स्तरीकरण प्रकल्प प्रस्तावित आहे. प्रकल्प पूर्ण होईल त्यावेळी जवळपास 43 टीएमसी पाणी उजनीमध्ये येणे अपेक्षित आहे. लवादासमोर चर्चा सुरु असली तरी या संदर्भात सरकार असा प्रस्ताव चर्चेला घेईल का?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा असला तरी मी उत्तर देऊ इच्छितो. मराठवाड्याच्या हिश्श्याचे 25 टीएमसी पाणी देत असताना 19 टीएमसी पाणी उस्मानाबाद जिल्हयासाठी आणि 6 टीएमसी पाणी बीड जिल्हयासाठी द्यायचे आहे. कृष्णा खोरे अंतर्गत येणाऱ्या मराठवाड्याच्या भागाला अगोदर प्राधान्याने पाणी द्यावे लागेल. त्यांना पाणी देऊन काही पाणी शिल्लक राहिले तर सन्माननीय सदस्यांनी विचारले त्या पध्दतीने पुढील शेतकऱ्यांचा विचार करता येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कारंजा (जि.वाशिम) तालुक्यातील सुमारे ५०० शेतकरी महाराष्ट्र शासनाच्या विशेष पॅकेजअंतर्गत कृषी पीक विम्यापासून वंचित असल्याबाबत**

**(९) * ३९३७० श्री.केशवराव मानकर , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि.वाशिम) तालुक्यातील सुमारे ५०० शेतकरी महाराष्ट्र शासनाच्या विशेष पॅकेजअंतर्गत कृषी पीक विम्यापासून वंचित असल्याचे डिसेंबर, २००७ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या बँक तथा कृषी कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळावा यासाठी वर्षातून एक किंवा दोन पिके घेतली असली तरी २५ टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळेल का? कृषि अधिकारी आणि बँकेचे अधिकारी शेतकऱ्यांना मदत करीत नाहीत. सुलभतेने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन नियम करणार आहे का?

श्री.बाळासाहेब थोरात : योजना समजून सांगण्याच्या संदर्भात कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांचा रोल आहे. पॅकेजच्या संदर्भात कृषि अधिकारी शेतकऱ्यांबरोबर बँकेत जाऊन फॉर्म भरण्यासाठी मदत करीत असतात. बँकेबाबत स्पेसिफिक अडचण असेल तर ती सांगावी, त्याबाबत निश्चित लक्ष घातले जाईल.

श्री.केशवराव मानकर : शेतकऱ्यांचे २५ टक्के नुकसान झाले तरी विमा कंपनीकडून नुकसान भरपाई दिली जाईल काय? अधिकारी मदत करीत नाहीत त्याबाबत निदेश देणार काय?

श्री.बाळासाहेब थोरात : तशा सूचना कृषि विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात येतील. विम्याचा विषय समजून सांगावा आणि त्यादृष्टीने मदत करावी. 25 टक्के नुकसानीबाबत धोरण आहे त्या संदर्भात, दोन्ही सभागृहाचे सन्माननीय सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत पातळीवरील सदस्यांना एक पुस्तिका तयार करुन पाठविली आहे. हे धोरण पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. त्याबाबत कशी मदत करता येते याचे सविस्तर धोरण सन्माननीय सदस्यांना कळविले आहे, त्या पध्दतीने मदत करता येईल.

-----

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील नद्यांचे पाणी दूषित असल्याबाबत**

**(१०) * ४०४९७ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. दिवाकर रावते , डॉ. दिपक सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. किसनचंद तनवाणी , श्री. गोपीकिसन बाजोरिया :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नद्यांमधील जलप्रदूषण व त्यांची ठोस कारणे याबाबतचा शोध घेण्यासाठी जलसंपदा विभागाने राज्यातील नद्यांच्या पाण्याची तपासणी करून तसा अहवाल राज्य शासनाच्या जल गुणवत्ता पुर्ननिरीक्षण समितीकडे सादर करण्यात आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात कृष्णा, गोदावरी, भिमा, वैनगंगा, तापी,वर्धा, मुळा-मुठा अशा अनेक नद्या विविध कारणांमुळे प्रदुषित झाल्या असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने राज्यातील नद्यांतील जलप्रदूषण नष्ट करण्याबाबत शासनाने काही उपाययोजना केली आहे काय, असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे ?

**डॉ.सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर अहवाल समितीच्या विचाराधीन आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासनाने प्रदुषणाचा शोध घेण्यासाठी अहवाल तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. भीमा, पवना, तापी, वैनगंगा आदी नद्यांमध्ये प्रदुषण होत आहे याची कारणे काय आहेत? अनेक ठिकाणी रासायनिक प्रदुषण होत आहे. अनेक ठिकाणी नगरपालिकांचे दूषित पाणी डायरेक्ट नद्यांच्या पात्रात सोडले जाते. जलस्त्रोत शुध्द होण्यासाठी कोणती उपाययोजना या अहवालाच्या माध्यमातून करण्यात आली आहे?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, हा अहवाल अद्याप शासनास सादर व्हावयाचा आहे. सर्वसाधारणपणे जी कारणे समोर आली आहेत त्यामध्ये घरगुती सांडपाणी ट्रिटमेंट न करता नदी पात्रात सोडले जाते. प्रदुषण करणारे अनआयडेंटिफाय सोर्सेस आहेत त्यांना आयडेंटिफाय करावे लागेल, त्यावर ट्रिटमेंट देऊन मग ते पाणी नदी पात्रात सोडावे लागेल. नदी पात्राच्या दोन्ही बाजूस 3 कि.मी.पर्यंत नो डेव्हलपमेंट झोन, नो इंडस्ट्रिअल झोन केले तर नदी नाले प्रदुषित होतात, ते होणार नाही. शासनाला अंतिम अहवाल सादर व्हायचा आहे. तो अहवाल 20 जुलै, 2007 रोजी अंतिम झालेला असून तीन महिन्याच्या आत शासनापुढे येऊन पुढील निर्णय होईल.

(नंतर श्री.खर्चे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40497....

श्री. अरविंद सावंत : महोदय, अनेक साखर कारखान्यातून नदीमध्ये जे पाणी सोडले जाते त्यामुळे मोठ्या प्रमाणात नदीचे पाणी प्रदूषित होते. विदर्भातील पूर्णा नदी असो अथवा आमची सावित्री नदी असो अथवा महाडमधील सर्व नद्या असोत, अशा सर्वच नद्यांची हीच अवस्था आहे. म्हणून शासनाने या अहवालाची वाट न पाहता प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अशा कारखान्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासन विचार करणार काय ?

श्री. अजित पवार : महोदय, साखर कारखान्यातून मोलॅसिस सोडण्यात येते त्यामुळे मोठया प्रमाणात नद्यांमध्ये प्रदूषित पाणी तयार होते. त्याचबरोबर त्या भागात जे पाणी पिण्यासाठी वापरले जाते ते पाणी नदीत सोडतांना त्यावर ट्रिटमेंट करुनच सोडले पाहिजे. उदा. कोल्हापूरला जे पाणी वापरुन नदीत सोडण्यात येते तेच पुन्हा इचलकरंजीला उचलावे लागते. यासंबंधी पुढची पावले अशी उचलावी लागणार आहेत की, मोठमोठ्या शहरांमध्ये जे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येते त्यावर ट्रिटमेंट करुन किमान जनावरांच्या पिण्यायोग्य तसेच शेतीयोग्य असेच हे पाणी असले पाहिजे अशाच प्रकारे ट्रिटमेंट करुन ते पाणी पुढे सोडले पाहिजे, पण तसे होत नाही. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, पोल्यूशन कंट्रोल बोर्डामार्फत अशी कारवाई करण्यासाठी शासनाने पावले उचलावीत. प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करीत असतांना काही ठिकाणी कारखान्यांनी पाणी उचलायचे थांबवावे लागणार म्हणून त्यासाठी आम्ही या कारखान्यांना टाईमटेबल दिलेला आहे की, अमुक इतक्या दिवसांमध्ये आपण ट्रिटमेंट प्लांटसंबंधीची पावले उचलावीत. दुसरे म्हणजे पुण्यासारखी जी शहरे आहेत, त्यांच्या बाबतीत देखील आपल्याला विचार करावा लागतो. आज पुण्यामध्ये 11.5 टीएमसी पाणी वर्षभर वापरण्यात येते. त्यातील बहुतेक पाणी नदीत सोडण्यात येते. जे पाणी नदीत सोडले जाते ते इतके घाण असते की, त्याच्या वासामुळे मासेही मरतात, पिकाला दिले तर पिके सुध्दा जळतात. म्हणून यासंदर्भात केंद्रशासनाकडून विकासाच्या योजना करीत असतांना वेगवेगळ्या स्वरुपात जो निधी मिळतो त्यातून अशा पाण्यावर सुरुवातीला ट्रिटमेंट करुन ते पाणी शेती व जनावरांसाठी योग्य राहील असेच सोडावे आणि असे प्रकल्प बहुतेक शहरांमध्ये हाती घेतले आहेत. विदर्भात मात्र तशी व्यवस्था अजून नाही. तसेच जे कारखाने या प्रदुषणाला जबाबदार असतील ते

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .......... ता.प्र.क्र.40497....

बंद करण्याच्या संदर्भात एमपीसीबीला विश्वासात घेऊन ते बंद करण्याच्या दृष्टीने शासनाकडून पावले उचलण्यात येतील. परंतु अशा प्रकारे कारखाने बंद केल्यानंतर वेगळ्याच समस्येला सामोरे जावे लागणार आहे. म्हणून यासाठी जो ठराविक कालावधी लागणार आहे त्या काळात त्या कारखान्यांनी नियोजन करुन अशी पावले उचलण्यासंबंधी सूचना त्या कारखान्यांना करण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एमपीसीबी मार्फत कारवाई करुन उपयोगाचे नसतील तर असे कारखाने बंद करण्यात येतील. अशा प्रकारे किती कारखाने आजपर्यंत शासनाने बंद केलेले आहेत ? तसेच यासंबंधी जो ट्रिटमेंट प्लांट लागणार आहेत की ज्याद्वारे पाणी ट्रिटमेंट करुन जनावरे व शेतीच्या उपयोगासाठी असेल असे प्लांट उभारण्यासाठी शासन विचार करणार काय ?

श्री. अजित पवार : महोदय, राज्यशासन अशी यंत्रणा उभारणा नाही तर ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिसरात असे कारखाने आहेत त्यांचे हे काम आहे. त्या संस्थांना या कामासाठी शासन आवश्यक ती मदत करण्यास तयार आहे परंतु स्वत: शासन ही जबाबदारी उचलू शकणार नाही कारण राज्याला पिण्याचे पाणी अग्रक्रमाने द्यावयाचे आहे त्याला टॉप प्रायॉरिटी असून याबाबतीत महानगरपालिका व नगरपालिकांनी स्वत:चे प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 40497** .......

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सभापती महोदय, अतिशय महत्वाचा प्रश्न सदनासमोर चर्चेला आलेला आहे. सर्वसाधारणपणे जगातील सर्व शहरे नदीच्या किना-यावर वसलेली असून या शहरांच्या माध्यमातूनच नदीचे पाणी खराब करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, नदीपासून किमान एक कि.मी. अंतरावर कोणत्याही प्रकारचे सांडपाणी सोडले जाणार नाही यासाठी शासन काही प्रतिबंधात्मक उपाययोजना करणार आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, राज्य शासनाने जल गुणवत्ता पर्यनिरीक्षण समिती स्थापन केलेली आहे या समितीचे अध्यक्ष जलसंपदा विभागाचे सचिव असून जल संपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी या समितीमध्ये आहेत. या समितीचा अहवाल तयार झालेला असून हा अहवाल मंत्रीमंडळापुढे आल्यानंतर यासंदर्भातील निर्णय तातडीने घेण्यात येईल. तसेच सन्माननीय मंत्रीमहोदय डॉ. सुनील देशमुख यांनी सांगितल्यानुसार तीन महिन्याच्या आत या अहवालावर निर्णय घेण्यात येईल. अजून जलगुणवत्ता समितीचा अहवाल शासनास सादर झालेला नाही. परंतु या समितीच्या शिफारशीचे स्वरुप आता सांगितल्याप्रमाणे असेल. नदीच्या दोन्ही बाजूला 3 कि.मी. अंतरापर्यंत नो डेव्हलपमेंट झोन राहणार आहे, दुसरे तेथे इंडस्ट्रीयल एक्टीवीटिज करता येणार नाही तसेच कारखान्यातून जे सांडपाणी बाहेर निघते त्या पाण्यावर सदर कारखान्यांनी बाहेर ट्रीटमेंट करण्याची आवश्यकता आहे. तसेच यासंदर्भात ज्या ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे त्या त्या गोष्टी करण्यात येतील. लांग टर्मसाठी ज्या प्रकारचे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, तसे निर्णय घेण्यात येईल.

---------------

तारांकित प्रश्न क्रमांक : 41300

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मोहोळ (जि.सोलापूर) येथील उजनीच्या कालव्यावरील लोखंडी पुलाचा भाग तुटल्याबाबत**

**(१२) * ३९७९० श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) येथील प्रभाग नं.१ मधील ३ ते ४ हजार वस्तीतील उजनीच्या कालव्यावरील लोखंडी पुलाचा काही भाग तुटला असल्यामुळे तेथून ये जा करणाऱ्या नागरीकांना धोकादायक असल्यामुळे या परिस्थतीचे लेखी निवेदन दिनांक ४ डिसेंबर, २००७ रोजी स्थानिक नागरीकांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) सदर अशा महत्वाच्या ठिकाणाच्या पुलाकडे विशेष लक्ष देऊन कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना कार्यान्वित केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. सुनील दुशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) हे खरे आहे.

(२) तात्पुरती दुरुस्ती केली असून निधीच्या उपलब्धतेनुसार पुलाची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.

(३) दुर्घटना घडू नये यासाठी प्राथमिक दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच कायमस्वरुपी दुरुस्ती करण्याचे नियोजित आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मोहोळ, जि. सोलापूर येथील प्रभाग नं १ मधील कालव्यावरील लोखंडी पुलाचा किती भाग कोसळलेला आहे ? या पुलाची तात्पुरती दुरुस्ती किती रक्कमेची करण्यात आलेली आहे ? सदर पुलाची तात्पुरती दुरुस्ती केल्यानंतर नागरिकांना ये-जा करण्याची सोय झाली आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सदर पुलाच्या बाबतीत ४.१२.२००७ रोजी मागणी आली होती व तीन दिवसांच्या म्हणजे ७.१२.२००७ रोजी सदर पुलाची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या पुलाचा वापर या ठिकाणचे लोक ये-जा करण्यासाठी करीत आहेत. परंतु या लोखंडी पुलाची दुरुस्ती करणे आवश्यक असून या पुलाच्या कामासाठी १.५ लक्ष रुपये खर्च येणार असून मे महिन्याच्या अखेरपर्यंत या पुलाचे काम करण्यात येईल.

-----------

...३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे जानवले (ता.गुहागर) येथील बौध्दवाडीतील नळपाणी पुरवठा योजना राबविण्याबाबतची मागणी**

**(१३) * ४०४३० श्री.भास्कर जाधव** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जानवले ता.गुहागर येथील बौध्दवाडीतील ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाडीसाठी नळपाणी योजना राबवावी अशी मागणी येथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता**: (१) होय.

(२) व (३)

बौध्दवाडीचा समावेश स्लीपबॅक नुसार अंशत: हाताळलेल्या (पीसी) वर्गवारीत आहे. सदर वाडीसाठी वाणीवाडी येथील अस्तित्वातील विहिरीवरून नळ पाणी पुरवठा राबविण्याचा प्रस्ताव असून त्याची अंदाजित किंमत रू. ३.८७ लक्ष इतकी आहे. लोकवर्गणीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मौजे जानवले ता. गुहागर येथील बौध्दवाडीतील ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. शासनाने सांगितले आहे की,सदर वाडीसाठी वाणीवाडी येथील अस्तित्वातील विहिरीवरुन नळ पाणी पुरवठा राबविण्याचा प्रस्तावाची अंदाजित किंमत ३.८७ लच इतकी आहे. परंतु यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, सदर विहीर संसारे या व्यक्तीची मालकीची असून ही विहीर या व्यक्तीने बुजवलेली असून जानवले येथील बौध्दवाडीतील पिण्याच्या पाण्याची वस्तुस्थिती लपवली जात आहे. त्यामुळे जानवले येथील बौध्दवाडीतील ग्रामस्थांना शासन पाणी उपलब्ध करुन देणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मौजे जानवले ता. गुहागर येथील बौध्दवाडीचा समावेश स्लीपबॅक नुसार अंशत: हाताळलेला (पीसी) वर्गवारीत आहे. दिनांक ७.४.२००८ रोजी बौध्द वाडीच्या लोकांनी नळपाणी पुरवठा राबविण्यासाठी २० हजार रुपयाची लोकवर्गणी भरलेली असून ही योजना लवकरात लवकर भारत निर्माण योजनेतून पूर्ण केली जाईल.

श्री. भास्कर जाधव : मौजे जारवले ता. गुहागर येथील बौध्दवादीतील ग्रामस्थांनी नळपाणी पुरवठा योजनेसाठी लोकवर्गणी भरलेली आहे परंतु सदर विहीर ही संसारे नावाच्या व्यक्तिच्या

....४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :40403 .......

श्री. भास्कर जाधव....

कम्पाऊंडमध्ये असून ही विहीर त्या मालकाची आहे. परंतु सदर विहीर संसारे नावाच्या व्यक्तिने बुजवली असून या ग्रामस्थांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी बुजवलेली सदर विहीर पुन्हा खोदून या ठिकाणच्या ग्रामस्थांना या विहिरीतून पाणी उपलब्ध करुन दिले जाईल काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सभागृहात सन्माननीय सदस्य जी माहिती देतात ती सत्य समजून कार्यवाही केली जात असते त्यामुळे सदर विहीर खाजगी व्यक्तिच्या मालकीची असेल तर यासंदर्भात माहिती घेतली जाईल आणि या व्यक्तिने ही विहीर बुजवली असेल तर ती विहिर पुन्हा खोदण्यात येईल व त्या ठिकाणच्या ग्रामस्थांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन दिले जाईल. तसेच या विहिरीच्या संदर्भात योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल व पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी निर्माण केल्या म्हणून संबंधितावर कायदेशीर कारवाई सुध्दा केली जाईल.

----------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर जि.प.चा पाणीपट्टी उपकर पाटबंधारे विभागाकडे थकीत असल्याबाबत**

**(१४) * ३९२२७ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, नागपूर व प्रकल्प अधिकारी भू व जल व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प, नागपूर या दोन विभागामार्फत मोठ्या मध्यम व लघु प्रकल्पाद्वारे सिंचन व बिगर सिंचनाकरीता पाणीपुरवठा करण्यात येत असून पाणी पट्टी व विस टक्के जि.प. सेस वसुल करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १४६ च्या तरतूदींनुसार सदर उपकर वसुल करुन जि.प.ला प्राप्त करुन देणे आवश्यक असतानाही सन २००६-२००७ अखेर उक्त दोन्ही विभागाकडे अनुक्रमे १४३.१८ लक्ष व ७४४.१४ लक्ष असे एकूण ८८७.३२ लक्ष रुपये एवढा निधी गेल्या अनेक वर्षापासून उक्त विभागाकडे थकीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ.सुनील देशमुख,श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) होय.

(२) होय.

(३) निधीचे उपलब्धतेनुसार देय उपकर अदा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, किती रुपयांचा निधी थकित आहे ? किती दिवसा पासून हा निधी थकित आहे आणि हा निधी केव्हा वितरित करण्यात येणार आहे ?

डॉ.सुनील देशमुख :सभापती महोदय, 2001 सालापासून जवळजवळ 16 कोटी रुपयांचा निधी थकीत आहे. सन्माननीय सदस्यांना संपूर्ण राज्याची माहिती हवी आहे की फक्त नागपूर महानगरपालिकेची माहिती हवी आहे.?

श्री.नितीन गडकरी : नागपूर महानगरपालिकेची माहिती द्यावी.

डॉ.सुनील देशमुख : नागपूर महानगरपालिकेची 16 कोटी रुपयांची थकीत रक्कम आहे या वर्षी साडेचार कोटी रुपये म्हणजे 4 कोटी 69 लक्ष रुपयांचा निधी त्यांना दिला आहे. . उर्वरित निधी टप्याटप्याने त्यांना वितरित करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : टप्याटप्याने म्हणजे केव्हा हा निधी वितरित करण्यात येणार आहे ? जिल्हा परिषदा स्वायत्त असून त्यांना शासनाकडून लेजिटीमेट पैसे दिले जात नाहीत. टप्पा कधीच उगवत नाही. आता प्रश्न विचारल्यामुळे साडेचार कोटी रुपये नागपूर महानगरपालिकेला दिलेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. एकूण सोळा कोटी रुपये थकलेले आहेत. या जिल्हा परिषदेचे बजेट अडीच कोटी रुपयांचे आहे अशा स्थितीत जिल्हा परिषद आपले काम कसे करील ? साडेचार कोटी रुपयांचा चेक जिल्हा परिषदेला दिला आहे काय आणि उरलेले पैसे या वर्षातच पूर्णपणे दिले जाणार आहेत काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे. जिल्हा परिषदा चालविण्यासाठी उपकराची 20 टक्के रक्कम जिल्हा परिषदांना पाणीपट्टीतून दिली जाते. वसुली झाल्यानंतर हे पैसे डायरेक्ट ट्रेझरीमध्ये जाते. या संदर्भात आमचा जलसंपदा विभाग वित्त मंत्र्याशी चर्चा करील. जेवढी रक्कम वसूल होते त्यापैकी 20 टक्के रक्कम काढून किमान वर्ष अखेरीस उर्वरित रक्कम त्या जिल्हा परिषदेला दिली गेली असती तर हा आकडा वाढत जाणार नाही. पिण्याच्या पाण्याचे , बिगर सिंचनाच्या पाण्याचे, शेतीच्या पाण्याचे असे एकूण 620 कोटी रुपये या वर्षी वसूल करण्यात आलेले आहे. या संदर्भात तातडीने बैठक घेण्यात येईल. संपूर्ण राज्यासाठी जवळजवळ 56 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. थकीत रक्कम 167 कोटी रुपये एवढी आहे. म्हणजे जवळजवळ 100 कोटी रुपये राज्य सरकारला द्यावयाचे आहे. ज्याप्रमाणे नागपूरच्या जिल्हा परिषदेला हे पैसे द्यावयाचे आहे त्याचप्रमाणे राज्यातील इतरही जिल्हा परिषदांना हे पैसे द्यावयाचे आहेत.कारण त्या जिल्हा परिषदांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे असे म्हणता येणार नाही. 100 कोटी रुपयांची तरतूद पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांच्या वेळी करण्याचा प्रयत्न केला जाईल किंवा जास्तीत जास्त नागपूरच्या अधिवेशनात पुरवणी मागणीच्या वेळी तरतूद करण्याचा प्रयत्न केला जाईल. तेवढी तरतूद करुन सर्व जिल्हा परिषदांना उप कराची निधी देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री.नितीन गडकरी : साडेचार कोटी रुपये दिले आहेत ना ?

श्री.अजित पवार : होय

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेजारच्या राज्यातून बेकायदेशीररित्या बनावट विदेशी मद्य व काजूफेणी येत असल्याबाबत

**(१५) * ३९५०५ श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेजारच्या राज्यातून बनावट विदेशी मद्य व काजूफेणी बेकायदेशीररित्या आणण्याच्या घटनेत फार मोठया प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक** : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) याबाबत केलेल्या चौकशीत गोवा बनावटीचे विदेशी मद्य व काजूफेणी ही बेकायदेशीररित्या या राज्यात आणण्यात येत असल्याचे आढळून आल्याने ती रोखण्यासाठी जिल्ह्यातील कार्यरत विभागीय अधिकारी व विभागीय स्तरावर निर्माण केलेली गस्ती पथके यांचेकडून कारवाई करण्यात येऊन माहे १ जानेवारी, २००८ ते दिनांक १० मार्च, २००८ या कालावधीमध्ये ८४ गुन्हे नोंदविण्यात आले असून त्यात गोवा बनावटीचे बेकायदेशीर विदेशी मद्य व काजूफेणी असा एकूण रु. ३,२१,७९०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांच्या प्रामाणिकपणाबद्दल मी दाद देतो. माननीय मंत्री महोदयांनी प्रामाणिकपणे हे कबूल केलेले आहे की, गोव्यातून बेकायदेशीररीत्या दारु आपल्या राज्यामध्ये येत असते. दोन महिन्यामध्ये 84 गुन्हे नोंदविण्यात आले असल्याचे उत्तरात सांगण्यात आलेले आहे. तेव्हा ज्यांच्या विरुध्द गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत त्यांना अटक करण्यात आली आहे, की त्यांना जामिनावर सोडून देण्यात आलेले आहे ? ज्या अर्थी एवढया मोठया प्रमाणावर गोवा बनवाटीचे विदेशी मद्य गोव्यातून आपल्या राज्यात येते त्या अर्थी आपल्याकडील संबंधित पोलीस अधिकारी वा एक्साईज डिपार्टमेन्टचे अधिकारी संगनमत करीत असले पाहिजे त्यांनी संगनमत केल्याशिवाय एवढे बनावट विदेशी मद्य आपल्या राज्यात येणार नाही तेव्हा या अधिकाऱ्यांची तातडीने बदली करुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, गोवा हे पर्यटनाचे प्रमुख राज्य असून महाराष्ट्रातून हजारो पर्यटक गोव्याला जात असतात . गोव्याच्या फेणीबद्दल पर्यटकांमध्ये जास्त आकर्षण आहे. दोडामार्ग, बांदा, भेन्डसी, सातर्डा, इन्सुली, तारखोल, किरपणी, मोलेमाड, मोचेमातखाणी इत्यादी ठिकाणी उत्पादक शुल्क विभागाचे अधिकारी गस्त घालत असतात व नाके तपासणी करीत असतात त्यामुळे 84 गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. त्यातील 75 बेवारस गुन्हे आहेत आणि 9 गुन्हे वारस आहेत. त्यातून 3 लाख 21 हजार 790 रुपयांचे मद्य जप्त करण्यात आले आहे. अशा प्रकारे गस्त घालून तपासणी करुन हे अधिकारी कर्तव्य तत्परता दाखवत असल्यामुळे 84 गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. अशा अधिकाऱ्याना अकार्यक्षम म्हणून त्यांच्यावर बदलीची कारवाई केली तर त्या अधिकाऱ्यांवर अन्याय होईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 14:15

श्री. गणेश नाईक (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 39505 ....

सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण यांच्या मताशी मी सहमत आहे. येथे अन्य मार्गांनी सीमा भागातून अशा प्रकारे दारूची विशेषत: गोव्याच्या काजूफेणीची वाहतूक केली जाते. परंतु राज्य सरकार त्यावर नियंत्रण आणण्यासाठी, ही चोरटी वाहतूक बंद करण्यासाठी सतर्क आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी 84 लोकांवर आपण गुन्हा दाखल केला आहे असे आपण सांगितले आहे. तेव्हा काजू फेणीच्या संदर्भातच पण माझा प्रश्न थोडासा वेगळा मात्र याच्याशी संबंधित असाच आहे. कोकणामध्ये खास करून रत्नागिरी जिल्ह्यात काजू फेणी विकण्यासाठी नको पण तयार करण्यासाठी, प्रक्रिया करणारा, उत्पादित करणारा कारखाना काढण्यासाठी परवानगी मागितली आहे आणि त्यासाठी 9:1 असे भांडवलही देण्याचे मान्य झालेले आहे तर असे प्रस्ताव शासनाकडे किती पडले आहेत आणि त्यातील कितींना आपण आजवर परवानगी दिलेली आहे ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, गोव्याप्रमाणे महाराष्ट्रातील काजू बोंडांपासून मद्यार्क निर्मिती करण्याची गरज आहे जेणे करून कोकणातील शेतकऱ्यांना त्यांच्या दैनंदिन अर्थकारणात भर पडणार आहे. राज्य सरकार याबाबत अंतिम टप्प्यात, निर्णयाप्रत आलेले आहे. मात्र यासाठी किती अर्ज आले आहेत याची माहिती आता माझ्याकडे नाही, वाटल्यास ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या माहितीनुसार शेतकऱ्यांच्या नाश होणाऱ्या या काजूबोंडांचा वापर त्यांच्या संसाराला हातभार लावण्यासाठी करू देता येईल या दृष्टीने निश्चितपणे शासन कारवाई करील.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या संबंधात आता मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले आहे ते समाधानकारक नाही. दोडामार्ग आणि सावंतवाडी या भागामध्ये काजू बोंडांवर आधारित मद्यार्क निर्मितीस परवानगी मागितल्यास त्यासाठी 9:1 असे भांडवल देण्याचा निर्णय देखील शासनाने घेतला आहे. परंतु हे प्रकल्प गेल्या 6-7 वर्षात अडचणीत आले आहेत आणि त्यांना कोठलेही भांडवल वा मदत उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे हे प्रकल्प आज यशस्वी होत नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. याबाबत सरकारने एक भूमिका घेतली आणि जाहीर केले की, काजू बोंडांवर आधारित फेणी निर्मितीचे प्रकल्प सीमा भागामध्ये काढले जातील आणि त्यासाठी त्यांना मदत देखील केली जाईल. तेव्हा ही भूमिका यशस्वी होण्यासाठी राज्य सरकार

..... एफएफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 39505 ....

तेथील मद्यार्क निर्मितीचे कारखाने काढण्यासाठी किती दिवसात निर्णय घेणार आहे आणि ज्यांनी असे कारखाने काढण्याची मागणी केलेली आहे त्यांना किती दिवसात आपण मंजुरी देणार आहात?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, राज्याचे ग्रीनमेज म्हणजे धान्यापासून अल्कोहोल करण्यासाठी परवानगी दिली तशाच प्रकारे काजू, चिकू आणि अन्य फळे यांवरदेखील प्रक्रिया करण्यासाठी पुढील अधिवेशनापूर्वी राज्य सरकार निर्णय घेईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. आज 15 प्रश्नांवर चर्चा झाली. धन्यवाद.

***

...... एफएफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सागरी मंडळाच्या सन 2005-06 चा प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने मॅफ्को लिमिटेडचा सन 2004-05 चा 34 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : 34 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

**अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यात सध्या निर्माण झालेला विजेचा प्रचंड तुटवडा " या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी दिनांक 7 एप्रिल 2008 रोजी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतेवेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( प्रेस : कृपया सोबतची अधिक माहिती येथे छापावी. )

( यानंतर सौ.रणदिवे ....जीजी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.**

**सभापती** :सन्माननीय सदस्य सर्वश्री.नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,संजय केळकर यांनी "मौ.कुळगांव (बदलापूर) येथील सर्व्हे नं.39 ही जागा बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारती करता देण्यात येणे, गेल्या अनेक वर्षापासून नगरपरिषदेने सदर जागेबाबत जागेच्या मुल्यांकनाची किंमत व्याजाच्या मोबदल्यात जिल्हाधिकारी, ठाणे यांना अदा करणे, सदरची जागा वन खात्याची नसल्याचे केंद्र शासनाने पत्र देऊनही सदर जागा अद्यापही नगरपरिषदेला हस्तांतरित न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.नितीन गडकरी,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,जगदीश गुप्ता यांनी "दौंड, जि.पुणे येथील शासकीय धान्य गैरव्यवहार प्रकरणात अनेक अधिकारी गुंतलेले असून सदर धान्य गैरव्यवहाराची तक्रार पोलिसात करण्यासाठी पुरवठा विभागाने केलेली टाळाटाळ, तसेच या प्रकरणात अफरातफर झाल्याचे तपासात आढळून आले नाही असा अहवाल न्यायालयात पाठवून या प्रकरणाची न्यायालयीन प्रक्रिया थांबविण्यात येणे." या विषयावर नियम 93 अन्वाये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.प्रकाश शेंडगे,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,रामनाथ मोते यांनी "धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासंदर्भात संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी झारखंड, ओरिसा इ. राज्यांना भेटी देऊन त्या राज्यात धनगर नव्हेतर धांगड जात अनुसूचित जमातीमध्ये असल्याचे चुकीचे अहवालात नमूद करणे, त्यामुळे धनगर समाजात पसरलेला असंतोश, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी "डहाणू,जि.ठाणे येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये 3 विद्यार्थ्यांचा तर पालघरमध्ये एका विद्यार्थ्याचा मृत्यू होऊन सदर मृत्यूबाबतचा अहवाल शासनास न पाठविता तो ...

. . . .2 जी-2

**सभापती** . . . .

दडविण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता यांनी "कमानी कुर्ला येथील सीटीएस क्र.120 याठिकाणी असलेल्या तलावाची नोंद मुंबई महानगरपालिकेच्या कागदपत्रांवर आजही उपलब्ध असताना हा तलाव बुजविण्यात येऊन या जागेवर एल ॲण्ड टी कंपनीच्या बांधकामास शासनाने परवानगी देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. मात्र या विषयाच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना स्विकारलेली आहे. मी सूचनेस अनुमती नाकारतो.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर चव्हाण,विनोद तावडे,संजय केळकर,रामनाथ मोते यांनी "मुंबईतील प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबीर पुनर्रचनेच्या नावाखाली सुमारे 42 कोटींचा घोटाळा झाल्याचे सन 2006 मध्ये उघड होणे, सदर घोटाळयामध्ये समावेश असलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित करुन अथवा त्यांना मुंबईबाहेर बदल्या करण्याचे आश्वासन विधानमंडळात देऊनही त्याचे पालन न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याबाबतीत शासनाला दोन दिवसामध्ये निवेदन करण्यास सांगावे.

**सभापती** : शासनाने याबाबतीत लवकरात लवकर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 11 एप्रिल 2008 रोजी आंतरजातीय प्रेमप्रकरणी बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीच्या माजी सभापती अलका जगताप व त्यांचे पती सुर्यकांत जगताप यांना कोकरे कुटुंबियांकडून जबरदस्त मारहाण होऊन त्यांची पोलिसांसमक्ष गावांत काढलेली धिंड" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने तातडीने निवेदन करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, धन्यवाद.

. . . .2 जी-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**: यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मोठया बाटलीबंद जारमध्ये प्रक्रिया केलेल्या शुध्द पाण्याऐवजी साधे पाणी भरुन ते बिसलेरी शुध्द पाण्याच्या नावे विक्री होत असल्याचा अन्न व औषध प्रशासनाने दिनांक 11 एप्रिल 2008 रोजी वरळी येथील सह्याद्री डिस्ट्रीब्युटर या कंपनीत टाकलेल्या धाडीत आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

**सभापती** :यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील, शरद पाटील यांनी "राज्यामध्ये वाढत्या महागाईला आळा घालण्यासाठी राज्याच्या पुरवठा विभागाने साठेबाजांच्या बाबतीत घडक कारवाई सुरु करणे, अशाच प्रकारे खालापूर तालुका (जि.रायगड) येथे बीएमएस फुड प्रॉडक्ट कंपनीच्या गोदामावर दिनांक 13 एप्रिल 2008 रोजी पुरवठा विभागाने धाड टाकून दीड कोटीचा गहू जप्त करणे, अमरावती येथे सुमारे 21 कोटी रुपयांच्या डाळी जप्त करणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे यांनी "विदर्भात 80 टक्के पेक्षा जास्त खनिज संपत्ती असून उद्योजक सदर खनिज संपत्ती इतर राज्यांमध्ये नेत असल्याने या भागातील उद्योग पूर्णपणे बंद होत असल्यामुळे विदर्भातील खनिज संपत्ती विदर्भाकरिता आरक्षित ठेवण्याची आवश्यकता, खनिज संपत्तीच्या लिजपट्टयांमध्ये गैरव्यवहार होत असून या बाबींची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ KTG/ 14:25

**सभापती** ...

सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी " सिधुदूर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यातील कास गावात तेरेखोल नदीच्या पात्रात वर्षानुवर्षे बेसुमार वाळू उत्खनन होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी धुपल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करुनही त्याकडे प्रशासन जाणीवपूर्वक करीत असलले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत यांनी " राष्ट्रीय स्तरावर खेळासाठी 18 संस्थांनी शासनाकडे अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करणे, सदर संस्थांना सुमारे 18 लाख रुपये अनुदान देण्याच्या प्रस्तावावर क्रीडा मंत्र्यांच्या नावाने बोगस सही करुन सदर रक्कम घाईगर्दीत या संस्थांना वितरित केली असून सदर प्रकार उघडकीस आल्यानंतरा या संस्थाविरुध्द पोलिसात तक्रार दाखल करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

आज 10 निवेदने आलेली आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना एक किंवा दोन पेक्षा जास्त प्रश्न विचारण्याची मी परवानगी देणार नाही. सन्माननीय सदस्यांनी एक किंवा दोन प्रश्नांपेक्षा जास्त प्रश्न विचारु नयेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याच्या दृष्टीने अटींमध्ये सुधारणा करणे

**मु. शी.** : पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याच्या दृष्टीने अटींमध्ये सुधारणा करणे याबाबत श्री. पाशा पटेल व श्री. वितोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, विनोद तावडे यांनी "पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याच्या दृष्टीने अटींमध्ये सुधारणा करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे, केवळ एका प्रश्नाने या विषयाचे समाधान होणार नाही असे मला वाटते. हा विषय स्वतंत्ररीत्या चर्चेला घेण्यात यावा अशी मी आपणास विनंती करतो.

**सभापती** : विधानसभेमध्ये स्थगन प्रस्तावाच्या निवेदनावर उपप्रश्न किंवा चर्चा होत नाही. या ठिकाणी आपण निवेदनांवर एक किंवा दोन प्रश्न विचारण्याची सन्माननीय सदस्यांना अनुमती देतो. हा विषय अन्य मार्गाने उपस्थित करता आला तर त्याचा जरुर विचार केला जाईल. सर्व सन्माननीय सदस्यांना सारखा नियम लागू आहे.

श्री. पाशा पटेल : अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून हा विषय घेता येईल काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, फळ पिकांचा काढणी हंगाम एकापेक्षा जास्त वेळा येतो. माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, फळ पिकांसाठी जी विमा योजना राबविली जाते त्या नुसार हप्ता निम्याने कमी केला जाणार आहे काय ? तसेच या संदर्भात दुसरी चांगली योजना तयार करण्यात येणार आहे काय, ही योजना किती दिवसामध्ये सुरु केली जाणार आहे तसेच द्राक्ष पिकाचे थंडीमुळे नुकसान होत असते. त्यामुळे फळ पीक विमा योजनेमध्ये थंडीमुळे नुकसान होणाऱ्या पिकांना संरक्षण देण्याचा अंतर्भाव केला जाणार आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, फळ पिकांसाठी पीक विमा योजना राबविण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येत आहे. परंतु दुर्दैवाने या योजनेस विशेष यश मिळालेले नाही. आंबा पिकासाठी हवामान विमा योजना सन 2005-06 व सन 2006-07 मध्ये राबविण्याचा प्रयत्न शासनाने केला होता. पहिल्या वर्षी 100 झाडांचा इंश्यूरन्स प्रिमियम भरला गेला होता. दुसऱ्या वर्षी 5 हजार झाडांकरिता इंश्यूरन्स प्रिमियम भरण्यात आला होता. सांगली जिल्हयामधील दोन तालुक्यांमध्ये पायलट बेसीसवर हवामान विमा योजना लागू करण्यात आलेली आहे. या योजनेनुसार विमा हप्ता हेक्टरी 12 हजार रुपयांपासून 23 हजार रुपये इतका ठरविण्यात आला होता. या पैकी काही शेतकऱ्यांनी प्रिमियम भरला नाही. त्यामुळे या योजनेस

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जितका प्रतिसाद अपेक्षित होता तितका प्रतिसाद मिळालेला नाही. नारळ पिकासाठी देखील अशा प्रकारची योजना राबविण्याचा शासनाचा विचार आहे. फळ झाडे किती वर्षांची झालेली आहेत, त्यांची पिकींग्ज किती वेळा झालेली आहे, तसेच झाडापासून किती उत्पादन होणार आहे याचे निकष कसे काढावयाचे याचे उत्तर अजूनपर्यंत मिळू शकलेले नाही.

यानंतर श्री. बरवड..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील .....

सन्माननीय सदस्यांनी गारपिटीबरोबरच थंडीचा उल्लेख करावा असे सांगितले. पायलट बेसिसवर सन्माननीय सदस्यांची सूचना मान्य करण्यास हरकत नाही. महत्वाचा विषय असा आहे की, प्रिमियम कसा ठरवावयाचा तसेच झालेले नुकसान कसे निश्चित करावयाचे ? या दोन गोष्टींच्या बाबतीत व्यवस्थित समाधानकारक उलगडा यामध्ये सांगितलेला नाही. याबाबत सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर निश्चितपणे त्यावर विचार केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, कृषी विमा योजनेचा कोणत्याही शेतकऱ्याला किंवा उत्पादकाला फायदा होत नाही ही वस्तुस्थिती आहे आणि माननीय मंत्रिमहोदयांनीही ते मान्य केले आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी विमा योजनेची जी मार्गदर्शक तत्वे आहेत त्याच्या आधारावर ही जशी पीक विमा योजना आहे तशीच खाजगी विमा कंपन्यांनी सुध्दा आपली योजना केलेली आहे. या दोन्ही पीक विमा योजना परिणामकारक नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, यासंदर्भात शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची कोणती योजना होऊ शकते याबाबतीत सरकारने अभ्यास करुन योजना तयार करावी. त्याकरिता पाहिजे तर शासनाने सबसिडीचा भार सोसावा. त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल. आता प्रिमियम भरला तरी एकाही शेतकऱ्याला इंश्योरंसचा लाभ मिळत नाही. यामध्ये उलट त्यांचे शोषण होते. यासंदर्भात शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्वानुसार शासन नवीन काय धोरण घेणार किंवा नवीन काय योजना निर्माण करणार ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या विषयावर केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने दोघांनीही समित्या नियुक्त केलेल्या आहेत, अभ्यास गट नियुक्त केलेले आहेत. अभ्यासाचीच प्रक्रिया चालू आहे. आपण जी पायलट योजना राबवली ती या अभ्यासाच्या माध्यमातूनच राबवली आहे. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की., जो प्रिमियम भरला जातो त्याच्या तुलनेत शेतकऱ्यांना कमी पैसे मिळतात. सन्माननीय सदस्य जे म्हणत आहेत ते फळझाडांच्या बाबतीत मान्य आहे. परंतु इतर पिकांच्या बाबतीत प्रिमियमच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर पैसे वितरित केलेले आहेत. यामध्ये 50 टक्के रक्कम राज्य शासनाकडून आणि 50

RDB/ SBT/ KTG/

श्री. राणा जगजितसिंह पाटील .....

टक्के रक्कम केंद्र शासनाकडून दिलेली आहे. इंश्योरंसच्या माध्यमातून ही जी मदत मिळते ती केंद्र शासन आणि राज्य शासनाकडूनच मिळत असते. पीक विम्याच्या बाबतीत समाधानकारक योजना आलेली नाही. मी आताच सांगितल्याप्रमाणे सन्माननीय सदस्य याबाबतीत काही सूचना देऊ शकले तर निश्चितपणे त्याचा अंतर्भाव करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : आयुर्वेद संचालनालय, मुंबई येथील संचालक डॉ. गो.प्र.तितर यांच्या मनमानी कारभारामुळे कार्यालयातील कर्मचारी त्रस्त होणे

**मु. शी.** : आयुर्वेद संचालनालय, मुंबई येथील संचालक डॉ. गो.प्र.तितर यांच्या मनमानी कारभारामुळे कार्यालयातील कर्मचारी त्रस्त होणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता यांनी "आयुर्वेद संचालनालय, मुंबई येथील संचालक डॉ. गो.प्र.तितर यांच्या मनमानी कारभारामुळे कार्यालयातील कर्मचारी त्रस्त होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी वितरित केलेल्या निवेदनामुळे माझे समाधान झाले असल्यामुळे मला उपप्रश्न विचारावयाचे नाहीत.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : दारुबंदीबाबत शासनाने केलेले नवीन नियम दारुबंदीला घातक ठरणे

**मु. शी.** : दारुबंदीबाबत शासनाने केलेले नवीन नियम दारुबंदीला घातक ठरणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गणेश नाईक ( राज्य उत्पादन शुल्क मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दारुबंदीबाबत शासनाने केलेले नवीन नियम दारुबंदीला घातक ठरणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये पहिल्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, ज्यावेळी महिला संघटना किंवा गाव पातळीवरील महिला दारुबंदीची मागणी करीत होत्या त्यावेळेला त्या निवेदनावर बनावट किंवा त्या गावातील नसलेल्या मतदारांच्या स्वाक्षऱ्या घेऊन अनुज्ञप्ती बंद करण्याची मागणी केली जात असे. त्याचप्रमाणे अशा नोंदणीकृत संस्था राजकीय व अन्य हेतूने प्रेरित होऊन किंवा अनुज्ञप्ती धारकाला त्रास देण्याच्या उद्देशाने देखील अशा अनुज्ञप्ती बदं करण्याबाबत मागणी करीत असत. माझा प्रश्न असा आहे की, असे किती ठिकाणी आपल्याला दिसले की, महिला संघटनांनी मागणी केली असताना किंवा गावातील महिलांनी मागणी केलेली असताना खोट्या स्वाक्षऱ्या घेतल्या ? दुसरे म्हणजे "अनुज्ञप्ती धारकाला त्रास देण्याच्या उद्देशाने" असा उल्लेख केलेला आहे. दारु धंदेवाल्याचे दुकान बंद करणे ही त्यांना त्रास देण्याची बाब होते काय ? उलट ज्या महिला संघर्ष करतात त्यांच्याबद्दल अशा प्रकारे रेकॉर्डवर बदनामीकारक उल्लेख करणे बरोबर नाही. यातून दारु धंदेवाल्याबद्दल आपले प्रेम दिसते. अनुज्ञप्ती धारकाला त्रास देण्याच्या उद्देशाने महिला असे करतात असे म्हटले आहे. गावागावात जाऊन आपण महिलांना कसे तोंड दाखवणार ? आपण ही चार वाक्ये मागे घ्यावीत. महिलांनी खोट्या सह्या घेतल्याची आपल्याला कोणती उदाहरणे दिसली ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, यामध्ये "काही महिला संघटनांनी" अशी मी दुरुस्ती करतो. प्रश्न असा आहे की, मी वारंवार उत्पादन शुल्क खात्याच्या अनुषंगाने माझी वैयक्तिक मते मांडलेली आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ज्या उद्देशाने ही नियम 93 ची सूचना दिलेली आहे त्यामध्ये खरोखरच लोकांची व्यसनाधिनता कमी व्हावी, त्यांचे संसार चांगले चालावेत, नशेमध्ये समाजात वादावादी, भानगडी होऊ नयेत हा उद्देश आहे आणि तसेच मत सर्वांचे आहे. मी वारंवार सांगितले आहे की, कै. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना खोपोलीत दारुकांड झाले होते आणि त्यामध्ये जवळपास 100 लोक मृत्यू पावले होते.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक.....

त्यातून प्रश्न असा उपस्थित झाला की, देशी दारुचे उत्पादन करण्यासाठी परवानगी द्यावयाची की नाही, विक्री केंद्राला परवानगी द्यावयाची की नाही ? तेथून या गोष्टीला सुरुवात झाली. कायद्यानुसार गावातील ग्रामसभा सर्वोच्च आहे. त्या ग्रामसभेतील 50 टक्के लोक एकत्र यावेत. एखाद्या गावातील लोकसंख्या 1 हजार असेल तर 500 लोकांनी एकत्र यावे. 251 लोकांनी असलेले दारुचे दुकान बंद करावे अशाप्रकारचे मतदान केले तर ते दुकान बंद होईल. 1 वर्षापर्यंत त्यामध्ये पुन्हा बदल घडणार नाही. कधी कधी गावामध्ये पाणीपुरवठा करावयाचा आहे, वीज आणावयाची आहे, रस्ता आणावयाचा आहे असा समज करुन लोकांच्या सहया घेतल्या जातात. एवढेच नाही तर पलिकडील गावातील, वाडयातील लोकांच्या अर्जावर सहया घेतल्या जातात असे आढळले आहे. माननीय सदस्या श्रीमती गो-हे यांनी किती महिलांनी खोटया तक्रारी केल्या आहेत असे विचारले होते त्याची माहिती पटलावर ठेवणार आहे असे मी म्हटले आहे. परंतु यामध्ये अडचण निर्माण होऊ लागली. सातारा जिल्हयातील काही दुकाने बंद पडली. 25-25 कि.मी.लांब अंतरावर तरुण मंडळी दारु पिण्यासाठी जाऊ लागली, त्यातून अपघात झाले. त्यामुळे त्यांची इच्छा असेल तर कायद्यामध्ये दारु पिण्याला मनाई केलेली नाही, कोणाला थांबवू शकत नाही. यामध्ये सर्वच महिला मंडळांचा मला उल्लेख करावयाचा नव्हता. काही महिला मंडळ असे मला म्हणावयाचे होते. काही लोक बाजूच्या दुकानदाराच्या प्रभावाखाली येऊन ते दुकान हटवून टाकण्याची मागणी करतात. त्यामध्ये बनावट दारु विक्री करणा-याचा प्रभाव असतो. काही वेळेला राजकीय व्यक्तीशी अनेकांचा संबंध असतो त्याचे दुकान बंद करावयाचे असते, असे प्रकार झाले आहेत, परंतु शासनाची याबाबतची भूमिका स्पष्ट आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : ज्यावेळी गावामध्ये महिला पुढाकार घेऊन दारु बंदी असावी असा प्रस्ताव मांडतात त्यावेळी गावातील अनेक गुंड आणि पोलीस सुध्दा त्या महिलांवर दबाव आणण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब करतात. निवडणुकीमध्ये त्या महिला पराभूत कशा होतील असा प्रयत्न केला जातो. पुष्कळवेळा महिलांकडून बाटली उभी की आडवी असा ठराव मांडला जातो. अनेकदा आडवी बाटलीच्या बाजूने मतदान झाल्याचे दिसून येते. सन्माननीय सदस्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

श्रीमती गो-हे यांनी या परिस्थितीवर मात करण्यासाठी नियम 93 ची सूचना दिली होती. त्याच्या पाठीमागचा हेतू महत्वाचा आहे. हेतू पाहून शासनाने कारवाई करणे अपेक्षित आहे. विशुध्द मनाने महिलांना मदत करण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. राज्यात कोठेही असे प्रकार होणार नाहीत अशी दक्षता घेणार काय ?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी ज्या भावनेतून प्रश्न विचारला आहे त्या हेतूविषयी माझ्या मनामध्ये शंका नाही. भविष्य काळामध्ये दारुचे दुकान चालू ठेवण्यासाठी किंवा बंद करण्यासाठी जी काही काही प्रक्रिया असेल त्यासाठी सहया करीत असताना इनफ्रंट कॅमेरे लावले जातील आणि पोलीस यंत्रणा ठेवली जाईल. त्यामुळे कोणतेही गुंडपुंड या कामाला रोखू शकणार नाहीत.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या व निदेशकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या

**मु. शी.** : राज्यातील व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या व निदेशकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप वळसे-पाटील ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी " राज्यातील व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या व निदेशकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, + 2 स्तरावरील अभ्यासक्रमासंबंधी ही 93 ची सूचना दिली होती. त्याला अनुलक्षून शासनाने असे उत्तर दिले आहे की, "दिनांक 11.12.2006 रोजीच्या शासन निर्णयानुसारच सुधारित वेतनश्रेणीची अंमलबजावणी करीत आहे." त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही किंवा होत नाही. या जी.आर.ची तातडीने अंमलबजावणी करण्याचे शासनाने निदेश दिले आहेत काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, या अभ्यासक्रमासंबंधी व्यवसाय शिक्षण संचालकांकडून अनेक प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत. त्या प्रस्तावावर अद्यापही निर्णय झ ालेला नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...)

या सर्व धोरणात्मक बाबींच्या संदर्भात विचारविनिमय करुन निर्णय घेणार आहोत असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की या प्रस्तावाची छाननी करुन आणि विचारविनिमय करुन साधारणत: दोन महिन्याच्या आत माननीय मंत्री महोदय निर्णय घेतील काय ? भाषा विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षकांची अनेक पदे निर्माण केलेली आहेत. एका संस्थेच्या अनेक शाळा असतात आणि एका शाळेमध्ये काही तास, दुस-या शाळेमध्ये काही तास असे पूर्ण वेळ कार्यभार असणारे शिक्षकही उपलब्ध आहेत. अशा प्रकरणी माननीय मंत्री महोदय तातडीने निर्णय घेतील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या दोन प्रश्नांचे उत्तर "होय" असे आहे. तिस-या प्रश्नाचे उत्तर, "तपासून घेऊन कार्यवाही करण्यात येईल." असे आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील शासकीय कर्मचा-यांची पदोन्नतीने भरावयाची पदे

**मु. शी.** : विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील शासकीय कर्मचा-यांची पदोन्नतीने भरावयाची पदे याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी यांनी "विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील शासकीय कर्मचा-यांची पदोन्नतीने भरावयाची पदे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : या प्रश्नावर लक्षवेधीच्या माध्यमातून सविस्तर चर्चा झालेली आहे. ही पदे भरण्यावरील स्थगिती सुप्रीम कोर्टाने उठविलेली आहे. 35 हजार पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. तेव्हा एक स्पेशन ड्राईव्ह घेऊन ही पदे भरण्यात येणार आहेत काय ? तसेच पदोन्नतीने रिकाम्या होणा-या 35 हजार जागाा किती कालावधीत भरण्यात येतील ?

श्री. राजेश टोपे : 3 महिन्यात जागा भरणार काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. त्याला "होय" असे उत्तर आहे. सुप्रीम कोर्टाने 28.3.2008ला निर्णय दिलेला आहे. व्हीजेएनटी आणि एसबीसीच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. याबाबतीत दिलेली स्थगिती उठलेली आहे. मागील काळात भरती प्रक्रिया थांबलेली होती. त्याबाबतीत आता पहिल्या महिन्यात ज्येष्ठता यादी तसेच सीआरच्या संदर्भातील काम केले जाईल. तीन महिन्याच्या कालावधीमध्ये पदोन्नती आणि सरळ सेवेची पदे भरण्याच्या बाबतीत तातडीने कारवाई केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : 35 हजार पदे पदोन्नतीने भरल्यानंतर पुन्हा 35 हजार पदे रिक्त होणार आहेत. या रिक्त पदांवर पुन्हा व्ही.जे.एन.टी. मधील उमेदवारांन नोकरीची संधी उपलब्ध होईल. एमपीएससी मार्फत ही पदे भरण्यासाठी वर्षानुवर्षे लागतील. तेव्हा वृत्तपत्रात जाहिरात देऊन किंवा एखाद्या एजन्सीकडे हे भरतीचे काम देऊन ही रिक्त होणारी पदे भरली जातील काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे-पिंपरी शहरातील भारनियमनामुळे उद्योगधंद्यावर होणारे परिणाम

**मु. शी.** : पुणे-पिंपरी शहरातील भारनियमनामुळे उद्योगधंद्यावर होणारे परिणाम याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे, यांनी "पुणे-पिंपरी शहरातील भारनियमनामुळे उद्योगधंद्यावर होणारे परिणाम" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : पुणे मॉडेलचा हेतू अतिशय चांगला होता. परंतु वीज अपुरी पडू लागली. कोणत्या कारणामुळे ही तफावत निर्माण झाली. सुरुवातीला नियोजन करुन पूर्ण शहराला वीज मिळत होती परंतु आता ती तशी मिळण्यामध्ये कोणत्या अडचणी आल्या. या अडचणी पुन्हा उद्‌भवू नये म्हणून शासन कोणती दक्षता घेणार आहे ?

....नंतर गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील :सभापती महोदय, आपल्या राज्यात विजेची कमतरता आहे. ती विजेची कमतरता भरुन काढण्यासाठी समान पध्दतीने शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये भारनियमन करतो. पुण्याचे मॉडेल असे आहे की, जेवढया कॉन्टमचे भारनियमन पुणे शहरात करावयाचे आहे, तेवढया कॉन्टम एवढी वीज पुण्यातील नागरिकांनी पुढे येऊन आणली तर त्या शहराला भारनियमनातून मुक्त करता येईल. ही योजना पुणे शहरात सुरु केली, त्यावेळेला पुणे शहरात असणारा शॉर्ट फॉल आणि गेल्या वर्ष, दोन वर्षामध्ये विजेची वाढलेली मागणी यामध्ये फार मोठे अंतर तयार झाले. 100 ते 120 मे.वॅ.विजेची कमतरता जाणवावयास लागली होती. बाकीच्या भागात लोडशेडींग करुन पुण्यात वीज कमी आहे, पुण्यातील नागरिक वीज आणत नाहीत, तरी सुध्दा तेथे भारनियमन चालू ठेवावयाचे काय हा प्रश्न त्या ठिकाणी निर्माण झाला होता. याबाबतीत स्थानिक चेंबर,सीएआय. यांनी पुढाकार घेतला आणि त्यांनी महावितरण कंपनीला पत्र दिले. महावितरण कंपनीने यासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी रेग्युलेटरी कमिशनकडे पाठविला. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी रेग्युलेटरी कमिशनने सांगितले की, यासाठी कायमची एक व्यवस्था तयार करा. त्यासाठी एक शॉट टाईम फ्रेन्चाईजी नेमा. नंतर त्यासंबंधी लॉंग टर्ममध्ये सुनावणी घेऊन निर्णय करता येईल. त्याप्रमाणे टाटा पॉवर ट्रडींग कंपनी पुढे आली. या कंपनीने पुणे शहराला आवश्यक असणारी वीज पुरविण्याच्या संदर्भातील भूमिका घेतली. त्या ठिकाणी लागणारी 60 टक्के वीज टाटा पॉवर ट्रेडींग कंपनीकडून खरेदी केली जाणार आहे. उर्वरित 40 मे.वॅ.वीज स्थानिक कॅप्टीव्ह जनरेशनमधून निर्माण करण्यात येणार आहे. म्हणून पुणे मॉडेल पुन्हा सुरु झाले आहे. त्यामुळे पुणे शहरातील भारनियमन संपुष्टात आलेले आहे. त्याचप्रकारचा प्रयोग बारामती येथील इंडस्ट्रीयल असोसिएशनने केलेला आहे. त्यांनी देखील भारनियमन टाळण्यासाठी प्रस्ताव दिला आणि तो प्रस्ताव महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी रेग्युलेटरी कमिशनने मान्य केला आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव नागपूर, औरंगाबाद, मुंबई, ठाणे, भांडूप वा अन्य शहरांमधून पुढे आला तर त्या शहरांचे प्रस्ताव याच धर्तीवर स्वीकारणास काही अडचण नाही. वीज टंचाईच्या परिस्थितीतून बाहेर येईपर्यंत आपण वेगवेगळे उपाय करतो आहोत. या उपायाचा फायदा पुणे शहराला निश्चितपणे झालेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला, त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, ब-याच वेळेला आपण अशी चर्चा करतो की, वीज नसल्यामुळे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

उद्योगधंदे बंद पडले. जे उद्योग एम.आय.डी.सी.च्या एरियामध्ये आहेत, त्या एरियात आपण कधीही भारनियमन करीत नाही. आठवडयातून एक स्टॅगरिंग डे असतो त्या दिवशी भारनियमन केले जाते. जे उद्योग एम.आय.डी.सी.च्या बाहेर आहेत, त्या उद्योगांना काही ना काही प्रमाणात विजेच्या बाबतीत त्रास होतो. जे कॅप्टीव्ह प्लॅन्ट आहेत, त्यातून वीज निर्मिती केली गेली पाहिजे. कॅप्टीव्हमधून निर्माण केलेली वीज जास्त महाग पडते. डिझेलचा वापर करुन वीज निर्मिती करावी लागते, त्यामुळे वीज निर्मिती करण्यात प्रश्न निर्माण होतात. पुण्यातील लोकांनी हा प्रश्न मार्गी लावला आहे. वीज निर्मितीसाठी जास्त खर्च होतो, तो जास्तीचा खर्च शासनाने तिजोरीतून करावा अशी अपेक्षा होती, परंतु त्या गोष्टीस आपण ठाम नकार दिला आहे. परंतु पुण्यातील लोकांनी जास्तीचा खर्च स्व:ता उचलण्याची तयारी दाखविली आहे. पुणे येथील ग्राहकांना मागच्या वेळेस दर युनीटला 43 पैसे जास्त लावत होतो. यावेळचा दर अजून एम.ई.आर.सी.ई.ने निश्चित केलेला नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, टाटा ट्रेडींग कंपनी बाहेरुन वीज खरेदी करणार असून ती वीज पुणे शहरात देणार आहे. ही ट्रेडींग कंपनी बाहेरुन वीज खरेदी करुन जास्त दराने वीज देणार आहे. नागपूर येथे 15 दिवस झाले एक वीज निर्मिती प्रकल्प तयार झालेला आहे. यश ॲग्रोटेक कंपनीकडून 8 मे.वॅ.वीज मिळू शकते. परंतु या ठिकाणी मात्र पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट करण्यात आले आहे त्यात म्हटले आहे की, 3 रुपये 5 पैसे प्रति युनीट दराने वीज आम्हालाच दिली पाहिजे. ॲग्रीमेंटमध्ये असे नमूद केले असल्यामुळे सध्या त्या ठिकाणी भांडणे सुरु आहेत. माझा देखील वीज निर्मितीचा 20 कोटी रुपयांचा प्रकल्प सुरु केला होता. परंतु तो प्रकल्प आपल्या सौजन्याने बंद पडलेला आहे. माझ्या प्रकल्पातून आणि यश ॲगोटेक कंपनीतून निर्माण होणा-या विजेमुळे तेथील भारनियमन कमी होऊ शकते. एकीकडे बाहेरची वीज खरेदी करता आणि ती वीज तेथे देता. परंतु महाराष्ट्रात वीज निर्मिती प्रकल्प सुरु होते, ते वीज खरेदी करण्यात येत नसल्यामुळे बंद पडू लागलेले आहेत. बाहेरच्या ट्रेडींग कंपनीला जास्त पैसे देऊन त्यांची वीज खरेदी करता आणि तो जास्तीचा खर्च पुणे शहरातील लोकांकडून वसूल करता. महाराष्ट्रात वीज निर्मितीचे प्रकल्प कार्यरत आहेत, त्या प्रकल्पांची वीज खरेदी करुन लोकांना देण्यास काय हरकत

3...



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

आहे ? टाटा कंपनीची 4 रुपये 40 रुपये प्रति युनीट दराची वीज तुम्हाला चालते. परंतु आमच्या प्रकल्पातील विजेला तुम्ही 3 रुपये 5 पैसे दर देता. उमरेड येथे एक वीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला होता तो प्रकल्प देखील बंद पडलेला आहे. तो प्रकल्प 8 मे.वॅ.वीज निर्मिती करु शकतो. तो प्रकल्प अजून जास्तीची वीज निर्मिती करु शकतो. परंतु तुमच्या अचचणीमुळे तो प्रकल्प जास्तीची वीज निर्मिती करु शकत नाही. जे प्रकल्प वीज देण्यास तयार आहे त्यांचेशी एक धोरण आहे. दुसरीकडे जास्त दराची वीज तुम्ही खरेदी करता आणि ती वीज तुम्ही दुसरीकडे पुरवितात. ही विसंगती दूर कशी करणार ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 14:50

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यामध्ये दोन प्रश्न महत्वाचे आहेत. पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, पुण्यासाठी जी वीज आणली आहे ती वीज राज्य शासनाने किंवा महावितरणने खरेदी केलेली नाही. पुण्यातील नागरिकांनी खरेदी केलेली आहे. ती वीज पुरवण्याच्या संदर्भातील ऑप्शन त्यांच्याजवळ आहे. त्यांनी वीज कोठून खरेदी करावयाची हा त्यांचा प्रश्न आहे. त्याची कॉस्ट तेथून भरली जाते. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जी वस्तुस्थिती सांगितली ती खरी आहे. आज या राज्यामध्ये को-जनरेशनचे जे प्रोजेक्ट येतात किंवा अन्य प्रोजेक्ट येतात त्यांच्या संदर्भात पॉवर परचेस ॲग्रीमेंट झालेली आहेत त्याआधारे त्यांचे दर वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेले आहेत. अशा प्रकारची भूमिका नियामक आयोगाने घेतली आहे यावेळी को-जनरेशनने किंवा अन्य प्रोजेक्टला सपोर्ट करण्याच्या दृष्टीकोनातून फिक्स टेरीफ 3 रुपये 10 पैशाच्या आसपास ठरविले जाते. परिस्थितीमध्ये आता थोडासा बदल झालेला आहे आणि एमओआरसीने को-जनरेशन प्रोजेक्टला 3 रुपये 10 पैसे दर दिलेला आहे यामध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचाही प्रोजेक्ट अडचणीत आलेला आहे. एका बाजूला पॉवर परचेस ॲग्रीमेंट झाले असल्यामुळे वीज पुरविण्याचे बंधन आहे परंतु वीज निर्माण केली तर त्याची कॉस्ट जास्त येते व निर्मिती करणे परवडत नाही. यामध्ये एकच मार्ग आहे की जर आपण एमईआरसीच्या पुढे गेलात म्हणजे अपिल केलेत जसे बाकीच्या प्रोजेक्टमध्ये फिक्स कॉस्ट आणि व्हेरीअेबल कॉस्ट त्याच्यामध्ये असणार आहे. आपल्या प्रोजेक्टच्या इन्व्हेस्टमेंटच्या किती टक्के तेथे मिळाले पाहिजेत आणि इंधनाचे वाढलेले दर, त्यामध्ये वापरलेला कोळसा यासंदर्भामध्ये आपण किती चार्ज करु इच्छिता यासंदर्भात एमईआरसीकडे अपिल केले तर राज्यामध्ये येणाऱ्या छोटया प्रकल्पांना त्याच्यातून वीज निर्मितीला वाव मिळावा आणि त्याच्यातून वीज मिळावी यासाठी राज्य शासन एमईआरसीसमोर महावितरणमार्फत राज्य शासन सकारात्मक भूमिका घेईल. माझे मत असे आहे की, एक पिटीशन एमईआरसीकडे केले तर हा प्रश्न सुटू शकेल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रोजेक्ट बंद झाला तरी पिटीशन करणार नाही. प्रश्न शासनाकडे आहे. राज्यातील प्रकल्प बंद पडलेले आहेत. आता एक नवीन प्रकल्प सुरु झाला होता तो बंद पडलेला आहे. सगळया देशामध्ये ट्रेडींग कंपनी आहे त्यासंदर्भात आम्ही सुप्रीम कोर्टात गेलो आहोत त्याचा निर्णय जो काही लागायचा आहे तो लागेल. आता आम्ही येथील एमईआरसीकडे अपिल करणार नाही. परंतु शासनाला राज्यात वीज पाहिजे आणि वीज शासन

.....2

श्री. नितीन गडकरी...

टाटा कंपनीकडून ट्रेडींग करुन पुण्याला देत आहे. नागरिक पैसे भरत नाहीत. बिलामध्ये ते पैसे लावतात. एमईआरसीला पिटीशन द्या. राज्याला विजेची गरज आहे. तुमची ट्रेडींग कंपनी तयार करा. तुम्हाला जेवढी वीज मिळेल तेवढी कमी रेटमध्ये घ्या आणि ज्या ज्या ठिकाणी द्यायला तयार आहेत त्यांना द्या. पिटीशन शासनाने करावयाचे आहे. दरवेळी सचिव श्री. पांडे यांना भेटून कोळसा केवढयाचा आणि भाव केवढयाचा याची घासाघीस कोण करणार कारण आता कोळशाचे भाव रोज बदलत आहेत. रोज भाव वाढत आहेत. 5 रुपयाने सुध्दा वीज मिळणार नाही. शासनाला असून वीज मिळत नाही आणि महाराष्ट्राचे एखाद्या अधिकाऱ्याच्या जिद्दीपायी वाटोळे सुरुच आहे. शासन काही निर्णय घेणार आहे किंवा नाही ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने पिटीशन करुन देण्याची प्रोव्हीजन नाही. परंतु ऊर्जा विभाग म्हणून ही बाब एमईआरसीच्या निदर्शनास आणून देऊ. याच्यामध्ये त्यांनी जी फिक्स टेरीफ पॉलिसी केलेली आहे त्यामुळे या राज्यातील प्रकल्प सुरु होऊ शकत नाहीत. फिक्स कॉस्ट आणि व्हेरीएबल कॉस्ट अशी डयूएल पॉलिसी त्यामध्ये असली पाहिजे. एमईआरसीने त्यासंदर्भात हियरींग घेऊन निर्णय द्यावयाचा आहे. राज्य शासनाने स्वत: ट्रेडींग कंपनी काढली पाहिजे अशी जी आपली सूचना आहे त्याबाबतीत सरकारने ट्रेडिंग कंपनी ऑलरेडी रजिस्टर केलेली आहे. पॉवर ट्रेडिंगसाठी जे लायसन मिळवायचे असते ते केंद्र शासनाकडून अद्याप मिळालेले नाही. येत्या 8-10 दिवसात ते मिळेल अशी अपेक्षा आहे. केंद्र शासनाकडे अर्ज पेंडींग आहे. ते लायसन मिळाल्यानंतर राज्य शासन स्वत:च्या ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून या राज्यामध्ये मग त्यामध्ये कॅबिनेटपुढे जावे लागेल किंवा अन्य काही मेकॅनिझम करावे लागेल ते शासन करील. कारण वीज खरेदी करताना त्याची प्रॉडक्शन कॉस्ट काय आहे आणि काय दराने खरेदी करावयाची आहे यासंदर्भात आम्ही निर्णय करीत आहोत आणि शासन पुढे गेलेले आहे.

-----

.....3



SSK/ SBT/ KTG/ 14:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकणातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई

**मु. शी.** : कोकणातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी कोकणातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

या नंतर श्री. भोगले..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, कोकणातील एकंदरीत भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता पाणी टंचाई फेब्रुवारीपासून जाणवायला लागली आहे. याबाबत काय उपाययोजना केलेल्या आहेत त्याचे उत्तर निवेदनामध्ये दिलेले आहे. साधारणपणे फेब्रुवारीपासून पाणी टंचाई जाणवते आणि दुर्गम भागामध्ये दोन-तीन कि.मी.अंतरावरुन ग्रामस्थांना पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागते. रत्नागिरी जिल्हा परिषदेने 160 गावांसाठी 8.33 कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविला. यंत्रणेकडून जी दिरंगाई होते त्यामध्ये सुधारणा होण्याची गरज आहे. पाणी टंचाई सुरु झाल्यानंतर घाईगर्दीने टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो आणि मग त्यात घोटाळे होतात, जनतेपर्यंत पाणी पोहोचत नाही. या यंत्रणेच्या कारभारात सुधारणा करणार का? फेब्रुवारीच्या अगोदर आराखडे उपलब्ध होतील का? ठाणे जिल्हयातील ग्रामीण व आदिवासी भागातील आश्रमशाळांपैकी एक-दोन अपवाद वगळता सर्वच आश्रमशाळांमध्ये अजूनही पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झालेल्या नाहीत. त्या योजना केव्हा पूर्ण करणार आहात? आदिवासी विकास विभागाकडून निधी दिला गेला नसेल किंवा इतर कारणे असतील, परंतु आश्रमशाळांमध्ये पाणी उपलब्ध नाही.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, टंचाई आराखडा सप्टेंबर-ऑक्टोबर या महिन्यात तहसीलदार व बीडीओ, सर्व सरपंच, ग्रामसेवक यांना बोलावून तयार करणे अपेक्षित आहे. ज्या ज्या ठिकाणी लोकप्रतिनिधींचा स्वत:चा इंटरेस्ट असतो, अशा ठिकाणी ते स्वत: आमसभा बोलावून सरपंचांना बोलावून आराखडा तयार करतात आणि पंचायत समिती स्तरावरुन सर्व आराखडे एकत्रित करुन जिल्हा परिषदेकडे पाठविले जातात. जिल्हा परिषदेकडून ते जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविले जातात. ऑक्टोबर ते डिसेंबर पहिला टप्पा, जानेवारी ते मार्च दुसरा टप्पा व एप्रिल ते जून तिसरा टप्पा असे तीन वेगवेगळे टप्पे केले पाहिजेत. रायगड जिल्हयात काही प्रमाणात विलंब झाला हे खरे आहे. त्याचे कारण वेगळे आहे. इतर सर्व ठिकाणचे आराखडे वेळेवर प्राप्त होऊन मंजूर झालेले आहेत. रायगड जिल्हा परिषदेने एक ठराव घेतला. टंचाईचा आराखडा तयार केला जातो हा पूर्ण स्थानिक स्तरावर म्हणजे जिल्हा परिषद स्तरावर केला जातो. जिल्हा परिषद म्हणजे स्थानिक लोक आहेत. त्यांच्या अडीअडचणी त्यांना माहिती आहेत. त्यांच्याकडूनच अंमलबजावणी केली जाते. ती त्यांनी लवकरात लवकर केली पाहिजे. रायगड जिल्हा परिषदेमध्ये

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे...........

विलंब झाला याचे कारण म्हणजे मागील वर्षाचा टंचाईचा निधी मिळण्यास वेळ लागला. महसूल विभागाने काही त्रुटी काढल्या होत्या. त्यांनी टीएसपीमध्ये 7 कोटी रुपये प्रस्तावित केले होते. कोणतेही टंचाईचे काम जून, 30 पर्यंत पूर्ण संपले पाहिजे. ज्यावेळी अहवाल मागविण्यात आला तेव्हा पाऊस सुरु झाल्यानंतरही 'प्रगतीपथावर' आहे असे उत्तर दिले. त्यामुळे वाद निर्माण झाला. सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांनी सीईओ यांना बोलावून मार्ग काढावा असे सुचविले. कोकण विभागामध्ये विलंब झाला आहे. यापुढे याबाबत काळजी घेण्यात येईल एवढीच ग्वाही देतो. आश्रमशाळांमध्ये सध्या पाणी नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. ठाणे जिल्हयामध्ये एनसीपीसी अंतर्गत जी गावे आहेत त्यांच्याबाबत पुढील दोन महिन्यात आराखडा तयार होईल आणि कामांबाबत गती येईल. सगळ्या एनसीपीसी गावातील कामे पूर्ण होतील. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले बहुतांश प्रश्न सुटतील. जे प्रश्न शिल्लक राहतील ते सर्व शिक्षा अभियानामध्ये घेता येतील.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जावळी (जि.सातारा) तालुक्यात महिलांनी केलेली दारुबंदी पुन्हा सुरु करणे

**मु. शी.** : जावळी (जि.सातारा) तालुक्यात महिलांनी केलेली दारुबंदी पुन्हा सुरु करणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्री. रामनाथ मोते, श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक (दारुबंदी व उत्पादन शुल्कमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्री. रामनाथ मोते, श्री. संजय केळकर, यांनी "जावळी (जि.सातारा) तालुक्यात महिलांनी केलेली दारुबंदी पुन्हा सुरु करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, माननीय मंत्री महोदय नेहमी सभागृहात अत्यंत चांगले उत्तर देत असतात. परंतु निवेदनात मात्र महिलांचा अपमान करणारे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले आहे. या महिलांनी एकत्र येऊन दारुचा व्यवसाय बंद केला. परंतु हा दारुचा व्यवसाय बंद केल्यानंतर 25 तारखेला शासनाने एक जी.आर. काढून ही दारुबंदी पुन्हा सुरु करण्यात आली. अशा प्रकारे शासनाने केलेल्या कायद्याला हरताळ फासण्यासाठी महिला एकत्र आल्या होत्या. वास्तविक गावातील महिला अशिक्षीत असतात आणि त्यांना एवढेच माहीत आहे की, दारु पिऊन आलेला नवरा बायका-पोरांना मारतो, घर चालवित नाही आणि संपूर्ण कुटुंबाचे जीवन उद्ध्वस्त करतो म्हणून त्याची दारु बंद झाली पाहिजे. त्यांना मतदानातील काही समजत नाही कारण विधानपरिषदेच्या निवडणुकीत सुध्दा आमदारांची मते अनेक वेळा अवैध ठरतात. मग या महिलांना मतदानातील काय समजणार आहे आणि अशा प्रकारचे कारण देऊन केलेली दारुबंदी पुन्हा सुरु केली. माझा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, "सदर परिसरातील अवैध मद्यविक्री करणाऱ्यांनी शासकीय आदेशाचा गैरफायदा घेऊन शासनाच्या अनुज्ञप्ती गैरमार्गाने बंद करण्याचा प्रयत्न केला." याचा अर्थ अवैध दारु धंदा करणारे होते हे आपणच कबूल करीत आहात. मग त्यांच्यावर शासनाने कारवाई का केली नाही ? तसेच या ठिकाणी दारु पिणाऱ्या पुरुषांकडून त्यांचे संसार उद्ध्वस्त होऊ नयेत म्हणून या गावातील दारुबंदी होण्यासाठी शासनाच्या नवीन धोरणानुसार पुन्हा मतदान घेण्याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. गणेश नाईक : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील मेढा या गावच्या महिलांनी त्यांच्या गावातील देशी दारुचे दुकान बंद व्हावे म्हणून 25 टक्के महिला एकत्र येऊन जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. असा अर्ज केल्यानंतर त्या परिसरातील जवळपास 5 मद्य विक्रेत्यांची दारुची दुकाने बंद करण्यात आली. या महिलांना मतदानाला जातांना वीज पुरवठ्यासाठी आपल्याला अर्ज करावयाचा आहे, मोफत शिधावाटप करण्यासाठी अर्ज करावयाचा आहे, कर्जमाफीसाठी अर्ज करावयाचा आहे. अशा प्रकारे विविध कारणांच्या अनुषंगाने काही महिला संघटनांनी अर्ज केले......अडथळा......सन्माननीय

.......3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक .........
सदस्य सांगतात तो उद्देश मी समजू शकतो आणि त्यांच्या मताशी मी सहमत आहे. कारण दारु पिणे हे स्वत:च्या शरीराला, कुटुंबाला तसेच समाजालाही घातक आहे. मघाशी मी सांगितल्याप्रमाणे सन 1973 पर्यंत या राज्यामध्ये दारुबंदीच होती.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील अत्यंत ज्वलंत विषय असून दुर्देवाने ग्रामीण भागातील महिलांना दारुबंदीसाठी पुढाकार घ्यावा लागतो. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे गावातील महिला सुशिक्षीत असतातच असे नाही. त्यानुसार सर्व महिलांना जाऊन सांगितले की, आपल्याला गावात दारुबंदी करावयाची आहे आणि त्यासंबंधीच्या अर्जावर सही करावी अशा प्रकारे या महिलांनी प्रयत्न केले तर प्रथम ती महिला मागे बघणार आणि आपला नवरा याबाबतीत काय करणार हे पाहूनच विचार करणार. म्हणून ज्या सक्षम संघटना आहेत, चांगल्या गोष्टीसाठी, चांगल्या उद्देशासाठी अशा वेगवेगळया माध्यमातून महिलांच्या सह्या घेऊन मुख्य उद्देश दारुबंदी असेल व तसा जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करतात. चांगल्या कामासाठी असे काम करणाऱ्या संघटनांना फसव्या संघटना म्हणणे योग्य नाही. कारण त्यांचा उद्देश दारुबंदी असाच होता. अशा चांगल्या घटनांसाठी ग्रामीण भागातील महिलांचे सहकार्य घेण्यासाठी आणि त्यांच्या सह्या घेण्यासाठी या मार्गांचा वापर करुन दारुबंदी केली तर ती चुकीची गोष्ट नाही. परंतु आपल्या निवेदनात मात्र अशा संघटनांनी फसवणूक करुन हे काम केले आहे, असेच जाणवते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सन्माननीय सभापती महोदय, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी आपल्याला सत्य आणि अहिंसेची शिकवण दिलेली आहे. त्यामुळे सत्याच्या अनुषंगाने या ठिकाणी भूमिका मांडण्यात आलेली आहे. त्यामुळे खोटी माहिती देणे हे चुकीचे आहे. या ठिकाणचे दारुचे दुकान बंद करण्याच्या संदर्भात मी स्वत: 17.4.2008 रोजी माननीय आयुक्तांना आदेश दिले होते व आयुक्तांनी यासंदर्भात सुनावणी घेऊन सत्य परिस्थिती काय आहे यांसदर्भात सांगितले होते. त्याप्रमाणे मी मघाशी म्हटल्या प्रमाणे या दारु बंदीच्या संदर्भात एकाच व्यक्तीच्या अनेक सहया व अंगठे असल्याचे निदर्शनास आलेले आहे. देशी दारुचे दुकान बंद पडल्यानंतर गावठी दारु विकली जावी असाही उद्देश काहींचा असतो. ज्या दारुने शरीराला अपाय होत नाही अशी दारु प्यायली गेली तर ते बरे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गावठी दारु विकली जावी यासाठी देशी दारुचे दुकान बंद पाडले जाते असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे. परंतु माननीय गृहमंत्र्यांनी ज्या गावात गावठी दारु विकली जात असेल त्या ठिकाणच्या पोलीस पाटलाचे पद रद्द केले जाईल अशी घोषणा केली होती त्यामुळे या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी आपले मत व्यक्त करावे अशी विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपल्या गावात गावठी दारु विकली जाते याची माहिती त्या गावच्या पोलीस पाटलाला असेल तर संबंधित पोलीस पाटलाचे पद रद्द केले जाईल परंतु बहुतेक गावे ही मोठी असतात व देशी दारुचा व्यवसाय गावाच्या कोप-यात चालत असतो आणि त्याची माहिती संबंधित पोलीस पाटलाला नसेल तर प्रश्न उदभवणार नाही परंतु आपल्या गावात गावठी दारु विकली जात आहे व या गोष्टीकडे संबंधित गावच्या पोलीस पाटलाने दुर्लक्ष केले तर निश्चित प्रकारे अशा पोलीस पाटलावर कारवाई करु असे सांगितले होते त्या मताशी मी आजही ठाम आहे.

-----------------------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वाडा तालुका (जि.ठाणे ) औद्योगिक दृष्टया डी प्लस झोन जाहीर झाल्यामुळे अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : वाडा तालुका (जि.ठाणे)औद्योगिक दृष्टया डी प्लस झोन जाहीर झाल्यामुळे अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करुन देणे याबाबत सर्वश्री संजय केळकर,रामनाथ मोते व विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर,रामनाथ मोते व विनोद तावडे यांनी वाडा तालुका (जि.ठाणे ) औद्योगिक दृष्टया डी प्लस झोन जाहीर झाल्यामुळे अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करुन देणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, वाडा ( जि. ठाणे) तालुका औद्योगिक दृष्टया डी झोन जाहीर झाल्यापासून या परिसरात मोठया प्रमाणात औद्योगिकरण झालेले असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी या परिसरात उत्पादन सुरु केलेले असून यापैकी काही कारखाने रासायनिक प्रक्रियेचे सुध्दा आहेत. रासायनिक प्रक्रियेचे कारखाने असल्याने रासायनिक कंपन्यात स्फोट होऊन तसेच आगी लागून मोठे अपघात होत असतात. परंतु उत्तरामध्ये म्हटले आहे की, "ग्रामपंचायत क्षेत्रात अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर अग्निशमन केंद्र किंवा इतर सुरक्षा येत्रणेसाठी खर्च करता येणे शक्य नाही. वरील आगीच्या व स्फोटांच्या घटनांमध्ये स्थानिक अग्निशमन दल नसल्यामुळे नजीकच्या भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलांची मदत घेण्यात आलेली आहे" सभापती महोदय, वाडा तालुक्यात डी प्लस झोन जाहीर झ ाल्यापासून 411 उद्योग घटकांची स्थायी नोंदणी झालेली आहे. त्यामुळे या कारखान्यांच्या माध्यमातून शासनाला करोडो रुपयांचे फायदा होत असतो, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत असतो त्यामुळे या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा उभी करण्याची नितांत आवश्यकता आहे. अग्निशमन यंत्रणा नसल्याने होणारी हानी टाळण्यासाठी अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी वाढा शहरात ग्रामपंचायत असल्याने सक्षमतेच्या कारणावरुन यंत्रणा उभी राहू शकत नाही. याबाबत शासनाचे उदासीन धोरण असल्याने वित्त व जिवित हानीचे संकट कायमस्वरुपी उभे असल्यामुळे ते निवारण्यासाठी अग्निशमन यंत्रणा उभी करण्याची नितांत आवश्यकता आहे. या ठिकाणी एमआयडीसी नाही त्यामुळे शासनाकडून या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा किती दिवसात उपलब्ध करुन दिली जाईल.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी केलेली सूचना अतिशय योग्य आहे. वाडा तालुक्यात डी प्लस झोन जाहीर झालेला असल्यामुळे या ठिकाणी येणा-या कारखान्यांना शासनाकडून अनेक फायदे दिले जातात. डी प्लस झ ोनमुळे सेल्स टॅक्स माफ केला जातो, कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करुन दिले जाते,शासनाकडील विविध संस्थाकडून मिळणा-या कर्जाच्या सवलतीचा फायदा दिला जातो अशा सर्व सुविधांचा फायदा डी प्लस झोनमधील उद्योगांना मिळत असतो.

यानंतर श्री. गायकवाड....

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 15.10

श्री.गणेश नाईक ...

तेथील उद्योजक सिमेन्ट कॉक्रिटचे पक्के स्ट्रक्चर उभे न करता नट बोल्ट वापरुन तात्पुरते स्ट्रक्चर उभे करीत असतात. शासनाकडून सवलती देण्यासंबंधीचा कालावधी संपल्यानंतर लगेच हे स्ट्रक्चर डिसमेन्टल करुन ते उद्योजक तेथून निघून जातात. वाडयाची डी प्लस झोनच्या संदर्भात सवलत देण्याची मुदत संपली होती ती वाढवली आहे. मुरबाड येथे अशा प्रकारे सवलती घेण्याकरिता काही कारखानदार आले होते त्यांचा सवलतीचा कालखंड संपल्यानंतर जवळजवळ 70 टक्के कारखाने बंद झालेले आहेत. जिल्हयाच्या ग्रामीण भागामध्ये दिवसेंदिवस नागरीकरण वाढत चाललेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे ती सजेशन फॉर ॲक्शन आहे. त्या ठिकाणी केमिकल झोन नाही तेथे इंजिनिअरीग किंवा इलेक्ट्रॉनिक्सचे आयटेमचे पॅकीग करण्याची इन्डस्ट्री आहे. त्यामुळे तेथे फायर फायटींगची तितकीशी गरज नाही मात्र शहराचा विकास वाढत चालला आहे ही गोष्ट विचारात घेता अग्नीशमन यंत्रणेची किती गरज आहे हे तपासून निश्चित त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही केली जाईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: बोईसर (जि.ठाणे) येथील मे.स्टर्लींग ऑक्झलरीज प्रा.लि. कारखान्यात स्फोट होऊन दोन कामगारांचा झालेला मृत्यू

मु.शी :बोईसर (जि. ठाणे) येथील मे.स्टर्लींग ऑक्झलरीज प्रा.लि. कारखान्यात स्फोट होऊन दोन कामगारांचा झालेला मृत्यू या सबंधी सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर,यांनी "बोईसर (जि. ठाणे) येथील मे. स्टर्लींग ऑक्झललरीज प्रा.लि. कारखान्यात स्फोट होऊन दोन कामगारांचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना जी दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, बोईसर परिसरातील कारखान्यांमध्ये वारंवार स्फोट घडतात त्यातील काही स्फोटाची नोंद होत असते तर काही स्फोटाची नोंद होत नाही. काही कारखाने योग्य प्रकारची काळजी घेत असतात त्यामुळे ती चर्चा बाहेर येत नाही. कारखान्यात स्फोट झाल्यामुळे कामगारांचा मृत्यू होत असतो. या कारखान्यात सुध्दा स्फोट झाला असून त्या ठिकाणी काय घडले आहे याची निवेदनामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे परंतु का घडले आहे आणि सरकारने काय करावयास पाहिजे याचा निवेदनामध्ये उल्लेख केलेला नाही. मला या निमित्ताने असा प्रश्न विचारावयाचा आहे की, कामगाराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कामगार विभागाने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत , ही उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती यंत्रणा कार्यान्वित आहे आणि ती यंत्रणा कार्यक्षमतेने काम करते किंवा नाही या संबंधी काही पाठपुरावा केला जातो काय किंवा त्या सबंधी काही आढावा घेण्यात येतो काय ? शासकीय यंत्रणेतील कोणता अधिकारी तेथे किती वेळा भेटी देण्यासाठी गेला होता याची आकडेवारी माझ्याकडे आहे. त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अपघात घडू नयेत या दृष्टीने कोणती काळजी घेतली गेली पाहिजे या संदर्भात कामगारांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. आपल्या राज्यात मोठया प्रमाणावर उद्योग वाढत आहेत त्या ठिकाणी काम करण्यासाठी परराज्यातून अनेक कामगार येथे येत असतात तेव्हा या कामगारांची नोंद होत असते काय एखाद्या कारखान्यात अपघात झाला तर कामगार खात्याच्या अंतर्गत त्याची नोंद घेण्यात येते काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी ठाणे जिल्हयातील बोईसर परिसरातील कारखान्यामध्ये झालेल्या स्फोटासंबंधी या ठिकाणी प्रश्न विचारलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, या कारखान्यात स्फोट होण्याच्या अगोदर दिनांक 13.4.2008 रोजी निरीक्षकानी या कारखान्याला भेट दिली होती. डायरेक्टर ऑफ इन्डस्ट्रीज सेफटीज ॲन्ड हेल्थ हे कारखान्यातील क्रेन, बॉयलर, मशिनरीची रचना, खोली, व्हेन्टीलेशन, कॅन्टीन इत्यादी बाबीसंबंधी निरीक्षण करीत असतात. बोईसर येथील स्टर्लीग ऑक्झीलरीज प्रा. लि. या कारखान्यामध्ये रिॲक्टरचा स्फोट झाला होता त्या संदर्भात मालकाच्या विरुध्द केस दाखल करण्यात आली आहे. या स्फोटामुळे दोन कामगारांचा ऑन द स्पॉट मृत्यू झाला असून चार कामगाराना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. ज्या कामगारांचा मृत्यू झाला होता त्याच्या



श्री.गणेश नाईक...

कुटुबिंयाना जी काही मदत द्यावयाची असते ती मदत देण्यात आलेली आहे. अर्थात एखाद्या व्यक्तिचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या कुटुंबियाना मदत देणे हा त्या वरील उपाय होऊ शकत नाही. कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कामगारांचे वर्कशॉप घेण्यात येत असतात. डायरेक्टर ऑफ इन्डस्ट्रीज सेफटीज ॲन्ड हेल्थ यांच्याकडून या संदर्भात योग्य ती कार्यवाही केली जाते. अर्थात ज्या प्रमाणात हे काम व्हावयास पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. अपघात घडल्यानंतर नुकसान होते आणि कामगारांचा मृत्यू होतो तेव्हा अपघात घडू नये यासबंधी निश्चितपणे जी काही कार्यवाही करावयास पाहिजे ती करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, तारापूर, बोईसर येथील कारखान्यातील स्फोटांची घटना आहे आणि या निवेदनात म्हटले आहे की, त्यात 2 कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून 5 कामगारांना दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. सभापती महोदय, तारापूर, बोईसरची ही घटना असताना तेथून जवळपासच्या, ठाण्यातील वगैरे कोणत्याही रूग्णालयात या कामगारांना उपचारासाठी न नेता एकदम कळंबोली येथील एमजीएम रूग्णालयात का नेण्यात आले ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी या संदर्भात घेतलेल्यामाहितीनुसार त्या मालकांनी सांगितले की, त्यांच्या परिचयाचे डॉक्टर आहेत की, जे आगीमध्ये जळालेल्या रूग्णांवर अधिक चांगल्या पद्धतीने उपचार करतात आणि त्या डॉक्टरांबद्दल त्यांना खात्री वाटत होती म्हणून त्यांनी त्या कामगारांना त्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले आहे.

**उपसभापती** : नियम 93 खालील निवेदनांवरील चर्चा आता संपली आहे. यानंतर सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होऊन दुपारी 3.45 वाजता पुन्हा भरेल.

( दुपारी 3.16 ते 3.45 मध्यंतर )

( यानंतर सौ. रणदिवे .... एसएस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ KGS/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 15:45

**(मध्यंतरानंतर)**

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

कोरेगावमध्ये बांधण्यात आलेली भिंत

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, याठिकाणी मला महत्वाच्या विषयाकडे सदनाचे लक्ष वेधावयाचे आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्य,मुंबईमध्ये एका गावाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. कोरेगाव मध्ये दलित आणि सवर्ण यांच्यामध्ये एक भिंत बांधण्यात आलेली आहे आणि ती भिंत कलेक्टर यांनी उभी केल्याचे वर्तमानपत्रातून जाहीर झाल्यामुळे आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि मुंबईमध्ये सर्व समाजातील स्तरावर हा चर्चेचा विषय झालेला आहे. त्यामुळे आपण याबाबतीत शासनाला निवेदन करण्यास सांगावे. तसेच ही भिंत निष्कासित करण्याबाबत आदेश देण्यात यावेत. या घटनेमुळे समाज जीवनावर आघात होत आहे आणि महाराष्ट्रात याचे गंभीर परिणाम दिसून येतील अशी स्थिती आहे.

**उपसभापती** : शासनाने याबाबतीत निवेदन करावे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, होय.

----

. . . .2एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनांसंबंधी**

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक 1 ते 4 नंतर चर्चेला घेण्यात येतील. प्रथम लक्षवेधी सूचना क्रमांक 5 चर्चेसाठी घेण्यात येईल.

. . . .2 एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : घर कामगार संघटनेने दिलेला बेमुदत उपोषणाचा इशारा

मु. शी. : घर कामगार संघटनेने दिलेला बेमुदत उपोषणाचा इशारा यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, जयंत प्र.पाटील वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील(मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रातील हजारो घर कामगार हलाखीचे जीवन जगत असणे, अत्यंत तुटपुंजा पगार,नोकरीची शाश्वती नसणे, मालकांकडून शारीरिक, मानसिक, आर्थिक छळाला सामोरे जावे लागणे,सामाजि सुरक्षितता, विमा, घर हक्क, वैद्यकीय सुविधा, पेन्शन, रेशन या मागण्यांसाठी घर कामगार संघटनेने दिलेला बेमुदत उपोषणाचा इशारा, शासनाने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणे, त्यामुळे घर कामगार कर्मचारी व विविध संघटना यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 एस-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी घर कामगारांच्या प्रश्नासंदर्भात लक्षवेधी सूचना देण्यात आली आहे. परंतु माझा सुरुवातीला असा आक्षेप आहे की, याठिकाणी शासनाने निवेदनामध्ये "घरेलू" असा शब्द वापरलेला आहे आणि तोच आक्षेपार्ह आहे. घर कामगारांसाठी प्रतिष्ठीत शब्द वापरला पाहिजे. परंतु "घरेलू" हा मराठी शब्द नाही, पण तो शासनाने वापरलेला आहे. या कामगारांच्या संदर्भात कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने घोषणा केलेली आहे. परंतु ते प्रस्तावित आहे. अजूनपर्यंत त्याचे स्वरुप स्पष्ट करण्यात आलेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, सदरहू कल्याण मंडळाचे स्वरुप काय आहे ? तसेच या घर कामगारांना पेन्शन व वैद्यकीय सुविधा देण्याच्या बाबत कधी निर्णय घेण्यात येणार आहे ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापत महोदय, घरेलू कामगार किंवा घर कामगार यांच्या अनुशंगाने माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय परिषद आयोजित केली होती. तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरण व जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात येणार आहे. घरेलू कामगारांसाठी विविध संस्थांच्या मार्फत मागणी करण्यात येत आहे. कामगारांना किमान वेतन मिळावे, वैद्यकीय मदत मिळावी, त्यांना साप्ताहिक सुट्टी मिळावी तसेच वर्षभराकरिता एखाद्या महिन्याकरिता सुट्टी मिळावी त्यांना बोनस मिळावा अशा प्रकारच्या विविध मागण्या संघटनेकडून केल्या जातात. राज्य शासनाने 12 ऑगस्ट 2004 रोजी असंघटीत कामगारांसाठी एक योजना लागू केलेली आहे. 18 ते 60 या वयोगटातील दारिद्रय रेषेखालील सर्व असंघटित कामगारांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे. अशा प्रकारे केंद्र शासन व राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत. या घटकाच्या हिताची जपणूक करण्यासाठी शासन कार्यरत आहे. माथाडी कामगारांचे बोर्ड असते. तेथे रजिस्ट्रेशन झ ाल्यानंतर काम मिळण्याची हमी कामगारांना मिळते. कामगारांना वेतन देण्याबाबतचा निर्णय मालकांवरच सोपविण्यात आला आहे. केंद्र सरकार व राज्य शासनाच्या माध्यमातून कामगारांच्या आरोग्याची व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या अनुषंगाने बऱ्याच योजना लागू केलेल्या आहेत. या योजनांमध्ये सुधार करुन त्या अधिक सक्षम करण्याच्या अनुषंगाने शासन प्रयत्नशील आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आताच सांगितले आहे की, असंघटित कामगारांकरिता योजना केंद्र शासनाने लागू केलेल्या आहेत. ती योजना प्रस्तावित आहेत. या कामगारांकरिता राज्य शासनाने नेमकी कोणती पावले उचलली आहेत साध्या वैद्यकीय सुविधा देण्यापासून त्यांना किमान वेतन मिळेपर्यत कामगारांच्या अनेक समस्यांची कोणतीही दाद मिळत नाही. त्यांना त्रास भोगावा लागातो. त्यांना बरे नसल्यास औषधोपचार वेळेवर होत नाही. या कामगारांना पेंशन मिळत नाही. याबाबत राज्य शासनाने कोणती पावले उचलली आहेत हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. उत्तरात देखील योजना प्रस्तावित आहे असे म्हटलेले आहे,

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, या अनुषंगाने विधेयकाचा मसुदा तयार झालेला असून मंत्रिमंडळासमोर हा मसुदा ठेवण्याची कार्यवाही सुरु आहें. सदर विधेयकामध्ये घरगुती कामगारांकरिता मंडळ स्थापन करण्याची तरतूद आहे. दिनांक 24/ 3 /08 मध्ये मुख्य सचिवांच्या

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक..

झालेल्या बैठकीत त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार, तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर घरेलू कामगार कल्याण मंडळ विधेयक 2008 चा प्रारुप अहवाल तयार करण्यात आलेला असून विधी व न्याय विभाग व वित्त विभागाचा अभिप्राय प्राप्त झालेला आहे. वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता करण्यात येत आहे. सदर विधेयक मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी ठेवले जाईल व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गेल्या 3 अधिवेशनापासून घरेलू कामगारांसाठीचे विधेयक होणार आहे असे सांगण्यात येत आहे. या विषया संदर्भात वारंवार बऱ्याच संस्था मुद्दा उपस्थित केला जातो. घरासाठी काम करणाऱ्या लोकांना कामगारांचा दर्जा देण्यासंदर्भात हे विधेयक आहे. हे विधेयक जोपर्यंत पारीत होत नाही तो पर्यंत घरकाम करणाऱ्यांना कामगारांचा दर्जा मिळणार नाही. असंघटित कामगारांची अतिशय हालाखीची परिस्थिती आहे. या संदर्भात निर्णय कधी घेण्यात येणार आहे ? हे विधेयक या अधिवेशनामध्ये पारीत केले जाणार आहे असे सांगितले जाईल काय ? माननीय मुख्यमंत्री महोदय मानीनय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर पाटील घोषणा देतात, आश्वासने देतात. अधिवेशन सुरु झाले की, पुन्हा विचार करण्यात येत आहे, सचिव सांगत आहेत, असे सांगितले जाते. गेल्या 3 अधिवेशनापासून आम्ही हेच ऐकत आहोत. त्यामुळे माझी विनंती आहे की, अमूक तारखेपर्यंत या बाबत निर्णय घेतला जाईल असे माननीय मंत्री महोदय सांगतील काय ? ते ज्या निर्भिडपणे इतर वक्तव्ये करीत असतात त्याचप्रमाणे टाईम बाऊंड निर्णय सांगतील काय ? कामगारांबाबत निर्णय घेतल्यास लोक आपणाला दुवा देतील.

श्री गणेश नाईक : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे, या अनुषंगाने कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्याकरिता विधेयक आणण्यात येणार आहे. या विधेयकाचे प्रारुप स्वरुप तयार झालेले आहे. विधी व न्याय तसेच वित्त विभागाने जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्द्यांचा विचार केल्यानंतर लगेच मंत्रिमंडळासमोर आणण्यात हे विधेयक येणार आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय जे सांगत आहेत ते उत्तरामध्ये आलेले आहे. पाच वर्षापूर्वी कमिटी नेमलेंली होती. माननीय मंत्रिमहोदय तेच ते उत्तर देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, याबाबत तीन अधिवेशनांमध्ये चर्चा झाली. सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनीही मागे यावर सविस्तर चर्चा घडवून आणली. पाच वर्षापूर्वीचा जो निर्णय आहे तोच निर्णय माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत. त्याच्यापुढे ते जात नाहीत.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सभापती महोदय, मी सांगितले की, 24.3.2008 ला म्हणजे 21 दिवसांपूर्वी या अनुषंगाने विधी व न्याय आणि वित्त विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले. वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यावर निर्णय घेऊन ती बाब मंत्रिमंडळासमोर येणार आहे. याचा अर्थ घर कामगार आणि अन्य घटकांना माणूस म्हणून आत्मविश्वासाने जगण्याकरिता जी शक्ती प्रदान करण्याची सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांची इच्छा आहे किंवा जी गरज आहे त्या अनुषंगाने शासनाचे प्रयत्न चालू आहेत.

**उपसभापती** : यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 2 घेण्यात येईल.

श्री. संजय दत : सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. आपण सर्वांना न्याय देता. ज्या सन्माननीय सदस्यांची नावे लक्षवेधी सूचनेवर आहेत त्यांना प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचनेवरील नावे वाचल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिलीच पाहिजे असे नाही. आपल्याला कल्पना असेल की, आपल्याला लक्षवेधी सूचना द्यावयाची असेल तर सन्माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक किंवा अन्य सन्माननीय सदस्यांची नावे आपण त्यामध्ये देता. हे सगळे चालू असते. मला त्यबाबत काही म्हणावयाचे नाही किंवा त्याबद्दल माझी हरकत नाही. एका लक्षवेधी सूचनेवर कोणी कितीही वेळ बोलावयाचे याला काही अर्थ नाही. यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 2 घेण्यात येईल.

---

...2...

**पृ. शी.** : वांद्रे पूर्व येथील गांधीनगरातील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड म्हाडाने एमआयजी क्लबला विकणे.

**मु. शी.** : वांद्रे पूर्व येथील गांधीनगरातील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड म्हाडाने एमआयजी क्लबला विकणे यासंबंधी ॲड. अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वांद्रे (पूर्व) मुंबई येथील गांधीनगरातील एमआयजी क्लबच्या ताब्यात असलेला भूखंड म्हाडाच्या गांधीनगर वसाहतीच्या लेआऊटमध्ये खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असणे, सदरहू मैदान एमआयजी क्लबला देखभालीसाठी दिले असताना सदरहू भूखंड 1 कोटी रुपयांना म्हाडाने एमआयजी क्लबला विकल्याचे दिनांक 8.12.2007 रोजी वा त्यासुमारास वृत्तपत्रात प्रसिध्द होणे, उक्त विक्रीच्या व्यवहाराबाबत म्हाडाच्या दक्षता विभागाने काही आक्षेप नोंदवून तसा अहवाल म्हाडाच्या उपाध्यक्षांना सादर करुनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, केवळ एमआयजी क्लबच्या ताब्यात असल्यामुळे सदरहू मैदानावर नागरिकांना फिरण्यास अथवा खेळण्यास मनाई करण्यात येणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक 4.11.2007 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण महामंडळ, वांद्रे (पूर्व) यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही आजतागायत याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, स्थानिक नागरिकांना मैदानाच्या वापरापासून वंचित रहावे लागत असणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत तातडीने सखोल चौकशी होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...3...

RDB/ KTG/ KTG/ SBT/ KGS

ॲड. प्रितमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KTG/ SBT/ KGS

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे. वांद्रे (पूर्व) येथील गांधीनगर लेआऊटमध्ये जे क्रीडांगण होते ते म्हाडाने एमआयजी क्लबला विकले अशी बातमी वर्तमानपत्रामध्ये आली होती. उच्च न्यायालयाने यासंदर्भात असा निकाल दिलेला आहे की, त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारे वाणिज्यिक किंवा कमर्शियल वापरासाठी त्याचा वापर करु नये. त्या ठिकाणी या क्लबची दादागिरी फार वाढलेली आहे. त्या विभागातील लोकांना खेळण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी त्रास होतो. त्यांच्या मनमानीप्रमाणे सर्व चालले आहे. याबाबतीत सतत वर्तमानपत्रात बातम्या येतात. मी कोर्टात गेलो तेव्हा कोर्टाने याबाबत सांगितले. जो भूखंड क्रीडांगणासाठी राखीव आहे तो म्हाडाला विकता येतो काय ? तो भूखंड विकला तर त्याचा दर ठरविण्याचा अधिकार कशा पध्दतीने असावा ? तो दर म्हाडाच्या दराप्रमाणे असावा की क्लबने निवेदन दिले त्यावर म्हाडा जी सवलत देते त्याप्रमाणे असावा ? क्रीडांगणासाठी राखीव असलेल्या भूखंडावर 15 टक्केपेक्षा जास्त बांधकाम करता येत नाही. जर 15 टक्केपेक्षा जास्त बांधकाम केले असेल तर ते बांधकाम शासन तोडणार काय ? दक्षता पथकाने या पूर्ण कराराचे उल्लंघन झाले आहे असा अहवाल दिलेला आहे तसेच लीज रद्द करण्याची शिफारस केलेली आहे. ती शिफारस शासन ताबडतोब मान्य करणार काय ? याबाबतीत कोणता राजकीय दबाव आहे काय ? त्या विभागातील लोकांना या मैदानाचा पट्टा सोडून बाकीचे मैदान पूर्णवेळ खेळण्यासाठी मिळणार काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, एमआयजी क्लबला बीएमसी आणि म्हाडाने लीजवर जागा दिलेली आहे. उपसंचालक, नगररचना यांनी 1 कोटी 18 लाख 26 हजार 360 रुपये किंमत सुचविली होती. ती रक्कम भरल्यानंतर काही अटींच्या अधीन राहून ही जागा लीजवर दिलेली आहे. त्याबाबत काही तक्रारी आलेल्या आहेत. या तक्रारींची मुंबई मंडळाने दखल घेऊन एमआयजी क्लब बरोबर चर्चा केली आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने क्लबला काही गोष्टी करण्यास सांगितल्या होत्या त्याप्रमाणे त्यांनी आम्ही करु असे कबूल केले आहे. तसेच या तक्रारी दक्षता विभागाकडे सुध्दा गेल्या होत्या. त्यासंबंधी बीएमसी आणि म्हाडाच्या अधिका-यांनी संयुक्त भेट देऊन एक अहवाल तयार केलेला आहे. त्या अहवालावर शासन निर्णय घेणार आहे. विधानसभेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे की, एमआयजीच्या प्रकरणासंबंधी बीएमसी आणि म्हाडा यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत महापालिका आयुक्त व मुख्य सचिव यांना तोडगा काढण्यासंबंधी विनंती केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी अशीही घोषणा केलेली आहे की, सदर प्रकरणी बीएमसी आणि म्हाडाची संयुक्त बैठक घेऊन मुख्य सचिव निर्णय घेतील आणि हे प्रकरण निकाली काढतील. या प्रश्नाबाबत खालच्या सभागृहात चर्चा झालेली आहे. याबाबत मुख्य सचिव एक महिन्याच्या आत निर्णय घेणार आहेत.

**उपसभापती** : खालच्या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, म्हाडाला अशा पध्दतीने भूखंड विकता येतो काय ?

**उपसभापती** : माननीय मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे.

ॲड.अनिल परब : माननीय मंत्रिमहोदयांकडून माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांना मी सांगू इच्छितो की, आपला प्रश्न महत्वाचा आहे. आपण गांभीर्यपूर्वक तो मांडत आहात. त्यामुळेच मी बोलत आहे की, या सभागृहात एक भूमिका आणि खालच्या सभागृहात वेगळी भूमिका असे होऊ नये. कारण नसताना माननीय राज्यमंत्री अडचणीत येतील. म्हणून मी मघाशी म्हटल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहात जे सांगितले आहे ते पाहिजे असेल तर माननीय राज्यमंत्री पुन्हा सांगतील.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी म्हाडाला नोव्हेंबर, 2007 मध्ये पत्र दिलेले आहे. त्या पत्राला म्हाडाने साधे उत्तर सुध्दा दिलेले नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी म्हाडाला नोव्हेंबर महिन्यात पत्र दिलेले आहे. त्या पत्राला दोन दिवसामध्ये उत्तर द्यावे अशा सूचना मंत्रिमहोदयांनी म्हाडाला द्याव्यात असे मी सूचित करतो.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये स्पष्ट म्हटले आहे, तरीही मी अतिरिक्त माहिती दिली आहे. मुंबई मंडळाने चौकशी केली आहे, कमिटी नेमली आहे, अधिका-यांनी भेट दिलेली आहे. तेथील नागरिकांचे म्हणणे होते की, आम्हाला 3 तास चालण्याची परवानगी द्यावी. त्याप्रमाणे एमआयजी क्लबने नागरिकांना मैदानाच्या ठिकाणी 3 तास चालण्याची परवानगी दिलेली आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हे मैदान लोकांसाठी राखीव आहे. लोकांनी त्यावर 2 तास चालावे की 3 तास चालावे यावर क्लब प्रतिबंध लावू शकत नाही. तेथील लोकसंख्या 25 हजाराच्या आसपास आहे, हा भूखंड क्रीडांगणासाठी राखीव आहे. म्हाडामध्ये अनागोंदी कारभार चालला आहे. हा सरळ सरळ तेथील लोकांवर अन्याय आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : हे कोणाच्या आशीवार्दामुळे होत आहे ?

ॲड.अनिल परब : कोणाच्याही आशीवार्दामुळे असेल, सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी एक महिना वाट पहावी. शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. त्या कमिटीचा निर्णय होईपर्यंत एमआयजी तेथे काम करणार नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती** : सभापतीस्थानावरुन माननीय सभापती, उपसभापती किंवा तालिका सभापती जेव्हा सन्माननीय सदस्यांना खाली बसण्यासाठी सांगतात किंवा गप्प राहाण्यासाठी सांगतात त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी त्यांचे ऐकले पाहिजे. एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्यांनी उठून बोलणे इष्ट नाही. काही वेळा माननीय मंत्री महोदय उत्तर देत असताना त्यांनाही सांभाळून घेण्याची भूमिका आपणाला घ्यावी लागते. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये जे काही विधान केलेले आहे ते माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

ॲड. अनिल परब : माझे दोन प्रश्न आहेत. क्रीडांगण विकण्याचे अधिकार म्हाडाला आहेत काय ? दक्षता समितीने दिलेल्या अहवालावर काय कारवाई केलेली आहे ? तेथील लोकांना त्या मैदानावर खेळण्यास क्लबची परवानगीची गरज आहे काय ? लिजवर दिलेला पट्टासोडून बाकीची जागा लोकांना वापरण्यास परवानगी दिलेली आहे काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : दक्षता पथकाचा अहवाल प्राप्त झालेला आहे. अहवालानुसार कारवाई सुरु झालेली आहे. कमिट्या नेमलेल्या आहेत. कमिट्यांचा रिपोर्ट आल्यानंतर निर्णय होईल. मुख्य सचिवांची समिती नेमलेली आहे. एक महिन्याच्या आत या प्रकरणी निर्णय लागेल.

श्री. राम पंडागळे : काही सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजू शकतो. मुंबई शहरातील अनेक मैदाने निरनिराळया संस्थाकडे असताना त्याबाबतीत कोणी काही बोलत नाही. परंतु एमआयजीबाबत केवळ पोटतिडिकेने बोलले जात आहे. त्यामुळे या तक्रारीमध्ये काही तथ्य नाही..

ॲड. अनिल परब : तक्रारीत तथ्य नाही हे सन्माननीय सदस्यांनी कसे ठरवले ?

श्री. राम पंडागळे : हे मैदान देण्याच्या बाबतीत मुंबई महानगरपालिकेने ठराव केला होता काय ? मातोश्रीसारख्या अन्य संस्थांना देखील अशा त-हेने मैदाने दिलेली आहेत. त्याबाबतीत देखील चौकशी केली जाईल काय ? एमआयजी क्लबचे अध्यक्ष हे दलित आहेत काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगावंकर : होय. सन्माननीय सदस्यांनी इतर मैदानांची चौकशी करण्याची मागणी केलेली आहे. तेव्हा त्यांचीही चौकशी केली जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, रेकॉर्डवर येण्यासाठी मी दोन/तीन प्रश्न विचारु इच्छितो. म्हाडाने हे मैदान लिजवर दिलेले आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. म्हाडा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

कायद्यातील सेक्शन प्रमाणे म्हाडाला अशा त-हेने मैदान लिजवर देता येते काय ? दिनांक 26 मार्च 2008 रोजीच्या तारांकित प्रश्न क्रमांक 37521ला माननीय मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिलेले आहे की, "त्या भूखंडाचा बहुतांश भाग हा सन 1981 पासून त्या क्लबच्या ताब्यात असल्यामुळे आकारलेल्या अधिमूल्याचा पुनर्विचार करण्याबाबत प्राधिकरणाने दिनांक 10.11.2003चे ठरावाद्वारे रु. 1,18,26,360 एवढे सुधारित अधिमूल्य निश्चित केले आहे." म्हणजे याला नियमाचा आधार नाही.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारचे भूखंड म्हाडाला लिजवर देता येतात काय ? विभागाने उत्तरात असे म्हटले आहे की, एम.आय.जी.क्लबच्या मते, ऑन रेकॉर्ड नाही पण हे संपूर्ण मैदान 1976 पासून त्यांच्या ताब्यात आहे. दुसरे उत्तर दिनांक 26 तारखेस दिले आहे, त्यात म्हटले आहे की, 1981 पासून त्यांच्याकडे या भूखंडाचा काही भाग आहे. विभागाकडून देण्यात आलेल्या उत्तरांमध्ये विसंगती आहे. त्या विसंगतीचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. दिनांक 10 नोव्हेंबर, 2003 रोजी या राज्यात युतीचे राज्य नव्हते. प्राधिकरणाने ठराव क्रमांक 5978 अन्वये काही अटींच्या अधीन राहून भूखंड दिला आहे. त्या अटी कोणत्या आहेत? एखाद्याला एखाद्या भूखंडाचा मर्यादित भाग मेन्टेनन्स करण्यासाठी दिला असेल तर त्यास आमची हरकत नाही. परंतु सर्व मैदानावर जनतेने केव्हा खेळावे यासाठी एम.आय.जी.क्लबची परवानगी घेण्याची गरज आहे काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, ही जमीन म्हाडाची होती. म्हाडाला आपली जमीन लिजवर देण्याचा पूर्णपणे अधिकार आहे. भूखंड बी.एम.सी.चा असेल किंवा म्हाडाचा असेल तर तो भूखंड लिजवर देण्याचे त्यांना अधिकार आहेत. सर्व नियमांची तपासणी करुनच म्हाडाने सदर भूखंड एम.आय.जी.क्लबला दिला आहे. शाळा, रहिवाश्यांना खेळासाठी मैदान, गार्डनची परवानगी यासंबंधी एम.आय.जी.क्लबला म्हाडाने अटी घालून दिल्या आहेत. त्या अटींची पूर्तता क्लबकडून करण्यात येत आहे. ज्या अटींची पूर्तता होत नाही, ती पूर्तता म्हाडा क्लबकडून करुन घेणार आहे. या भूखंडाच्या बाबतीत तक्रारी आलेल्या आहेत, त्या तक्रारीची दखल म्हाडाने तसेच दक्षता पथकाने घेतलेली आहे. या तक्रारींच्या संदर्भात उच्चस्तरीय समिती नेमली आहे. ती समिती याबाबतीत चौकशी करीत आहे. या संदर्भात समिती नेमली आहे तरी सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नाही हे बरोबर नाही. याबाबतीत काय केले पाहिजे याबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांनी मला सांगावी.

श्री. जितेंद्र आव्हाड : "या वसाहतीमधील सर्व रहिवाश्यांना खेळपट्टी सोडून" असे निवेदनात म्हटले आहे, तर खेळपट्टी का सोडावयाची असा माझा पहिला प्रश्न आहे. निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, सदर खेळपट्टी वापरण्यास सकाळी तीन तास आणि सायंकाळी तीन तास परवानगी देण्यात येईल. सायंकाळी निश्चित कुठल्या वेळेस वापरण्यास परवानगी आहे असा माझा

2...

15-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) XX-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड....

दुसरा प्रश्न आहे. ही वेळ कोणी ठरविली ? तेथील रहिवाश्यांनी कामधंदे सोडून यावयाचे आणि तेथील खेळपट्टीवर खेळावयाचे यासंबंधी शासनाचे काही नियम आहेत काय ? या संदर्भात जी बंधने घालून देण्यात आली आहेत ती बंधने उठविली जातील काय ? क्रिकेट खेळण्यासाठी खेळपट्टी असते. ती खेळपट्टी कोणासाठी राखून ठेवलेली आहे काय ? या मैदानाच्या बाबतीत जी बंधने घालून दिली आहेत ती बंधने काढून सदर खेळपट्टी रहिवाश्यांसाठी खुली करुन देण्यात येईल काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : याबाबतीत विचार करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : आमच्या विभागातील एम.आय.जी.क्लबच्या संदर्भात चर्चा चालू आहे. या ठिकाणी दलित आणि संवर्ण हा प्रश्न उपस्थित होत नाही. सदर भूखंड म्हाडाला लिजवर देण्याचा अधिकार आहे अशी माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी दिली आहे. ही गोष्ट मला देखील मान्य आहे. सदर भूखंड विक्री केला ही बाब 7/12 उता-यावर नोंद करता येते काय ? या प्रश्नाचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. या विभागात एम.आय.जी.कॉलनी कधी जन्माला आली ? एम.आय.जी. क्लब कधी निर्माण झाले ? गांधीनगर वसाहत कधी जन्माला आले ? या ठिकाणी क्रीडांगण होते ते गांधीनगर व तेथील परिसरातील रहिवाश्यांसाठी खुले होते. त्या ठिकाणी एक शाळा होती. ती शाळा उद्ध्वस्त केली गेली. म्हणून माझा पुन्हा तोच प्रश्न आहे की, या विभागातील एम.आय.जी.कॉलनीचा जन्म कधी झाला ? एम.आय.जी.क्लबचा जन्म कधी झाला ? गांधीनगर कॉलनी कोणत्या वर्षी जन्माला आली ? या गोष्टींचा इतिहास माननीय मंत्री महोदयांना कळला तरच यासंदर्भातील उत्तरे देणे त्यांना सोपे होईल....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

ही जमीन लीजवर दिली होती तर ती प्रॉपर्टी कार्डवर गेली कशी ? यासंदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे या परिसरात राहणारे बरेचसे औद्योगिक कामगार आहेत. फक्त क्रिकेटसाठी हे मैदान वापरले जाणार असेल तर त्यांच्या मुलांनी जायचे कुठे ? हायकोर्टाने कमर्शिअल वापरासाठी या मैदानाला विरोध केलेला आहे. परंतु या मैदानाचा कमर्शिअल वापर होत आहे. वाईट हेतूने प्रश्न विचारलेला नाही. या मुलांनी खेळण्यासाठी जायचे कुठे हा महत्वाचा प्रश्न आहे त्याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, एमआयजी क्लबला लीजवर जमीन देताना ज्या अटी घातलेल्या आहेत त्या अटींप्रमाणे काम होत आहे. एमआयजी क्लबच्या संदर्भात ज्या तक्रारी आलेल्या आहेत त्या तक्रारी दूर करण्यासाठी समिती नियुक्त केलेली आहे. अटींप्रमाणे त्यांच्याकडून काम करुन घेणार आहोत. समितीच्या शिफारशी येतील त्याप्रमाणे कार्यवाही करु. आपली जी शंका आहे ती एमआयजी क्लब सर्व अटींचे पालन करणार आहे किंवा नाही मी सांगू इच्छितो की, अटींचे पालन करणार आहे. तेथे शाळा बांधणार आहोत. हे मैदान दिवसभर खुले करण्याचा विचार शासन करणार आहे.

**उपसभापती** : सदनामध्ये या प्रश्नावर भरपूर चर्चा झालेली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, क्रीडांगण जनतेसाठी खुले झाले पाहिजे. एमआयजी क्लबला जागा देण्याच्या संदर्भात, मैदान देण्याच्या संदर्भात ज्या अटी आणि शर्ती आहेत ते कागदपत्र शासनाने तपासून पहावेत. या सगळया चर्चेच्या माध्यमातून मी एवढेच सांगू इच्छितो की, सभागृहात सर्वपक्षीय चर्चा झाली त्या चर्चेच्या अनुषंगाने म्हाडाने जो करार केलेला आहे तो तपासून पहावा. परंतु कोणत्याही परिस्थितीत हे मैदान जनतेच्या वापरासाठी 24 तास खुले ठेवावे अशा प्रकारची मी सूचना करतो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी म्हाडाला जी पत्रे लिहिली त्याचे उत्तर म्हाडाचे अधिकारी देत नाहीत. राज्यामध्ये माहितीचा अधिकार आहे. तरीदेखील आमदारांना अधिकारी उत्तर देत नाहीत. अशा अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची जी मागणी आहे ती पूर्ण करु.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाच्या आरोग्य सेवेतील हजारो वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करणे.

**मु. शी.** : शासनाच्या आरोग्य सेवेतील हजारो वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करणे यासंबंधी डॉ. दीपक सावंत, सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, अनिल परब, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाच्या आरोग्य सेवेत बारा वर्षापूर्वी दाखल झालेले हजारो वैद्यकिय अधिकारी, सदर वैद्यकिय अधिकारी राज्याच्या ग्रामीण व अतिदुर्गम भागात जनतेला आरोग्य सेवा पुरवित असून ते शासकिय सेवेत वर्षानुवर्षे अस्थायी पदावर असून त्यांना शासकिय सेवेत कायम करावे अशी त्यांनी सातत्याने शासनाकडे केलेली मागणी, शासन सेवेतील इतर अधिकाऱ्यांना वेतनवाढ, भत्ते, पदोन्नती आदि आर्थिक लाभ मिळत असून सदर आर्थिक लाभापासून हजारो अस्थायी डॉक्टर वंचित असणे, आदिवासी दुर्मिळ भागात काम करणाऱ्या डॉक्टरांना शासनाने जाहिर केलेला प्रोत्साहन भत्ताही मिळत नसणे, अस्थायी वैद्यकिय अधिकाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत शासनाने चालविलेली अक्षम्य चालढकल, दरवर्षी अकरा महिन्यांसाठी तात्पुरती नियुक्ती देण्यात येणे, शासनाच्या बेपर्वाई वृत्तीमुळे राज्य शासनातील हजारो अस्थायी वैद्यकिय अधिकाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांकडे शासनाचे व जनतेचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक २८ मार्च, २००८ पासून राज्यभर असहकार आंदोलन सुरु करण्याचा घेतलेला निर्णय, परिणामी ग्रामीण भागातील जनतेला मिळणाऱ्या आरोग्य सेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याने जनतेत व अस्थायी वैद्यकिय अधिकाऱ्यांत पसरलेला असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे ( आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>**निवेदनानंतर**</u>

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, गेली अनेक वर्षे हा प्रश्न प्रलंबित आहे. या विषयावर माझी ही दुसरी लक्षवेधी सूचना आहे. शासनाच्या आरोग्य सेवेत 12 वर्षापासून हे वैद्यकीय अधिकारी आहेत. हे वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गात मोडणारे असून उत्तरामध्ये म्हटल्याप्रमाणे जिल्हा स्तरावरील व अन्य स्तरावरील अशी एकूण 7281 मंजूर पदे आहेत. त्यामध्ये तात्पुरत्या नियुक्तीने बंधपत्रित 600 वैद्यकीय अधिकारी आहेत.

नंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1... डॉ.दीपक सावंत...

तातपुरत्या नियुक्तीने सुमारे 2150 वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून 651 पदे रिक्त आहेत असे निवेदनात म्हटले आहे. आज या डॉक्टरांनी शासनाची 13-13 वर्षे सेवा केलेली आहे, त्यांना दोन-दोन अपत्ये झाली आहेत. असे असताना देखील त्यांना अस्थायी म्हटले जाते. हे सर्व डॉक्टर ग्रामीण भागात काम करीत आहेत. राज्य शासनाने वेगळा पायंडा पाडला आहे. शासनाने शुध्द आयुर्वेदिक पदवीधारक डॉक्टरांची निवड केली असून एमबीबीएसच्या जागेवर या आयुर्वेदिक डॉक्टरांना नियुक्त करणे मला पटलेले नाही. ज्या पॅथीमध्ये शिक्षण घेतले त्याच पॅथीमध्ये व्यवसाय करणे आवश्यक आहे. एमबीबीएस किंवा तत्सम पदवीधारक डॉक्टर नेमणे आवश्यक आहे. असा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय? जुलै, 2007 मध्ये याच विषयावर बैठक झाली होती त्या बैठकीचे मिनिट्स माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्या बैठकीत काही अटी व शर्ती श्री.रा.का.पवार, सहसचिव यांच्या उपस्थितीत मान्य करण्यात आल्या होत्या. त्यावेळी असे ठरले होते की, एका महिन्यात निर्णय घेतला जाईल. तो निर्णय घेण्यात आला का?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न मला कळला नाही?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, राज्य शासनाच्या ग्रामीण रुग्णालयात 36 शुध्द बीएएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्याचे योजिले आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार ज्यांनी त्यांनी आपापल्या पॅथीमध्ये प्रॅक्टिस करावी हे योग्य आहे. ग्रामीण जनतेबाबत हा दुजाभाव का केला जात आहे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रा.आ.केंद्रांमध्ये बीएएमएस डॉक्टरांची नियुक्ती करता येते का? याबाबत रिक्रूटमेंट रुल्सप्रमाणे बीएएमएस डॉक्टर नियुक्त करता येतात. यासाठी प्रा.आ.केंद्राच्या पातळीवर कोणते काम केले जाते, त्यासाठी कोणते डॉक्टर योग्य आहेत हे तपासणे आवश्यक आहे. नॅशनल प्रोग्रॅम आहेत त्यासाठी या डॉक्टरांना नियुक्त केले जाते. प्रा.आ.केंद्रे ही रेफरल सेवेसाठी आहेत. तेथे डॉक्टर कमी आहेत म्हणून एक बीएएमएस आणि एक वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. एक बीएएमएस डॉक्टर नेमण्याचे धोरण स्वीकारले आहे. एक बीएएमएस डॉक्टर नेमणे बंधनकारक केले जाणार आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 16:20

श्री.रणजित कांबळे....

2007 मध्ये जी बैठक झाली त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे काय निर्णय झाला? असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. डॉक्टरांना तात्पुरत्या सेवेऐवजी कायम सेवेत घेण्यासाठी एमपीएससीकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी एमपीएससीकडे प्रस्ताव पाठवावा लागेल. त्यांनी प्रस्ताव रिजेक्ट केला तरी कॅबिनेटला हा प्रस्ताव सुपरसिट करता येतो आणि कॅबिनेटने तो सुपरसिट केला आहे. वेगवेगळया राज्यांनी ॲडहॉक किंवा टेंपररी डॉक्टरबाबत कोणती पध्दत स्वीकारली आहे या संदर्भात राज्य शासनाने कर्नाटक राज्याची सिस्टीम तपासून तिचा अभ्यास करुन आपल्या राज्यामध्ये कशा पध्दतीने ती सिस्टीम अंमलात आणता येईल या संदर्भात अधिकाऱ्यांना पाठविले होते. त्यानंतर कर्नाटक पॅटर्नवर आपल्या राज्यामध्ये ही पध्दत लागू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. तो प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाने तो प्रस्ताव अमान्य केला. त्या विभागाने कळविले की, सार्वजनिक आरोग्य विभागाने एमपीएससीसोबत बसून रिक्रूटमेंट रुल्समध्ये बदल करणे आवश्यक आहे, त्याशिवाय प्रस्ताव मान्य होऊ शकत नाही. सध्या रिक्रूटमेंट रुल्समध्ये बदल करणे विचाराधीन आहे. यासाठी रिक्रूटमेंट रुल्समध्ये कोणकोणत्या अटी व शर्ती अंतर्भूत करावयाच्या ही बाब शासन तपासून घेत आहे.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ग्रामीण भागात एकही डॉक्टर जायला तयार नसतो. वर्ग-1 ची पदे एमपीएससी मार्फत भरली जातात. परंतु एमपीएससीचे अध्यक्ष डॉ. शशीकांत कर्णिक यांनी एमपीएससीमध्ये भ्रष्टाचार केला त्यामुळे डॉक्टर्ससह सर्व नेमणुका अडकून पडल्या आणि आज हे सर्व डॉक्टर्स आझाद मैदानावर धरणे धरुन बसलेले आहेत. परंतु त्यांना कोणताही मंत्री भेटायला जात नाही, त्यांचे म्हणणे कोणीच ऐकून घेत नाही. कर्नाटक पॅटर्नबाबत येथे उल्लेख झाला. अशा प्रकारे त्या त्या राज्यांनी अशा अडचणीतून मार्ग काढला. माननीय मंत्री महोदय म्हणतात की, सामान्य प्रशासन विभागाने प्रस्ताव नाकारला आणि एमपीएससी बरोबर चर्चा करावी लागेल. अशा प्रकारे किचकट प्रोसिजर निर्माण होत आहे. या सर्व गोष्टी होईपर्यंत या डॉक्टरांचे वय क्रॉस झालेले असेल. कारण आताच त्यांची वयोमर्यादा संपलेली आहे. म्हणून कालबध्द कार्यक्रम तयार करुन या प्रकरणी दोन महिन्यात शासनाने निर्णय घ्यावा व या डॉक्टरांना कामावर घ्यावे. असा प्रयत्न शासन करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे एवढे सोपे नाही. कारण मेडिकल ऑफिसर ही गॅझेटेड पोस्ट असल्यामुळे त्यांची रिक्रुटमेंट एमपीएससी मार्फतच होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काही वर्ग-3, नॉन गॅझेटेडची पदे सुध्दा एमपीएससीमार्फतच भरण्यात येतात. त्यामागे काही तरी कारण आहे. सन्माननीय सदस्य सांगतात त्यानुसार करावयाचे म्हटले तर प्रथम आपल्याला शेडयुलमधून ही पदे वगळावी लागतील व तसा प्रस्ताव माननीय राज्यपालांकडे पाठवावा लागतो व त्यांची मान्यता घ्यावी लागते. तसेच हे वगळण्याची कारणे द्यावी लागतात, जे ऑब्जेक्शन्स रेज केले त्यांचा तपशील द्यावा लागतो व त्यासंबंधी सभागृहात चर्चा सुध्दा करावी लागते. अशा सर्व गोष्टी सहज आणि सोप्या नाहीत, त्यासाठी वेळ लागणारच आहे. तसेच सन्माननीय सदस्य म्हणाले की, आझाद मैदानावर धरणे धरुन बसलेल्या डॉक्टरांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. अशी परिस्थिती नाही तर या डॉक्टरांशी आमची बोलणी चालू आहे, असे देखील या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

श्रीमती उषा दराडे : महोदय, हिवाळी अधिवेशनात यासंदर्भात जे उत्तर मंत्री महोदयांनी दिले होते तेच उत्तर आताही दिले जात आहे. यासंदर्भात आपण रिक्रुटमेंट रुल्स करणार असे सांगण्यात आले परंतु सध्याच्या परिस्थितीत या लोकांची दहा-बारा वर्षे टेम्पररी सेवा झालेली आहे

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ........

व त्यामध्ये त्यांचे वय निघून गेलेले आहे. म्हणून रिक्रुटमेंट रुल्स तयार करतांना या डॉक्टर्सना रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टने फायदा होईल अशी तरतूद या रिक्रुटमेंट रुल्समध्ये केली जाणार काय ? तसेच मागील हिवाळी अधिवेशनातच रिक्रुटमेंट रुल्स तयार करण्यासंबंधीचे आश्वासन दिले होते ते अद्यापही तयार झालेले नाहीत. ते रुल्स शासन किती दिवसात तयार करणार आहे ? अन्यथा त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होणार आहे. म्हणून शासन या सर्व गोष्टींचा विचार करुन हे रुल्स ताबडतोब तयार करुन योग्य तो निर्णय घेणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी आताच दिलेले आहे. तसेच आपण टाईम बाऊंड प्रोग्रॅम तयार करण्याबाबत सूचना केली त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, अशा प्रकारे टाईम बाऊंड प्रोग्रॅम करणे शक्य नाही. सन्माननीय सदस्यांनी या लोकांची वयोमर्यादा संपल्याचा उल्लेख केला त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, रिक्रुटमेंट रुल्स मध्ये बदल करीत असताना त्यांच्या अनुभवाचा विचारही करण्यात येणार त्यामुळे हा प्रश्न शिल्लक राहणार नाही. तसेच नियुक्तीसंबंधीच्या नियमांमध्ये आपण ऑलरेडी वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत ठेवलेलीच आहे त्यामुळे वयाचाही प्रश्न येणार नाही. तसेच येथे वारंवार सांगण्यात येते की, या डॉक्टरांची 10-12 वर्षे सेवा झालेली आहे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, राज्यातील एकूण 2150 डॉक्टर्सपैकी फक्त 180 डॉक्टर्स असे आहेत की, ज्यांची 10-12 वर्षे सेवा झालेली आहे. यासंबंधी आम्ही एमपीएससीकडे प्रस्ताव पाठविला होता व त्यांना अशी सूचना केली की, ज्या डॉक्टरांची सेवा 10-12 वर्षे झालेली आहे त्यांना लेखी परीक्षेपेक्षा अनुभवावर जास्त भर द्यावा तसेच प्रत्यक्ष नेमणुकीच्या वेळी सुध्दा त्यांच्या अनुभवावरच भर देण्यात येणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ...

अनुभवाचा क्रायटेरिया ठरवल्यामुळे या सगळयांचा त्यामध्ये ॲटोमॅटीक समावेश होऊ शकेल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कर्नाटक राज्यामध्ये सुध्दा अशाच प्रकारचा प्रश्न उपस्थित झालेला होता. परंतु कर्नाटक सरकारमध्ये इच्छाशकती असल्यामुळे त्यांनी स्पेशल रिक्रुटमेंट कमिटी करुन 15 मार्काची ओरल एक्झाम घेऊन या प्रश्नाला न्याय दिलेला आहे. त्यांनी म्हटले आहे की, "The Special Recruitment Committee shall take Viva of not exceeding 15 marks for the Candidates in the Selection process and shall publish marks secured by such candidates on the Notice Board on the same day of the Viva." आणि या सगळयांना रेग्युलर कलेले आहे. कर्नाटक सरकारमध्ये जी इच्छाशकती आहे ती इच्छाशकती तुमच्यात नाही. त्याच प्रकारे महाराष्ट्र शासन स्पेशल रिक्रुटमेंट कमिटी स्थापन करुन या प्रश्नाला न्याय मिळवून देणार आहे काय? ज्यांची सेवा 3 वर्षाची झालेली आहे त्यांच्याबाबत आम्ही बोलत नाही परंतु ज्यांनी 5-5,10-10 वर्षे सेवा दिलेली आहे अशा वैद्यकीय अधिका-यांच्या बाबतीत मी बोलत आहे त्यामुळे अशा वैद्यकीय अधिका-यांना आपण नियमीत कराल काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर अगोदरच दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जी बाब निदर्शनास आणलेली आहे ती शासनाच्या विचाराधीन आहे. परंतु मी हे सांगू इच्छितो की, ही बाब एमपीएससीच्या परव्हयूच्या बाहेर आहे. शेडयूल्ड लिस्ट प्रमाणे आपल्याला काम करावे लागणार आहे. यासंदर्भात एक जरी व्यक्ती न्यायालयात गेली आणि स्टे मिळवला तर त्याचे परिणाम सर्वांना भोगावे लागतील. वैद्यकीय अधिका-यांच्या संदर्भात शासनाला सुध्दा काळजी आहे. जर ही पदे आपल्याला एमपीएससीच्या परव्हयूमधून काढावयाची असेल तर तसा प्रस्ताव करावा लागतो व तो प्रस्ताव माननीय राज्यपालांच्या मंजूरीसाठी पाठवावा लागतो. त्यांची मंजूरी मिळाल्यानंतरच आपल्याला तसे करता येते. आपण अशा प्रकारचे मुद्दे सभागृहात वारंवार उपस्थित करता व आम्ही त्यामुद्यांना वारंवार उत्तरे देतो. वैद्यकीय अधिका-यांची आपल्याला जेवढी काळजी आहे त्यापेक्षा आम्हाला वैद्यकीय अधिका-यांची जास्त काळजी आहे. वैद्यकीय अधिका-यांच्या संदर्भात आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांना वैद्यकीय अधिका-यांच्या संदर्भात जेवढी काळजी आहे त्यापेक्षा शासनाला अधिक काळजी आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : एमपीएससीच्या परव्हयूमधून काढू असे आपण म्हटले होते.

. डॉ. दीपक सावंत : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात न्याय मिळालेला नाही. माननीय सभापती महोदयांच्या दालनात जेव्हा बैठक झाली होती त्यावेळेस सुध्दा असेच सांगण्यात आले होते. आता या गोष्टीला एक वर्ष झालेले आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, डॉक्टरांची कमतरता आहे याची आम्हाला चांगली माहिती आहे. वैद्यकीय डॉक्टरांच्या संदर्भात आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत.परंतु आता जे नियमात बसत नाही ते जर आम्ही केले तर उद्या कोर्टात कोणीही जाऊ शकते.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सकारात्मक उत्तर दिलेले आहे. एमपीएससीच्या परव्हयूच्या बाहेर काढू असे त्यांनी सांगितले या लक्षवेधी सूचनेला न्याय देण्यात आलेला आहे. या लक्षवेधी सूचनेवर बराच वेळ खर्च झालेला आहे त्यामुळे मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारीत आहे.

डॉ. दीपक सावंत : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात न्याय मिळालेला नाही.

-----------

....3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : डेक्कन ओडीसी ही डिलक्स गाडी आर्थिक तोटयात येणे
**मु. शी.** : डेक्कन ओडीसी ही डिलक्स गाडी आर्थिक तोटयात येणे यासंबंधी सर्वश्री सुरेशदादा देशमुख, संजय दत्त, गोविंदराव आदिक, प्रतापसिंह मोहिते-पाटील, सय्यद जामा, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि भारतीय रेल्वेच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दर्जाची सुविधा असलेली डिलक्स ट्रेन डेक्कन ओडिसी गाडी आठवडयातून एकदा चालविण्याचा निर्णय एम.टी.डी.सी. ने घेणे, मात्र मागील चार वर्षात या गाडीच्या केवळ ८७ फेऱ्या होणे आणि त्या फेऱ्या फायदेशीर न ठरणे, परिणामी प्रत्येक वर्षी २५ लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागत असल्याची बाब दिनांक २५.०३.२००८ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, परिणामी या उपक्रमास गेल्या चार वर्षात १ कोटी रुपयांचा तोटा होणे, परदेशी पर्यटकांना आकर्षित करणारी ही गाडी आर्थिक तोटयात जात असल्याने त्याबाबत कोणत्या सुधारणा करण्याची गरज आहे, याबाबत सर्व समावेशक अभ्यास करुन त्याअनुषंगाने शासनाने गांभीर्याने करावयाची कारवाई आणि त्यावर शासनाची तातडीची प्रतिक्रिया. "

श्री. सुरेश शेट्टी ( पर्यटन राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त :सभापती महोदय, पर्यटनाचा अतिशय महत्वाचा विषय या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने उपस्थित करण्यात आलेला असून या ठिकाणी मला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. या विषयाच्या बाबतीत संबंधित खात्याचे मंत्री पुढाकार घेतात याची मला कल्पना आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मी दोन तीन प्रश्न उपस्थित करणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि भारतीय रेल्वेच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दर्जाची सुविधा असलेली डिलक्स ट्रेन डेक्कन ओडिसी गाडी सुरु करण्यात आलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, डेक्कन ओडीसी या ट्रेनची कॅपेसीटी किती प्रवाशांची आहे व गेल्या चार वर्षात प्रत्येक फेरीमध्ये किती पॅसेंजर नेण्यात आले, तसेच नुकसान झाले आहे काय असल्यास किती रुपयांचे नुकसान झाले आहे.?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 16.35

श्री.संजय दत्त..

यानंतर मला दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, गोवा, सिक्कीम, ओरिसा या सारखी जी लहान राज्ये आहेत ती राज्ये टुरिझमचे मार्केटीग करतात. महाराष्ट्र राज्यामध्ये टुरिझमचा जो पोटॅशिंअल आहे तो साध्य करण्यासाठी टुरिझमचे मार्केटीग करण्याच्या बाबतीत किंवा काही व्हिजन ठरविण्याच्या बाबतीत किंवा टुरिझमच्या संदर्भात परस्पेक्टीव्ह प्लॅन तयार करण्याच्या संदर्भात प्रत्यक्षात काय कार्यवाही केली गेली आहे आणि प्रॅक्टीकलमध्ये नक्की काय स्थिती आहे या सबंधी माननीय मंत्री मत्रीमहोदय सांगू शकतील काय ?

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्यांनी दोनच प्रश्न विचारावेत.

श्री.संजय दत्त : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी आपण प्रश्न विचारत असता त्यावेळी मी शांत बसून आपल्याला सहकार्य करीत असतो.सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना पुन्हा प्रश्न विचारतो. त्यांनी माझ्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे.मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की,डेक्कन ओडिसी गाडी सुरु करण्यात आलेली आहे.तेव्हा त्या गाडीच्या प्रत्येक फेरीची प्रवासी क्षमता किती आहे, त्याच प्रमाणे पॅसेंजरच्या संदर्भात आणि कॉस्टच्या संदर्भात आपण किती पोटॅशिंअल साध्य केलेले आहे,तसेच चार वर्षात किती नुकसान झालेले आहे.? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गोवा, केरळ, सिक्कीम यासारखे जी लहान लहान राज्ये आहेत त्यां ठिकाणी टुरिझमचे मार्केटीग केले जाते. महाराष्ट्रामध्ये त्यापेक्षा किती तरी पट टुरिझमचे पोटॅशिंअल आहे .तेव्हा या संदर्भात राज्य शासनाचा परस्पेक्टीव्ह प्लॅनच्या बाबतीत तसेच मार्केटीगच्या बाबतीत काय फिडबॅक आहे? या बाबतीत राज्य शासनाला काय अनुभव आलेला आहे ? या संदर्भातील प्लॅन करण्यासाठी सभागृहातील सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेण्यात येईल काय ?

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सजय दत्त यांनी डेक्कन ओडिसीसबंधी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न असा होता की, डेक्कन ओडिसी या गाडीतून किती प्रवाशांनी प्रवास केला आणि त्यातून किती फायदा झाला वा तोटा झाला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की 2004 साली ही ट्रेन सुरु करण्यात आली होती. त्या अगोदर टाटा कन्सलटन्सीकडून या गाडीचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यात आला होता. त्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये असे म्हटले होते की, कमीत कमी चार ते पाच वर्षे ब्रेक इव्हन साठी लागतील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे

श्री.सुरेश शेट्टी ....

राजस्थान सरकार आणि इंडियन रेल्वे या दोघांनी मिळून " पॅलेस ऑन व्हील " ही ट्रेन सुरु केली होती त्या ट्रेनच्या अनुभवाच्या आधारावर टाटा कन्सलटन्सीने हा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला होता. हिंदुस्थानात असो वा इतर कोणताही देश असो. त्या ठिकाणी लक्झरी ट्रेन सुरु केल्यानंतर किमान चार ते पाच वर्षे ब्रेक इव्हनसाठी लागतात. ही ऑर्डिनरी लक्झरी ट्रेन नसून सुपर लक्झरी ट्रेन आहे. 2004 साली प्रवासाचा हंगाम संपत असतांना ही ट्रेन सुरु केली होती. 2004-2005 साली या ट्रेनने 25 ट्रीप्स केल्या होत्या 406 प्रवाशांनी या ट्रेनमधून प्रवास केला होता.

श्री.संजय दत्त : प्रत्येक फेरीची कॅपेसिटी किती होती ?

श्री.सुरेश शेट्टी : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अजून माझे उत्तर संपलेले नाही आपल्या प्रश्नाला मी उत्तर देणारच आहे. 2005-206 मध्ये या ट्रेनच्या 25 ट्रीप्स झाल्या होत्या आणि 612 प्रवाशांनी प्रवास केला होता, 2006-2007 मध्ये सुध्दा 25 ट्रीप्स झाल्या होत्या आणि 813 प्रवाशांनी प्रवास केला होता. 2007-2008 मध्ये 28 ट्रीप्स झाल्या होत्या आणि 1069 प्रवाशांनी प्रवास केला होता. या ट्रेनची क्षमता 80 प्रवाशांची आहे. तीन वर्षे आपल्याला तोटा झाला होता. चार पाच वर्षा नतर ब्रेक इव्हन करु अशा प्रकारे आपण या ट्रेनचा प्रोजेक्ट बनवला होता परंतु मला आता सांगण्यास आनंद वाटतो की, 2007-2008 मध्ये आपण प्रॉफिटमध्ये आहोत. पहिली तीन वर्षे आपण लॉसमध्ये होतो. संपूर्ण देशातील ही पहिली लक्झरी ट्रेन अशी आहे की चौथ्या वर्षात ती प्रॉफिटमध्ये गेली आहे. या वर्षी डेप्रिसिएशनसहीत 3 लाख रुपयांचा प्रॉफिट
झालेला आहे. तो भाग बाजूला काढला तर अधिक प्रॉफिट होईल. ही ट्रेन सुपर लक्झरी आहे. सध्या ही ट्रेन पूर्णपणे चार्टरड झालेली असून ती आता आग्रा येथे गेलेली आहे. या ट्रेनच्या चार्टरींगलासुध्दा सुरुवात झालेली आहे..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 16:40

श्री. सुरेश शेट्टी .....

या ट्रेनच्या मार्केटिंगसाठी जे आपण प्रयत्न केले आहेत त्यामुळे युरोप, ईस्ट एशिया, अमेरिकेमध्ये देखील आपल्याला जास्तीत जास्त प्रमोशन या ट्रेनचे मिळते आहे. आज देशात इतर राज्यांनी यम्हणजे जयपूरमध्ये, कर्नाटकामध्ये देखील अशा प्रकारे एक ट्रेन इंट्रोड्यूस केलेली आहे, म्हणजेच एक प्रकारे स्पर्धा वाढते आहे. पण तरीही महाराष्ट्रातील या डेक्कन ओडिसी ट्रेनचे आजवर 800 चे बुकींग झालेले आहे. तसेच या पुढील वर्षात याची प्रसिद्धी आणि प्रमोशन चांगले झालेले असल्याने आपण पूर्णपणे फायद्यात येणार आहोत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्याच्या उत्तराची व्याप्ती तशी मोठी आहे, त्यामुळे मी त्याबाबत सविस्तर माहिती येथे देऊ लागलो तर त्यासाठी मला दोन तास लागतील....

**उपसभापती** : मंत्री महोदयांनी येथे दोन तास उत्तर देण्याऐवजी आम्हा सर्वांना त्या ट्रेनमधून घेऊन जावे...

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी या विभागाचा मंत्री असूनही त्या ट्रेनमधून आजवर गेलो नाही. तर आपणा सर्वांना मी कसा काय घेऊन जाणार ?

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आता येथे पर्यटन विभागाच्या ाननीय राज्यमंत्र्यांनी डेक्कन ओडिसीच्या संदर्भात उत्तर दिले आहे. मी पर्यटन विभागाचे आणि खास करून महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन करतो की, या विभागाने, या शासनाने डेक्कन ओडिसी सारखी ट्रेन पर्यटन विभागाच्या माध्यमातून 2004 पासून सुरू केली आणि राज्यातील अजिंठा वगैरे सारखी जी पर्यटन स्थळे आहेत त्या व्यतिरिक्त कोकणामध्ये देखील या ट्रेनद्वारे चांगले काम केलेले आहे. एकूणच कोकणातील पर्यटनाचे जे पोटेन्शिअल आहे ते काढण्याचे काम या ट्रेनने केलेले आहे. त्यामुळेच मी या प्रसंगी महाराष्ट्र शासनाचे आणि पर्यटन विभागाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, मला या निमित्ताने असा प्रश्न विचारावयाचा आहे की, पर्यटन विभाग हा राज्यात अत्यंत दुर्लक्षित असा विभाग यापूर्वी होता. गेल्या 3-4 वर्षांचा काळ सोडला तर त्यापूर्वी या विभागावर कधीही 9-10 कोटी पेक्षा जास्त तरतूद अंदाजपत्रकामध्ये केली गेलेली नव्हती. मात्र गेल्या 2-3 वर्षात या विभागासाठी अर्थसंकल्पातून मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे. कारण आता या विभागाचे महत्त्व लोकांना आणि संपूर्ण देशालादेखील कळून चुकले आहे. म्हणून या पर्यटनाला केरळ सारखे छोटे राज्य, गोव्यासारखे छोटे राज्य इतकेच नव्हे तर सिक्कीम,

...... 3डी 2 ...

श्री.गुरूनाथ कुलकर्णी .....

राजस्थान सारखी राज्ये देखील मोठ्या प्रमाणात वाव देत आहेत, प्रमोशन करीत आहेत मात्र महाराष्ट्रात अत्यंत कमी तरतूद केली जात होती त्यामुळे पाहिजे तेवढे प्रमोशन्स होत नव्हते. त्यामुळे आता तरी हे प्रमोशन करण्याबाबत शासन गांभीर्याने विचार करणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सर्वप्रथम मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांचे आभार मानू इच्छितो. कारण त्यांनी येथे सांगितले आहे की, डेक्कन ओडिसीने कोकणातील पर्यटनात मोठी वाढ केलेली आहे. आता एकूणच प्रमोशन आणि प्रसिद्धीच्या संबंधात जो प्रश्न त्यांनी विचारलेला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, गेल्या 3 वर्षात पर्यटन विभागाने खूप काम केले आहे. आमच्या विभागाचे माननीय मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील आणि या अगोदरच्या केंद्रीय मंत्री श्रीमती रेणुका चौधरी असोत वा आताच्या केंद्रीय मंत्री श्रीमती अंबिका सोनी असोत त्यांनीदेखील केंद्र सरकारच्या वतीने आम्हाला खूप मदत केली आहे. गेल्या वर्षात 1200 कोटी रूपये केंद्र सरकारने यासाठी आपल्याला दिले होते. कारण आता केंद्र आणि राज्य सरकारला देखील माहिती झाले आहे की, पर्यटन हे असे क्षेत्र आहे की ज्यातून मोठ्या प्रमाणात एम्प्लॉयमेंट मिळू शकते, मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळेच केरळ वगैरे सारखी लहान लहान राज्ये, अगदी छत्तीसगड सारखे लहान राज्य देखील रोजगार निर्मितीच्यादृष्टीने पर्यटन विभागासाठी जास्तीत जास्त तरतूद करीत आहे. छत्तीसगड सारख्या लहान राज्याने 3600 कोटी रूपये पर्यटन विभागावर खर्च करीत आहे. ...

( यानंतर सौ. रणदिवे..... 3इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

केरळ राज्याचे बजेट सुध्दा कितीतरी जास्त आहे. गोवा हे लहान राज्य असून सुध्दा तेथे पर्यटनावर कितीतरी खर्च केला जातो. मी सांगू इच्छितो की, पर्यटन विभागाची काम करण्याची इच्छा आहे. गेल्या वर्षी पर्यटन विभागासाठी 12 कोटी रुपये देण्यात आले होते. त्यातून आम्ही इंटरनॅशनल लेव्हलवर पब्लीसिटी केली, तीन इंटरनॅशनल फेस्टीव्हलमध्ये भाग घेतला होता आणि तेथे महाराष्ट्र राज्याचा स्टॉल लावण्यात आला, प्रमोशन्स् केले. दुबईमध्ये रोड शो केला, लंडन मध्ये देखील रोड शो केला. त्यासाठी डेक्कन ओडिसीमधील जे ऑक्युपेन्सी रेट आहेत, ते वाढले आहेत. पण आम्ही फायनान्स विभागाकडे सतत मागणी पाठवित आहोत. परंतु जोपर्यंत फायनान्स विभागाला पर्यटनाचे महत्व समजणार नाही, तोपर्यंत सध्या जो निधी मिळत आहे, तो पुरेसा होईल असे आम्हाला वाटत नाही. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, आम्हाला या बजेटमधून जो निधी मिळालेला आहे, त्यातून काहीही होणार नाही. त्यामुळे आपण येथे जी काही भाषणे करणार आहोत, त्याचा काहीही फायदा होणार नाही. महाराष्ट्र राज्याचे प्लॅनिंग आणि फायनान्स विभाग पर्यटनाच्या बाबतीत सिरिअसली विचार करणार नाही, तोपर्यंत पर्यटन विभाग काहीही करु शकणार नाही.

-----

. . . .3 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये पदोन्नती संदर्भात होत असलेले गैरव्यवहार

मु. शी. : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये पदोन्नती संदर्भात होत असलेले गैरव्यवहार यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे,नितीन गडकरी,संजय केळकर, मधुकर चव्हाण,रामनाथ मोते वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये ठेकेदार पध्दतीने मोठया प्रमाणात कर्मचारी कार्यरत असणे, तसेच अधिकाऱ्यांच्या पदोन्नती संदर्भात गोपनीय पत्रव्यवहारात फेरफार करुन गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे, सदर महामंडळातील कर्मचाऱ्यांना शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता नसताना व शासकीय निकष डावलून तसेच महाराष्ट्र शासनाच्या सेवाशर्ती नियमांचे उल्लंघन करुन पदोन्नती देण्यात येणे,मंडळातील उप प्रादेशिक अधिकारी पदावर नियमबाह्यरित्या पदोन्नती देण्यात येणे, तसेच काही क्षेत्रीय अधिकाऱ्यांना तदर्थ पदोन्नती देऊन शासनाच्या नियमांचा भंग केला जाणे, अपंग उमेदवारांच्या नेमणुकांमध्ये देखील अनियमितता झाली असणे, या संदर्भात सदर महामंडळाच्या कर्मचारी संघटनेने सदर बाबी शासनाच्या निदर्शनास आणूनही कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये असंतोष निर्माण होणे, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

श्री.गणेश नाईक (पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .3 ई-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी फक्त स्पेसिफिक मुद्दे मांडणार आहे. एकतर 150 कर्मचाऱ्यांची भरती मागील दरवाजातून झालेली आहे. त्याला कोणतीही शासन मान्यता नसताना परस्पर आपल्या पध्दतीप्रमाणे, एखाद्या व्यक्तीच्या मनमानी कारभारामुळे अशा प्रकारे भरती करण्यात आली आहे. परंतु ही भरती नियमाप्रमाणे व्हावी यासाठी आवश्यक ती जाहिरात देऊन म्हणजे आता ज्यांची भरती केलेली आहे त्यांनी आणि जे नव्याने तेथे भरती होणार आहेत अशा लोकांनी रितसर अर्ज करुन त्यानुसार त्यांची भरती करणार आहात काय ? हा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, तसेच मी दुसऱ्या प्रश्नाच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना दोन अधिकाऱ्यांच्या बाबतीत माहिती देऊ इच्छितो. त्याठिकाणी श्री.बनाटे नावाचे अधिकारी आहेत. तसेच तेथील चीफ अकाऊंट ऑफीसर श्री.पांडे यांना पदोन्नती देऊ नये असे माननीय मंत्री आणि विभागाचे सचिव यांच्या सहीचे आदेश होते. अशा प्रकारचे आदेश हे पानाच्या शेवटी खालच्या बाजूला असतात. पण त्यावर कागद ठेऊन झेरॉक्स काढण्यात आली आणि नियंत्रण मंडळाच्या बैठकीमध्ये त्याचे वाटप करण्यात आले. ज्यावेळी ही बाब मंडळाच्या लक्षात आली, त्यावेळी मंडळाने संबंधितांना रिव्हर्ट करावे, याबाबतीत चौकशी करावी असे सांगितले. त्याप्रमाणे संबंधितांना रिव्हर्ट केले. माझ्याजवळ त्या संबंधातील पत्र आहे. मी ते सर्व कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांकडे देतो आणि त्यांनाही त्याची माहिती असेल. संबंधितांना रिव्हर्ट केल्यानंतर त्यांचा पुढील अडीच वर्षाचा कालावधी माफ करुन त्यांना लगेच प्रमोशन देखील देण्यात आले.मग आपण एखाद्या व्यक्तीला रिव्हर्ट कशासाठी करतो ? मग प्रमोशन कशासाठी दिले जाते? श्री.बनोटे यांना एवढया विशेष सोयी-सुविधा कशासाठी देण्यात आल्या आहेत ? असा प्रश्न आहे. तसेच एक केस अशा प्रकारची आहे की, श्री.कदम नावाचे अधिकारी हे हजेरीपटावर गैरहजर असल्याचे दिसत आहे.पगाराच्या बाबतीत टोटल करताना ते गैरहजर असल्याचे दाखविलेले आहे.माझ्याकडे कागदपत्रे आहेत आणि मी ती आपल्याकडे पाठवितो. नंतर श्री.बनाटे यांनी असे पत्र दिले आहे की, आता संबंधितांचे वेतन देण्यात यावे. माझा प्रश्न आहे की, अशा अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ? निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"प्रदूषण नियंत्रण महामंडळाला शासनाच्या अशा परवानगीची गरज नाही." म्हणजे आम्ही आमची मनमानी करु. आम्हाला बाकीच्या गोष्टींची गरज नाही. तसेच तेथी चीफ अकाऊंट ऑफीसर श्री.पांडे आहेत. त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे. अकाऊंटस् संबंधात काम करण्यासाठी सदरहू व्यक्तीचे बी.कॉम.पर्यंत शिक्षण झालेले असावे असा

. . . .3 ई-4



श्री.विनोद तावडे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम आहे. क्लार्क आणि त्यावरील पदांसाठी ग्रॅज्युएशनपर्यंत शिक्षण असले तरी चालेल. पण या स्पेसिफिक पदांसाठी म्हणजे हेड अकाऊंटन्ट आहे, असिस्टंट अकाऊंट ऑफीसर आहे, अकाऊंट ऑफीसर आहे, त्या व्यक्तीचे बी.कॉम.पर्यंत शिक्षण झालेले असले पाहिजे असा नियम आहे. पण चीफ अकाऊंट ऑफीसर या पदासाठी कोणीही चालेल. याचे कारण काय ? तर स्पेसिफिक अधिकाऱ्याला पूरक व्हावे अशा प्रकारचे तात्पुरते पत्रक काढून घेण्यात आले. अशा प्रकारे मनमानी सुरु आहे. त्या नुसार हे दोन अधिकारी मनमानी पध्दतीने पाहिजे त्यांचे प्रमोशन करतात, पाहिजे त्यांचे डिमोशन करतात. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, चार जणांना प्रमोशन देण्यात आले, परंतु त्यातील तीन पदांना मान्यताच मिळालेली नाही. तरी देखील प्रमोशन देण्यात आले आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत या स्पेसिफिक दोन अधिकाऱ्यांच्या भानगडी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणलेल्या आहेत.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ..

माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो प्रश्न विचारला आहे की,मंडळामध्ये 157 लोकांनी बॅक डोअर एन्ट्री केलेली आहे. शासनाच्या अखत्यारीत असलेल्या मंडळाची जी नियमावली ठरवलेली असते, ती नियमावली दूर करुन चुकीच्या पद्धतीने भरती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. वर्तमानपत्रामध्ये पदांकरिता जाहीरात देऊन, लेखी व तोंडी परीक्षा घेणे तसेच फिजिकल फिटनेसची तपासणी करुन पदे भरण्याची प्रचलित पद्धत आहे. तसेच यास दोन महिन्यामध्ये पदांना मान्यता मिळणे व जाहीरात देणे आवश्यक होते. परंतु या ठिकाणी बॅक डोअर एन्ट्री झालेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे असे सन्माननीय सदस्यंचे म्हणणे आहे. या घटकांना तातडीच्या कामासाठी घेतलेले आहे. हे कर्मचारी चार ते पाच वर्षाकरिता राहणार असतील तर त्यांना दिलेली मान्यता चुकीची आहे. या लोकांची सुद्धा लेखी व तोंडी परीक्षा घेतली पाहिजे. फिजिकल फिटनेसची तपासणी केली पाहिजे. जे घटक निकष पूर्ण करतील ते विभागात राहतील व जे घटक निकष पूर्ण करणार नाहीत, त्यांना खात्यामधून जावे लागेल. मंडळाकडून राज्य शासनास माहिती मिळालेली आहे. ती माहिती मी पडताळून पाहतो. तसेच ज्या घटकांनी नियमांचा भंग केलेला असल्याचे सिध्द झाल्यास त्यांच्यावर खातेनिहाय चौकशी करुन कारवाई केली जाईल. हजेरीपटावर गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांची बाब येथे निदर्शनास आणून दिलेली आहे. आपण ही बाब सांगितल्यामुळे,मी त्यास चॅलेंज करीत नाही.या बाबतीत पूर्ण चौकशी करुन ज्या गोष्टी कायद्याच्या कक्षेबाहेर झालेल्या असतील त्यांना ठरलेल्या मापदंडांना सामोरे जावे लागणार आहे.

सभापती महोदय, काही ठिकाणी काही सिनियर अधिकारी निवृत्त होत असतील किंवा काही कारणास्तव सेवेतून मुक्त होण्याची परवानगी मागत असतील म्हणजेच सीआरएस व व्हीआरएस . अशा वेळी त्या खात्यामध्ये त्या दर्जाचा अधिकारी नसल्यास त्या अधिकाऱ्याच्या सबऑर्डीनेटला पदाचा चार्ज दिला जातो त्याचा कालखंडा किती असावा याची मर्यादा आखून दिली जाईल. त्यामुळे या मंडळांमध्ये कायद्याने ठरविलेल्या कक्षेतच सर्व कामे होतील असे मी आपणाला विश्वासपूर्वक सांगतो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( विशेष उल्लेखाची सूचना )**

**पृ.शी** : ठाणे जिल्हयामध्ये शासनाची परवानगी न घेता वीजनिर्मिती प्रकल्पाचे सुरु असलेले बांधकाम.

**मु.शी** : ठाणे जिल्हयामध्ये शासनाची परवानगी न घेता वीजनिर्मिती प्रकल्पाचे सुरु असलेले बांधकाम या बाबत संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमताने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुरबाड जि. ठाणे तालुक्यातील मौजे धानिवली येथे 15 मेगावॅट ( कोलेबस ) वीजनिर्मिती प्रकल्प केंद्राचे बांधकाम आवश्यक त्या सरकारी परवानग्या उदा. पर्यावरण, वन खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र न घेताच तसेच ग्रामस्थांना ग्रामपंचायतीने विश्वासात न घेताच प्रकल्पाची जमीन बिगरशेती न करताच सुरु केलेले आहे, त्यास नियोजन प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या ग्रामस्थांनी ठाम विरोध केला आहे व संबंधित कंपनीने अनधिकृत बांधकाम न थांबविल्यास ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा देणे, परिसरातील 12 गावातील ग्रामस्थांची नाराजी लक्षात घेता, शासनाने सदरचे अनधिकृत बांधकाम तात्काळ थांबवावे म्हणून सदर बाब मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडू इच्छितो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉइंट ऑफ इंन्फॉर्मेशन बाबत

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये विशेषत: प्रश्नोत्तराचा तास व लक्षवेधी सूचनेच्या तासाच्या वेळी दूरदर्शनचे प्रतिनिधी व काही वाहिन्यांचे प्रतिनिधी उपस्थित असतात. ते प्रतिनिधी नेमक्या कोणत्या वाहिनीचे असतात हे मला आता सांगता येणार नाही. परंतु आज प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी व लक्षवेधी सूचनेच्या वेळी देखील हे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. याबाबत सभागृहामध्ये माहिती नाही. आपल्याला याबाबत काही माहिती असल्यास आपण ही माहिती कृपया आम्हाला द्यावी.

**उपसभापती** : या बाबत चौकशी करुन मी ही माहिती सभागृहाला अवगत करतो.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकात मुस्लीम समाजाचे दारुण चित्र रंगवून ते कुमारवयीन मुलांच्या मनावर बिंबविण्यात येणे

**मु. शी.** : एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकात मुस्लीम समाजाचे दारुण चित्र रंगवून ते कुमारवयीन मुलांच्या मनावर बिंबविण्यात येणे याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य डॉ. दीपक सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकात बड्या प्रकल्पांमुळे आदिवासी कसे विस्थापित होत आहेत व स्वतंत्र भारताच्या अर्धशतकी प्रवासात मुस्लीम समाज कसा विस्थापित व उपेक्षित राहिला हे सांगणारा धडा एनसीईआरटीच्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे. मुस्लीम समाजाचे दारुण चित्रण सदर धड्यात रंगविण्यात आले असून कुमारवयीन मुलांच्या मनावर ते बिबविण्यात येणे, राजकीय पक्षाच्या वागण्यात एकच समाज कसा विकासापासून व मुख्य प्रवासापासून वंचित राहतो हेही दाखविण्यात आले आहे. एनसीईआरटीच्या पुस्तकात कुमारवयीन मुलांवर चांगले संस्कार करण्याची गरज असताना राजकीय धड्याचा समावेश केल्याने, नको ते विषयही समाविष्ट केल्याने या विषयाबाबत शासनाने निवेदन करावे, ही विनंती."

सभापती महोदय, एनसीईआरटीचा जो अभ्यासक्रम असतो त्या विषयावर मी आजचा विशेष उल्लेख करीत आहे. एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकामध्ये दोनतीन गोष्टी सांगण्यात आलेल्या आहेत. एकतर बड्या प्रकल्पांमुळे आदिवासी कसे विस्थापित झाले या विषयावर एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकात उल्लेख केलेला आहे. तसेच स्वतंत्र भारताच्या अर्धशतकी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/ KTG/ KGS/

डॉ. दीपक सावंत .....

प्रवासात मुस्लीम समाज कसा विस्थापित राहिलला आहे, कसा उपेक्षित राहिला आहे याचा धडाही एनसीईआरटीच्या पुस्तकात आहे. मुस्लीम समाजाचे दारुण चित्र या धड्यामध्ये रंगविण्यात आलेले आहे. कुमारवयीन मुलांच्या मनावर चांगल्या गोष्टी बिबवणे आवश्यक आहे. याहीपेक्षा भयानक सत्य मी आपल्यासमोर मांडू इच्छितो. गोवा राज्याला एनसीईआरटीचे जे पुस्तक लागू केलेले आहे त्या पुस्तकामध्ये इतिहासाचे विकृतीकरण केलेले आहे. त्यामध्ये अनेक मराठी चुका आहेत. त्या पुस्तकामध्ये गांधीजींचा उल्लेख देखील एकेरी केलेला आहे. त्यामध्ये 'गांधीचे', 'गांधीला', 'गांधीने' असा एकेरी उल्लेख केलेला आहे.

दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, जसे मुस्लीम समाजाच्या बाबतीत सांगितले आहे तसेच हिंदू देवदेवतांच्या ज्या तसबिरी आहेत त्या विकृतपणे मांडलेल्या आहेत. त्यामध्ये श्री. विष्णू भगवान यांना साबणाची जाहिरात करताना दाखवले आहे. सनलाईट साबणाच्या जाहिरातीमध्ये श्री. विष्णू भगवान सनलाईट साबण घेऊन येत आहेत असे दाखवले आहे. त्याचप्रमाणे भारतीय कापड गिरण्यांमध्ये तयार झालेल्या कापडाच्या लेबलमध्ये देव भक्तांना कापड देत आहे अशी जाहिरात दाखवलेली आहे. एनसीईआरटीची जी पुस्तके आहेत त्यामध्ये अशा प्रकारच्या गोष्टी दाखवलेल्या आहेत. त्यामुळे मुलांवर चांगले संस्कार होण्याऐवजी वाईट संस्कार होतील. राजकीय धड्यांचा अशा प्रकारे समावेश केल्यामुळे आणि नको त्या विषयांचा समावेश केल्यामुळे याबाबतीत शासनाने तातडीने निवेदन करावे यासाठी हा विषय मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/ KTG/ KGS/

**पृ. शी.** : बीड येथील खिदमत इनाम दर्गा येथे नमाज पढण्यासाठी जागा अपुरी पडणे

**मु. शी.** : बीड येथील खिदमत इनाम दर्गा येथे नमाज पढण्यासाठी जागा अपुरी पडणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"बीड, ता. बीड, जि. बीड येथील सर्व्हे नं. 115, क्षेत्र 28 एकर 36 गुंठे ही जमीन खिदमत इनाम जमीन दर्गा हाजी हुश्मुज शाह बीडचे सेवेकरिता असून वक्फ मिळकत म्हणून याची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्रात अनुक्रमांक 15 पार्ट सी मध्ये असणे, पैकी 21 एकर 36 गुंठे जमीन वक्फ बोर्डाच्या ताब्यात असणे, 7 एकर जमीन अनधिकृत इतरांच्या ताब्यात असणे, 21 एकर 36 गुंठे जमिनीमधून इदगाहसाठी जमीन द्यावी अशी विनंती अल्पसंख्यांक समाजामार्फत वारंवार करण्यात येणे, याबाबत माजी आमदार सय्यद सलीम, राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष नवीदुजमा, मुकर्रम पठान यांनी वारंवार जिल्हा प्रशासनास निवेदन केले, सध्याचा दर्गा फार जुना असून ईदचा नमाज पढण्यासाठी जागा अपुरी असणे, या जुन्या दर्ग्याच्या ठिकाणी पार्कीन्गला जागा नसून जाण्यायेण्याचा मार्ग अरुंद रस्त्याने असणे, सर्व्हे नंबर 115 तरफ पिंगळेमध्ये दर्गा होईल एवढी जागा असणे, ही जागा बीड तेलगाव हायवे जवळ असणे, गावाजवळ असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, या सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर शासनाने करावयाची तातडीची उपायोजना याबाबत मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिल्हा परिषद जालना येथील अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना डिम्ड ट्रेन्ड समजून शासनाच्या निर्देशानुसार वेतन निश्चितीची कार्यवाही करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : जिल्हा परिषद जालना येथील अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना डिम्ड ट्रेन्ड समजून शासनाच्या निर्देशानुसार वेतन निश्चितीची कार्यवाही करण्याची आवश्यकता याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" जिल्हा परिषद, जालना या जिल्ह्यातील अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षक ज्यांची नेमणूक 1.7.1972 पूर्वी झाली होती अशा सेवानिवृत्त शिक्षकांना डिम्ड ट्रेन्ड समजून वेतननिश्चिती व वेतनश्रेणी बाबत शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही होणेबाबत."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

ज्यावेळी प्रशिक्षित शिक्षक मिळत नव्हते त्यावेळी राज्याच्या तत्कालीन धोरणानुसार अनेक जिल्हा परिषदांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक नेमण्यात आले. हे शिक्षक प्राथमिक शिक्षक म्हणून काम करीत होते. या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन मिळावे म्हणून दिनांक 1.7.1972 पूर्वी ज्या शिक्षकांच्या नेमणुका झालेल्या आहेत अशा सर्व अप्रशिक्षित शिक्षकांना शासनाने प्रशिक्षित डीम्ड ट्रेंड शिक्षक म्हणून त्यांना निवृत्तीवेतन देण्याचा निर्णय झालेला आहे. परंतु जालना जिल्हयामध्ये अनेक डीम्ड ट्रेंड शिक्षक दिनांक 1.7.1972 पूर्वी लागले आहेत. तथापि, दिनांक 12.1.2006 रोजी ग्रामविकास विभागाने एक आदेश काढून या सर्व शिक्षकांची वेतनश्रेणी निश्चित करण्यासाठी, वेतन निश्चित करण्यासंबंधी निदेश देऊनही या डीम्ड ट्रेंड शिक्षकांचे वेतन निश्चित झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनासंबंधी अडचण निर्माण झालेली आहे. मी या विशेष उल्लेख सूचनेद्वारे विनंती करतो की, डीम्ड ट्रेंड शिक्षकांचे वेतन निश्चितीच्या प्रकरणात शासनाने तातडीने लक्ष घालावे.

----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : श्री.तुळशीदास नारायण दांडेकर, यांची जुहू, मुंबई येथील राहत्या घराची जागा बळकावण्याचा प्रयत्न होणे

**मु. शी.** : श्री.तुळशीदास नारायण दांडेकर, यांची जुहू, मुंबई येथील राहत्या घराची जागा बळकावण्याचा प्रयत्न होणे याबाबत श्री.विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

श्री.तुळशीदास नारायण दांडेकर, वय वर्षे 55 हे गेली 70 वर्षे आपल्या वडिलांसह दांडेकर मच्छिवाली चाळ, जुहू हॉटेलसमोर, जुहू तारा रोड, जुहू, मुंबई-400049 याठिकाणी रहात होते. सदर चाळ ही श्री.तुळशी राजश्री मिस्त्री व चापशी राजश्री मिस्त्री यांचे मालकीची आहे. जागेचा सिटी सर्व्हे क्र.864 आहे. सदरची जागा ही या भागातील गुंड श्री.धरमसिंग चौधरी व इतर लोकांनी जबरदस्तीने बळकावण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात सी.आर.क्र.68/2006 व एफआयआर क्र.219/2006, जुहू पोलीस स्टेशन व आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडे नोंदविण्यात आले होते व याबाबत चौकशी करण्यात आली होती. श्री.धरमसिंग चौधरी व त्यांचे साथीदार यांनी श्री.दांडेकर यांचे आज अस्तित्वात असलेले घर तोडून टाकण्याचा प्रयत्न केला तसेच घरातील सामान रस्त्यावर फेकून दिले व सदर घराची जागा रिकामी करण्यासाठी धमकावणी दिली. श्री.दांडेकर सदर जागेवर गेल्या 70 वर्षांपासून रहात आहेत व त्यांचेकडे त्यासंदर्भातील पुरावे (शिधापत्रिका, निवडणूक परिचय पत्र, भाडे पावती) आहेत. 20 मार्च, 2008 रोजी श्री.दांडेकर यांनी अदखलपात्र गुन्हा नोंद 543/08, जुहू पोलीस ठाणे येथे श्री.धरमसिंग चौधरी यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. तरी आजपर्यंत सदर विषयात संबंधित पोलीस ठाणे

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

यांनी कोणतीही कारवाई केली नाही. तसेच तक्रार दाखल करुन घेताना श्री.दांडेकर यांच्यावर दबाव आणून योग्य तक्रार करण्यास परावृत्त केले. अशाच प्रकारे मुंबईतील अनेक भूखंडावर गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी सामान्य लोकांना धमकावून त्यांची घरे रिकामी करुन भूखंड ताब्यात घेण्याचे प्रकार सुरु केले आहेत. मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करतो की, श्री.दांडेकर हे ज्येष्ठ नागरिक आहेत. तरी त्यांच्या जीविताला असलेला धोका लक्षात घेता संबंधित गुंडांवर शासनाने त्वरित कारवाई करुन श्री.दांडेकर यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी मी या माध्यमातून करीत आहे.

-------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ KTG

**पृ. शी.** : टाटा स्काय व डिश टी.व्ही.द्वारे मराठी वाहिन्यांचे प्रक्षेपण न दाखविणे

**मु. शी.** : टाटा स्काय व डिश टी.व्ही.द्वारे मराठी वाहिन्यांचे प्रक्षेपण न दाखविणे याबाबत श्री.अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.अरविंद सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, मराठी भाषेवर व मराठी चॅनेलवर होणा-या अन्यायाचा उल्लेख मी करीत आहे.

केबल चालकांच्या मनमानीला व अत्यंत खराब प्रक्षेपणाला कंटाळून ग्राहक टाटा स्काय व डिश टीव्हीकडे वळले. परंतु टाटा स्काय व डिश टीव्हीच्या मनमानी कारभारामुळे व अन्य प्रादेशिक भाषामधील जितक्या वाहिन्या दाखविण्यात येतात त्या तुलनेत मराठी वाहिन्यांची संख्या अत्यल्प आहे. गेल्या काही महिन्यात ज्या नव्या मराठी वाहिन्या सुरु झाल्या आहेत त्या टाटा स्कायच्या डिश टीव्हीवर दाखविल्या जात नाहीत अशी हजारो मराठी ग्राहकांची तक्रार आहे. महाराष्ट्रात मराठीचा द्वेष हे त्यामागे एक प्रमुख कारण असून टाटा स्कायवर तामिळी, तेलगू, कन्नड, बंगाली आदि कार्यक्रम दाखविले जातात. टाटा स्काय व डिश टीव्हीच्या प्रसारणात मराठी कार्यक्रम का दाखविण्यात येत नाहीत याची चौकशी करुन त्याबाबत शासनाने तसे तात्काळ निवेदन करावे.

केबल चालकांची मनमानी आणि खराब प्रक्षेपणामुळे अनेक ग्राहक गेल्याकाही महिन्यात टाटा स्काय आणि डिश टीव्हीकडे वळले. डीव्हीडी पिक्चर क्वॉलिटी आणि तांत्रिकदृष्टया सुरेख प्रसारण हे या दोन्हींचे वैशिष्टय आहे. मात्र गेल्या काही महिन्यात ज्या नव्या मराठी वाहिन्या सुरु झाल्या आहेत, त्या अद्यापही टाटा स्काय आणि डिश टीव्हीवर पहायला मिळत नाही. झी टीव्हीच्या

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ KTG

श्री.अरविंद सावंत.....

डिश टीव्हीवर त्यांच्या स्वत:च्या झी मराठी, झी टॉकीज आणि झी 24 तास या वाहिन्यांसह सहयाद्री, मी मराठी व ई टीव्ही मराठी या मराठी वाहिन्या पाहायला मिळतात. मात्र स्टार माझा आणि दोन दिवसांपासून सुरु झालेली आयबीएन-लोकमत या वाहिन्या पहायला मिळत नाहीत. तर टाटा स्कायवर सहयाद्री, मी मराठी, ईटीव्ही मराठी, झी मराठी आणि स्टार माझा या वाहिन्या पहायला मिळतात. झीच्या झी टॉकीज, झी 24 तास आणि आयबीएन-लोकमत टाटाच्या ग्राहकांना पहायला मिळत नाही. या दोन्ही कंपन्यांची अन्य कंपन्यांशी व्यावसायिक स्पर्धा असल्यामुळेच त्या एकमेकांच्या वाहिन्या दाखवित नसल्याचे सांगण्यात येत असले तरी त्यामागे मराठी द्वेष हेच मुख्य कारण असल्याचे सांगण्यात येते, कारण तसे नसते तर केवळ मराठी वाहिन्यांबाबतच अशी दुटप्पी भूमिका का घेण्यात येत आहे ? असा सवाल मराठी ग्राहकांकडून विचारण्यात येत आहे. टाटा स्कायवर तामिळ, तेलगु, मराठी, कन्नड, बंगाली, मल्याळम, गुजराती, पंजाबी, ओरिया आदी प्रादेशिक भाषांमधील वाहिन्या दाखविण्यात येतात. यात तामिळ भाषेतील नऊ, तेलगुच्या सात, कन्नड भाषेतील सात, बंगालीतील पाच, मल्याळम भाषेतील आठ वाहिन्या दाखविण्यात येत आहेत. ज्यांच्याकडे अद्यापही केबलची जोडणी आहे त्यांना मात्र मराठीमध्ये सुरु असलेल्या सर्वच्या सर्व वाहिन्या पहायला मिळत आहेत. मराठीतही सध्या एकूण आठ वाहिन्या सुरु असून लवकरच आणखी दोन ते चार वाहिन्या सुरु होणार आहेत. टाटा स्काय आणि डिश टीव्हीचा मराठी द्वेष असाच सुरु राहिला तर त्यांच्या हजारो ग्राहकांना सध्या सुरु असलेल्या काही आणि भविष्यात सुरु होणा-या मराठी वाहिन्यांपासून वंचित रहावे लागणार आहे. याबाबत शासनाने सत्वर योग्य ती कारवाई करावी अशी विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी अतिशय महत्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी मागील अधिवेशनात सुध्दा हा विषय उपस्थित केला होता.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखातील विषयाची गंभीरपणे दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी.

प्रा.वसंत पुरके : होय.

--------

नंतर श्री.शिगम

अस्धारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:05

**पृ. शी.** : ग्रंथपालांना निर्वाह योग्य वेतनश्रेणी देण्याची केलेली मागणी

**मु. शी.** : ग्रंथपालांना निर्वाह योग्य वेतनश्रेणी देण्याची केलेली मागणी.. याबाबत श्री. संजय दत्त वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

राज्यातील "अ" वर्गाची 238 "ब" वर्गाची 1,288, "क" वर्गाची 2,540 आणि "ड" वर्गाची 4,188 अशी विविध वर्गातील सार्वजनिक वाचनालये आहेत. 1972 साली तत्कालीन शिक्षणमंत्री माननीय श्रीमती प्रभाताई राव यांनी ग्रंथालय सेवा नियम आणि वेतन समिती स्थापन केली. प्रभाताई राव यांच्या समितीने राज्यभर दौरा करुन ग्रंथपाल आणि सेवकांना वेतनश्रेणी लागू करावी अशी शिफारस अहवालाद्वारे शासनाकडे केली. ग्रंथपालांच्या वेतनाचा प्रश्न सुटावा असा त्या मागचा उद्देश होता. ग्रंथालय सेवा नियम आणि वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी करुन राज्यात सर्वत्र विविध पातळयांवर चळवळी व आंदोलने ग्रंथपालांकडून करण्यात आली, मात्र त्या बाबत महाराष्ट्र शासन उदासिन असल्याची खंत राज्य ग्रंथालय संघाच्या कर्मचा-यांमध्ये पसरलेली आहे. 1979 साली. प्रा. सदानंद वर्दे शिक्षण मंत्री असताना परिक्षण अनुदान दुप्पट करण्यात आले. माजी आमदार व्यंकप्पा पत्की समितीने देखील ग्रंथपालांना वेतनश्रेणी द्यावी आणि ग्रंथालय कर लावून हा विभाग आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण करावा अशी शिफारस करणारा अहवाल शासनास सादर केला. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख यांनी 5 वी आणि अंतिम दुप्पट अनुदान वाढ केली. ग्रथपालांना निर्वाह योग्य मानधनाची तात्पुरती सोय झाल्याने दिलासा मिळाला. 2007 च्या विधिमंडळात या प्रश्नाबाबतचा पाठपुरावा केला असताना उच्च शिक्षण राज्यमंत्र्यांनी सांगितले की, 5 वेळा अनुदान दुप्पट केले आहे. ग्रंथपाल व ग्रंथसेवक हे सार्वजनिक ग्रंथालय संस्थाचे कर्मचारी आहेत. त्यांच्या वेतनश्रेणीची जबाबदारी शासन घेऊ शकत नाही. सद्य:स्थितीत ग्रथपालांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय दत्त....)

मिळणारे अनुदान वेतनश्रेणीच्या 50 टक्के देखील नाही. "क" आणि "ड" वर्गातील 9000 ग्रंथपालांचा वेतनश्रेणीचा प्रश्न प्रलंबित आहे. या ग्रंथपालांना केवळ 925 रुपये दरमहा मानधनावर काम करावे लागत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. ग्रंथसेवकांना निर्वाह योग्य वेतनश्रेणी देण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याची गरज आहे. या सार्वजनिकदृष्टया अत्यंत महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना मी दाखल करीत आहे."

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे प-हे, कांदलवाडी, ता. मुरबाड जि.ठाणे या गावचे सरपंच श्री. चिंधू चवर यांनी केलेली आत्महत्या

**मु. शी.** : मौजे प-हे, कांदलवाडी, ता. मुरबाड जि.ठाणे या गावचे सरपंच श्री. चिंधू चवर यांनी केलेली आत्महत्या याबाबत श्री. सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मौजे प-हे, कांदलवाडी, ता. मुरबाड, जि. ठाणे या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक आणि अन्य लोकांनी चिंधू चवर या आदिवासी कातकरी सरपंचाच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन त्याचे अंगठे घेऊन भ्रष्टाचार केला होता. अपहारित रक्कम वसूल करण्यासाठी शासकीय अधिका-यांनी चिंधू चवर याला वसुलीच्या नोटीसेस पाठविल्या. नोटीसेस आल्यामुळे झालेल्या मन:स्तापामुळे सरपंच असलेल्या चिंधू चवर या लोकप्रतिनिधीने विधान मंडळाचे अधिवेशन चालू असताना दिनांक 28 मार्च 2008 वा त्या सुमारास आत्महत्या केली असल्याची बाब उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी एफ.आय.आर. नोंदवण्यास नकार दिला. परिणामी चिंधूच्या पत्नीने राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी संपूर्ण चौकशी होऊन एफ.आय.आर. दाखल करुन न घेणा-या मुरबाड पोलिसांवर आणि वसुलीच्या नोटीसेस पाठविणा-या अधिका-यावर कारवाई होऊन त्याच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याची आणि अज्ञानी, अशिक्षित आदिवासींचे अंगठे घेण्यावर प्रतिबंध होण्याच्यादृष्टीने शासनाने धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. या सार्वजनिकदृष्टया महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना दाखल करीत आहे."

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे दरे (ता. कोरेगाव, जि. सातारा) येथे सवर्ण आणि दलित वस्त्यांमध्ये बांधण्यात आलेली भिंत पाडण्याची आवश्यकता

**मु. शी.** : मौजे दरे (ता. कोरेगाव, जि. सातारा) येथे सवर्ण आणि दलित वस्त्यांमध्ये बांधण्यात आलेली भिंत पाडण्याची आवश्यकता याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"सभापती महोदय काल देशभरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबडेकरांची 117वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. असे असताना मौजे दरे (ता. कोरेगाव, जि. सातारा) येथील भिमनगर दलित वस्ती आणि सवर्णांची वस्ती यांच्यातील एक संघर्षाचा विषय वर्तमानपत्राच्या माध्यमातून, तसेच दूरचित्रवाहिन्यांच्या माध्यमातून पुढे आला असून त्यासंदर्भात मी विशेष उल्लेख मांडत आहे. मौजे दरे, (ता. कोरेगाव, जि. सातारा) येथील भिमनगर दलित वस्ती आणि सर्वर्णांची वस्ती एकमेकास लागून आआहेत. सदर गावातील सवर्णांची वस्ती जास्त असून दोन वस्त्यांच्या मध्यभागी सवर्ण आणि दलित यांच्या अनधिकृत बांधकामाबाबत सुमारे 7 ते 8 वर्षापासून वाद सुरु असणे, त्यातच ग्रामस्थांनी या जागेत 6 फूट उंच आणि 155 मीटर लांबीची भिंत बांधणे, सदर भिंतीमुळे दलित लोकांना त्यांच्या समाज मंदिरात जाण्यास अडथळा निर्माण होणे, सदर अडथळा दूर करण्याबाबत 7 ते 8 दिवसापूर्वी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा देऊन सुध्दा शासनामार्फत काहीच कारवाई न करणे, भिंत न पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब यांच्या जयंती दिनी म्हणजे दि. 14.4.2008 रोजी तेथील दलितांनी सुरु केलेले आंदोलन व आत्मदहन करण्याचा केलेला प्रयत्न, त्यामुळे दलित वर्गात निर्माण झालेला संताप, याबाबत सवर्णांकडून सदर गावातील

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे....)

दलिताची होत असलेली पिळवणूक, त्यामुळे या प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून दलितांना समाजमंदिरामध्ये जाता येईल यादृष्टीने ही भिंत पाडून दलितांना न्याय मिळवून द्यावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे."

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात शासनाने आजच्या आज निवेदन करावे असे आपण शासनाला निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाची बाब या ठिकाणी उपस्थित केली आहे. दोन समाजांमध्ये त्या ठिकाणच्या भींतीमुळे दरी निर्माण झाली आहे. या ठिकाणी सन्माननीय श्री. दिलीप वळसे पाटील उपस्थित आहेत, त्यांनी स्व:ता लक्ष घालावे आणि संबंधित विभागास नोंद घेण्यास सांगावे. सन्माननीय सदस्यांनी अतिशय गंभीरपणे मुद्दा उपस्थित केलेला असल्यामुळे शासनास गांभीर्याने नोंद घेण्यास सांगावी.

श्री. दिलीप वळसे पाटील : ठीक आहे.

-------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 2 यावर सभागृहात चर्चा सुरु आहे. परंतु या विधेयकाच्या आधी सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 10, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतर (सुधारणा) विधेयक पुर:स्थापनार्थ दाखविण्यात आले आहे. प्रथम पुर:स्थापनार्थ विधेयक मांडून घेऊ.

श्री. पांडरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण पुर:स्थानार्थ विधेयक प्रथम मांडण्यास आमचा विरोध नाही. परंतु माझी देखील याबाबतीत अशी सूचना आहे की, सन 2008 चे वि.प.स. क्रमांक 8, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, 2008 हे विधेयक पुर:स्थापनार्थ विधेयकानंतर लागलीच चर्चेला घेण्यात यावे व त्यानंतर सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 2, महाराष्ट्र कृषि उत्पन्नपणन ( विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक चर्चेला घ्यावे.

**सभापती** : आजच्या कार्यक्रमपत्रिकेत शासकीय विधेयकात अनुक्रमांक (क) सन 2008 चे वि.प.स. क्रमांक 8, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, 2008 हे पुर:स्थापनार्थ विधेयकानंतर लागलीच चर्चेला घ्यावे अशा प्रकारची सूचना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केली आहे. प्रथम आपण पुर:स्थानार्थ विधेयक मांडण्याचे कामकाज पूर्ण करुन घेऊ व त्यानंतर सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 8 चर्चेला घेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक.

**L.C.BILL NO. X OF 2008.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT AND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)**

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 10, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, 1976 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 10 मांडतो.

**सभापती** : विधयक मांडण्यात आले आहे.

-------------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला या विधेयकात एक छोटीशी सूचना करावयाची होती. सन्माननीय सदस्यांना विमानाच्या वीस फे-या प्रवास करण्याची सवलत दिली आहे. कोकणात विमानतळ नाही. त्यामुळे कोकणातील आमदारांना गोवा येथील विमानतळ जवळ पडते. म्हणून गोवा विमानतळाचा या फे-यांमध्ये समावेश करण्यात यावा अशी माझी सूचना आहे.

**सभापती** : हे विधेयक चर्चेला येईल त्यावेळी आपण आपली सुधारणा सुचवू शकता. ती सुधारणा शासनाला मान्य असेल तर ती सुधारणा शासन मान्य करील अथवा शासनास ती सुधारणा अमान्य असेल तर ती मान्य करणार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : ज्यावेळी हे विधेयक चर्चेला येईल त्यावेळी मी माझी सुधारणा सुचविन.

----

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन 2008 चे वि.प.स. क्रमांक 8, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, 2008 हे विधेयक चर्चेला घ्यावे अशा प्रकारची सूचना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केली आहे. सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 2, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व निनियमन) (सुधारणा) विधेयकावर सभागृहात गेल्या चार,पाच दिवसापासून चर्चा सुरु आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी 4 तास 33 मिनिटे विचार मांडलेले आहेत. तसेच ते या विधेयकावर ऑन लेग आहेत. सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, आपणाला विचार व्यक्त करण्यासाठी अजून किती वेळ लागण्याची शक्यता आहे.? शासकीय विधेयकाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळेचे बंधन घालता येत नाही अशी वस्तुस्थिती असली तरी....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ KGS/ 17:15

**सभापती** ....

सदनासमोर असणारे एकूण कामकाज पाहून यासंबंधी नियम 33 प्रमाणे कारवाई होऊ शकते. परंतु माझी इच्छा अशी आहे की, अशी कारवाई न करता जर सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या अनुषंगाने थोडक्यात जर आपले विचार व्यक्त केले तर या बिलावरील चर्चा पूर्ण करता येईल.

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आता जी सूचना केली त्यानुसार वि.प.वि.क्रमांक-8 प्रथम चर्चेला घेण्यात येईल.

-----

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे,त्यांची विक्री,व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक .

L.C. BILL NO.VIII OF 2008

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963 AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.)

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 8 महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, 1963 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, अनिल परब, विनोद तावडे यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 8 महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, 1963 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 18 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त तीन महिन्याचे आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.



SSK/ KTG/ KGS/ 17:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, खरे म्हणजे प्रथमदर्शनी सर्वसामान्य माणसांसाठी हे चांगले विधेयक होते. परंतु यावर सर्वंकष चर्चा होऊन साधक-बाधक गोष्टींचा विचार करुन जर कायदा केला नाही तर यामध्ये अनेक अडचणी निर्माण होऊ शकतील.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

बिलाच्या उद्देशामध्ये म्हटले आहे की, आतापर्यंत विकासकाकडून एखादे घर विकताना 500 चौ.फूट ॲक्च्युअल एरिया असेल तर बिल्टअप, सुपर बिल्टअप अशा त-हेने मनमानी करुन घराचे वाटेल तसे भाव आकारले जायचे. त्यासाठी नियम नव्हता. म्हणून अभिहस्तांतरण विधेयक गेल्या वर्षी मंजूर झाले त्या अभिहस्तांतरणाबाबत काही त्रुटी राहिल्यानंतर त्या अनुषंगाने हे विधेयक आणण्यात आले आहे. अभिहस्तांतरण विधेयक मंजूर झाल्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांची त्यावर सही झाली. माननीय महामहिम राष्ट्रपतींची सही झाली आणि पुन्हा शासनाकडे त्या संदर्भात नियमावली करण्यासाठी आलेले आहे. हे जे विधेयक आहे या विधेयकामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रवर्तक चटई क्षेत्राच्या आधारे सदनिकांची विक्री करीत नाहीत असे राज्य शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदनिका खरेदीदारांना पुष्कळदा चटई क्षेत्र, बांधीव क्षेत्र व अतिरिक्त बांधीव क्षेत्र यामधील फरकाचे अचूक आकलन होत नाही. परिणामी उक्त अधिनियम अधिनियमित करण्यामागचे उद्दीष्ट पूर्णपणे साध्य होत नाही. उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की, "महाराष्ट्र शासनाने अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी, एक नवीन गृहनिर्माण धोरण घोषित केले असून त्यामध्ये इतर गोष्टीबरोबर, सदनिकांच्या खरेदीचा व विक्रीचा व्यवहार हा केवळ चटई क्षेत्राच्या आधारे करण्यात येईल, अशीही तरतूद आहे. उक्त धोरण अंमलात आणण्यासाठी प्रवर्तक सदनिकेच्या चटई क्षेत्राच्या आधारे सदनिकेची विक्री करील आणि त्यास अशा सदनिकेच्या चटई क्षेत्राच्या प्रमाणात सामाईक क्षेत्राकरिता व सुविधांकरिता स्वतंत्र आकार लावता येईल. या तरतुदी करण्यासाठी, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, 1963 यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. वरील उद्दीष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे."

सभापती महोदय, युएलसी कायदा रद्द करण्यासाठी विधेयक आणले होते, त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, अतिरिक्त जमिनी मोकळ्या होतील, स्पर्धा होईल आणि सर्वसामान्य गरीब माणसांना, मध्यमवर्गीयांना घरे परवडतील. ज्यावेळी युएलसी रद्द करण्याचे विधेयक मंजूर झाले त्यावेळी भारतीय जनता पक्षाने केंद्रामध्ये एनडीए सरकारने जे धोरण स्वीकारले त्याला अनुरुप सुसंगत पाठिंबा दिला. परंतु पाठिंबा देत असताना युतीतील सहकारी शिवसेना पक्ष व इतर सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले होते ते सर्व मुद्दे गेल्या वर्षभरात सत्यात उतरले

श्री.मधुकर चव्हाण.....

आहेत. त्यांनी भीती व्यक्त केली होती की, यामधून फायद्यापेक्षा तोटेच अधिक होतील. ते गेल्या वर्षभरात नजरेस आलेले आहे. सदनिकांचे भाव आकाशाला भिडले आहेत. दादर, परळ या भागात गेल्या वर्ष दोन वर्षात 5 हजार रुपये प्रती चौरस फूट दर होता तो 12 ते 15 हजार रुपये झालेला आहे. त्याठिकाणी बिल्टअप, सुपर बिल्टअप या प्रक्रियेमुळे सर्वसामान्य माणूस घर घेऊ शकतो असे स्वप्नरंजन करु शकत नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. त्यांनी अभिहस्तांतरण बिल आणले. बिल्डर मंडळींचा दबाव होता तरी बिल आणले. त्यानंतर त्या बिलाची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. मध्यंतरीच्या काळात असे झाले की, एकूण गृहनिर्माणाच्या बाबतीत गोंधळसदृश परिस्थिती शासनाने निर्माण केली. धारावीच्या विकासासाठी 4 एफएसआय, 225 चौ.फूटाऐवजी 300 चौ.फूटाची जागा देऊ, झोपडपट्टीला 225 ऐवजी 360 चौ.फूट जागा देऊ असे सांगण्यात आले. केंद्राच्या एसआरए योजनेच्या सुसंगत अशा तऱ्हेचे महाराष्ट्र शासनाने धोरण स्वीकारले, त्यामुळे असे जाहीर केले. अभिहस्तांतरण बिल सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले होते. मला त्यातील एक मुद्दा आठवतो. अभिहस्तांतरण केल्यानंतर स्टॅम्प डयुटी भरायला जाईल त्यावेळी प्रचलित भावानुसार स्टॅम्प डयुटी भरावी लागेल आणि मग भीक नको पण कुत्रे आवर अशी त्याची स्थिती होईल. आम्ही वर्तमानपत्रात वाचले होते की, शासन अभय योजना आणणार आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

परंतु ही अभय योजना काय आहे याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. समजा मी सन 1975 अथवा त्यानंतर म्हणजेच जवळपास 20 वर्षापूर्वी, 25 वर्षापूर्वी सदनिका घेतलेली असेल, तिचे रजिस्ट्रेशन केले असेल परंतु अभिहस्तांतरण झाले नसेल तर ते अभिहस्तांतरण करण्यासाठी शासनाच्या नवीन कायद्यानुसार, असे अभिहस्तांतरण करण्यासाठी गेलो तर बाजारभावाने त्याची स्टॅम्प डयुटी भरावी लागणार आहे. समजा मी त्यावेळी एक हजार रुपये चौ. फूट या भावाने सदनिका घेतली असेल तर आजचा रेडि-रेक्नरचा जो रेट आहे त्या रेटप्रमाणे मला स्टॅम्प डयुटी भरुन असे अभिहस्तांतरण करावे लागणार आहे. याचाच अर्थ "नाकापेक्षा मोती जड" अशी ही परिस्थिती झाली. शासनाने पिसमीलमध्ये गृहनिर्माण योजना तयार केली आहे. शासन धारावीला 4 चा एफएसआय देणार आहे. याचा अर्थ एकूण उपलब्ध असलेल्या क्षेत्रापैकी फक्त 10-12 हेक्टर जमीन देऊन आणि त्यासाठी 4 चा एफएसआय देऊन ही घरे बांधणार व या लोकांना 400 चौ. फूटाची घरे देण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. मी आताच उल्लेख केल्यानुसार एसआरए अथवा केंद्रशासनाच्या एनएसडीपी म्हणजेच गलिच्छ वस्ती निर्मुलन कार्यक्रमाअंतर्गत हे धोरण शासनाने जाहीर केले आहे. ज्या कष्टकऱ्यांनी, मुंबई शहरातील सर्वसामान्य माणसाने मग तो कारकून असो, शिक्षक असो, शिपाई, पोस्टमेन, फायरमेन, वायरमेन, मजूर असेल हातगाडीवाला, श्रमजीवी, फेरीवाला, भाजीवाला, पोलीस असेल कोणीही, जे कष्ट करतात आणि प्रामाणिकपणे आपल्या पगारातून इन्कम टॅक्स भरतात, ज्यांना चोरी करण्याचा आधार नाही, अशा सर्वसामान्य व चाळीत राहणाऱ्याला, ज्याने मुंबई घडविली, अनेक जन आंदोलनात भाग घेतला, अनेक राष्ट्रीय आंदोलनात, सामायिक व समतायोग्य आंदोलनांमध्ये भाग घेतला, कष्ट केले, यातना सहन केल्या, जेलमध्ये गेला अशा सर्वसामान्य माणसाला 225 चौ. फूटाऐवजी 400 चौ. फूट क्षेत्राचे घर का देऊ नये, असा माझा प्रश्न आहे. परंतु शासनाने तुकड्या-तुकड्यात अशी योजना जाहीर केल्यामुळे सभागृहात एक प्रकारे गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण केली आहे. सुदैवाने गृहनिर्माण विभागाला प्रधान सचिव म्हणून अत्यंत चांगले व निस्पृह असे अधिकारी लाभलेले आहेत. आता सध्या ते माननीय मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव म्हणून आहेत. म्हणून जे धोरण शासनाने जाहीर केले आहे त्याची प्रभावी अंमलबजावणी करुन प्रामाणिकपणे कार्यान्वित करणे हे

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .......

शासनाच्याच हातात आहे. युएलसी कायदा रद्द झाल्यानंतर शासनाला वाटले होते की, शासन तसेच महानगरपालिकेच्या ताब्यात गिरण्यांकडे असलेली बरीच मोकळी जागा येईल. परंतु परवाच माननीय मुख्यमंत्र्यांनी गिरण्यांच्या प्रश्नावर चर्चा करीत असतांना अतिशय स्पष्टपणे सांगितले होते की, शासनाच्या अपेक्षेप्रमाणे या गिरण्यांच्या जमिनीतून 1/3 जागा शासन आणि 1/3 जागा महापालिकेला मिळेल, असे वाटत होते. परंतु अजून एक इंच जमीन सुध्दा मिळाला नाही. म्हणून शासनाने जाहीर केलेले धोरण अस्पष्ट असेच आहे. विशेषत: या कायद्याच्या बाबतीत बोलावयाचे असेल तर रेडिरेक्नरप्रमाणे किंवा प्रत्यक्ष बांधकाम "वॉल टू वॉल" कारपेट एरियाप्रमाणे भाव घेतला पाहिजे. हा निर्णय अत्यंत योग्य असा आहे. पण यामध्ये पुढचा क्लॉज असा ठेवलेला आहे की, "सदनिकेच्या चटई क्षेत्राबरोबरच सामाईक क्षेत्र आणि सुविधांसाठी स्वतंत्र आकार लावता येईल." याचा अर्थ असा की, यासंबंधीचे काहीच नियम केलेले नाहीत व त्यामुळे तो विकासक काहीही बोलू शकतो व त्यानुसार वसूल करु शकतो. म्हणून जोपर्यंत शासनाची अभय योजना येत नाही, अशा बारीकसारिक गोष्टींवर विचार होत नाही तोपर्यंत यातून काहीच स्पष्ट होणार नाही. कारण ज्यावेळी आपण एखादा कायदा करतो अथवा कुठलाही कायदा करतो त्यावेळी त्याचा मूठभर तसेच श्रीमंत लोकांवर परिणाम होत नसतो. कारण हे श्रीमंत व मूठभर लोक बाजारामध्ये उपलब्ध असलेली परमेश्वराने दिलेले आयुष्य वाढविणे आणि माता विकत घेणे याव्यतिरिक्त सगळीच सुखे विकत घेऊ शकतात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

परंतु कायद्याचा परिणाम सर्वसामान्य जनतेवर होत असतो. त्यामुळे शासनाने भान ठेवून, डोळयात तेल घालून कायदे करण्याची आवश्यकता असते, नियमावली तयार करण्याची आवश्यकता असते. स्पष्टपणे बोलावयाचे झाले तर केलेल्या कायद्यांचा जनतेला फायदा होण्याऐवजी जनतेला अडचणीत कसे आणता येईल यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणारी जी प्रशासकीय यंत्रणा असते त्यामध्ये हाताच्या बोटावरील अधिकारी-कर्मचारी सोडले तर बहुतांशी लोक नियमावलीचा गैरुफायदा घेऊन त्रासच देण्याचा प्रयत्न करीत असतात. आपण या ठिकाणी स्टँप डयूटी असो किंवा रेंट लावण्याबद्दलचा कायदा करीत आहोत. या कायद्याचा उद्देश सर्वसामान्य माणसाची फसवणूक होऊ नये यासाठी जरी असला तरी यातील पळवाटांचा दुरुपयोग करुन जेव्हा सर्वसामान्य माणूस सदनिका खरेदी करेल त्यावेळेला बिल्डर त्याला सांगेल की, या कायद्यात वॉल टू वॉल एरिया एवढी आहे, मग ही वॉल 8 इंचाची आहे की, 12 इंचाची आहे हे त्यावेळेला कोणीही सांगू शकणार नाही. जिन्याचा भाग कोणाकडे इनक्ल्यूड करावयाचा, गॅलरीचा भाग कोणाकडे इनक्ल्यूड करावयाचा , ओपन स्पेस कोणामध्ये इनक्ल्यूड करावयाची, त्याचा दर काय लावायचा यासंदर्भात अधिक बारकाव्याने नियम होण्याची आवश्यकता आहे. मला माहिती आहे की, संयुक्त चिकित्सा समितीकडे एखादी गोष्ट गेली तर तीला मर्यादा राहत नाही. संयुक्त समितीस दोन महिन्याचा कालावधी जरी दिला गेला तरी नंतर त्याला 4 महिने,6 महिने लागतात, संयुक्त चिकित्सा समितीचा कालावधी अनेक कारणामुळे वाढत असतो. विरोधी पक्षाकडून कालावधी कमी प्रमाणात वाढतो परंतु मंत्री न आल्यामुळे मिटींग कॅन्सल होतात व संयुक्त चिकित्सा समितीला जास्त वेळ लागतो. त्यामुळे या विधेयकाचा उद्देश बाहेरच्या बाजूने चांगला असला तरी त्या कायद्यात लूप राहता कामा नये ही महत्वाची बाब आहे. त्यामुळे मला असे वाटते की, संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक जाणे अत्यंत आवश्यक आहे. महत्वाचा मुद्दा असा आहे की, अजून पर्यंत शासनाने गृहनिर्माणाचे धोरण दोन्ही सभागृहात आणलेले नाही. या धोरणावर सर्वंकष चर्चा होईल व या चर्चेमुळे कायदे तयार होतील. गृहनिर्माण धोरणासाठी आपल्याला सर्वंकष कायदे करावे लागणार आहेत. यासाठी एक कायदा करुन उपयोगाचे होणार नाही. या ठिकाणी सी वार्डचा विकास करण्यासाठी प्रयोगादाखल काही लोकांना एकत्रित आणलेले आहे. मुंबई शहराच्या 5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

बिल्डींग, 10 बिल्डींग असा एकत्रित विकास करावा लागणार आहे. एकएका बिल्डींगचा विकास करणे आपल्याला काही ठिकाणी कठीण होईल. कारण कामाठीपुरा सारख्या भागात दोन इमारतीमध्ये अर्धाफूट किंवा एक फुटाचे सुध्दा अंतर नसते. त्या ठिकाणी हौसगल्ली साफ करण्यासाठी सुध्दा माणूस जाऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. गृहनिर्माणाच्या बाबतीतील धोरण अगदी स्पष्ट असण्याची आवश्यकता आहे. पुढील 25-30 वर्षात मुंबई, ठाणे, पुणे यासारखी शहरे वाढणार आहेत. आजच माननीय शरद पवार साहेब असे म्हणाले की, पुण्यामध्ये आता कोणत्याही योजना आणू नका. पुण्याची लोकसंख्या आता खूप वाढलेली आहे. परंतु सभापती महोदय पोटं भरल्यानंतर आता हे बोलायला लागले आहेत. आता पोट भरल्यावर सांगायला लागले आहे की, पश्चिम महाराष्ट्रातील विशेषत: पुण्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नका, विकासाच्या योजना आणू नका कारण पाण्याचा प्रश्न तीव्र होत चालला आहे. पुण्यामध्ये सगळी मंडळी जंगल निर्माण करीत होती, सगळीकडे जंगल आणि जंगल वाढत होते. डोळयासमोर कोणत्याही प्रकारचा विकास आराखडा न ठेवता योजना आखल्या जात होत्या. मोहेंजोदडो आणि हडप्पा हजारो वर्षापूर्वीची आमची शहरे दुर्देवाने आज पाकिस्तानात गेली आहेत परंतु आर्किटेक्चरानी उत्खनन केल्यानंतर ही शहरे खोदून काढल्यानंतर आश्चर्य वाटायला लागले की, हजारो वर्षापूर्वी रस्ते, पादचारी रस्ते, साडपाण्याची व्यवस्था, न्हाणी घराची व्यवस्था, अभ्यास रुम, लीव्हींग रुम, बेड रुमची व्यवस्था चांगल्या प्रकारे केली होती. ही कन्सेप्ट त्यावेळी आपल्याकडे होती. खरे म्हणजे यासंदर्भात आम्हाला पाश्चिमात्यांनी शिकवावयास नको होते. परंतु आता पैशाच्या माध्यमातून मला कसे पैसे मिळतील याचा विचार केला जातो. माझ्या वाचनात आले आहे की, धोरण आखतांना बहुतांशी शासनकर्ते भविष्यात कायद्यांचा परिणाम काय होईल याचा विचार न करता आता माझे काय? मला यातून काय मिळणार आहे ? अशा प्रकारे विचार करुन आपण जर कायदे केले तर मला वाटते त्यातून जनतेला त्रास होईल व मुंबई, ठाणे, कल्याण या शहरांची लोकसंख्या भरमसाठ वाढलेली आहे, ज्यांचें अर्बनायझेशन मोठया प्रमाणात होत आहे त्यावर परिणाम करणारे हे विधेयक ठरेल असे मला आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करावयाची आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या विधेयकातील बारीकसारीक मुद्यांवर साधकबाधक चर्चा करण्यासाठी हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे. जो पर्यत "अभय योजना" आणत नाही तोपर्यत या विधेयकाचा काहीही उपयोग होणार नाही. मला माननीय मत्री महोदयांना अशी विनंती करावयाची आहे की, हे विधेयक घाई घाईने मंजूर करण्याचा हट्ट धरण्यात येऊ नये. हे विधेयक आणण्या मागचा शासनाचा उद्देश चांगला असेल तर हे विधेयक संयुक्त चिकत्सा समितीकडे पाठविण्यात यावे. दोन तीन महिने हे विधेयक पुढे गेल्यामुळे काही आकाश कोसळणार नाही. या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने मला अशी विनंती करावयाची आहे की, दोन्ही सभागृहाच्या 18 सन्माननीय सदस्यांच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक पाठविण्यात यावे आणि त्याना अहवाल सादर करण्यासाठी काल मर्यादा घालून देण्यात यावी आणि पावसाळी अधिवेशनामध्ये हे विधेयक मांडण्यात यावे.

सभापती महोदय, सर्व सामान्य माणसावर परिणाम करणारे हे विधेयक आहे.. आज मुंबई शहरामध्ये सर्वासामान्य माणूस घर घेऊ शकत नाही. तो स्वप्न सुध्दा रंगवू शकत नाही. "असावे घरकूल आपुले छान, पुढे असावा बाग बगीचा, वेल मंडपी जाई जुईचा " या कवितेतील बोल केवळ कवितेमध्येच आहेत असे मला वाटते. मुंबई शहरामध्ये एखाद्याने काल परवा झोपडे बांधले असेल तर मतासाठी कोणी 1980 साल जाहीर करते त्यानंतर दुसरा कोणी तरी 1985 साल जाहीर करतो, तिसरा 1990 साल जाहीर करतो त्यानंतर पुन्हा कोणी तरी 1995जाहीर करीत असतो.. मला असे सांगावयाचे आहे की, मुंबई हे एक बेट असून आज तेथे 1 कोटी 35 लाख लोक राहतात. प्रत्यक्षात भौगोलिक दृष्टया या बेटावर फक्त 65 लाख लोकच राहू शकातात . मुंबई शहरासाठी आज 100-150 किलोमिटर्स अंतरावरुन पाणी आणले जाते.ज्या ठाणें जिल्हयातील ग्रामीण व आदिवासी भागातून मुंबईसाठी पाणी आणले जाते त्या मधल्या भागातील लोकांना पाण्याचा थेंब सुध्दा मिळत नाही. मुंबईतील चाळीत राहणाऱ्या लोकाना पुरेशा दाबाने पाणी मिळत नाही त्यामुळे पंप लाऊन पाणी घेतले जाते आणि सुरुवातीस तोटीला पाईप लावल्यानंतर त्या पाईपातील पाणी तोंडाने ओढून काढावे लागते. मात्र दुसऱ्या बाजूला सात बेड रुम, आठ बेड रुम असलेल्या

फलॅटमध्ये भरपूर पाणी दिले जाते त्या ठिकाणी टब बाथची व्यवस्था

श्री.मधुकर चव्हाण ...

केली जाते. अशा प्रकारे चाळीत राहणारा माणूस आणि मोठया फलॅटमध्ये राहणारा माणूस यामध्ये दरी निर्माण झाली आहे. या ठिकाणी मी समजावादाने प्रेरित होऊन बोलत नाही. परंतु ही दरी तयार झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. गरीब माणसांना आणि मराठी माणसांना घर मिळणे हे शासनाच्या धोरणामुळे आज दुरापास्त झालेले आहे. मराठी माणूस झोपडे बांधू शकत नाही. मराठी माणसाने आपली जीवन जगण्याची पध्दती ठरलेली असते. तो कसेही राहील परंतु स्वाभिमानाने जीवन जगेल, तो फुटपाथवर राहणार नाही तसेच कधीही नियमबाहय वर्तन करणार नाही. गृह निर्माण धोरणाचा बटयाबोळ झालेला असल्यामुळे मराठी माणूस मुंबई बाहेर फेकला जात आहे. तो मुंबईमध्ये राहू शकत नाही. म्हणूनच या विधेयकातील बारीक सारीक तरतुदीचा विचार होणे आवश्यक आहे. या ठिकाणी मांडण्यात आलेल्या विधेयकाचा उद्देश जरी चांगला असला तरी नियमावली व्यवस्थित करुन कायदा पास करणे आवश्यक आहे असे मला वाटते. त्यामुळे प्रशासकीय व्यवस्थापनात सर्व सामान्य माणसाला नंतर त्रास होणार नाही. विकासक आणि बिल्डर्स या विधेयकातील लुपहोल्सचा आधार घेत असतात कारण या लोकांची वृत्ती ही छिद्रान्वेषी असते. कायदा केल्यानंतर तो कायदा किती चांगला आहे हे तो पाहत नाही तर त्या कायद्यामध्ये त्याला पळण्यासाठी छिद्रे कोठे आहे हे तो शोधत असतो व त्यातून त्यांची छिद्रान्वेषी वृत्ती दिसून येते आणि जी वृत्ती गरिबांना छळण्यासाठी वापरली जाते तिलाच छिद्रान्वेषी वृत्ती म्हणतात.

सभापती महोदय,कै. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असतांनाची एक गोष्ट मी येथे सांगू इच्छितो. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये अमुक एक गोष्ट करा असे त्यांनी अधिका-यांना सांगितले होते. त्यावेळी मंत्रीमंडळाची बैठक संपल्यानंतर आय.ए.एस. अधिकारी आपआपसात चर्चा करीत होते व त्यांनी असे सांगितले की , अशा प्रकारे करणे कठीण आहे हे कायद्याच्या चौकटीत बसत नाही. श्री.द.म.सुकथनकर हे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त होते व नंतर मुख्य सचिव झाले होते. त्यांना कै.वसंत दादा पाटील यांनी बोलावून घेतले होते त्यावेळची ही आठवण त्यांनी सागितली होती.. कायदा कसा असावा या बाबतीत कै.वसंत दादा पाटील यांनी सांगितले की , मी जी गोष्ट करण्यास आपल्याला सांगितले आहे. त्याबाबतीत तुम्ही असे म्हणत आहात की ही गोष्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

कायद्याच्या चौकटीत बसत नाही. मी सांगितलेली गोष्ट गरीबांच्या कल्याणासाठी आहे, सर्व सामान्य लोकांसाठी आहे त्यामुळे कायद्याच्या चौकटीत जर ती बसत नसेल तर चौकट बदला. परंतु मी जे काही सांगत आहे ते कायद्यात बसवा." म्हणजे माणूस हा कायद्यासाठी नाही तर, सामान्य माणासाचे जीवन सुसहय व्हावे, सर्व सामान्य माणसाचे नागरी जीवन सुसहय व्हावे यासाठी हा कायदा आहे. कायद्यातील नियमांचे पालन सर्व सामान्य माणूसच करीत असतो बाकीचे कोणीही पालन करीत नाही. आज न्याय सुध्दा विकत मिळतो. सामान्य माणसाशी संबंधित असलेल्या घरासंबंधीचा हा विषय आहे म्हणून हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्याला मंत्री महोदय काही उत्तर देणार असतील तर ते देऊ शकतात.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत हे सुधारणा विधेयक येथे सादर करण्यात आलेले आहे त्याबाबत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हे नवीन विधेयक नाही तर अगोदरच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी आणलेले विधेयक आहे. या तरतुदीतील काही तरतुदींसंबंधात नागरिकांना अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्या संबंधात अनेक तक्रारी आपल्याकडे आल्या आणि त्यावरून यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे हे शासनाला पटले आणि त्यामुळेच आपण या सुधारणा या विधेयकाद्वारे येथे आणलेल्या आहेत. सभापती महोदय, सदनिका खरेदी करताना ती सदनिका नेमकी किती क्षेत्रफळाची आहे हे त्या खरेदीदारास समजत नाही आणि त्याचा गैरफायदा विकासक घेतात. विकासकांच्या या अपप्रवृत्तीस आळा घालण्यासाठी राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणात अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, यापुढे सदनिकेची खरेदी-विक्री ही सदनिकेच्या चटई क्षेत्रफळानुसार करता येईल आणि तेथील सामाईक सोयी-सुविधांचे पैसे प्रमाणशीर घ्यावेत अशी तरतूद 1964 च्या मोफा नियमात असली तरी हे पैसे आकारताना खरेदीदाराची काही वेळेस फसवणूक होत असते. यासाठी या विधेयकामध्ये दोन तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. पैकी एक तरतूद अशी आहे की, सदनिकेची खरेदी-विक्री ही सदनिकेच्या चटईक्षेत्रफळाच्या आधारावर करता येईल. चटईद्यक्षेत्रामध्ये बाल्कनीचाही समावेश असेल. दुसरी तरतूद अशी आहे की, सामाईक सुविधांसाठी द्यावयाची रक्कम ही चटईक्षेत्राच्या प्रमाणात द्यावी लागेल. सभापती महोदय, हे विधेयक संमत झाल्यानंतर जर सदनिकांची विक्री चटईक्षेत्राच्या आधारे करण्यात आली नाही अथवा सामायिक सुविधांकरितांची रक्कम चटईक्षेत्रफळाच्याप्रमाणात न आकारल्यास खरेदीदार मोफा अधिनियमाच्या कलम 5(क) अनुसार नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाद मागू शकतील. या तरतुदींचा भग करणाऱ्या विकासकास मोफा अधिनियमाच्या कलम 13(1) अन्वये 3 वर्षांपर्यंत तुरूंगवास किंवा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षा होऊ शकते.

सभापती महोदय, या बाबतीत मी आणखी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अशी सुधारणा प्रस्तावित केली आहे की, सामाईक सोयी-सुविधांसाठी

...... 3पी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अॅड. शेगावकर .....

चटई क्षेत्रफळाच्या प्रमाणात रक्कम आकारण्याची तरतूद वगळण्यात यावी. या संदर्भात 1964 च्या मोफा अधिनियमान्वये विहित केलेल्या नमुना करारपत्राकडे लक्ष वेधण्यात येते. सदर करारपत्रात पुढीलप्रमाणे तरतूद आहे -

" The Flat Purchaser hereby agrees to purchase from the Promoter and the Promoter hereby agrees to sell to the Flat Purchaser one Flat No......of the Type.......of carpet area admeasuring.......Sq.meters (Which is inclusive of the area of balconies) on.........Floor as shown in the floor plan thereof hereto annexed and marked. Annexure D/Shop No........./covered/open Garage No......in the *........Building (hereinafter referred to as "the Flat") for the price of Rs.........including Rs......being the proportionate price of the common areas and facilities appurtenant to the premises, the nature, extent and description of the common/limited common areas and facilities / limited common areas and facilities which are more particularly described in the Second Schedule hereunder written......."

म्हणजेच अशी तरतूद आहे की, सामायिक सोयी-सुविधांसाठी प्रमाणशीर रक्कम द्यावी लागेल. मात्र 'प्रमाणशीर' या शब्दाचे स्पष्टीकरण सदर करारपत्रात नाही याचा विकासक गैरुायदा घेऊ शकतात. कमी क्षेत्रफळाच्या सदनिका खरेदी करणाऱ्या व्यक्तीला जास्त क्षेत्रफळाच्या सदनिका खरेदी करणाऱ्या व्यक्ती इतकीच रक्कम द्यावी लागू नये यासाठी 'प्रमाणशीर' या शब्दाचे स्पष्टीकरण देण्यासाठी विधेयकाच्या 9 व्या आणि 10 व्या ओळीत स्पष्टीकरणात्मक`तरतूद केली आहे. प्रस्तावित स्पष्टीकरणात्मक सुधारणेमुळे चटई क्षेत्रफळाच्या प्रमाणात सामाईक सोयी-सुविधांसाठी रक्कम द्यावी लागेल. ....

( यानंतर सौ.रणदिवे .... 3क्यू 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर . . . .

वरील पार्श्वभूमीवर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांची सुधारणा मागे घ्यावी अशी मी त्यांना विनंती करतो. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.मधुकरजी चव्हाण यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या निश्चितपणे विचारात घेता येतील. परंतु जर आपण आज विधेयक मंजूर केले नाही तर सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने ते अडचणीचे होणार आहे. तसेच आपण गृहनिर्माणच्या बाबतीत जे नवीन धोरण जाहीर करणार आहोत, त्याबाबतीत देखील अडथळा निर्माण होईल. त्या मुळे सन्माननीय सदस्यांनी सदरहू विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मागे घ्यावा आणि हे विधेयक संमत करावे अशी मी त्यांना विनंती करतो.

----

. . . .3 क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जेव्हा सदनामध्ये विधेयक मांडले जाते, तेव्हा त्याबाबत चर्चा करण्याची एक पध्दत असते, एक नियम असतो आणि त्या माध्यमातून ते विधेयक हळूहळू, झिरपत, झिरपत सन्माननीय सदस्यांच्या विचारांना चालना देत रहाते. मग त्यावर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण भाषण करतात, मी भाषण करतो आणि मग ते ऐकता-ऐकता सदनातील सन्माननीय सदस्यांच्या हे लक्षात येते की, या बिलामध्ये ही बाब असली पाहिजे, ती बाब असली पाहिजे वगैरे. कधी-कधी जे आमच्या लक्षात आले नसेल, ते त्यांच्या लक्षात येण्याची शक्यता असते आणि मग ती बाब या सदनासमोर येऊ शकते. परंतु आपण तर सगळी आंधोळ करुन मोकळेच झाला आहात की, चला, विधेयक संपले. मी तुम्हाला दोष देत नाही आणि दुर्दैवाने तुम्ही असे काही मांडले की, आता सरकार कोणत्या मानसिकतेमध्ये आहे हे मला कळलेले नाही. आम्ही तुमच्या बोलण्यावर का विश्वास ठेवावयाचा ? असा आपण सर्वांसमोर प्रश्न उपस्थित केलेला आहे. पहिली गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण आणि आम्ही हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव दिलेला आहे, तो मागे घ्यावा अशी विनंती केली आहे. पण हा प्रस्ताव का मागे घ्यावयाचा ? तर आता शासन गृहनिर्माण धोरण जाहीर करणार आहे. पण ते धोरण जाहीर झाले नाही तर लोकांची गैरसोय होईल. पण ते धोरण कुठे आहे ? याबाबतीत आम्हाला आश्वासन देऊन दीड वर्षे झाले आहे. याबाबतीत मुंबई शहरामध्ये बरेच सेमिनार झाले. दोन सेमिनारच्या वेळी मी स्वत: तेथे गेलो होतो आणि याबाबत भाषण केले आहे, तेथील भाषणे ऐकली आहेत. पण या सदनामध्ये अजून गृहनिर्माणच्या संदर्भात चर्चा झालेली नाही. माझ्या माहितीप्रमाणे विधानसभेमध्ये कदाचित आज या विषयावर चर्चा सुरु आहे.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर (खाली बसून) : विधानसभेमध्ये चर्चा सुरु आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पण विधानपरिषदेमध्ये तशी चर्चा नाही आणि ती चर्चा होणार आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने मग शासन नियमावली वगैरे पुढे बरेच विषय आहेत. परंतु असे झाले आहे की, सरकारला धीर नाही. आपण दुर्दैवाने आपल्या धोरणात्मक पध्दतीमध्ये एक धांदरटपणा निर्माण केलेला आहे. आम्हाला हे विधेयक चार दिवसापूर्वी मिळाले. या विघेयकाचे पुन:स्थापन झाले. त्यानंतर आम्ही आमच्या उप सूचना दिल्या. पण सरकारला काय झाले आहे हे कळत नाही. कारण माननीय मुख्यमंत्री एका समारंभामध्ये पटकन बोलले. त्यांचा महाराष्ट्राचे अत्यंत लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून सतत उल्लेख केला जातो. ती लोकप्रियता टिकविण्यासाठी ते

. . . .3क्यु-3



APR/ KTG/ KGS/ 17:45

श्री.दिवाकर रावते . . . .

असे पटकन बोलले की, आम्ही या मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांना 370 चौ.फूटाची घरे देणार. मग मी आमच्या माननीय विरोधी पक्षनेत्यांना टी.व्ही.समोर बोलताना पाहिले. गरीब लोकांना 370 चौ.फूटाची घरे देऊन काय होणार आहे ? निदान त्यांना एक झोपावयाची स्वतंत्र खोली मिळेल एवढी तरी जागा मिळाली पाहिजे. मग त्यांच्या लक्षात आले की,काहीतरी गोंधळ झाला आहे. 370 चौ.फू.म्हणजे काय ? कसे देणार ? मग त्यांनी खुलासा केला की, मी 370 सुपर बिल्टअप असे म्हणालो. त्यांचे असे शब्द आहेत. म्हणजे या सदनामध्ये तुम्ही चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे घर विक्रीच्या संदर्भात कायदा करण्यासाठी जेव्हा आमच्यासमोर येता, तेव्हा महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री बाहेर जाऊन, झोपडपट्टीवासियांना खुष करण्यासाठी, सध्या मुंबईतील जो गोंधळ कमी झाला आहे, तो वाढविण्यासाठी आणि आपल्या सुप्रसिध्दीची लोकांमध्ये आणखी संभ्रमावस्था कशी निर्माण होईल असा प्रयत्न करतात. ते असे सांगतात की, 370 चौ.फूटाची घरे देणार. पण त्यामध्ये काय देणार ? आम्हाला वाटले की, तेवढा कारपेट एरिया उपलब्ध करुन देणार. आम्हाला आनंद झ ाला. परंतु नंतर त्यांनी असा खुलासा केला की, मी सुपर बिल्टअप एरियाबाबत बोललो.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ KTG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 17:50

श्री. दिवाकर रावते..

राज्याचे प्रमुख जे बोलतात, ते राज्याचे धोरण असते. राज्याचे माननीय मंत्री महोदय, जे बोलतात ते राज्याचे धोरण असते. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांवर बोलताना काही निर्बंध असतात. तसे निर्बंध सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांवर नसतात. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी अतिशय काळजीपूर्वक बोलले पाहिजे. कोठलाही समारंभ असो, किंवा सभागृह असो त्यांनी वक्तव्य काळजीपूर्वक केले पाहिजे. श्रध्दांजली वाहण्याच्या कार्यक्रमात देखील त्यांना जपूनच बोलावे लागते. त्या ठिकाणी जर माननीय मंत्री महोदय भावनेच्या भरामध्ये चुकून स्मारक केले जाईल असे बोलून केले तर मग लोक त्यांच्या मागे लागतात. आपण असे, असे बोलला होतात. त्यामुळे मंत्र्यांवर खूप जबाबदारी असते. मी आपणास सांगू इच्छितो की, कवी कुसुमाग्रजांचे स्मारक जाहीर केल्यानंतर ते पूर्ण करण्याकरिता विधी मंडळाच्या सन्माननीय सदस्यांना अक्षरश: लढाई करावी लागली होती. विदर्भामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्मारक होण्याकरिता सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी साधारणपणे 4 अधिवेशनामध्ये हा मुद्दा लावून धरला होता. सभापती महोदय, मला आठवते आहे या संदर्भात आपणही न्याय मिळवून दिला होता. या विषयासंदर्भात आपण सुमारे 35 मिनिटे भाष्य केले होते. संत गाडगेबाबा किंवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या निधीच्या संदर्भात आपण विचार मांडले होते. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांना जपूनच बोलावे लागते. कारण ते राज्याचे धोरण असते. काचेच्या नाजूक भांडे आपण ज्या प्रमाणे जपतो त्याप्रमाणे राज्यकारभार करताना सर्व गोष्टी जपूनच कराव्या लागतात. चटईक्षेत्रानुसार सदनिकेची विक्री करताना 370 चौ.फूट जागा सुपर बिल्टअप नुसार मिळणार असल्याचे माननीय मंत्री महोदय येथे सांगतात. यामागे शासनाची संकल्पना काय आहे हा प्रश्न येथे निर्माण झाला. त्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, माननीय मंत्री महोदय, सुपरबिल्टअप म्हणाले आहेत. त्याचे कार्पेट एरियाप्रमाणे साधारण 269 चौ.फूट जागा मिळू शकते. झोपडपट्टीवासियांना पुनर्विकासामध्ये जागा वाढवून दिली जाणार आहे. किती काळजी आहे शासनाला गरीब जनतेची ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण आता सभागृहामध्ये नाहीत. त्यांचा एखाद्या गोष्टीला विरोध असला तरी देखील सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण बोलण्याच्या सुरुवातीला नेहमीच

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

मंत्री महोदयांचे अभिनंदन करीत असतात. खरे तर त्यांचे काय गुण आहेत तेच मला अजून कळालेले नाहीत. फार सुंदर आहे, फार चांगले आहे असे बोलून हात हलविण्याची त्यांची पद्धत आहे. मी एका प्रस्तावाचा उल्लेख केला होता. त्या विषयी मी पुढे बोलणार आहे. मी जी उपसूचना केलेली आहे ती मागे घ्यावी अशी विनंती करण्यात आली होती.

सभापती महोदय, कोणतेही विधेयक तयार करीत असताना त्यातील काही बाबींची व्याख्या तयार केली जाते. प्रॉपटी ॲक्टमध्ये, मालकी हक्काची, किंवा चटई क्षेत्राची व्याख्या केलेली नाही. ज्यावेळी आपण चटई क्षेत्राबाबत विधेयक आणतो त्यावेळी, त्या विषयासंदर्भात व्याख्या तयार करणे आवश्यक आहे. अमूक म्हणजे काय, तमूक म्हणजे काय, याची व्याख्या कायद्यात असणे आवश्यक आहे. चटई क्षेत्र म्हणजे काय आहे याची माहिती कोणाला आहे काय, ते कोण ठरवते, कसे ठरविते ? ही व्याख्याच येथे केलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण या ठिकाणी अज्ञानाने काही गोष्टी बोलून गेले. वॉल टू वॉल असे मोजले म्हणजे ते चटई क्षेत्र. असे त्यांनी सांगितले होते. विक्रीच्या विषय येथे निघाला म्हणून मी सांगू इच्छितो की, आता विकासक काय करणार आहेत ? ते ज्या इमारती उभी करणार त्यामध्ये जी नवीन घरे बांधणार आहेत तेथे भिंती बांधणार नाहीत.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

ही तुझी सदनिका आहे, कारपेट एरिया मोजून घे असे ते सांगतील. आता या सदनिकेमध्ये तुझ्या राहण्याच्या पध्दतीनुसार किती भिंती बांधून पाहिजेत, बाथरुम कशा पध्दतीने बांधून पाहिजे, त्यामध्ये मधली भिंत पाहिजे की ओपन पाहिजे त्यापमाणे लिहून दे, त्याप्रमाणे बांधून देतो आणि त्याचे पैसे घेतो असे सांगतील. कार्पेट एरियाची नक्की व्याख्या काय आहे ? ती व्याख्या कोणी करावयाची आहे ? त्याबाबत शासनाला कल्पना आहे काय ? सभापती महोदय, चटई क्षेत्राची व्याख्या शासनाच्या रेडी रेकनरमध्ये जाहीर केलेली आहे. हे शासनाचे रेडीरेकनर आहे. दुर्दैव असे आहे की, हे रेडीरेकनर इंग्रजीमध्ये प्रसिध्द करतात. महाराष्ट्र शासनाचा रेडीरेकनर बनविणारा जो कोणी असेल, ज्याच्या कल्पनेतून हे आले आहे त्याची डीएनए टेस्ट घ्यावी लागेल आणि त्याच्यामध्ये ब्रिटिशाचा अंश शिल्लक आहे काय ते पहावे लागेल. या रेडीरेकनरमध्ये काय व्याख्या आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी ती व्याख्या ऐकली तर खूप आनंद होईल. बिल्डर नक्की असे करणार आहे काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 3 वर्षाची सजा आहे. सर्वांना सजेवर पाठवावे लागेल. हे आताचे रेडीरेकनर आहे. "Stamp Duty Ready Reckoner Market Value of Flat in Mumbai 2008." या रेडीरेकनरच्या पृष्ट क्रमांक 208 वर कार्पेट एरिया म्हणजेच चटई क्षेत्राची व्याख्या दिलेली आहे. ती व्याख्या इंग्रजीमध्ये असल्यामुळे इंग्रजीमध्येच वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "As per the IS: 3861-1975 (Reaffirmed 1992) of Bureau of Indian Standards (BIS)....." बीआयएस याचा अर्थ असा आहे की, त्यांनी बनवलेली जी व्याख्या आहे त्यामध्ये कायद्याव्दारे सुध्दा आपल्याला बदल करण्याचा अधिकार नाही. देशात फक्त यांनाच अधिकार आहे. त्यांनी काय व्याख्या केलेली आहे ? संयुक्त चिकित्सा समितीपुढे जावयास नको असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. आम्ही हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे का न्यावयास मागतो ? यामध्ये व्याख्या नसेल तर ती आली पाहिजे. आपल्याला जनतेला काही द्यावायचे आहे. जनतेला शुद्ध आणि चांगले देण्याची आपली इच्छा आहे. आपल्या निवेदनामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, विकासक फसवाफसवी करतात. कसा एरिया लावला हे कोणालाही कळत नाही. या व्याख्येमध्ये शुद्धता यावी, स्वच्छता यावी, मोकळेपणा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/ KGS/ KTG

श्री. दिवाकर रावते .....

यावा, चटई क्षेत्राप्रमाणे ते मोजता यावे यासाठी आपल्याला ते करावयाचे आहे. पुढे जे दिलेले आहे ते बिलंदर आहे. परवा मी विचारले की याबाबत काय करणार ? सरकारने जनतेशी बनवाबनवी करु नये असे माझे प्रामाणिक मत आहे. केलेल्या कायद्याचा दुरुपयोग करतात म्हणून त्यांच्यावर कारवाई करणे हा विषय आहे. परंतु सरकार ज्यावेळी कायदा करते त्यावेळी जनतेच्या हिताचाच कायदा करावयाचा असतो आणि सरकारचे हेच कर्तव्य असते. आपण आता काय करीत आहात ? हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवावयास पाहिजे असे माझे मत आहे. मी पुढे वाचल्यावर ते आपल्याला कळेल. चटई क्षेत्र कशाला म्हणावयाचे याची व्यवस्थित व्याख्या जोपर्यंत या कायद्यामध्ये होत नाही तोपर्यंत या चटई क्षेत्राच्या बाबतीत गोंधळ होईल.

सभापती महोदय, कायद्याव्दारेही ज्यामध्ये बदल करता येत नाही असे हे ब्युरो ऑफ इंडियन स्टॅण्डर्ड आहे. ते केंद्र सरकारचे असून घटनेप्रमाणे आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "....(Government of India Recognised body for Weights and Measure), Carpet Area is full area of a house excluding area of all the walls in the house, Kitchen, passage, toilets, 50% of balcony area etc....." हे सगळे कार्पेट एरियामध्ये आले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मंत्रिमहोदयांनी विधेयकावर बोलताना असे निवेदन केले की, कार्पेट एरियात बाल्कनीचा समावेश केलेला आहे. सभापती महोदय, यापुढे मी जे वाचणार आहे त्यामुळे जमीन दुभंगणार आहे. त्यामुळे मंत्रिमहोदयांना हे विधेयक तर मागेच घ्यावे लागेल. आपण अधिका-यांच्या नादी लागू नये. या पुस्तकात असे नमूद केले आहे की, "....But in actual practice this method is not adopted. Carpet area for purpose of stamp duty is rent-able area which is in exclusive possession of owner. It is measured from finished wall to finished wall above the skirting level or above the dado level in case of toilet blocks and in case of open balcony area is taken as 50% of area and closed balcony is to be measured in full. Floor Area is Carpet Area as per BIS mentioned above plus area of Kitchen, passage, toilets and full balcony..."

**सभापती** : सभागृहाची वेळ वाढविणे आवश्यक आहे. आता सुरु असलेले विधेयक आणि त्यानंतर वि.प.वि.क्रमांक-4 मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) विधेयक, 2008 ही दोन्ही विधेयके पूर्ण होईपर्यंत सर्वांच्या संमतीने सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, पणन संबंधीच्या विधेयकावरील चर्चा आज होणार आहे काय ?

**सभापती** : पणन संबंधीचे विधेयक आज होईल की नाही हे मी थोडया वेळाने आपल्याला सांगतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये एक्सक्ल्यूझिव्ह हा शब्द आहे. यात कोणता एरिया एन्क्ल्यूझिव्ह आहे, कोणता एरिया एक्सक्ल्यूझिव्ह आहे ते समजत नाही. कार्पेट एरियासंबंधीची नेमकी व्याख्या काय आहे ते या विधेयकात कोठेच नमूद केलेले नाही. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर कोणी कसे ठरवावयाचे ? एखाद्याने गाळा बांधल्यावर जो विकत घेत आहे त्याला तो बोलविणार आणि सांगणार की, हा कार्पेट एरिया आहे, आता इंटेरिअरचा भाग तुला कसा पाहिजे ते सांग, त्याप्रमाणे तुला मी भिंती बांधून देतो. काही जण गाळा घेतल्यानंतर मोडतोड करतात आणि आपल्या पध्दतीने बांधकाम करतात, ही प्रॅक्टीस आहे. सभापती महोदय, याच पुस्तकाच्या पान क्र.39 वर कार्पेट एरिया आणि बिल्टप एरिया कसा असावा त्याची व्याख्या दिलेली आहे. त्यात असे म्हटले आहे की, "Carpet Area, Built-up-area : Rates given in the reckoner is for Built-up area. If carpet area is mentioned in the document then built-up-area should be arrived as below. But if in document any thing other than Carpet area is mentioned, then that area recorded in the document is to be taken into consideration, but for open parking and terrace whatever area is written in the agreement that should be considered. Built-up-area = 1.2 X Carpet area. Carpet area = Built-up-area (divided by) 1.2..."

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

अशा प्रकारे कार्पेट आणि बिल्टअप एरियाचे कोष्टक रेडिरेकनरमध्ये दिलेले आहे. मी बिल्टअप एरियाचा उल्लेख यासाठी केला की महानगरपालिकेकडून जेव्हा इमारतींचे नकाशे मंजूर केले जातात ते या बिल्टअप एरियावर मंजूर केले जातात. कार्पेट एरियावर ते मंजूर केले जात नाहीत. मला आठवते की, पूर्वी मुंबईसाठी 0.33 आणि उपनगरांसाठी 1 चटईक्षेत्र निर्देशांक होता. परंतु उपनगरामध्ये जिना म्हणजे स्टेअरकेस चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये मोजला जात नाही. मी स्थायी समितीचा अध्यक्ष होतो त्यावेळी हा विषय लावून धरला होता. तत्कालीन मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. तिनईकर यांच्याशी मी चर्चा केली आणि त्यासंदर्भात ठराव आणला. चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये जिना आल्यामुळे कमीत कमी जिन्यामध्ये जो भाग येईल तो विकला जाईल. त्यावेळी बिल्टअप एरिया कन्सेप्ट होती. सुपरबिल्टअप एरिया कन्सेप्ट नव्हती. म्हणजे सव्वातीन फूट बाय सव्वातीन फूट असे जिने जाण्या-येण्यासाठी बांधले जात होते. अशा जिन्याच्या इमारतीमधील एखाद्या मजल्यावरील माणूस मेल्यानंतर त्याचे पार्थिव खाली आणण्यासाठी खूप त्रास होत असे. दोन-तीन इमारतीमध्ये अशा प्रकारची परिस्थिती मी पाहिली आणि त्यानंतर श्री. तिनईकर यांच्यापुढे हा विषय मी मांडला आणि मोठ्या स्टेअरकेस बांधण्याची शिफारस करणारा ठराव मुंबई महानगरपालिकेमध्ये संमत करण्यात आला. उपनगरामध्ये बंधन नसल्यामुळे मोठ्या स्टेअरकेस बांधण्यात येतात. मुंबई महानगरपालिकेने केलेल्या शिफारशी नुसार शासनाने निर्णय घेतला आणि शहरांमध्ये देखील जिन्याचे बांधकाम चटईक्षेत्र निर्देशांकातून काढून टाकण्यात आले. त्यामुळे आता जिने प्रशस्त असतात. यामुळे विकासकाचा फायदा झाला. म्हणून बिल्टअप एरियावर नकाशे मंजूर होत असतील तर सदनिका विकत असताना ती बिल्टअप एरियावर विकली असेल तर तिचे मोजमाप कसे करावयाचे याचे रेडिरेकनरमध्ये कोष्टक दिलेले आहे. त्या कोष्टकाप्रमाणे मी एका पानावर एरिया मोजला. सभापती महोदय, आर्किटेक्टकडून हे नकाशे समजून घेतले पाहिजेत. 30 फूट x 20 फूट सभागृहाचे चटईक्षेत्र निर्देशांकाप्रमाणे 600 चौ.फूट क्षेत्र असावयास पाहिजे. याचा बिल्टअप एरिया काढावयाचा झाला तर दीडफूटाची भिंत पकडून तो एरिया 677.25 चौ.फूट इतका होतो. परंतु रेडीरेकनरमध्ये दिलेल्या कोष्टकानुसार हा एरिया 720 चौ.फूट इतका होतो. म्हणजे कशा प्रकारे कार्पेट एरिया काढायचा याचे कोष्टक या रेडिरेकनरमध्ये दिलेले आहे. बिल्टअप एरियाला 1.2 ने भागले तर तो कार्पेट एरिया 564 इतका येतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KTG/ 18:10

श्री. दिवाकर रावते....

कोस्टकाप्रमाणे हे गणीत आहे. जेवढा हॉल मोठा, जेवढी सदनिका मोठी त्याप्रमाणे कार्पेट आणि बिल्टअपमध्ये फरक आहे. छोटी सदनिका असेल तर त्यात विकासक जास्त गडबड करतात. साधारणपणे स्वयंपाकगृह हे नेहमी 7x10 असते. त्या स्वयंपाकगृहाचा कार्पेट एरिया 70 फूट होतो. परंतु या स्वयंपाकगृहाचा बिल्टअप एरिया 97.95 चौ.फुट मोजला जातो. रेडीरेकनर प्रमाणे त्या स्वयंपाकगृहाचा कार्पेट एरिया 70 चौ.फुटाऐवजी 81 येतो. विकासकाच्या कोस्टकाप्रमाणे त्या स्वयंपाकगृहाचा बिल्टअप एरिया 84 चौ.फुट येतो. 97.95 चौ.फुटाचा 84 चौ.फुट बिल्टअप एरिया येतो आणि 70 चौ.फुटाचा 81 चौ.फुट येतो. हे सगळे तांत्रिक घोळ आहेत. हे घोळ कसे निस्तारणार हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. विकासकाला गाळे विकण्यासंदर्भात कायदेशीर दिशा द्यावयाची असेल तर ती पध्दतशीर असली पाहिजे. ती दिशा तांत्रिकदृष्ट्या शुध्द करुन दिली पाहिजे. आपण अनॉमली असा शब्द वापरतो. एखादी गोष्ट वादातित असेली तरी तर त्यात वादातित गोष्टी कमीत कमी असल्या पाहिजे. कोणताही कायदा परिपूर्ण नसतो, म्हणून कायद्यात नेहमी परिवर्तन होत असते. कायदा करणे, त्यात परिवर्तन करणे हा एक विधिमंडळाच्या कामकाजाचा एक भाग आहे. पूर्वी जे कायदे झाले, ते कायदे त्यांच्या दृष्टीने परिपूर्ण होते. परंतु आता काळ बदलला आहे. वेळ बदलली आहे. परिस्थिती बदलली आहे. गरजा बदलल्या. मागण्या बदलल्या. त्यास अनुसरुन ज्यावेळी या सर्व गोष्टी घडतात, त्यावेळी कायद्यामध्ये परिवर्तन होत असतात. तेव्हा केलेला कायदा हा बरोबर नव्हता असे म्हणता येणार नाही. परंतु परिस्थितीनुरुप आपण कायद्यात परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न करीत असतो. आज या सभागृहापुढे जे विधेयक मांडण्यात आले आहे. त्या विधेयकाची संकल्पना काय आहे ही बाब स्पष्ट होत नाही. मी या विधेयकातील तरतुदीच्या बाबतीत जी काही माहिती देणार आहे ती अतिशय गंभीर आहे. ती माहिती ऐकल्यानंतर आपणच हे विधेयक मागे घेण्याचे शासनाला आदेश देऊ शकतात. या ठिकाणी सामायीक सेवा यासंदर्भातील उल्लेख केलेला आहे. सामायीक सेवासंदर्भात आपण या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी माहिती वाचून दाखविली. It is standard Agreement for Sale. Every Builder prepares his own Agreement as per his requirements and terms. It is a language. विकासकाच्या गरजेप्रमाणे भाषा वापरलेली आहे. स्टॅन्डर्ड ॲग्रीमेंटमधील मजकूर या ठिकाणी वाचून दाखविला. परंतु या ठिकाणी सामायीक सेवा म्हणजे काय

2...

श्री. दिवाकर रावते....

यासंबंधीची माहिती का दिली नाही ? या संदर्भात शासनाकडून अतिशय फसवाफसवी केली जात आहे, ती निषेधार्ह आहे. एका ठिकाणी सांगता की, विकासकाने सर्वसामान्य ग्राहकांना फसवू नये म्हणून आम्ही चटईक्षेत्र निर्देशांकाप्रमाणे विक्रीचा कायदा आणतो आहोत. परंतु तो कायदा निर्भळ आहे काय ? तो निर्भळ नाही म्हणून मी उपसूचना दिली होती. ती मागे घेण्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी विनंती केली, त्या अनुषंगाने मी बोलतो आहे. विकासकांकडून सदनिकांचे चटईक्षेत्र कसे मोजले जाते यासंबंधीचा पूर्णपणे मी खुलासा केला आहे. मी उपसूचना मांडली होती ती अशी होती की, " ओळ क्रमांक 9 आणि 10 वगळण्यात यावी." पोटकलम "ड" मधील ओळीमध्ये असे म्हटले आहे की, "चटईक्षेत्रानुसार केवळ सदनिकेची विक्री करेल," परंतु... शासन कसली बनवा बनवी करीत आहे ? बिल्टअप, सुपर बिल्टअपने सदनिकेची विक्री करु नये असे शासनाने विकासकांना आदेश दिले आहे. परंतु पूर्वीप्रमाणेच आजही सदनिकांची विक्री होत आहे. पोटकलम "ड" मधील ओळीमध्ये असे म्हटले आहे की, चटईक्षेत्रानुसार केवळ सदनिकेची विक्री करेल, परंतु त्याच ओळीत पुढे असे म्हटले आहे की, परंतु सदनिकेच्या चटईक्षेत्राच्या प्रमाणात सामायीक क्षेत्राकरिता स्वतंत्र आकार लावता येईल. तुम्ही कोणत्याही गोष्टीवर चार्ज लावू शकता. सामायीक सेवा म्हणजे काय ? सामायीक सेवेची व्याख्या दिलेली नाही. त्याची या स्पष्टता केलेली नाही. विकासक हा सामायीक सेवा कशा कशाला म्हणणार ? या विधेयकात सामायीक सेवेच्या बाबतीत कुठेही स्पष्टता केलेली दिसून येत नाही. मला वाटले की, सामायीक सेवेची व्याख्या कायद्याच्या व्याखेत नसेल म्हणून मी विधेयकातील उद्देश व कारणे वाचण्याचा प्रयत्न केला. या विधेयकाच्या उद्देशामध्ये माननीय मंत्री महोदय, आपण असे म्हटले आहे की,.......

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 18:15

श्री.दिवाकर रावते........

"महाराष्ट्र शासनाने अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी, एक नवीन गृहनिर्माण धोरण घोषित केले असून त्यामध्ये इतर गोष्टीबरोबर, सदनिकांच्या खरेदीचा व विक्रीचा व्यवहार हा केवळ चटई क्षेत्राच्या आधारे करण्यात येईल, अशीही तरतूद आहे."

सभापती महोदय, सह्याद्री अतिथीगृहामध्ये यासंबंधी चर्चा झाली होती. मी त्या चर्चेमध्ये भाग घेतला होता. मी जे काही मत मांडले त्याची नोंद मंत्रीमहोदयांकडे आहे. त्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा व्हायची होती. "उक्त धोरण अंमलात आणण्यासाठी प्रवर्तक सदनिकेच्या चटई क्षेत्राच्या आधारे सदनिकेची विक्री करील आणि त्यास अशा सदनिकेच्या चटई क्षेत्राच्या प्रमाणात सामाईक क्षेत्राकरिता व सुविधांकरिता स्वतंत्र आकार लावता येईल. या तरतुदी करण्यासाठी, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, 1963 यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. वरील उद्दीष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे." उद्देश व कारणामध्ये याचे स्पष्टीकरण आलेले नाही. मला वाटले होते की, मंत्रीमहोदय सभागृहामध्ये सांगतील. सभापती महोदय, आपण स्वत: दोन वेळा मंत्रीमहोदयांना या संदर्भात विनंती केली. तिसऱ्या वेळी त्यांनी कागद काढला आणि वाचून दाखविला. त्यामध्ये सुध्दा सामाईक क्षेत्राबाबत स्पष्टीकरण नव्हते. सामाईक क्षेत्रामध्ये काय काय येईल हे सांगितलेले नाही. विधेयकामध्ये त्याचे स्पष्टीकरण नाही. मग हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवू नये असे का सांगत आहात? संयुक्त समितीमध्ये या संदर्भात चर्चा होऊन व्याख्या ठरविणे आवश्यक आहे. पूर्वी सुपर बिल्टअपची व्याख्या केलेली होती. 40 ते 50 टक्के कार्पेट एरियावर लोड करायचा अशी सुपर बिल्टअपची व्याख्या होती. आता शासनाने आणखी गडबड केलेली आहे. सामाईक क्षेत्रामध्ये काय काय येईल? जीना, स्टेअरकेसचा सुपर बिल्टअपमध्ये समावेश असतो. Super built up area not to be measured, not to be counted. लिफ्टवेल त्यामध्ये येईल. त्यानंतर मोकळी जागा म्हणजे स्टेअरकेस पॅसेज, जीना, उद्वाहन याचा समावेश होईल. आता कॅप्सूल लिफ्ट असतात. आतून बॉक्स असतो. जमिनीपासून दीड फुटावर असला तरी एलिव्हेशन ट्रिटमेंटमध्ये जाते. त्याची पुन्हा मोजणी होणार आहे. It is not in carpet area. तो पोर्शन कार्पेट एरियामध्ये इन्क्लूड होणार आहे. तुम्ही सांगितले की, बाल्कनी 50 टक्के असली पाहिजे. आता ती तुम्ही 100 टक्के करुन टाकली आहे.

..2..

श्री.दिवाकर रावते........

तिला फ्लॉवर बेड असतो, ती पाच ते सहा इंच वर असते. पूर्वी बाल्कनी चार इंच खाली असायची. आता ती एकच होते. त्यासाठी प्रिमियम घेतला जातो. ही प्रिमियमची तरतूद मी मुंबई महापालिकेत असताना करुन घेतली होती. मध्यमवर्गीय लोकांनी ती आतून बंद केलेली असायची. महापालिकेचे अधिकारी ती बाल्कनी तोडून त्यांचे नुकसान करायचे. श्री.तिनईकर महापालिकेचे आयुक्त असताना त्यांनी सहकार्य केले. व्यावहारिक दृष्टीकोन कसा असू शकतो? मी त्यांना सांगितले, या संदर्भात रोज तक्रारी येत आहेत. हा मध्यमवर्गीय माणूस आहे. बाल्कनी बंद करण्यासाठी चार-पाच हजार रुपयांचा खर्च करतो. महापालिकेचे अधिकारी तेथे जातात व हप्ता द्या सांगतात किंवा ती बाल्कनी तोडून टाकतात. मग आपण बाल्कनी क्लोजरसाठी प्रिमियम आकारु असे मी त्यांना सुचविले.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

मी स्थायी समितीचा अध्यक्ष असतांना हे करुन घेतले आहे. त्यावेळी इन्क्लूड करुन तो प्रिमीयम लावला. त्यानंतर स्टील्ट पोर्शनमध्ये गॅरेज येते व त्याचे मिनिमम चार्जेस लावून महापालिकेला उत्पन्न मिळते, अशा प्रकारे त्यावेळेस करुन घेतले आहे. हे आम्ही महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने तर केलेच परंतु अशा प्रकारे बेकायदेशीर कामे जी चालत होती ती थांबविणे हा सुध्दा त्यातील उद्देश होता. परंतु आता या विधेयकात आणखी काय केले तर फ्लॉवर बेल्ट हा प्रकार आणला. फ्लॉवर बेल्ट एक तर 4 इंच खाली किंवा वर असा पार्ट ऑफ द प्रिमायसेस, सदनिकेचा तो भाग नाही आणि बाहेरुन ग्रील लावली की ती जागा आतमध्ये येईल व तो कारपेट एरिया म्हणून गणला जाईल अशी यात दुरुस्ती आणली आहे. सामाईक क्षेत्रात तसेच सुविधांमध्ये कशाचा अंतर्भाव येतो हे मात्र स्पष्ट केलेले नाही. एलिव्हेशनच्या बाबतीत या नवीन नियमाप्रमाणे कमीत कमी 20 चौ.मीटर म्हणजेच 250 चौ. फूट व जास्तीत जास्त 2000 चौ. फूट इतक्या क्षेत्राची व्यायाम शाळा मंजूर होते. त्यानंतर क्लब हाऊस, स्विमिंग पूल, जॉगिंग पार्क, गार्डन, कार्यालय या सर्व सोई-सुविधा झाल्या. त्यासाठी या विधेयकात असा शब्दप्रयोग आहे की, यासाठी स्वतंत्र आकार लावता येईल, परंतु चटई क्षेत्राच्या प्रमाणात, प्रपोर्शनेट टू कारपेट एरिया, यू कॅन चेंज. मजल्याचा व जिन्याचा भाग हा पूर्वी समजा एकाच मजल्यावर चार फ्लॅट्स असतात, ते वेगवेगळ्या मापाचे असले तरी चौघांवर डिव्हाईड होत होता परंतु तो आता प्रपोर्शनेट करुन टाकला परंतु यासंबंधीची स्पष्ट व्याख्या दिलेली नाही. आपण जो उल्लेख यामध्ये केला त्यावरुन चटई क्षेत्राची स्पष्टता नाही त्याप्रमाणे सामाईक क्षेत्राची सुध्दा स्पष्टता दिसून येत नाही, कसलाही बोध होत नाही. सुविधा कोणत्या म्हणता येतील तर लिफ्ट, लिफ्टचा पिंजरा परंतु त्या लिफ्टला लागणारी मशीन म्हणजे सुविधा. कारण मशीन नसेल तर ती चालू शकणार नाही. ही ॲडिशनल सुविधा, इट इज डिफाईन्ड. त्यानंतर वाहनतळाचाही उल्लेख यात केला आहे. पूर्वी ओपन जागेत पाच सहा वाहने राहतील अशी परिस्थिती होती. परंतु नवीन नियमाप्रमाणे त्या इमारतीमध्ये किमान वाहनतळ असले पाहिजे. ती बांधलेली असली पाहिजेत. रस्त्यावर कोणाचेही वाहन असता कामा नये. कुठलीही इमारत बांधावयाची असली तरी त्याचे सुरुवातीच चार मजले वाहनतळासाठी असतात, त्यानंतर इमारत सुरु होते. त्या वाहनतळात नियमाप्रमाणे 35 चौरस मीटर म्हणजेच

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

350 चौ.फूट ते 45 चौ.मीटर म्हणजेच 450 चौ.फूट अशा चार सदनिका असतील तर त्यासाठी एक वाहनतळ. म्हणजे 350 ते 450 चौ. फूटाच्या चार घरांपैकी कोणीतरी नॅनो गाडी तरी घेऊ शकेल असे गृहित धरुन ही व्यवस्था अगोदरच केली आहे. परंतु एखादी चांगली व दुधाळ म्हैस 1.10 लाखाला येते आणि इकडे नॅनो गाडी मात्र 1.00 लाख रुपयाला मिळते, मग ती कोणीही घेऊ शकेल. त्यानंतर 5 ते 70 चौरस मीटर म्हणजेच 475 चौ.फूट ते 750 चौ. फूट अशा सदनिका असतील तर दोन आणि त्याच्या पुढील म्हणजेच 700 चौ. फूटापेक्षा जास्त एरिया असलेल्या सदनिका असतील तर प्रत्येकी एक वाहनतळ अशी तरतूद सुविधा या नावाखाली नवीन कायद्यामध्ये आहे. असे चार मजले सुरुवातीला वाहनतळ आणि त्यानंतर इमारत सुरु होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

वाहनतळाचे तुम्ही आता काय करणार आहात? मधील एरिया बिल्टअप, कार्पेट झाला तर त्याला तुम्ही प्रपोर्शनेटने देणार आहात काय? वाहनतळासाठी काय दर लावले जाणार आहेत? वाहनतळ ही सेवा आहे. ही सेवा सामायिक क्षेत्रात येते किंवा सुविधांमध्ये सुध्दा येते. त्यामुळे वाहनतळ सुविधेत धरणार की, सामायिक क्षेत्रात धरणार आहात ? वाहनतळ सुविधेमध्ये घेतले तर त्यासाठी किती पैसे घ्यावयाचे आणि सामायिक क्षेत्रात धरले तर त्यासाठी किती पैसे घ्यावयाचे? या सभागृहात जेवढी जागा आहे त्या जागेमध्ये सुध्दा 5-7 वाहने राहू शकतील. वाहनतळाच्या संदर्भात या कायद्यामध्ये काहीही सांगण्यात आलेले नाही परंतु वाहनतळाच्या संदर्भात शब्द आणलेला आहे. वाहनतळाच्या संदर्भात या कायद्यात काहीही तरतूद केलेली नाही. वाहनतळाच्या संदर्भात आपण स्टँप डयूटी कशी ठरवणार आहात? सरकारचे रेडीरेकनर बिल्टअप एरियाचे आहे. बिल्टअप एरियाप्रमाणे भाव ठरत असतो. ज्यावेळेस सदनिकाचे व्हॅल्यूएशन झाल्यानंतर स्टँप डयूटी भरावी लागते. सुपर बिल्टअपवर स्टँप डयूटी भरावी लागत असते. ज्यावेळेस महसूल खात्याचे कुलकर्णी वतनाच्या संदर्भात विधेयक येईल त्यावर आम्ही आमचे स्पष्ट विचार मांडणार आहोत. महसुलच्या विधेयकाला बराच वेळ लागणार आहे. त्यामुळे हे विधेयक तुम्ही घाई घाईने पास करु नका. या विधेयकासाठी सकाळी वेळ दिला तरी हरकत नाही परंतु या विधेयकाच्या संदर्भात आम्हाला खूप काही विचार मांडावयाचे आहेत. प्रश्न असा आहे की, स्टँप डयूटी कशी लावणार? करार पत्रामध्ये काय धरणार? सामायिक क्षेत्रात सुविधा दिल्या तर त्याला स्टँप डयूटी लागणार की, चटई क्षेत्राला लागेल? चटई क्षेत्राला स्टँप डयूटी लागत असेल तर यासंदर्भात जे कोष्टक दिलेले आहे ते म्हणजे कारपेट एरिया मल्टीप्लाय बाय 1.2 इज इक्वल टू बिल्टअप एरिया. म्हणजे प्रत्यक्षात आम्हाला मिळालेले चटईक्षेत्र आणि तुमच्या कोष्टकाप्रमाणे धरले तर त्यामध्ये खूप फरक पडतो. त्यामुळे यासंदर्भात आपण काय करणार आहात? या विधेयकाच्या संदर्भातील प्रश्न अनुत्तरीत आहेत.. आम्हाला माहिती आहे की, आम्ही विधेयकावर कितीही बोललो तरी आपण फक्त ऐकतात. सभापती महोदय, सुदृढ लोकशाही कशाला म्हणतात? विधेयक सभागृहात आल्यानंतर विरोधकांनी त्या विधेयकाच्या उणीवा दाखवल्या आणि त्या उणीवा खरोखरच योग्य असतील तर ते विधेयक सन्मानाने मागे घेऊन उणीवा भरुन काढल्या पाहिजेत. तुम्ही आणि आम्ही या ठिकाणी एकमेकाला

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

विरोध करण्यासाठी बसलो नसून चांगला कायदा निर्माण करण्यासाठी बसलेलो आहोत. या सदनात सत्तारुढ पक्षाकडून अशाच प्रकारे पाहिले जात आहे. विरोधकांना बोलायचे तेवढे बोलू दे, ओरडायचे तेवढे ओरडू देत, बहुमताच्या जोरावर आम्ही सर्व मंजूर करुन नेऊ. पापाच्या टोपल्या डोक्यावर ठेवून तुम्हाला जेवढया वाहायच्या असतील तेवढया वाहा.. मात्र तुम्ही आणि आम्ही एकमेकांच्या विरोधात या सदनात उभे नाही. कायद्यात बदल करण्याची आवश्यकता असली तर सरकारने तशा प्रकारचा बदल केला पाहिजे. कायद्याची योग्य ती चिरफाड करुन योग्य तो कायदा बनवणे ही या सभागृहाची जबाबदारी आहे. विधेयकाला पक्ष किंवा विरोधक नसतात. विधेयकाच्या संदर्भात उणीवा लक्षात आल्या तर त्यासाठीच संयुक्त चिकित्सा समितीची फट ठेवण्यात आलेली आहे. कायदा विथड्रॉ करावयाचा नसतो, कायदा मागे घ्यायाचा नसतो तर कायदा चांगल्या प्रकारे तयार करण्यासाठी या कायद्याला संयुक्त चिकित्सा समितीकडे न्यावयाचे असते. यासाठी मुदत ठरवून दिलेली आहे. एखादा कायदा किचकट असेल तर अशा कायद्याला संयुक्त चिकित्सा समितीमध्ये वेळ लागत असतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 18.30

श्री.दिवाकर रावते ....

एखादा कायदा जर किचकट असेल तर त्या संदर्भात अभ्यास करण्याकरिता संयुक्त चिकित्सा समितीमध्ये वेळ लागेल. त्यामुळे संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधयेक पाठविण्यात आल्यानंतर पुढच्या अधिवेशनामध्ये यासबंधीचे विधेयक मंजुरीसाठी मांडण्यात यावे. आपण सुदृढ लोकशाही कशाला म्हणतो ? एखादे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविल्यानंतर ते विधेयक पुन्हा सभागृहात मांडण्यात येते त्यावेळी जे संयुक्त समितीचे सदस्य असतात त्यांना या विधेयकावर बोलण्याचा अधिकार नाहीत असे संकेत आहेत. त्यांनी डिसेंट नोट दिली असेल तर ते भाषण करु शकतात अन्यथा त्यांना येथे भाषण करता येत नाही. बाकीच्या सदस्यांनी काहीही म्हटले तरी ते विधेयक मंजूरच करावे लागते आणि ते विधेयक मंजूर होतेच असे संकेत आहेत. लोकशाहीने अशा प्रकारे ज्या पाय-या निर्माण केलेल्या आहेत त्या टाळता कामा नयेत. त्या पाय-या ओलांडता कामा नयेत . त्यातून एक सुदृढ कायदा तयार झाला पाहिजे. जनतेच्या हिताचे रक्षण करण्याची सद्‌भावना जर शासनाच्या मनात असेल तर सुदृढ कायदा तयार केला पाहिजे. परंतु ही सद्‌भावना शासनाच्या मनात नाही असे आम्हाला जाणवत आहे. शासन कशासाठी या पाय-या ओलांडत आहे ?. या ठिकाणी मी जे काही सागितलेले आहे, त्या बाबतीत शासनाच्या अधिका-यांना माझे आव्हान आहे.मी या व्यवसातून बाहेर आलेलो आहे. त्यांनी जे सांगितलेले आहे ते जर योग्य असेल तर त्यांनी मला त्या बाबतीत सांगावे.मी त्यांच्याशी दूरध्वनीवरुन बोलतो. त्यांनी मला सांगावे की अमुक गोष्ट मला योग्य वाटते अमुक गोष्ट योग्य वाटत नाही. ज्या कायद्याला व्याख्या नसते असा कायदा कधीच बनत नाही.या कायद्याची अंमबजावणी करणा-या अधिकाऱ्याला त्या कायद्याचे पूर्ण ज्ञान नसेल असा कायदा कधीच बनत नाही. तेव्हा अशा प्रकारचा कायदा आपण का बनवत आहात? या कायद्यातून कोणासाठी पळवाटा निर्माण करीत आहात .मी घेतलेल्या 700 स्केअर फूटाच्या फ्लॅटमध्ये मी कसा राहत आहे.? त्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांनी जो उल्लेख केला होता तो ऐकल्यानंतर मला वाईट वाटले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनामध्ये उत्तर देत असंताना कधीही गैरसमज निर्माण करुन घ्यावयाचा नसतो. सभागृहाच्या गॅलरीमध्ये जे अधिकारी बसलेले असतात त्यांनी योग्य असे वर्जन त्यांच्याकडे द्यावयाचे असते आणि मत व्यक्त करावयाचे असते.प्रत्येक अधिका-याच्या ज्ञानाप्रमाणे ते मत असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

सभापती महोदय, कुलकर्णी वतना संबंधीचे विधेयक ज्यावेळी चर्चेसाठी येईल त्यावेळी मी सविस्तर बोलणार आहे.श्री.रामानंद तिवारी आता निवृत्त झालेले आहेत. परंतु त्यांनी गिरणी कामगारांनी टॉवरमध्ये रहावयाचे नाही काय अशा प्रकारे मोठे भाषण ठोकले होते.त्यानी टॉवरमध्ये राहण्यास कोणीही नाही म्हणत नाही. परंतु टॉवरमध्ये त्यांनी रहावे अशा प्रकारची त्यांची ऐपत बनवली पाहिजे. सरकारने या गिरणी कामगारांची तशी ऐपत बनवावी. 36 व्या मजल्यावर 225 स्केअर फुटाची सदनिका घेऊन राहणा-या माणसाची काय स्थिती होईल या बाबतीत मी आपल्याला एक उदहारण देतो. माझी इमारत 12 मजल्याची आहे आणि तेथील लिफट बंद पडली तर तेथील लोक सक्षम असले तरी लिफट दुरुस्त करण्यासाठी सहा सहा महिने पैसे जमा करीत नाहीत. त्यामुळे ही लिफट लवकर दुरुस्त होत नाही व लोकांना जीने चढून जावे लागते. या टॉवरमध्ये तर गिरणी कामगार राहणार आहेत.त्यांची आर्थिक स्थिती तर नाजूक आहे. त्यांच्याकडे उदरनिर्वाहाचे साधन नाही. असे गिरणी कामगार जर 12 किंवा 14 मजल्यावर रहावयास गेला आणि त्या इमारतीची लिफट जर बंद पडली तर त्याला जीने चढून जावे लागेल. आमच्या इमारतीसाठी 12 मजल्याची लिफट बनविण्याकरिता 13 लाख रुपयांचे कोटेशन काल देण्यात आलेले आहे. आज आपण 36 मजल्याचे टॉवर बनवत आहात आणि त्या इमारतीमध्ये गिरणी कामगारांना राहण्यासाठी घर देणार आहात. तेव्हा अभिमानाने असे सांगण्यात आले होते की, गिरणी कामगाराने टॉवरच्या इमारतीमध्ये रहावयाचे नाही काय ? त्याने जरुर या टॉवरच्या इमारतीमध्ये रहावे. 225 स्केअर फुटाच्या घरामध्ये तो राहणार आहे. त्याचे टॅक्स भरण्यासाठी सवलत देण्यात येणार आहे .एस.आर.ए. अंतर्गत टॅक्स भरण्याच्या संदर्भातच आपण त्यांना सवलत देणार आहात. परंतु पाण्याचे आणि विजेचे बिल भरण्याच्या बाबतीत मात्र कोणतीही सवलत दिली जाणार नाही. 36 मजल्यासाठी कायद्यानुसार पाच लिफटस् लागतील. त्या लिफटच्या मेन्टेनन्स चा खर्च कोण करणार आहे? इतर सोसायटयांमध्ये सुविद्य लोक राहतात व ते समजू शकतात परंतु गिरणी कामगार ज्या टॉवरच्या इमारतीत राहतात त्या इमारतीची लिफट जर बंद पडली तर तो वरच्या मजल्यावरील फलॅटमध्ये कसा जाईल ? एखाद्या इमारतीला बाहेरुन रंग द्यावयाचा असेल तर सात ते आठ लाख रुपये लागतात. 15 व्या 17 व्या किंवा 28 व्या मजल्यावरील नळाचा पाईप तुटला तर त्याची दुरुस्त करण्यासाठी जी परात बांधावी लागते त्याला 25 ते 28 हजार रुपये

3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

लागतील. असा मुद्दा मी मांडला होता. तेव्हा माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, " हल्ली लोकांना काय काय वाटते, त्यांनी मेन्टेनन्सचा विषय काढला आहे. आम्ही त्या कामगारांना मोफत घर दिले आहे आणि मेन्टेनन्ससंबंधीचा विषय येथे काढण्यात आला आहे. वगैरे वगैरे " अर्थात मी हा विषय का उपस्थित केला या संदर्भात अधिकाऱ्यांनी त्यांना नीट समजावून सांगितले नाही. त्यांनी जर व्यवस्थित समजावून सांगितले असते तर मुख्यमंत्र्या सारख्या उच्च पदस्थ व्यक्तिमत्वाकडून अशा प्रकारचे कॉमेन्टस करण्यात आले नसते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

मी एवढेच म्हटले की, 5 माळ्याची इमारत बांधा, तेथे कॉमन गॅलरी द्या, त्याचे जीवन त्याला जगू द्यात. तुम्ही 225 चौ.फूटाची सदनिका आता त्याला देणार आहात. तुमचे तिवारी साहेब व्याख्यान देऊन गेले. तेव्हा अशा प्रकारे विक्रीमध्ये सामाईक सेवांखाली कोठेही काही नाही म्हणून माझी आपल्याला नम्रतेने विनंती आहे की, तुम्हाला, सरकारला योग्य कायदा खरोखरी करायचा असेल तर आणि कायदा करणाऱ्या आपल्या अधिकाऱ्यांकडून जनतेला न्याय द्यायचा असेल तर या सदनामध्ये व्यक्त झालेल्या भावनांचा आदर करून, त्या भावना लक्षात घेऊन आपण आणलेला कायदा, त्यातील दुरूस्त्या मागे घ्याव्यात आणि हा कायदा सुधारण्यामागील आपला हेतू प्रामाणिक असेल तर चटईक्षेत्र निर्देशांकाप्रमाणे लोकांना लाभ दिला पाहिजे असे वाटत असेल तर आपण मी जी उपसूचना मांडली आहे त्यानुसार त्या दोन ओळी कायद्यातून काढून टाकण्यास मान्यता द्या. त्यानंतर मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, आपण उत्तर देताना रेडी रेकनर कसे बनविणार आहात हेही आपणाला सांगावे लागेल. कारण ते तुमचे खाते बनवित नाही तर महसूल खाते बनविते, ते रेडी रेकनरमध्ये बदल करीत असतात. म्हणून हा कायदा परिपूर्ण `नाही. किंबहुना तो विकासकांना आणखी बनवाबनवी करण्याची संधी देणारा आहे आणि गाळेधारकांना नक्की कळणार नाही की, त्याने नेमके काय आणि किती खरेदी केले आहे. यात चटईक्षेत्राची व्याख्या आहे ती भारत सरकारने जे मानांकन केलेले आहे त्याप्रमाणे केलेली नाही त्यामुळेच हे विधेयक आपण संयुक्त चिकित्सा समितीकडे अधिक विचारार्थ द्यावे आणि तसे ते द्यायचे नसेल तर मी आपल्याला यातील 0 वी आणि 10 वी ओळ काढून टाकण्याची जी उपसूचना केली आहे ती मान्य करून त्या ओळी काढून टाकाव्यात आणि मगच तुमचा हे विधेयक आणण्यामागील हेतू स्वच्छ आहे असे सांगा एवढेच मी आपल्याला सांगू इच्छितो. जयहिंद जय महाराष्ट्र.

***



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, चटईक्षेत्राच्या आधारे सदनिकांची खरेदी-विक्री करण्यासंबंधातील हा जो कायदा आपण आणला आहे तो सर्व सामान्य माणसाला आगीतून फुफाट्यात नेणारा आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी आपण आणलेल्या या सुधारणांची जी चिरफाड केली आहे त्यानंतर तर तुम्हाला वस्त्र सावरायला देखील ठेवले नाही. म्हणून मी या संदर्भात केवळ दोनच मुद्दे मांडणार आहे. सभापती महोदय, हा जो कायदा आपण आणत आहात त्यातून तरतूद करीत असताना ही जी व्याख्या आहे, खास करून सामाईक क्षेत्र आणि सुविधा या संदर्भातील, त्याबाबत तुम्ही स्पष्टीकरण करावे की, तुम्ही या बाबत नक्की काय करणार आहात ? आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी सांगितल्याप्रमाणे लिफ्ट पासून सगळ्या बाबी त्यात येतात, त्यामध्ये व्हरांड्याचा उल्लेख त्यांच्याकडून राहून गेला होता, तो मी मुद्दाम येथे करतो आहे. त्या वाहनतळाच्या बाबतीत देखील हा कायदा तेवढ्या पुरता मर्यादित नाही हे सगळ्यांसाठी लागू होणार आहे. त्यामुळे जे प्रचंड श्रीमंत आहेत त्यांना काहीच फरक पडणार नाही. परंतु मध्यमवर्गीय मात्र यामुळे होरपळून निघणार आहेत. युएलसी कायदा आपण रद्द केला त्यामुळे असा काय मोठा फरक पडला आहे ? युएलसी कायदा रद्द केल्यामुळे जागांचे भाव धडाधडा कमी होतील, कोसळतील आणि मध्यमवर्गीयांना स्वस्तामध्ये घरे मिळू लागतील असे सांगितले जात होते. पण प्रत्यक्षात काय घडले आहे ? प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. मग त्याचा विचार या संदर्भात देखील आपण करणार आहात की नाही ? युएलसी रद्द केल्याने उलटपक्षी भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. आता हा कायदा येणार म्हटल्यावर जी काही लूटालूट करायची ती करून घ्या अशीच भूमिका आणि विचारसरणी बिल्डरांची राहिली आहे. तेव्हा याची डेट ऑफ इफेक्ट काय आहे ? ज्या खरेदीदाराने रेडी पझेशन सदनिका घेतलेली नाही आणि आता केवळ बुकींग केले आहे त्यांच्या संदर्भात हा कायदा कसा लागू होणार आहे ? चटईक्षेत्र आपण कसे मोजणार आहात ? या संबंधातील जो जुना कायदा आहे त्यामध्ये 15 टक्के, 20, 25, 30, 40 टक्के लोडींग आहे. त्यामध्येदेखील गडबड आहे, प्रचंड लोडींग आहे. ....

( यानंतर सौ. रणदिवे ....4बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 18:40

श्री.अरविंद सावंत . . . .

म्हणजे एखाद्याला विचारले की, किती स्वे.फू.जागा धेतली आहे ? तर त्या व्यक्तीने 500 स्वे.फू.किंवा 700 स्वे.फू.एरियाचा फ्लॅट घेतला असेल तर 40 टक्के लोडींग म्हटल्यानंतर 700 स्वे.फू. जागेतील 280 स्वे.फू.जागा गेली. मग त्या माणसाला किती कारपेट एरिया मिळाला ? मग रेडीरेकनरच्या व्याख्येनुसार त्या कारपेट एरियामध्ये भिंती, त्यांची जाडी, टॉयलेट इ.गोष्टी आल्या. त्यामुळे प्रत्यक्षात त्या माणसाच्या हातामध्ये काहीच मिळत नाही. म्हणून चटई क्षेत्राचा मुद्दा रास्त आहे. पण जेव्हा तुम्ही त्या मुद्याला अनुसरुन दुसऱ्या बाजूला पळण्याची वाट ठेवली जाते, ते मात्र आक्षेपार्ह आहे. म्हणजे एका बाजूला भाव कमी करावयाचे आणि दुसऱ्या बाजुने वसूल करावयाचे. तुम्ही कोणता फरक केला ? तेव्हा हा फसविण्याचा धंदा बंद करावा. सभापती महोदय, खरे सांगावयाचे तर लोडींग ठेवले तरी हरकत नाही. पण 15 टक्के पेक्षा अधिक लोडींग टाकता येणार नाही असे जर या कायद्यामध्ये नमूद केले असते तर सर्वसामान्य माणसाला आपोआप तेवढा कारपेट एरिया मिळाला असता. समजा 800 चौ.फू.चा फ्लॅट असेल आणि 15 टक्के लोडींग असेल तर मग 15x 8 = 120 चौ.फू.गेल्यानंतर उरलेला कारपेट एरिया त्याला मिळाला पाहिजे. असे झाले असते तरी ठीक आहे. पण प्रत्यक्षात 40 टक्के लोडींग ठेवले जाते. एक हजार स्वे.फू.चा फ्लॅट असेल तर सध्याच्या लोडींगनुसार आपल्या हातात 600 स्वे.फू.जागा येणार आहे. केवळ एक हजार स्वे.फू.चा फ्लॅट आहे असे सांगावयाचे. यामध्ये आणखी एक आक्षेपार्ह बाब म्हणजे बाल्कनी.म्हणजे आज जी सुविधा आहे, ती तुम्ही काढून घेत आहात. बाल्कनीसाठी 50 टक्के दर आकारला जातो. पण तुम्ही आता 100 टक्के दर आकारण्याची मुभा दिलेली आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी जो प्रस्ताव दिलेला आहे, त्यावर आम्ही सर्वांनीच स्वाक्षरी केलेली आहे. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना एवढीच आहे की, यासाठी काही कालमर्यादा ठरवावी. एवढा कालावधी झाला आहे, त्यात आणखी दोन महिने जातील.त्यात काय झाले ? हे केवळ निवासी गाळयांसाठी आहे. इत:पर काय होणार आहे ? म्हणजे व्यावसायिकांच्या बाबतीत काय करणार आहात ? ते देखील कळले पाहिजे. कारण शेवटी हा बांधकामाचा विषय आहे. तेथे देखील चटई क्षेत्राचा मुद्दा येणार आहे. सध्या तुम्ही आय.टी.क्षेत्राला प्रचंड मुभा देत आहात. सभापती महोदय, परवाच आपण ऐकले असेल की, आय.टी.साठी जागा घेतली, तेथे प्रचंड प्रमाणात एफ.एस.आय.वाढवून देण्यात आला, कमी दर आकारण्यात आला.नंतर मात्र प्रत्यक्षात त्या

. . . .4 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

जागेचा आय.टी.साठी वापर केलेला नाही. त्याबाबत ऑब्जेक्शन घेण्यात आली आणि मग पुन्हा हळूहळू सरकत 50 टक्क्यावर आणले. जी जागा घेतलेली आहे, त्यातील 50 टक्के जागा आय.टी.साठी वापरली आणि उरलेली जागा कोणत्याही व्यवसायासाठी, कमर्शिअल परपजसाठी वापरली तर त्याबाबतीत काय केले जाते ? शासनाचा फायदा करता काय ? शासनाच्या तिजोरीमध्ये दोन पैसे तरी येतात काय ? म्हणून सर्वसामान्य माणसाला या बिलाच्या माध्यमातून कसा लाभ होणार आहे ? हे आपण सांगू शकत नाही. सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे. आता एप्रिल महिना सुरु आहे. या बिलाबाबत विचार-विनिमय करण्यासाठी मे, जून व जुलै या तीन महिन्याचा कालावधी द्यावा. या कालावधीमध्ये प्रत्येक क्लॉज बाय क्लॉज चर्चा करुन त्यामध्ये सुधारणा करा. जेणेकरुन सर्वसामान्य माणसाला आधार मिळेल. जुलै महिन्यामध्ये पावसाळी अधिवेशन असते. तेव्हा हे विधेयक परत आणावे. पण प्रत्यक्षात काय स्थिती आहे ? जे बिल्डर आहेत, त्यांनी निश्चिंत रहावे. आम्ही या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना सुरुवातीलाच तुम्हाला पळवाट दिलेली आहे, आम्ही लोकांची फसवणूक करण्यासाठी, त्यांचे वरपांगी समाधान करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही. तुमच्यासाठी शासन सावध आहे आणि त्यासाठीच आम्ही हे विधेयक आणलेले आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हे पाप करु नका. हे विधेयक मागे घ्यावे आणि संयुक्त चिकित्सा समितीकडे हे बिल पाठवावे, त्यासाठी तीन महिन्यांची मुदत ठेवावी आणि यामध्ये सुधारणा कराव्यात. मग त्या सुधारणांसह हे विधेयक सदनापुढे मांडावे. मी माननीय मंत्री महोदयांना परत एकदा विनंती करतो की, त्यांनी हे विधेयक मागे घ्यावे आणि संयुक्त समितीकडे पाठवावे. तीन महिन्याच्या कालावधीनंतर जुलैच्या अधिवेशनामध्ये हे बिल सदनामध्ये आणावे.

(सन्माननीय राज्यमंत्री ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर खाली बसून बोलतात.)

मला वाईट एका गोष्टीचे वाटते की, तुमच्या सारखा सज्जन माणूस यांना गिऱ्हाईक मिळाला आहे. तुमचे नाव प्रीतम आहे आणि ते प्रेमामुळे वाहून जातात. त्यांना कळतच नाही. त्यामुळे माननीय मंत्री श्री.शेगांवकर यांना शेंडी लावतात. त्यामुळे त्यांचे आडनाव शेगांवकर आहे की शेंडीगावकर आहे ? अशी परिस्थिती आहे. म्हणून तुम्ही याबाबतीत सावध रहावे. याठिकाणी तुम्हाला गंडवणारे

. . . .4 बी-3

भरपूर लोक आहेत. वरवर असे बोलतात आणि त्यामुळे आपल्याला वाटते की, आपण लोकांचे किती भले करावयास निघालो आहोत. पण प्रत्यक्षात लोकांचे भले होत नसते, तर दुसऱ्यांचेच भले होत असते. म्हणून कृपया आपल्याला परत एकदा हात जोडून विनंती करतो की, आपण हे विधेयक मागे घ्यावे आणि ते चिकित्सा समितीकडे विचारासाठी पाठवावे. त्यानंतर जुलैच्या अधिवेशनामध्ये सुधारित, सर्वंकष आणि सर्वाधिक लोकांना लाभ मिळेल अशा प्रकारचे बिल आपण सदनामध्ये आणू या. एवढेच बोलून मी आपली रजा घेतो. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकावर सुधारणेबाबत भाष्य केलेले आहे. त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचना पाहण्यात येतील. मोफा अधिनियम, कलम 5 नुसार नियमामध्ये स्पष्टता आणण्यात येईल. विधेयकातील ही कलमे सदनिका विकत घेणाऱ्यांकरिता आहे. त्यांना संरक्षण देण्यात येणार आहे. बिल्डरांनी जनतेची फसवणूक करु नये. या बाबत तपासणी करण्याकरिता सक्षम अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. ॲग्रीमेंटप्रमाणे, विकासकाने सर्व पूर्तता केलेली आहे की नाही, कोणाची फसवणूक तर झालेली नाही ना, याची खात्री करुन घेऊन सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच हा कायदा या पूर्वीच पास करण्यात आलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : या कायद्यामुळे कोणाची फसवणूक होणार नाही काय ?

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी आपले भाषण ऐकले आहे. आपणही त्यांचे भाष्य शांतपणे ऐकून घ्यावे.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, या विधेयकामध्ये स्पष्टता आणण्याकरिता सुधारणा आपण करु या. आज या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. लोकांची फसवणूक होत आहे. बिल्डर लोकांची फसवणूक करीत आहेत. जनतेची पिळवणूक होऊ नये, याकरिता विकासकांच्या विरोधात दंडात्मक कारवाई करता यावी, त्यांना जेलमध्ये पाठविण्याबाबत कारवाई करता यावी या करिता सुधारणा करण्यात येणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याबाबत विचार करण्यात येईल. हे सुधारणा विधेयक मंजूर करावे. सन्माननीय सदस्यांनी संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक पाठविण्याचा आग्रह धरु नये एवढी माझी विनंती आहे.

**सभापती** : आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला.

**सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

Amendment of section 3 of Mah. XLV of 1963

**सभापती** : खंड 2 ला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सुधारणा सुचविली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र सदस्यांद्वारा निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

खड क्रमांक 2, पृष्ठ क्रमांक 2, ओळ क्रमांक 9 व 10 वगळण्यात यावी.

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून असंमत झाली.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 8 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**सभापती** : सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 8 संमत झाले आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**सभापती** : यानंतर सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 4- मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई (समाजास उपयुक्त सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) विधेयक घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाचे आजचे कामकाज आता थांबवावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, उद्या नियम 93 अन्वये जी निवेदने आहेत ती घेतल्यानंतर लक्षवेधी सूचना न घेता बिले घ्यावीत. मी ज्या बिलावर बोलत आहे त्या बिलावरचे भाषण थोडे कमी करीन.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, उद्या नियम 260 अन्वये तीन प्रस्ताव आहेत. त्यामध्ये आजचे प्रलंबित असलेले दोन प्रस्ताव आणि उद्या विरोधी पक्षाकडून देण्यात येणारा प्रस्ताव असे तीन प्रस्ताव आहेत. आजच्या दोन प्रस्तावाला प्रत्येकी अडीच तास याप्रमाणे एकूण पाच तास होतात तसेच तिसरा जो प्रस्ताव आहे त्याला आणखी अडीच तास लागतील. त्यामुळे या प्रस्तावांसाठी साडेसात तास लागतील. तिसरा प्रस्ताव होणार नाही असे म्हटले तरी दोन प्रस्तावांना पाच तास लागतील. या व्यतिरिक्त दोन विधेयके आहेत. त्यामुळे आपण ही विधेयके आज संपवू या. उद्याच्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलल्या तरी आता आपण विधेयके संपवू या.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता बिल घेऊ नका. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितले आहे की, त्यांना बिलावर बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचा प्रस्ताव सकाळी 10.00 वाजता घेणार आहात. उरलेले जे दोन प्रस्ताव आहेत....

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचा जो प्रस्ताव आहे त्यासाठी दोन तास लागतील तसेच आजचे प्रलंबित असलेले दोन प्रस्ताव आहेत त्यासाठी 5 तास लागतील. तेवढ्या वेळेतही ते पूर्ण होणार नाहीत.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचा प्रस्ताव अर्ध्या तासात आटोपणारा आहे.

**सभापती** : त्या प्रस्तावाला एक तास वेळ देतो आणि या बिलांकरिता दुसरा तास देतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ते चालेल.

**सभापती** : उद्या सकाळी 10.00 ते 11.00 वाजेपर्यंत म्हणजे एक तासाचा वेळ सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सकाळी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावासाठी देऊ. त्यानंतर 11.15 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज सुरु करु. सदनाच्या नियमित कामकाजामध्ये औपचारिक काम पूर्ण झाल्यानंतर लक्षवेधी सूचना होणार नाहीत परंतु त्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात येतील. उद्या नियम 93 च्या सूचनेवरील जी निवेदने आहेत ती सुध्दा उद्या न घेता नंतर घेऊ. या ठिकाणी जी दोन विधेयके आहेत ती उद्या घेऊ आणि त्यानंतर नियम 260 अन्वये असलेले प्रस्ताव घेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे तो प्रस्ताव आणि शिक्षणासंबंधीचा प्रस्ताव यामध्ये फारसा फरक नाही. त्यामुळे दोन्ही प्रस्ताव वेगवेगळे न घेता क्लब करुन एकत्रित चर्चा घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : शिक्षणामध्ये हा विषय येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, तो प्रस्ताव खूप मोठा होईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, दोन्ही प्रस्ताव क्लब करण्यास काही हरकत नाही. त्यासाठी विशेष बैठक घेण्याची आवश्यकता नाही. कारण उत्तर तर सारखेच येणार आहे. मी केवळ सूचना केली आहे. त्याशिवाय सकाळी कोरमचा प्रश्न निर्माण होतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला अत्यंत नम्रपणे सांगावयाचे आहे. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना सांगू इच्छितो की, सभागृहात कोरमचा प्रश्न निर्माण होता कामा नये. राज्यपालांनी 12 सदस्यांना नामनियुक्त केलेले आहे. त्यापैकी 2-3 सदस्य वगळता उर्वरित सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. कारण त्यांना निवडणुकीचा, अन्य कसलाही त्रास होत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली पाहिजे.

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या बुधवार, दिनांक 16 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10 ते 11 पर्यंतचा वेळ सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या प्रस्तावासाठी दिलेला आहे. त्यांच्या प्रस्तावासाठी 1 तासाचा मर्यादित वेळ असेल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता सुरु होईल. त्यामध्ये नियमित कामकाज होईल. उद्या लक्षवेधी सूचना कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात येतील. परंतु त्या पुढे ढकलण्यात येतील. त्याचबरोबर नियम 93 ची निवेदनेही होणार नाहीत. त्यानंतर शासकीय विधेयके दाखविण्यात येतील. त्यानंतर नियम 260 अन्वयेचे प्रस्ताव कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात येतील.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 56 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 16 एप्रिल, 2008 रोजीच्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही